मंगल प्रभात

आणि इतर नाटके

साने गुरुजी

मंगल प्रभात आणि इतर नाटके

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B107

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

मंगल प्रभात आणि इतर नाटके : साने गुरुजी

प्रकाशक

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

riyapublications@gmail.com

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

अक्षरजुळणी

रावजी देसाई

मुखपृष्ठ

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक

जयंत प्रिंटर्स

आवृत्ती

१५ ऑगस्ट, २०११

किंमत

रुपये २८०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अनुक्रमणिका

मंगल प्रभात

अंक	प्रवेश		पान नं.
पहिला	प्रवेश पहिला	....	९
	प्रवेश दुसरा	....	१३
	प्रवेश तिसरा	....	१८
	प्रवेश चौथा	....	२०
दुसरा	प्रवेश पहिला	....	२४
	प्रवेश दुसरा	....	२७
	प्रवेश तिसरा	....	३१
	प्रवेश चौथा	....	३४
तिसरा	प्रवेश पहिला	....	३८
	प्रवेश दुसरा	....	४२
	प्रवेश तिसरा	....	४६
	प्रवेश चौथा	....	४७
	प्रवेश पाचवा	....	५२

ते आपले घर

पहिला	प्रवेश पहिला	....	५९
	प्रवेश दुसरा	....	६३
	प्रवेश तिसरा	....	६५
	प्रवेश चौथा	....	६९
	प्रवेश पाचवा	....	७१

दुसरा	प्रवेश पहिला	....	७४
	प्रवेश दुसरा	....	७९
	प्रवेश तिसरा	....	८०
	प्रवेश चौथा	....	८६
	प्रवेश पाचवा	....	८७
	प्रवेश सहावा	....	९०
तिसरा	प्रवेश पहिला	....	९१
	प्रवेश दुसरा	....	९४
	प्रवेश तिसरा	....	९६
	प्रवेश चौथा	....	९८
	प्रवेश पाचवा	....	१००
चौथा	प्रवेश पहिला	....	१०२
	प्रवेश दुसरा	....	१०३
	प्रवेश तिसरा	....	१०३
	प्रवेश चौथा	....	१०५
	प्रवेश पाचवा	....	१०६
	प्रवेश सहावा	....	१०८
	प्रवेश सातवा	....	१११

अस्पृश्योद्धार

प्रवेश पहिला	....	११७
प्रवेश दुसरा	....	१२०
प्रवेश तिसरा	....	१२३
प्रवेश चौथा	....	१२५
प्रवेश पाचवा	....	१२६
प्रवेश सहावा	....	१२८
प्रवेश सातवा	....	१२९
प्रवेश आठवा	....	१३५
प्रवेश नववा	....	१३७

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

	प्रवेश दहावा	१३९
	प्रवेश अकरावा	१४०
	प्रवेश बारावा	१४१
	प्रवेश तेरावा	१४१
	प्रवेश चौदावा	१४४
	प्रवेश पंधरावा	१४६
	प्रवेश सोळावा	१४७
	प्रवेश सतरावा	१५२

निळा पक्षी

पहिला	लाकूडतोड्याची झोपडी	१५७
दुसरा	प्रवेश पहिला	१७२
	प्रवेश दुसरा	१७९
तिसरा	प्रवेश पहिला	१८९
	प्रवेश दुसरा	२०२
चौथा	प्रवेश पहिला	२१९
पाचवा	प्रवेश पहिला	२४०
	प्रवेश दुसरा	२४२
	प्रवेश तिसरा	२४५
सहावा	प्रवेश पहिला	२६२
	प्रवेश दुसरा	२७०
	परिचय	२८०

++

मंगल प्रभात

मंगल प्रभात

अंक पहिला

प्रवेश पहिला

तुरुंगाचा देखावा. गज असलेली एक खोली. खोलीत एक कैदी असतो. त्याचे नाव शशांक. त्याची आई त्याला भेटायला आलेली असते. जेलर कुलूप उघडतो. खुर्चीवर बसतो.

जेलर : शशांक, तुमची आई तुमच्या भेटीला आलेली आहे. येथेच भेट होईल. (पोलीस आईला घेऊन येतात. आई जवळ जाऊ बघते.)

जेलर : येथे इकडेच बसा नि बोला. जवळ नाही जाता येणार.

आई : आई जवळ असली तरी लांब आहे, लांब असली तरी जवळ आहे. येथे बसते हो.

शशांक : आई, बरी आहेस तू ?

आई : तू बरा आहेस का ?

शशांक : माझे ठीक आहे. प्रकृती चांगली आहे.

आई : तोंडावरून तर तसे नाही वाटत. काय ही तुझी दशा झाली, डोळे खोल गेले, तू का आजारी आहेस ?

शशांक : नाही गं, आई. मी खरे सांगू ? आजकाल येथेच बरे वाटते. बाहेर असले म्हणजे आजूबाजूची परिस्थिती पाहून मन संतप्त होते. लोकांना खायला-प्यायला नाही. अन्नावाचून मरत आहेत. कसे पाहायचे सारे ? थंडीत गारठताहेत. उन्हात करपताहेत. ना अन्नवस्त्र, ना घरदार. काळा बाजार नि लाचलुचपती. स्वराज्य आले; परंतु जमाना बदलत नाही. वरती चार चांगली माणसे; परंतु खाली गोंधळ. पुंजीपतींना वाटत आहे, आपलेच सरकार आहे. जमीनदारांचे जुलूम चालूच आहेत. बिहारमध्ये अनेक

शेतकरी सत्याग्रह करीत आहेत असे ऐकले. जमीनदार त्यांना हाकलू पाहात आहेत. कधी जायची ही जमीनदारी ?

आई : जाईल, आज ना उद्या जाईल. परंतु गरिबांत तरी एकी हवी ना ? तेथे पुन्हा हिंदूमुसलमान, स्पृश्यास्पृश्य, अशा भानगडी आल्या म्हणजे काय करायचे ? मला तर निराशा वाटते, बाळ.

जेलर : घरगुती गोष्टी बोला.

शशांक : गरिबांची दुनिया हे माझे घर. सारे श्रमणारे माझे भाऊ. त्यांच्याविषयी मी बोलत आहे. आई, येथे तुरुंगात शांतपणे विचार करता येतो. रात्रीचा अंधार पाहून माणसास भय वाटते; परंतु प्रभात जवळच असते. नाही का? जगातील या मारामाऱ्या, ही युद्धे, पिळवणुकी, साऱ्या संपतील. दोनचार लोक सुखात नि ऐषआरामात राहावेत म्हणून कोट्यवधींचे होणारे रक्तशोषण थांबेल. गरिबांच्या रक्तशोषणाने कलंकित झालेले हे युग जाईल. नवीन युग येईल. खरे स्वराज्य येईल. हे काय ? आई, तुझ्या डोळ्यांतून पाणी आले ? रडू नकोस, मी हसतो आहे, तूही हस. तू बरी असलीस, सुखी असलीस, म्हणजे मी हसेन. हा बघ, मी हसतो आहे. तू हस ना जरा.

आई : कशी हसू, बाळ ?

शशांक : तुझ्या डोळ्यांतील पाणी बघून माझे धैर्य कसे राहील ? तू दूर असलीस तरी माझ्या हृदयाला तू धीर देतेस. मी तुरुंगात आलो तेव्हा अनेकांनी गळ्यात हार घातले; परंतु ते सारे सुकून गेले. त्यांनी केलेले जयजयकार तुरुंगाच्या या भिंती फोडून आत येऊ शकले नाहीत; परंतु आई, प्रेमाने थबथबलेला तुझा हात तू मुकेपणाने माझ्या डोक्यावर ठेवलास ! ते दृश्य रात्रंदिवस माझ्या डोळ्यांसमोर असते. आई, रडू नकोस.

आई : काय बोलतोस तू ? आईचे हृदयही तुला समजेनासे झाले का ? कसे पुसू हे डोळे ? रडू दे मला. येथे कोण आहे तुला ? पूर्वी हजारोंना अटक होई, तेव्हाचा निराळा प्रश्न. आज स्वराज्यात का अटक ? तू का पाप करीत होतास ? कोणा श्रीमंत काँग्रेसवाल्याने पोलिसात सांगावे, त्यांनी अटक करावी. काय करायचे ? तू येथे एकटा. ना येथे मित्र, ना सहकारी. रडू नको तर काय करू ? येथे तू नि मी आहोत. येथे तू लोकांचा पुढारी नाहीस. दु:खी विधवेचा तू एकुलता एक मुलगा आहेस.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

शशांक : आई, तुला खरोखरच मी दु:ख दिले. तुझे मनोरथ मी मातीत मिळविले. माझे सारे दिवस तुरुंगात जात आहेत. बाहेर सुखदु:खाचा, हसण्यारडण्याचा विराट संसार चालला आहे. नाना प्रकार, नाना बदल. बाहेर कधीकधी ऋतू येतो. कधी वसंत येतो; कधी आनंद, उत्सव. परंतु जेलमध्ये सारे दिवस सारखे, त्या लिंबाच्या झाडाच्या दोन फांद्या त्याच फक्त रोज दिसतात. आकाशाचा लहानसा तुकडा दिसतो. आई, कितीतरी तरुण जेलमध्ये बसून तरुणाचे पोक्त झाले. पोक्ताचे वृद्ध झाले आणि मेले. त्यांच्याप्रमाणे मीही एके दिवशी मरेन. इतर आयांप्रमाणे तू मनात आशा खेळवल्या असतील. परंतु मी तुझ्या आशा पूर्ण करू शकलो नाही.

आई : शशांक, तू मला सुख दिले नाहीस म्हणून का मी रडते ? नाही हो. आपल्या देशावर प्रेम करणे का पाप ? देशातील सर्वांचे संसार सुखाचे करण्यासाठी निर्मळ मार्गाने धडपडणे हेही का पाप ? आगलाव्यांची गोष्ट दूर राहो; परंतु तुम्ही निराळा मार्ग घेणारे. तरी का तुरुंग ? आणि वर्तमानपत्रेही तुमच्याविषयी काही देत नाहीत. कोणाचे लक्ष आहे तुमच्या या त्यागाकडे ?

शशांक : आई, कोणाचे असो वा नसो; आम्ही विजयी आहोत. समाजवादी विचार सर्वत्र पसरत आहेत. परवाच्या निवडणुकीत म्हणे समाजवादी निवडून आला ! आशेचा तो किरण आहे. आम्हाला तुरुंगात घालताना अधिकाऱ्यांचे मनही खात असेल. परंतु सत्तारूढ पक्षाला स्वत:चा मार्ग निष्कंटक ठेवायची इच्छा असेल. त्यांना त्यात देशहित वाटत असेल. परंतु, आई, काही झाले तरी जुना जमाना टिकणार नाही. आसपास बघ. भारतात नवयुग आणू तरच आशा. भारतात लवकर लोकशाही मार्गाने समाजवाद आला तर जगाला नवीन आशा दिल्यासारखे होईल. यासाठी समाजवादी पक्षाची धडपड. काँग्रेसला हे एक दिवस कळून येईल. नवीन जग येणार, नवसमाजनिर्मिती होणार. मला तर ती मंगल प्रभात दिसत आहे.

आई : मला नाही दिसत. किती जणांच्या मनात असे विचार खेळत आहेत ? आडनावे नि जातिपाती यांच्यापलीकडे कोण बघतो ? प्रांतभेद, भाषाभेद, जातिभेद, सारा बुजबुजाट आहे.

शशांक : आंधळ्याप्रमाणे वागणाऱ्यांची गोष्ट सोडून दे. आई, ती पाहा. सेवादले नवविचाराने संस्फूर्त होत आहेत. ते पाहा, मुंबईचे कामगार समाजवादी पक्षाभोवती, गुजराती की मराठी न बघता, इतर जातीय पुढाऱ्यांचे न ऐकता, काँग्रेसलाही दूर सारून सोशॅलिस्ट पार्टी गरीबोंकी पार्टी म्हणून उभे राहत आहेत; पुरुषोत्तमांना निवडून देत आहोत. आई, आई, आशेने राहा. माझी काळजी नको करू. मी कोण ? जनतासिंधूतील मी एक बिंदू. या अफाट दुनियेतील मी एक कण... आई, ते जाऊ दे. आपल्या शेतकरी पंचायतीची सांग ना हकिकत.

आई : तेथेही भांडणे. एकाला काँग्रेसवाल्याने फोडले. तेथे हिंदू-मुसलमान भानगडीही काहींनी सुरू केल्या. रहीम आता येत नाही.

शशांक : का बरं ?

आई : हिंदू-मुसलमान एक होणे अशक्य असा जातीयवादी प्रचार करीत असतात.

शशांक : नवभारतात सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. महात्माजींच्या महान बलिदानाचाही अर्थ तुम्हास कळू नये का ? रहीमला सांग, आम्ही अंतर देणार नाही. हिंदू-मुसलमान, शीख, ख्रिस्ती, पारशी सारे या भारतमातेचे. भारतमाता म्हणजे जगाचे प्रतीक. सारे धर्म येथे सुखाने नांदतील, सर्वांना एकत्र नांदविणे हाच धर्म.

आई : अरे, एक नवीन फौजदार आला आहे. तोही भेदभाव पाडणारा. जात्यंध माणसे खात्याखात्यांतून आहेत. हरिजन शेतकरी दूर होत आहेत, मुसलमान दूर होत आहेत, आपल्या या प्रदेशात सर्व धर्मांचे श्रमणारे लोक.

शशांक : जमीनदारांना आनंद झाला असेल फूट पाहून ?

आई : होय, ते वासुदेवराव तर गुर्मीत आहेत. रहीमचे नि त्यांचे भांडण झाले.

शशांक : का ?

आई : रहीमचे घर गळत होते. तो वासुदेवरावांकडे गेला व म्हणाला, "थोडे पेंढे द्या. घर शिवीन." तर जमीनदार म्हणाला, "कशाला घर शिवतोस ? तुझे घर नको. तुला दुसरीकडे जागा देतो. तिकडे घर बांध" रहीम म्हणाला, "तुम्हीच दुसरीकडे घर बांधा. माझी झोपडी सोडून मी जाणार नाही."

शशांक : रहीमचे उत्तर झोंबले असेल ?

आई : चांगलेच झोंबले. वासुदेवराव तो बंधारा फोडून शेतीच्या जमिनींची पुन्हा मिठागरे करणार असे कानावर आले आहे. सर्वत्र असंतोष आहे.

शशांक : आई, रहीम चांगला आहे. आपण त्याला प्रेम द्यायला हवे. हिंदुस्थानात कोणासही असुरक्षित न वाटो. गांधीजी गेले, तेव्हा एक मुसलमान माता म्हणाली, ''या अल्ला ! अभी हमको कौन ?'' ते उद्‌गार आपण विसरता कामा नये. आम्ही सारे तुमच्यासाठी आहोत. साऱ्या मानवासाठी आहोत, असे म्हटले पाहिजे.

जेलर : वेळ संपला.

शशांक : आई, तुझा आशीर्वाद दे. डोक्यावर हात ठेव. (आई जेलरकडे बघते.)

जेलर : परवानगी आहे. (शशांक पायांवर डोके ठेवतो. ती त्याच्या डोक्यावर हात ठेवते.)

जेलर : टाइम इज अप. वेळ खलास, शशांकबाबू.

(कोणी बोलत नाही. माता शशांककडे बघत हळूहळू पुढे येते. पोलिसांबरोबर जाते. पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा

(मुनीमजींची कचेरी. पुढे पेटी घेऊन तो बसला आहे. कागदपत्रं आहेत. समोर शेतकरी, कुळे.)

मुनीमजी : ते काही नाही. पैसे ताबडतोब पाहिजेत. तुमची नुसती तोंडे पाहून काय करू ? मला गोड गोड गोष्टी नकोत. पैसे आणा. हात हालवीत कशाला आलात ? आणि भाते लवकर कापा.

पहिला शेतकरी : अजून भाताचा दाणा भरला नाही. एवढ्यात कशी कापायची ? मळणी काढायला वेळ आहे. दादा अजून.

मुनीमजी : शिवा, तू पैसे आणलेस ? तू रे रामू ? आणि तू रहीम ? जॉन काय म्हणतो? सारे का हजामती करायला आलेत?

दुसरा शेतकरी : दोन शब्द सांगू का ?

मुनीमजी : काही बोलू नको. पैशांचे बोल. जामीनदाराच्या मुलीचे मार्गशीर्षात लग्न. लग्न का लांबणीवर टाकता येते ? पैसे आणा. कर्जाचे पैसे. व्याज नाही,

मुद्दल नाही, असे कसे रे तुम्ही ? मक्त्याची बाकी किती थकलेली. आधीच त्या काँग्रेस सरकारने मक्ते कमी केले. मालकाला म्हणे तिसरा हिस्सा आणि कुळाला दोन भाग. उलटी दुनिया ! हे का स्वराज्य ?

रहीम : तिसरा भाग मिळतो, नशीब समजा. उद्या हाही जाईल. सारी जमीन श्रमणाऱ्यांची होईल.

मुनीमजी : आणि मालक का भीक मागेल ?

जॉन : भीक कशाला ? आमच्याबरोबर कामाला या, आमचा हिशेब ठेवा. पोटापुरते देऊ.

मुनीमजी : कोठे रे असे बोलायला शिकलात ? त्या शशांकला तुरुंगात कोंडले तरी ही भाषा चालूच ? मला या गोष्टी ऐकायला वेळ नाही. बाकी चुकती करा. धनीसाहेबांना लग्न ठरवताना पाच हजार आधी द्यायला हवे आहेत. पैसे घेऊन या, म्हणून सांगितले होते की नाही. चोर साले हरामखोर !

तिसरा शेतकरी : शिवी नका देऊ.

मुनीमजी : कोण देतो शिवी ? तुम्ही नीट वागा. ते समाजवादी तुम्हाला बिघडवीत आहेत. इन्किलाबवाले रामनाम घेण्याऐवजी इन्किलाब बडबडतात आणि तुम्ही सारा धर्म फेकून त्यांच्याबरोबर नाचता ! ते निशाण ! त्यावर ते चक्र तो नांगर !

चौथा शेतकरी : श्रीकृष्णाचे चक्रच होते. बळीरामदादाचा नांगरच होता. देवाच्या त्या खुणा उगीच नावे का ठेवता ?

पहिला शेतकरी : चक्र म्हणजे कारखाने राष्ट्राच्या मालकीचे. नांगर म्हणजे जमीन श्रमेल त्याच्या मालकीची. आम्ही येथील सारी जमीन सहकारी पद्धतीने करणार आहोत.

मुनीमजी : उद्या येथे राहिलात तर ना ?

रहीम : आम्ही येथून कोठे जाणार ?

मुनीमजी : धनीसाहेब बंधारा फोडून टाकणार आहेत. तेथे मिठागर करण्याची त्यांची इच्छा आहे. तुमची घरेदारे उचला. येथे सारे जलमय होईल. सहकारी शेती करू म्हणे. मालकाची ही जमीन. ही का तुमच्या बापाची आहे ? येथे घरदार करण्याचा का तुम्हाला अधिकार आहे ? जाऊ द्या. मी कशाला बोलू ? पाटील, तुम्हीही यांच्यात ?

पाटील : मी यांच्यात नाही. मी तुमच्या बाजूचा. यांना किती सांगितले की जपून वागा; परंतु यांच्यात नवीन वारे शिरले. मी मुलाबाळांचा धनी. उद्या कुठे जाऊ ?

मुनीमजी : गोड बोलणी नकोत. पैसे आणलेत का ?

पाटील : पैसे देतो, व्याज देतो, खंड देतो. मळणी काढली की पैसे. दोन महिने जाऊ द्या.

मुनीमजी : दोन दिवसही थांबता येणार नाही. तुझ्याकडे पाचशे रुपये तेरा आणे सात पै बाकी आहे.

पाटील : इतका बाकी ?

मुनीमजी : जमाखर्च खोटा नसतो.

पाटील : बरे, दादा. परंतु इतक्यात जप्ती आणू नका. तुम्ही दयेचे समुद्र.

मुनीमजी : एकदम समुद्र अं ? अरे, दयेचा ओढा, नाला असे म्हण. एकदम समुद्रात नको मला लोटू.

पाटील : तुम्ही देवमाणूस.

मुनीमजी : तोंडावर स्तुती करतोस आणि पाठीमागे गावात निंदा करतोस.

पाटील : मी असा नाही. मी साधा सरळ माणूस. मी हुकमाचा बंदा.

मुनीमजी : तू तसा सरळ म्हणून अजून हुकूमनामा बजावला नाही. समजलास ? (नोकर येतो.)

नोकर : धनीसाहेब येत आहेत.

मुनीमजी : सारे चालते व्हा. निघा. पैसे घेऊन या. लवकर मळण्या काढा. भाते कापून टाका. किती दिवस दाणे भरायला ? निघा.
(जातात. पाटील राहतो.)

पाटील : माझ्यावर दया करा.

मुनीमजी : दयेचा बंदोबस्त करशील ?

पाटील : म्हणजे ?

मुनीमजी : घरात तूप नाही. तुला काळाबाजार येतो ना ? तो बद्री तुझ्या ओळखीचा. तूप पाठव पाच शेर. एक गुळाची ढेप पाठव.

पाटील : करतो व्यवस्था. वरती जपा. नाही तर सारे फाशी जाऊ.

मुनीमजी : अरे, सारे अधिकारी आपले. जा. (जमीनदार येतो. पाटील जातो.)

जमीनदार : काय, आहे हकिकत ?

मुनीमजी : आली होती सारी कुळे. तशी आपली कुळे आहेत. छान बोलतात गोड. भिऊन वागतात. परंतु बोलण्याने पेटी थोडीच भरणार आहे ? माझे असे म्हणणे की, भराभरा डिक्र्या काढाव्या. जप्त्या न्याव्यात. यांची घरेदारे विकून पैसे उभारायला हवेत.

जमीनदार : एकंदर वातावरण कसे वाटले ?

मुनीमजी : तुमच्या जमिनी जातील. जमीनदारांनी आमच्याबरोबर काम करावे, आमचा हिशेब ठेवावा, ही सारी शेती आमची, वगैरे बोलत होते. माजलेत सारे !

जमीनदार : त्या शशांकला अटकवले तरी त्यांच्या तोंडी अजून ही भाषा ? बघून घेऊ म्हणावे. बरे, आज पेटीत पैसे किती आहेत ?

मुनीमजी : फक्त पंचवीस रुपये साडेसात आणे.

जमीनदार : मुलगी बघायला ते गोपाळराव येणार आहेत. पैशांचे काय ? ही शेती विकावी का ? ते रावसाहेब परवा म्हणत होते, की येथे मिठागर करावे. तो बंधारा फोडून जर जमीन विकायला निघालो, तर ते विकत घ्यायला तयार आहेत.

मुनीमजी : अडीचशे घरांची वस्ती उठवावी लागेल.

जमीनदार : जातील दुसरीकडे. पैसे देत नाहीत. मगरूरीची भाषा. जा म्हणावे समाजवाद्यांकडे. यांच्यापेक्षा काँग्रेस बरी. तिसरा हिस्सा तरी मक्ता मिळतो आहे.

मुनीमजी : तुम्ही यंदा जिल्हा काँग्रेसमध्ये जाणार ना ?

जमीनदार : मी गेलो तर मला अध्यक्ष करणार आहेत.

मुनीमजी : छान होइल ! तुम्ही देशभक्त व्हाल !

जमीनदार : कधी नव्हतो आम्ही देशभक्त? देशावर ज्यांचे राज्य असेल, त्यांची भक्ती म्हणजे देशभक्ती. इंग्रजांचे राज्य होते, त्यांची भक्ती केली. काँग्रेसचे आले, त्यांची भक्ती.

मुनीमजी : उद्या समाजवाद्यांचे आले तर?

जमीनदार : त्यांचे येणे शक्य नाही.

मुनीमजी : रावसाहेब रोख पैसे देतील का? नाहीतर बंधारा फोडाल आणि पुन्हा पस्तावाल. मी जरा जाऊन येतो. (जातो)

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

जमीनदार : बंधारा फोडलाच पाहिजे. एरवी पैसे कोठून आणणार? (प्रभा येते.)

प्रभा : बाबा, वाजले किती, माहीत आहे का? आज का अंघोळ बिंघोळ नाही करायची? चला ना आता, मला तर भूक लागली.

जमीनदार : तू खाल्ले नाहीस का काही?

प्रभा : लाडू संपले. शंकरपाळे संपले.

जमीनदार : अग, भटजींना करायला सांग. सारे का मीच बघायचे? तुझ्या लग्नाची एक चिंता सारखी मला तर लागली आहे.

प्रभा : माझ्या लग्नाची एवढी घाई कशाला? का मला इतक्या लवकर दवडता दूर?

जमीनदार : वेडी आहेस! तुझी आई असती तर इतके दिवस तरी थांबती का? आणि हे बघ, बेटी, दिवस वाईट येत चालले आहेत.

प्रभा : दिवस तर चांगले येताहेत असे शशांक म्हणत असे.

जमीनदार : त्याचे नाव नको काढू.

प्रभा : का बरे? आपला तो नातलगच ना?

जमीनदार : भिक्कारडा! स्वत:चे सारे घालवून बसला आणि आमचाही सत्यानाश करायला उभा!

प्रभा : त्याने काही घालवले नाही. कुळांना जमीन त्याने दिली. तुम्ही श्रमता, तुमची जमीन, असे त्यांना म्हणाला. उद्या कायद्याने द्यावी लागेल. मग आज माणुसकीच्या प्रेमाने आपणच का देऊ नये? माणसाने कायद्याप्रमाणे वागण्यापेक्षा प्रेमाच्या कायद्याने का वागू नये?

जमीनदार : तूही का समाजवादी झालीस?

प्रभा : बाबा, समाजवाद, का पाप?

जमीनदार : समाजवाद म्हणजे भ्रष्टकार. त्यांना देव नको, धर्म नको.

प्रभा : काळाबाजार करून देवळाला सोन्याचे कळस बांधणारे वाटते धर्ममार्तंड? धर्म म्हणजे सर्वांना सुखी करणे. समाजवाद म्हणजे मानवतेचा धर्म. स्वत:पुरते पाहणे म्हणजे माया आणि सर्वांचे पाहणे म्हणजे ब्रह्म. समाजवाद म्हणजे ब्रह्माची उपासना, ब्रह्मज्ञान. चला परंतु वाद कशाला ? आधी मला लागली आहे भूक. बाबा, आधी अन्नब्रह्माची उपासना करू.

जमीनदार : हे पैसे ठेव.

प्रभा : कोणी दिले ?

जमीनदार : ठेव. तुझ्या लग्नाला हवेत ना ? मी बंधारा फोडणार आहे.

प्रभा : बंधारा फोडणार ?

जमीनदार : हो, म्हणजे मग ते रावसाहेब ती जमीन विकत घेणार आहेत. ते तेथे मिठागर करू इच्छितात.

प्रभा : बाबा, हे पाप नाही का ? ते शेतकरी कुठे जातील ?

जमीनदार : जातील मसणात.

प्रभा : असे नका बोलू. मसणात एके दिवशी सर्वांनाच जायचे आहे आणि ते ओळखनूच आपण प्रेमाने नको का वागायला ?

जमीनदार : तू नको मला शिकवायला. (मुनीमजी येतात.)

मुनीमजी : ते समाजवाले करतील त्या शेतकऱ्यांची व्यवस्था.

प्रभा : तुम्ही नका मध्येच बोलू. त्या रावसाहेबांचे गिऱ्हाईक तुम्हीच आणले असेल. त्यांच्यापासून मध्ये लाच किती खाणार ? साऱ्या गोष्टी मला कळल्या आहेत.

मुनीमजी : मी लाच खातो ?

प्रभा : सारे खाता. तुम्हाला तूप हवे, गुळाची ढेप हवी, चिरीमिरी हवी, विडीपान हवे. त्या रावसाहेबांनी किती देऊ केले आहेत ?

मुनीमजी : काय बोलता, प्रभादेवी ?

प्रभा : खरे ते बोलते, चला, बाबा. असले मुनीम तुम्हाला नाशाकडे नेतील. (वडिलांना घेऊन जाते.)

मुनीमजी : शेवटी मीच वाईट एकूण ? जग हे असेच आहे !
(जातो. पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा

(एक शेतकरी दोरी वळीत बसला आहे.)

शेतकरी : थकून गेलो अगदी. शेतकऱ्याला विसावा म्हणून नाही. जमीनदार लोडाशी बसतो. त्याला सारे आयते आणि आम्ही राब राब राबून मरतो. (रहीम येतो.)

रहीम : काय चालले आहे ?

शेतकरी : दोरी वळतो आहे. तू दिलेस का पैसे ?

रहीम : कोठून देऊ पैसे ?

शेतकरी : तू ऐकलीस का गोष्ट ?

रहीम : कोणती ?

शेतकरी : अरे, उद्या बंधारा फोडणार आहेत ! सारी शेती जाणार. या झोपड्या जाणार. घरे सोडून जा, घरे सोडून जा अशा दवंड्या होत आहेत.

रहीम : कोठे जायचे ?

शेतकरी : वरती काँग्रेसच्या कानावर का हे जात नाही ?

रहीम : शशांक असता तर काही करता. आता कोण ? त्याची आई एकटी काय करणार ?

शेतकरी : रहीम, तू शेतकरी पंचायत का सोडलीस ?

रहीम : तुम्ही मुसलमान, तुम्ही मुसलमान, असे कोणी म्हणू लागले. तो रावजी म्हणे, तुमचे आमचे जमणार नाही. तुमचे आमचे म्हणे सारे उलटे. यांना कळत नाही की हृदय एक असते. शेंडी ठेवो की दाढी ठेवो. त्यावरून का ओळखायचे ? शशांक कसे समजावून सांगे.

शेतकरी : जमीनदार का हिंदू कुळांची घरे ठेवणार आहे ? सारे जलमय करणार आहे. हे खोटे भेद. आपण सगळ्या गरिबांनी एक झाले पाहिजे. मानवधर्म आपणच जगाला देऊ. ही मी दोरी वळतो आहे. हे अलग अलग धागे, हे गवत, हे पेंढा. परंतु ओले करून एकत्र दोरी वळली, तर किती मजबूत झाली बघ. तसे आपण प्रेमाने एकजूट करू तर काय होणार नाही ? माझ्या मनात आहे, की सर्वांनी त्या बंधाऱ्यासमोर आडवे पडावे. बंधाऱ्यावर पडणारा घाव आपण आपल्या छातीवर घेऊ. छातीतून रक्त बाहेर पडू दे. ते रक्त भांडवलशाहीस भस्म करील. रहीम –

रहीम : काय ?

शेतकरी : पुराणात गोष्ट आहे. शशांकदादांनी सांगितली होती. धर्मराजा फासे खेळत होता. विराटराजा रागावला खेळात. त्याने धर्मराजाच्या कपाळावर फासा मारला. रक्ताची धार निघाली. धर्मराजाने ते हातात धरून ठेवले. द्रौपदी ताम्हन घेऊन आली. त्यात मग त्याने ते सोडले. धर्म

विराटराजाला म्हणाला, ‘‘माझे निष्पाप रक्त तुझ्या राज्यावर खाली पडते, तर सारे भस्म झाले असते.’’

रहीम : आपण सारे बंधाऱ्यावर जाऊ. आपण सारे एक. बंधारा फोडू द्यायचा नाही. सारे पाण्याने भरून गेल्यावर कोठे जायचे ? येथे आमच्या प्रिय माणसांच्या कबरा. येथे माझ्या बायकोची कबर आणि माझा लहान बाळ, त्याचीही कबर. हे का सारे सोडून जाऊ ? हे सारे पाण्याने भरले म्हणजे या कबरांची काय दशा होईल ? त्यांच्यावर साप येऊन बसतील. सारी दुर्गंधी सुटेल. जिकडे तिकडे खारे पाणी. जमीनदारांचे वाडे मजबूत. चुन्यादगडांचे वाडे. परंतु गरिबांची घरे ? ती पडतील. नाही, हे पाप आपण होऊ द्यायचे नाही. मी नि माझे मित्र येऊ. आपण सारे एक.

शेतकरी : हरिजनही येतील असे वाटते. ते ख्रिस्ती बंधूही येतील. आपण सारे तेथे जाऊन उभे राहू.

रहीम : आपण तिकडे शेतकरी पंचायतीच्या कचेरीत जाऊ चला.

शेतकरी : चल.

(जातात.)

प्रवेश चौथा

(जमीनदार उभे आहेत. मुनीमजी आहेत. पहारी हातात असले मजूर आहेत. शेतकरी आहेत. रहीम आहे.)

शेतकरी : आमचे म्हणणे तर ऐकून घ्या. असे निकरावर नका येऊ. तुमच्याच वडिलांनी हे धरण बांधले. ही जमीन पिकू लागली. पुन्हा का सारे खारे येथे करणार ?

जमीनदार : आमच्या वडिलांनी पुष्कळ गोष्टी केल्या. त्यांनी बांध घातला. सडक केली, दवाखाना घातला, शाळा काढली.

शेतकरी : म्हणून येथे वस्ती वाढली. दोन–अडीचशे घरांची वस्ती झाली. झाडावर फळे आली तर आम्ही आधी त्यांना नेऊन देत असू. तुमचे वडील वारले त्या दिवशी अडीचशे घरांत चूल पेटली नाही.

जमीनदार : परंतु आज ? – आज मला हाकलून लावण्याची भाषा तुम्ही बोलता !

शेतकरी : तुम्ही वडिलांची परंपरा चालवतात तर कोणी असे म्हणाले असते का ?

मुनीमजी : व्हा दूर. सारे लबाड आहात तुम्ही. मक्ता घालीत नाही, व्याज देत नाही, कधी फणस देणार नाही, आंबे आणणार नाही. व्हा दूर.

शेतकरी : तुम्ही चांगले तर आम्ही चांगले.

जमीनदान : (पहारी घेतलेल्या कामगारांस) बघता काय, घाला घाव. (आई येते)

आई : थांबा ! पाप नका करू.

जमीनदार : तुम्ही येथे कशाला ? मोठ्या घरातल्या तुम्ही.

आई : कोण मोठे ? कोण छोटे ? हे समतेचे युग आहे.

जमीनदार : हे कुणबी नि आपण का समान ?

आई : असे अभद्र बोलू नका. आजवर झाले ते पुरे. श्रमणाऱ्यांची पूजा करा.

जमीनदार : खेटरांनीच त्यांना पूजा.

शेतकरी : तोंड सांभाळून बोला.

आई : येथे रक्तपात नकोत. महात्माजींच्या देशांत रक्तपात नकोत. आपण नवधर्म ओळखू या. हा बंधारा फोडू नका. अडीचशे घराण्यांतील शेतकरी देशोधडीस लावू नका.

जमीनदार : माझ्या मुलीचे लग्न करायचे आहे. पैसे नकोत ?

रहीम : आमची घरेदारे बुडवून तिचे लग्न करणार ? आमचा संसार बुडवून तिचा मांडणार ?

जमीनदार : गप्प बस.

शेतकरी : तुम्ही का फक्त स्वत:चे पाहणार ?

मुनीमजी : आम्हीही दुसऱ्याचे बघतो. ते रावसाहेब येथे मिठागरे करतील. मिठागरांत कामगार कामे करतील.

शेतकरी : आणि आमची शेते ? आमची घरे ?

मुनीमजी : त्या शशांकाला विचारा. तो सर्वांना जमीनदाराविरुद्ध चिथवी.

आई : कोणी कोणाला चिथवीत नाही. हा नवा युगधर्म सर्वांना जागृती देत आहे. लोकांना दडपून ठेवून सुखात राहायचे दिवस गेले.
सारा श्रमणारा समाज आता जागा झाला आहे. दुनियेतील वारे पाहा, वादळे पाहा, जपून चला. युगधर्म ओळखून सारे वागाल, तर येथे रक्तपात टळतील. भारत शांतीच्या मार्गाने जावो.

जमीनदार : अरे, मारा पहारी. बघता काय ?

रहीम : आधी या छातीवर मारा. आमचे आधी मुडदे पडतील. मग बांध पडेल. हे सारे पाण्यात बुडवून आम्ही कोठे जायचे ? येथे आमचे वाडवडील मेले. त्यांच्या येथे कबरा. येथे माझी बायको मेली. येथे लहान मुलगा मेला. कोठे जाऊ आम्ही ? या गावचे आम्ही. तुम्हीच चालते व्हा.

शेतकरी : येथे पूर्वी सारे जंगल. तुमच्या वडिलांनी हा बंधारा बांधला. आमचे वाडवडील येथे रात्रंदिवस राबले. उरापोटावरून त्यांनी दगडधोंडे आणले. हा सारा खारेपाट सुपीक केला आम्ही. म्हणे मिठागरं करू ! नाही बांध फोडू देणार.

जमीनदार : माझी जमीन, मी वाटेल ते करीन.

आई : जमीन देवाची, श्रमणाऱ्यांची. वाटेल ते करण्याचे दिवस गेले.

जमीनदार : तुम्हालाही तुरुंगात जायचे वाटते ?

आई : आम्ही मरायलाही तयार आहोत.

जमीनदार : घाला रे घाव. कोण माझ्या सत्तेआड येतो पाहू. (फौजदार आणि प्रवीर येतो.)

प्रवीर : बांध फोडला जाणार नाही.

जमीनदार : का ?

प्रवीर : मी जिल्हा मॅजिस्ट्रेटांचा मनाईहुकूम घेऊन आलो आहे.

जमीनदार : तुरुंगातूनही शशांक सल्ला देतो वाटते ?

प्रवीर : शशांक एकटा नाही. आम्ही सारे तरुण त्याच्यासाठी मरायला तयार आहोत.

मुनीमजी : धनी, आता काय करायचे ?

जमीनदार : मी भेटून येतो कलेक्टर साहेबांना. आपले नाव काय ?

प्रवीर : मला प्रवीर म्हणतात.

जमीनदार : तुम्हाला पूर्वी कधी पाहिले नव्हते.

प्रवीर : मी शशांकांचा सहाध्यायी मित्र.

जमीनदार : दिसता तर मोठ्या घराण्यातले.

प्रवीर : अत:पर मोठेछोटे, उच्चनीच विसरून जायचे.

आई : शशांकाने ज्याच्यावर काम सोपवले, तेच का तुम्ही ?

प्रवीर : होय, आई.

(प्रभा येते.)

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

प्रभा : बाबा, कशाची ही गर्दी ?

जमीनदार : ही सारी मंडळी तुझ्या पित्याच्या विरुद्ध आहेत.

रहीम : आम्ही अन्यायाच्या विरुद्ध आहोत. व्यक्ती आम्हाला प्रिय नि पूज्यच असतात.

प्रवीर : आम्ही सारे त्याच्या मार्गाने जात आहोत.

प्रभा : तुम्ही कोण ?

प्रवीर : मी शशांकचा मित्र.

प्रभा : शशांकांच्या खोलीत तुमचा फोटो होता. तुम्ही प्रवीर ?

जमीनदार : तू यांना ओळखतेस ?

प्रभा : शशांक यांच्या गोष्टी सांगे माझी ओळख कुठली ? चला. बाबा, आपण जाऊ. हट्ट करू नका. जग बदलत आहे. जुन्या जमान्याप्रमाणे वागून नाही चालायचे, बाबा.

जमीनदार : रावसाहेबांजवळून बंधारा फोडून त्यांना जमीन देण्याबाबत मी आता पैसेही घेतले.

प्रभा : मी ते त्यांना परत केले.

जमीनदार : काय म्हणतेस ?

प्रभा : चला तुम्ही. (वडिलांना घेऊन जाते.)

आई : रहीम, तुला पाहून आनंद झाला.

रहीम : आई. (जवळ जातो.)

आई : अरे, तू घरी यायचास. तुला, शशांकाला मी आंबे द्यायची. तू येईनासा का झालास ?

रहीम : मुसलमान कशाला येथे म्हणत. मला वाईट वाटे.

आई : अरे, तुम्ही सारी भारतमातेची लेकरे. (त्याला जवळ घेते.) हा जॉन, ये रे जवळ. (जवळ येतो.) आणि हा विटनाक. ये रे जवळ. (जवळ येतो) या भारतमातेची तुम्ही सारे लेकरे, प्रभूची लेकरे, प्रवीर छान केलेस तू. तुला पाहून शशांकच आला असे वाटले. चला, आपण जाऊ. नवी मंगल प्रभात आणायची ना ? चला.

(पडदा पडतो.)

✦ ✦ ✦

अंक दुसरा

प्रवेश पहिला

शेतकऱ्यांची सभा : फलक घेऊन शेतकरी बसले आहेत. समाजवादी झेंडा आहे. आई अध्यक्ष आहे. प्रवीरही जवळ खुर्चीवर आहे.

एक शेतकरी : गडबड नका रे करू. गोंधळ नका माजवू. साथी शशांकासंबंधी फार उद्वेगजनक बातमी कानावर आली आहे आणि याच वेळेस जमीनदारानेही सारी जमीन जलमय करण्याचे ठरविले आहे. आपण याबाबत काहीतरी नीट विचार केला पाहिजे. म्हणून आधी सारे गप्प बसा. शशांकांच्या आई दोन गोष्टी सांगणार आहेत, त्या ऐकून घ्या. (आई उभी राहते.)

आई : पाहू गेले तर, मी एक बाईमाणूस. साऱ्या गोष्टी मी काही समजावून सांगू शकणार नाही. तुम्ही मला मानता. तुमचा हा मोठेपणा आहे. माझ्यात तशी पात्रता आहे की नाही देवाला माहीत. शशांकांवर तुमचे सर्वांचे प्रेम. तो माझा, या विधवेचा एकुलता एक मुलगा, तो केवळ माझाच नाही; तो तुमचाही आहे. तुम्ही सारी त्याचीच बहीण-भावंडे, तुमच्यासाठीच त्याचे सारे उद्योग. स्वराज्य आले ते तुम्हा गरिबांचे व्हावे म्हणून त्याची सगळी धडपड. जमीनदाराला हे बघवले नाही. तुमच्यातील जागृती त्याला पाहवली नाही. त्याने पोलीस अधिकाऱ्यांना लाच देऊन माझ्या शशांकाला तुरुंगात पाठवले. शशांकाचे सारे जीवन तुरुंगात जात आहे आणि दु:खद वार्ता कानावर आली की त्याची प्रकृती फार बिघडली आहे. मी तुम्हाला एक प्रश्न विचारते. शशांक तुरुंगात आजारी आहे. कोणावर त्याची जबाबदारी ? कोण या गोष्टीला कारण ? (एक श्रोता 'फौजदार' म्हणून ओरडतो.)

नाही, फौजदार कारण नाही. (दुसरा श्रोता 'जमीनदार' म्हणून ओरडतो.) नाही तोही नाही; शशांक तुरुंगात आहे याला कारण तुम्ही. तुमच्या भ्याडपणामुळे शशांक तुरुंगात आहे. (अहो, आई बसा खाली. वाहू लागलात ! असा आरडाओरडा.)

प्रवीर : कोण ओरडतो आहे ? तोंड लपवून कोण कशाला ओरडतो ? आईचे बोलणे पसंत नसेल तर उभे राहून सांगा. त्या बोलताहेत ते का खोटे आहे ?

आई : प्रवीर, तू बस. एखादा वात्रट कोणी गडबड करीत असेल. जमीनदाराचा किंवा पोलिसांचा हस्तक असेल. जाऊ दे. तिकडे लक्ष नका देऊ कोणी. आपल्या गावचा एकटा शशांकच तुरुंगात आहे ? नाही असे अनेक कार्यकर्ते तुरुंगात खितपत आहेत. त्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. तुम्ही भ्याडपणा सोडा. तुम्ही सर्वांनी छाती फुगवून साऱ्या जगाला सांगितले पाहिजे की, या जगातील ऐश्वर्यावर आमची सत्ता, आमचा अधिकार हवा. पाणी, प्रकाश, धनधान्य, ज्ञान, विज्ञान, कला, सर्वांचे आम्ही स्वामी होणार. जे माणसांना पशू करतात, त्यांना छळतात. त्यांची पिळवणूक करतात, त्यांना लुटून स्वत:चे बंगले बांधतात, त्यांना उपाशी ठेवून स्वत: चैनी करतात, ते मानवजातीचे शत्रू आहेत. तुम्ही सर्वांनी निर्भयपणे उभे राहून असे घोषवले पाहिजे. हे जमीनदार नि कारखानदार तुम्हा श्रमणाऱ्यांच्या पोटावर पाय देऊन स्वत: उंच झाले आहेत. त्यांना खाली ओढा. तुम्ही उभे राहा. ते कोलमडतील.

(''कुई कुई, बसा माझ्या आई !'' असे आवाज.)

आई : (आवाज अधिक चढवून) हे जमीनदार नि कारखानदार स्वत:ला सुसंस्कृत म्हणवतात; परंतु त्याची ही राक्षसी संस्कृती. पंडित जवाहरलालही त्यांना राक्षस म्हणून म्हणाले; चारसहा महिन्यांत गिरणीवाले दीडशे कोटी नफा उकळतात. साखर कारखानदार ११० कोटी नफा मिळवतात. जमीनदार तुम्हाला जमिनीवरून हुसकून लावीत आहेत. सरकारचे अधिकारी शशांकसारख्यास तुरुंगात ठेवीत आहेत. शशांकाचा आवाज बंद झाला तरी तुम्हा हजारो नरनारींचा आवाज कोण बंद करू शकेल ? म्हणा की अत:पर आम्ही हा अत्याचार सहन करणार नाही. आम्ही सत्याग्रह करू. महात्माजींच्या अहिंसेत सत्याग्रह, संप यांना

स्थान आहे. जमीनदाराने तुम्हाला हाकलावे यासाठी का ४२ साली तुम्ही लढलात, मेलात ? म्हणा की शेतात धान्य पिकते ते आमचे. कारखान्यात माल होतो तो आमचा. म्हणा की येथील जमीनदारास आम्ही बांध फोडू देणार नाही. छातीचे कोट करून तेथे सारे उभे राहा, पुन्हा वेळ आली तर. (इतक्यात रहीम व शशांक येतात.)

प्रवीर : कोण शशांक ? (गडबड होते.)

रहीम : बसा, खाली बसा. मी गाडी घेऊन स्टेशनवर गेलो होतो, तो अकस्मात शशांक दिसले. सरकारने त्यांना एकदम सोडले. गाडीतून त्यांना घेऊन आलो. ('शशांककी जय' घोष होतात.)

प्रवीर : काय ही तुझी दशा !

आई : (शशांकाला जवळ घेऊन) बाळ, किती रे खंगलास ! किती वाळलास ! हा माझा शशांक नव्हे; ही शशांकाची जणू छाया आहे. नुसती हाडे की रे राहिली !

शशांक : आई, वाईट वाटून नको घेऊ. जिवंत बाहेर आलो हीच देवाची कृपा. बंधूंनो, मी तुमच्यात आलो आहे. तुरुंगातील अंधारातही मी माझे मन प्रज्वलित ठेवीत असे. बुद्धी सतेज ठेवीत असे, तुमच्यासंबंधी विचार करीत असे. मी तुमच्यात नवीन प्रकाश घेऊन आलो आहे.

प्रवीर : तुला लवकर सोडले ?

शशांक : सरकारला माझ्या प्राणांची जोखीम घेण्याची इच्छा नव्हती. जमीनदारानेही कदाचित सोडा असे सांगितले असेल. मी असलो म्हणजे तुम्हाला भडकू देणार नाही असेही त्याला वाटले असेल. ते काही असो. तुम्ही बांध फोडू देता कामा नये. सारी जमीन का पाण्यात जाणार ? यांचा होतो खेळ, तुमचा जातो जीव.

आई : तू बोलू नकोस. थकला आहेस.

(इतक्यात दगड येतो. शशांकाला लागतो. तो घेरी येऊन पडतो. आई त्याला आपल्याजवळ घेऊन बसते. गडबड होते. ''पकडा हरामखोराला. त्याने मारला दगड.'' असे शब्द.)

रहीम : अरे, तो पळतो आहे. त्यानेच मारला दगड. धरा त्याला, खेचा.

(त्याला धरून आणतात. तो पाटील असतो.)

रहीम : तुम्ही दगड मारलात ? जमीनदारांचे बगलबच्चे ! शशांकासारख्या देवमाणसावर दगड फेकताना हात गळून का नाही पडले ?
(''त्याची चटणी उडवा.'' लोक म्हणतात.)

शशांक : (सावध होऊन) तुम्ही शांत राहा. मला मारणाऱ्याच्या केसासही हात नका लावू. जाऊ दे त्याला. (एकजण येतो.)

एकजण : अहो, पाटील तिकडे गावात जप्ती आली आहे तुमच्या घरादारावर. तुमच्या घरांतील धान्यही बाहेर काढण्यात आले आहे.

पाटील : माझ्याही ? माझेही धान्य बाहेर काढले ? त्या मुनीमाने उगीच थापा दिल्या. तुझ्या घरावर जप्ती आणणार नाही. जा, ती सभा उधळ, मला म्हणाला आणि मी इकडे आलो तर तिकडे माझ्यावरही जप्ती ? मी वेडा आहे, पकडा मला. मारा मी मरायलाच योग्य आहे.
(पाटील भराभरा थोबाडीत मारून घेतो.)

प्रवीर : सभा संपली आहे. आम्ही शशांकाला घेऊन जातो. तुम्ही जा आता. पाटील, तुम्हीही जा.

रहीम : शशांकाची मिरवणूक काढू. जमीदाराच्या वाड्यावरून नेऊ.

आई : तो थकला आहे.

रहीम : आम्ही त्रास होऊ देणार नाही.

शशांक : बरे तर चला. (जयघोष करीत जातात.)

प्रवेश दुसरा

(जमीनदाराचा दिवाणखाना ते व मुनीमजी बसले आहेत.)

जमीनदार : त्या भिकारड्यांची सभा कशी काय पार पडली ?

मुनीमजी : माझ्याच्याने ती भाषणे ऐकवत ना. सारी जहाल भाषणे. शशांकाची आई जणू कडक लक्ष्मी !

जमीनदार : आम्हाला खरोखर शशांकाच्या आईमुळे मान खाली घालावी लागते. त्या आमच्याच कुळातील. खानदानी घराण्यातील असून शेतकऱ्यांच्या घरी काय जातात ! नवरा मेल्यावर घरी रामनाम घेत बसायचे सोडून इन्किलाब झिंदाबाद म्हणत ही बाई हिंडते, व्याख्यान देते ! शिव शिव !

मुनीमजी : हा इन्किलाब कोण होता. धनीसाहेब ?

जमीनदार : कोणी बंडखोर होऊन गेला असेल.

(प्रभा येते.)

प्रभा : बाबा, इन्किलाब म्हणजे कोणी बंडखोर नव्हे. इन्किलाब शब्दाचा अर्थ क्रांती. ''क्रांती चिरायु होवो'' असा सर्व घोषणांचा अर्थ.

जमीनदार : क्रांती चिरायु होवो ?

प्रभा : हो, बाबा. नेहमी पाऊल पुढेच पडणार. पुढे जावे तो आणखी पुढे दिसणार! उत्तरोत्तर विकास, उत्तरोत्तर प्रगती. प्रगती का कधी संपते ? विकास अनंत असतो. खरे ना ?

मुनीमजी : तुम्ही शिकलेल्या. आम्हाला काय कळे ?

प्रभा : शशांकांच्या बौद्धिकांना मी जात असे. ते सारे समजून द्यायचे.

मुनीमजी : मी ती भाषणे ऐकू शकत नव्हतो. जणू निखारे वाटत.

जमीनदार : शेवटपर्यंत होतेत का तरी ?

मुनीमजी : तुम्ही सांगितलेत म्हणून बसलो होतो.

(इतक्यात बाहेरच्या मिरवणुकीचा आवाज, 'शशांक झिंदाबाद' वगैरे.)

प्रभा : बाबा, मी पाहून येते हं.

(जाते.)

जमीनदार : केवढाले हे जयजयकार ! एवढा कसला आनंद ?

मुनीमजी : सभा संपल्यावर परत जात असतील. ओरडणे हाच त्यांचा कार्यक्रम असतो. (प्रभा येते.)

प्रभा : बाबा, शशांकदादा सुटला ! त्याची ती मिरवणूक.

जमीनदार : खरेच का सुटला ? म्हणतेस काय ?

मुनीमजी : अशक्य गोष्ट. जेलमध्ये तो मरत पडला आहे.

प्रभा : गप्प बसा. शशांक देवमाणूस आहे. तुम्ही सभेत शेवटपर्यंत होता का ? सभेतच शशांक सुटून आला होता. तुम्हाला माहीत नाही ? आणि तुम्ही सभेत गुंड पाठविले होते. सभा मोडण्याचा प्रयत्न केलात. खरे की नाही ?

जमीनदार : मी सभेला नुसते हजर राहा म्हणून म्हटले तर हे काय प्रकार केलेत ? आणि मी तुम्हाला स्टेशनवर गोपाळरावांसाठी गाडी पाठवा, म्हणून सांगितले होते ना ?

मुनीमजी : रहीमला गाडी घेऊन जा म्हणून म्हटले होते.

श्री ७. क्रमांक
नगर वाचनालय, सातारा

प्रभा : रहीम तर शशांकाला घेऊन गाडीत घालून स्टेशनवरून परभारे सभेत गेला. लोकांनी सांगितले मला.

जमीनदार : सारा घोटाळा ! आधी जा स्टेशनवर. ते वाट पाहात असतील. तुम्ही नेहमी दुसऱ्यावर विसंबता. काहीतरी गोंधळ करून ठेवता. जा. (मुनीमजी जातात.)

प्रभा : बाबा, तुमचा स्वभाव आज मला कळला.

जमीनदार : तू वेडी आहेस. माझा स्वभाव ब्रह्मदेवासही कळणार नाही.

प्रभा : तुम्ही मुनीमजीस म्हणालात की, सभा उगीच मोडली म्हणून; तुम्हालाही मनातून गरिबांविषयी सहानुभूती वाटते होय ना ?

जमीनदार : सहानुभूती ? आणि मला ? अगं, सभा भरू द्यायला काय हरकत ? शब्दांची वाफ खुशाल जाऊ द्यावी ! त्यामुळे रक्त जरा थंड होते. तरुणांना बडबडू द्यावे. मागून सारे थंड होईल.

प्रभा : बाबा, हा तुमचा भ्रम आहे. दिवसेंदिवस आग भडकतच जाईल. तुम्ही युगधर्म ओळखून वागायला हवे. शेतकऱ्यांना जमिनी द्यायला हव्यात. ते राबतात, श्रमतात. बाबा, हा नवयुगधर्म सर्वांना दीक्षा देईल.

जमीनदार : तुलासुद्धा ?

प्रभा : होय, मलाही. हे विचारवारे सर्वांना खेचून घेतील.

जमीनदार : वेडी आहेस तू. मनातून असले विचार काढून टाक. तुझे आता लग्न होणार. एका जमीनदाराची तू सून होणार !

प्रभा : आणि पत्नी कोणाची ?

जमीनदार : त्या जमीनदाराच्या मुलाची. तो एक सुंदर तरुण आहे. मुंबईला पीएच.डी.चा अभ्यास करीत आहे.

प्रभा : तुम्ही त्या तरुणाला पाहिले आहे ?

जमीनदार : नाही.

प्रभा : त्याचे विचार तुम्हाला माहीत आहेत ?

जमीनदार : नाही.

प्रभा : तेही नवविचारांचे असले तर ?

जमीनदार : ते शक्य नाही. जमीनदारी का घालवील ? स्वत:चे सुख का दूर लोटील?

प्रभा : बाबा, मी तुमची मुलगी; परंतु मला ही जमीनदारी म्हणजे पाप वाटते. तसे

त्या तरुणास कशावरून वाटत नसेल ? आणि समजा, जमीनदारी राहावी, गरिबांना लुबाडावे अशा वृत्तीचा तो तरुण असेल, तर मला का आनंद होईल ? तो तरुण मला आवडेल का ? आमची जीवने एकरूप होतील का ?

जमीनदार : तू वेडी आहेस. तू आता जा. माझे औषध तयार कर. जा बेटी.

प्रभा : बाबा, उद्या माझे लग्न केलेत, मला सासरी पाठवलेत म्हणजे तुमची कोण काळजी घेईल ? आणते हं औषध तयार करून.

(प्रभा जाते.)

जमीनदार : किती गोड मुलगी ! हिची आई लहानपणीच वारली. ती असती तर इतके दिवस हिला लग्नाशिवाय राहू देतील ना. प्रभा उद्या सासरी गेल्यावर मला कसेसेच होईल; परंतु किती दिवस तिला माझ्यासाठी मी अशी ठेवू ? तिचा संसार आता मांडून द्यायलाच हवा.

(गोपाळराव येतात.)

गोपाळराव : अहो, स्टेशनवरून पायी आलो. रस्त्यांत चिखल. हे कपडे बघा. सारे घाण झाले. चांगले आहे मुलीच्या भावी सासऱ्यांचे स्वागत !

जमीनदार : मी स्टेशनवर गाडी पाठवली होती.

गोपाळराव : स्टेशनवर ना गाडी ना घोडा. आधी दुसरे कपडे तरी द्या. कोण ही फजिती! मी स्टेशनवरूनच परत जाणार होतो; परंतु मुलगी बघावी, तिला आशीर्वाद द्यावा, म्हणून शेवटी आलो.

जमीनदार : क्षमा करा. मी सारी व्यवस्था केली होती. काहीतरी घोटाळा झाला असावा. अरे, कोण आहे रे तिकडे ? रामा ? (रामा येतो.)
जा, यांना अंघोळीला घेऊन जा. नवे कपडे दे. गोपाळराव, जावे आपण. राग नका करू. (गोपाळराव जातात.) काय करणार ? सारा घोटाळा !
(मुनीमजी येतात.)

मुनीमजी : सारी व्यवस्था केली आहे. गाडी पाठवली आहे.

जमीनदार : कसली व्यवस्था केलीत ? ते गृहस्थ पायी चालत आले. तुम्ही नालायक आहात. स्वत: गाडी घेऊन का नाही गेलात ? दुसऱ्यावर का विसंबता ?

मुनीमजी : रहीम स्टेशनवर गेला होता; परंतु अचानक सुटून आलेल्या शशांकालाच तो घेऊन आला. हे सारे शेतकरी, ही कुळे माजली आहेत.

जमीनदार : साऱ्यांना देशोधडीस लावतो.

मुनीमजी : मी तरी तेच म्हणतो.

जमीनदार : तुम्ही सर्वांना रात्रीच्या भोजनाची आमंत्रणे दिलीत ना? फौजदारसाहेबांनाही मुद्दाम बोलवा.

मुनीमजी : ती सारी व्यवस्था केली आहे.

जमीनदार : मी स्वत: शशांकाकडे जातो. त्याला दगडही कोणी मारला म्हणतात. त्याला व त्याच्या मुंबईच्या मित्रांस जेवायला बोलावतो. लोकांना, बंडखोर शेतकऱ्यांना तेवढे बरे वाटेल. शशांकाविषयी माझ्या मनात द्वेष नाही असे त्यांना वाटेल. मी त्याला तुरुंगात पाठवायला जबाबदार, मी सरकारला सांगितले, असे लोक म्हणतात. म्हणून अशी कारवाई करायला हवी. मी जातो शशांकाकडे. तुम्ही सगळी व्यवस्था नीट ठेवा. (जातात.)

प्रवेश तिसरा

(शशांक लोडाशी बसला आहे. शशांकची आई जवळ आहे. प्रवीर आहे.)

आई : शशांक, मनात फार विचार नको करीत जाऊ. बरे व्हायला हवे ना लवकर? विश्रांती घे. किती बोलतोस ?

शशांक : आई, तितक्या दिवसांनी आलो तर मित्रांजवळ बोलू नको का ? आणि प्रिय मित्रांजवळ बोलण्याने का त्रास होतो ? प्रवीर, तू एखादे गाणे म्हणतोस ?

प्रवीर : मला नाही गाणेबिणे येत. मी अरसिक मनुष्य.

शशांक : तुझे लग्न झाले म्हणजे तुझ्या जीवनात संगीत येईल. स्त्री म्हणजे संगीत, स्त्री म्हणजे सौंदर्य, स्त्री म्हणजे व्यवस्था.

प्रवीर : मग तू का नाही करत लग्न ?

शशांक : पदोपदी तुरुंगात जाणाऱ्याला कोण देणार आपली मुलगी ? प्रवीर, तुझे लग्न ठरले आहे ही खरी का गोष्ट ?

प्रवीर : बाबा कोठेतरी ठरवू पाहत आहेत.

शशांक : कोणाजवळ ?

प्रवीर : मला काय माहीत ?

आई : प्रवीर, तुला माहीत नाही ?

प्रवीर : आई, खरेच नाही माहीत.

आई : तुझ्या गळ्यात एखादी घोरपड पडली तर ?

प्रवीर : आम्हा क्रांती करू पाहणारे ना ? आई, स्वत:च्या पत्नीच्या जीवनात जर आम्हाला क्रांती करता आली नाही, तर आम्ही समाजात कोणती क्रांती करणार ? आई, हिंदुस्थानात अजून तरी पतीच्या पाठोपाठ पत्नी येत आहेत. पती तुरुंगात जायला निघाला तर ती निघेल. पती जहागिरीवर पाणी सोडायला उभा राहिला, तर तीही वैभवावर तुळशीपत्र ठेवील. आई, शशांकाचे लग्न ठरवा ना. त्याच्या जीवनात येऊ दे ना संगीत.

शशांक : काहींच्या जीवनात उपजतच संगीत असते. माझ्या जीवनात सागरसंगीत आहे. प्रवीर, माझ्या मनात कधीकधी येई की, प्रभाशी तुझे लग्न जमवावे. मी तिला तुझ्या गोष्टी सांगत असे.

प्रवीर : एका जमीनदाराची ती मुलगी.

शशांक : तूही जमीनदाराचाच मुलगा आहेस.

प्रवीर : मी जमीनदारीवर तिलांजली दिली आहे. प्रभा का गरिबीत राहायला तयार होईल ?

शशांक : होईल. तुझ्याशिवाय ती मला कितीतरी विचारायची.
(रहीम येतो.)

आई : ये, रहीम ये. लहानपणी तू आलास म्हणजे खाऊ मागायचास.बस.

शशांक : रहीम, गाणे म्हण रे एखादे.
(रहीम ''जालिम का एक राज चला था !'' हे गाणे म्हणतो.)

प्रवीर : सुंदर गाणे !
(इतक्यात जमीनदार येतात.)

आई : या.
(सारे उठू लागतात. शशांक उठायला बघतो.)

जमीनदार : शशांक, उठू नकोस. पडून राहा. औपचारिकपणा नको. बसा तुम्ही सारी.
(सारी बसतात.)

रहीम : मी जातो, आई. जातो, शशांकदादा.
(जातो.)

प्रवीर : आई, मी जरा गाव बघून येतो. रहीमबरोबर मीही जातो.
(जाऊन बघतो.)

जमीनदार : थांबा, तुम्ही शशांकाचे ना मित्र ? तुम्हाला मी जेवायला बोलवायला आलो आहे. आज रात्री गरिबाकडे मीठ-भाकर गोड करायला या.

प्रवीर : माझा काय संबंध ?

जमीनदार : तुम्ही शशांकांचे मित्र, तुम्ही मॅजिस्ट्रेटचा बंदीहुकूम आणून बांध फोडू दिला नाही. तुम्ही मोठी माणसे. पुढे-मागे मंत्री व्हाल.

प्रवीर : (हसून) समाजवादी राजवट आली तर होईनही कदाचित मंत्री !

शशांक : प्रवीर, जा जेवायला. प्रभा कधीची म्हणे, की प्रवीरला बोलवू म्हणून. जा, नाही म्हणू नकोस.

प्रवीर : अच्छा, रात्री येईन. आता तर जातो.
(प्रवीर जातो.)

जमीनदार : शशांक, तूही ये.

आई : तो अजून आजारी आहे. त्याला नका आग्रह करू.

जमीनदार : मी त्याला पथ्यपाण्याचेच वाढीन.

आई : नकोच पण, प्रवीर येईल.

जमीनदार : शशांकाच्या आई, तुमच्या मनात अद्याप राग आहे. शशांकाला मी तुरुंगात घातले अशी तुमची अजूनही समजूत आहे. होय ना ?

शशांक : जाऊ दे त्या गोष्टी.

जमीनदार : प्रभाला बघायला आज एक गृहस्थ आले आहेत. बहुधा लग्न जमेल. प्रभाला आशीर्वाद द्यायला तू नाही येत ?

शशांक : माझा तिला नेहमीच आशीर्वाद आहे.

जमीनदार : तिच्या लग्नाच्या वेळेस तरी येशील ?

शशांक : आधी ठरू दे तरी.

जमीनदार : प्रवीर तरी येऊ दे. जेवताना बरोबर कोणी शिकलासवरलेला असला म्हणजे बरे.

आई : प्रवीर येईल.

जमीनदार : अच्छा, शशांक लवकर बरा हो. तुझेही लग्न आता व्हायला हवे.

शशांक : माझे, क्रांतीशी लग्न लागलेले आहे.
(जमीनदार जातात.)

शशांक : आई, मला जरा थोपट. गाणे म्हण.

आई : बाळ, आपण आतच जाऊ. येथे वारा आहे. मग मी थोपटेन, गाणे म्हणेन. (जातात. पडदा पडतो.)

प्रवेश चौथा

(बैठकखाना, गोपाळराव आणि जमीनदार बसले आहेत.)

गोपाळराव : हे बघा, पैशांचे काय ते एकदा सांगा.

जमीनदार : मुलगी तर पाहा आधी.

गोपाळराव : आधी पाच हजार रुपयांचे काय ते ठरू दे. मग मुलगी पाहणे.

जमीनदार : पैशांची जरा अडचण आहे. कुळे मस्त झाली आहेत.

गोपाळराव : तुम्ही बडे जमीनदार म्हणून ऐकत होतो.

जमीनदार : प्रजा बंडखोर झाली.

गोपाळराव : आमच्या बाजूला अजून सारे थंड आहे. गडबड नाही.

(प्रभा येते.)

प्रभा : तेथेही गडबड होईल. वातावरण गरम होईल. आग भडकेल. बाबा, तुमचे औषध कधीचे तयार आहे. चला ना.

गोपाळराव : या, औषध घेऊन या.

(प्रभा नि जमीनदार जातात.)

त्यांच्याजवळ पैसे नसतील तर काय करायचे ? परंतु यांची मुलगी तर चुणचुणीत दिसते. यांचीच मुलगी असावी.

(प्रभा येते.)

गोपाळराव : तुम्हीच जमीनदारांच्या कन्या ना ?

प्रभा : होय. मीच त्यांची मुलगी. माझेच लग्न ठरायचे आहे. परंतु लग्न ठरणार नाही.

गोपाळराव : म्हणजे ?

प्रभा : तुम्हाला पाच हजार रुपये हवे आहेत. बाबांजवळ पैसे नाहीत.

गोपाळराव : पैशांची करतील सोय.

प्रभा : खोटी आशा नको आणि बाबांनी पैसे दिले तरी मला ती गोष्ट पसंत नाही. पैशांशिवाय तुमच्या घरात जर मला येता येत नसेल, तर ते घर काय कामाचे ? तुम्ही पैशांचे पुजारी.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

गोपाळराव : मुलीच्या जातीला इतके बोलणे बरे नाही.

प्रभा : मी सत्य ते सांगत आह. खोटा विनय काय कामाचा ? बाबा मला स्वातंत्र्य देतात, मोकळेपणा देतात. तुमच्या घरी का गुलामखाना आहे ? स्त्रियांनी घराबाहेर पडता कामा नये, अधिक बोलता कामा नये, असे का तुमच्या घरचे शास्त्र ? मी शेतकऱ्यांत जाते. त्यांच्या मुलांत जेवते. रहीमचे घर गळत होते तर मी पेंढे पाठवून शिवून दिले. बसा ! जाते. (प्रभा जाते. मुनीमजी, फौजदार येतात.)

मुनीमजी : फौजदारसाहेब, हे गोपाळराव आणि गोपाळराव, हे फौजदारसाहेब. (नमस्कार चमत्कार होतात. बसतात.)

मुनीमजी : मी जातो. मला काम आहे.

फौजदार : काय गोपाळराव, आपल्याकडे वातावरण कसे काय आहे ?

गोपाळराव : सारे शांत आहे. आमच्याकडे सरकारही जरा कडक आहे. येथील जमीनदारांनी सारा भोळा कारभार दिसतो. कुळे त्यांच्या डोक्यावर बसत आहेत.

फौजदार : अहो, शेतकरी दरोडे घालू लागले आहेत. शहरातील माथेफिरू तरुण येतात, गरिबांना उठवतात. परवा एक डाका पडला. एका तरुणावर त्या बाबतीत संशय आहे. तो तरुण इकडेच शेतकऱ्यांच्या चळवळीत आला आहे असे कळले. फार सुंदर आहे म्हणतात. मला पुरावाही मिळाला आहे. उद्या त्या तरुणाला अटक करीन.
(इतक्यात मुनीमजी व प्रवीर येतात.)

मुनीमजी : हे प्रवीर, आमच्या शशांकाचे मित्र. यांनीच परवा कलेक्टरांकडून बांध फोडण्याबाबत बंदीहुकूम आणला. शशांक तुरुंगात होता म्हणून त्यांचे काम करायला हे इकडे आले. प्रवीर, हे फौजदारसाहेब आणि हे गोपाळराव. जमीनदारांच्या मुलीला हे बघायला आले आहेत.
(प्रवीर तोंड लपवून नमस्कार करतो.)

प्रवीर : मी येथे नाही बसत. तिकडे तरुण मंडळी बसली आहेत तिकडे मी जातो. (प्रवीर जातो. एक नोकर येतो.)

नोकर : फौजदारसाहेब, तुम्हाला धनीसाहेब बोलवीत आहेत.

फौजदार : मला ?

मुनीमजी : चला. तुम्हाला घेऊन जातो.
(जातात.)

गोपाळराव : प्रवीर येथे कोठे ? आणि याचा दरवड्याशी संबंध आहे की काय ? फौजदार याला अटक करणार की काय ? प्रवीर, काय हे तू केलेस ? तू इकडे कधी आलास ? येथे शेतकऱ्यांत का चळवळ करायला आलास ? मला लिहिलेस सुट्टीत अभ्यास करण्यासाठी राहिलो म्हणून. येथे मला बघून प्रवीरलाही आश्चर्य वाटले असावे. म्हणूनच तो येथे बसला नाही. ते काही असो. आता असे करावे. मुलगी एकदम पसंत करावी. म्हणजे भावी जावयावर संकट आलेच तर जमीनदारसाहेब अंमलदारास पैसे चारून त्याला सोडवतील. ते गरीब झाले असले तरी मान मोठा आहे. त्यांचा शब्द झेलला जाईल. असेच करावे.
(जमीनदार येतात.)
या, जमीनदारसाहेब

जमीनदार : मग काय ठरवता ?

गोपाळराव : तुमची मुलगी म्हणजे रत्न आहे ! कशी बोलत होती ! जणू पंडिता. धीट आहे. माझ्या मुलाला शोभेशी आहे.

जमीनदार : पैशांची थोडीफार सोय करीन.

गोपाळराव : पैसे नकोत. तुमच्या मुलीने धडा शिकवला आणि मी पैसे घेतल्याचे मुलाला कळाले तर तोही संतापायचा. अहो, ही नवी मुले.
(प्रभा येते.)

प्रभा : बाबा, चला. पाने वाढली आहेत.

जमीनदार : यांना आधी नमस्कार कर.
(पाया पडते.)

गोपाळराव : आशीर्वाद, तुला सून म्हणून ठरवीत आहे. आमच्या घराची लक्ष्मी हो.

जमीनदार : चला, गोपाळराव. चल प्रभा.
(प्रभा थांबते. दोघे जातात.)

प्रभा : यांनी एकदम हे काय केले ? मला विचार करायला वेळही नाही आणि मी एक गोष्ट ऐकली ती खरी का ?
(प्रवीर येतो.)

प्रवीर : (प्रभास पाहून चुकल्याप्रमाणे.) मी चुकून इकडे आलो.

प्रभा : तुम्हाला कुठे जायचे आहे ?

प्रवीर : जेवायच्या बाजूला.

प्रभा : आपले नाव ?

प्रवीर : प्रवीर.

प्रभा : शशांकचे मित्र ?

प्रवीर : होय.

प्रभा : गोपाळरावांचे का तुम्ही पुत्र ?

प्रवीर : हो.

प्रभा : खरेच ?

प्रवीर : खोटे कसे सांगेन ? परंतु ही चौकशी का ?

प्रभा : आधी चौकशी नको का करायला ?

प्रवीर : हवी तर.

प्रभा : तुम्ही शशांकबरोबर शिकत असा ?

प्रवीर : होय.

प्रभा : आणखी काय करता ?

प्रवीर : शेतकऱ्यांत जातो. जमीनदारी नको म्हणतो. परंतु मला भूक लागली. आहे.

प्रभा : कशाची ?

प्रवीर : तुमच्याजवळ बोलण्यात अर्थ नाही. पोटात कावळे ओरडत आहेत. मी जातो.

(प्रवीर जातो.)

प्रभा : किती सुंदर रूप ! यांनीच त्या दिवशी बांध फोडणे अडवले. गोपाळरावांचे हेच चिरंजीव. शशांक ज्यांच्या गोष्टी सांगे तेच हे. मनात नकळत ज्यांना मी पूजिले तेच हे. आई, तुझी ही कृपा. तुझे प्रेम स्वर्गातूनही माझे सारे जणू मंगल करीत आहे.

(पडदा पडतो.)

✦✦✦

अंक तिसरा

प्रवेश पहिला

फौजदार : प्रवीरला पकडण्याचे कारस्थान फुकट जाणार असे दिसते. तो पाटील साक्ष देणार होता; परंतु तो आता तयार नाही. त्याच्या घरावरही त्या मुनीमजींनी जप्ती नेल्यापासून तो चवताळला आहे. प्रवीरला गुंतवायची माझी इच्छा होती. त्याच्या बापापासून आणि प्रभाच्या बापापासून, या दोघा जमीनदारांपासून भरपूर पैसे घेऊन मग प्रवीरला सोडले असते. परंतु आता काय करायचे ?

(पाटील येतो.)

पाटील : तुम्ही बोलावले होते ?

फौजदार : तुम्हाला हल्ली बोलावणी लागू लागली. तुम्ही राजे झालात वाटते ?

पाटील : मी आता पाटील नाही. मी सामान्य शेतकरी. आम्हाला गरिबांचे राज्य आणायचे आहे. वतनदारी कोणाचीच नको. मिरासदारी कोणाचीच नको.

फौजदार : तू मी सांगितल्याप्रमाणे साक्ष देणार की नाही ?

पाटील : ज्याने बांध फोडला जाऊ नये म्हणून सरकारकडून बंदीहुकूम आणवून गरिबांची घरेदारे बुडू दिली नाहीत, जो शशांकदादाचा मित्र, त्याच्याविरुद्ध का मी खोटी साक्ष देऊ ?

फौजदार : तुम्हाला मोठी बक्षिसी देईन.

पाटील : आग लागो त्या बक्षिसाला !

फौजदार : तुमचे शेतकऱ्या–कामकऱ्यांचे राज्य यायला अजून अवकाश आहे. मी मनात आणीन तर आज तुमच्या हातात हातकड्या घालू शकेन.

पाटील : आज ना उद्या तुमच्या हातातही पडणे अशक्य नाही.

फौजदार : तोंड सांभाळून बोल.

पाटील : सर्वांनीच तोंड सांभाळावे. सरकारी नोकरांनी तर आधी. तुम्ही जनतेचे नोकर आहात, सेवक आहात. आम्ही तुमचे धनी, आम्ही मालक. तुम्ही नोकर असून आमच्यावर गुरगुरता ? ते जुने दिवस गेले आणि ते जुने पाटीलही गेले. आता स्वराज्य आहे.

फौजदार : स्वराज्य आले असले तरी नोकरशाही जुनीच आहे. पाटीलदादा, अहो, त्या ४२ साली अनेकांना आम्ही छळले, मारून मारून कायमचे पंगू केले; परंतु आम्ही का नोकरीवरून गेलो ? आम्हाला उलट बढतीच मिळत आहे. आमची येता-जाता पाठ थोपटली जात आहे. तुमची स्वप्ने तुमच्याजवळ ठेवा.

पाटील : आजची स्वप्ने उद्या प्रत्यक्षात येत असतात. फौजदारसाहेब, आज उपाय नाही म्हणून सरकारला तुम्हाला चुचकारून घ्यावे लागत आहे; परंतु नवीन माणसे खात्यात येतील. सरकारी यंत्र शुद्ध होत जाईल.

फौजदार : खा मनात मांडे. जो आमच्या खात्यात येतो, तो आमच्यासारखा होतो. कशाला बोलू ? पुन्हा एकदा विचारतो, साक्ष देणार की नाही ?

पाटील : खोटी साक्ष ?

फौजदार : जणू जन्मात खोटे बोललाच नसशील ? अरे, पाचशे रुपये देईन.

(रहीम व एक गुप्त पोलीस येतात.)

रहीम : आणि मला किती द्याल ?

फौजदार : गप्प बैस.

रहीम : मीही खोटी साक्ष देईन.

गुप्त पोलीस : मीही देईन.

फौजदार : प्रवीरला चोरीच्या खटल्यात गुंतवायचे आहे. मुंबईच्या डाक्याचा माल तुमच्याकडे विकायला त्याने आणला आहे, असे तुम्ही सांगायचे.

रहीम : सारे खोटेच सांगायचे ना ?

फौजदार : जग खोट्यावर चालते. तुम्ही घाबरू नका.

(प्रवीर व एक अंमलदार येतात.)

अंमलदार : (गुप्त पोलिसास) काय आहे प्रकार ?
(गुप्त पोलीस कानात सांगतो.)

अंमलदार : काय फौजदार साहेब, ओळखलंत मला ?

फौजदार : क्षमा करा. नमस्कार. असे अवचित कोठून आलात ?

अंमलदार : तुमचा कारभार बघायला.

रहीम : त्यांचा कारभार झक्क चालला आहे. ४२ च्या चळवळीत यांनी वेत मारले; परंतु आज त्यांना वरची जागा मिळाली !

पाटील : तरी खोटी साक्ष द्या म्हणतच आहेत.

अंमलदार : खोटी साक्ष ?

रहीम : होय.

गुप्त पोलीस : पाटलास ५०० रुपये द्यायला तयार आहेत. आम्हासही.

प्रवीर : आणि खोटे काय सांगायचे ?

पाटील : तुम्ही मुंबईस डाका घातलात, तिकडचा माल इकडे विकायला आणलात, वगैरे आम्ही साक्ष द्यायची.

प्रवीर : वा फौजदारसाहेब ! मला तुरुंगात घालून काय मिळालं तुम्हाला ?

अंमलदार : तुमचे आता लग्न होणार ! जमीनदाराचे तुम्ही चिरंजीव. जमीनदाराचे जावई होणार. दोहोंकडून भरपूर पैसे फौजदारसाहेबांना लाटता आले असते.

पाटील : आता आले लक्षात.

रहीम : तुम्ही का प्रभादेवीचे राजे होणार ?

पाटील : तुम्ही बांध फोडू दिला नाही. उद्या सासऱ्यांची इच्छा प्रमाण मानून तुम्ही का बांधफोडीचा हुकूम आणणार ?

प्रवीर : ते पाप मी करणार नाही. जमीनदाराच्या मुलीशी एकाच अटीवर मी लग्न करणार आहे.

रहीम : ती कोणती ?

प्रवीर : सारी जमीन कुळांना वाटून द्यायची.

पाटील : तुम्ही देवमाणूस.

फौजदार : मी जातो, साहेब.

अंमलदार : कोठे जाता ? एकटे नका जाऊ.

(शिट्टी वाजवतो. पोलीस येतात.)

पकडा यांना. फौजदार, तुमच्यावर अनेक आरोप आहेत. सरकारचे तुमच्याशिवाय चालत नाही ही गोष्ट खरी; परंतु म्हणून ताळतंत्र सोडाल तर शासनच होईल. किती झाले तरी हे नेहरू सरकार आहे. पाचपाचशे रुपये देऊन तुम्ही खोट्या साक्षी द्यायला सांगता ? पूर्वी पापे केलीत ती केलीत. आता स्वराज्यात तरी नका करू. देशाचे नाव कलंकित नका करू. जा, यांना घेऊन. (पोलीस हातकड्या घालून फौजदारास नेतात.)

रहीम : मी जातो.

पाटील : मीही जातो.

प्रवीर : तू माझा जुना मित्र. तू सरकारी नोकरीत कधी गेलास ?

अंमलदार : आज सर्वत्र भ्रष्टाचार आहे, लाचलुचपत आहे. दानतीची निर्मल माणसे सरकारी खात्यात शिरतील तर आज हवी आहेत. आज आपले सरकार आहे. आज नोकरीवर बहिष्कार नको. अशा लफंग नोकरांवर मी नजर ठेवतो. मी जातो, प्रवीर.

प्रवीर : माझ्या लग्नाला येणार की नाही ?

अंमलदार : नाही. प्रवीर, मला दुसरीकडे काम आहे. तू सुखी हो. खरेच का जमीनदारीवर तू पाणी सोडणार ?

प्रवीर : हो.

अंमलदार : तुझ्या भावी पत्नीचे काय मत ?

प्रवीर : आमची दोघांची मते सारखी आहेत. आम्हीही शेतकऱ्याबरोबर कष्ट करू. सहकारी शेती करू. आम्ही हिशेब ठेवू. निरपेक्ष सेवा म्हणजेच जीवनाचे साफल्य.

अंमलदार : धन्य तुम्ही ! मी जातो.

(जातो)

प्रवीर : प्रभाशी माझे लग्न लागावे म्हणून शशांकाला वाटे. देवाने तेच जमवून आणले. शशांकाची सारी स्वप्ने प्रभू पूर्ण करेल का ? प्रभा एका जमीनदाराची मुलगी. परंतु किती साधी नि सरळ ! परवा स्वतः ताटे उचलीत होती.

(प्रभा येते.)

प्रभा : प्रवीर, तुम्ही इकडे कोठे ?

प्रवीर : फुले शोधीत शोधीत आलो.

प्रभा : कशाला फुले ?

प्रवीर : ओळख कशाला ती.

प्रभा : अजून अवकाश आहे.

प्रवीर : परंतु आधीपासून बघून ठेवायला हवीत. तुम्ही कोठे निघालात ?

प्रभा : मी शशांकदादाकडे जात आहे. म्हटले त्याला भेटून यावे, त्याला अजून बरे वाटत नाही. तो नाही का लग्नाला येणार ? त्याने तर तुमची मूर्ती माझ्या मनात प्रथम निर्मिली. त्यानेच माझ्या आत्म्याचे तुमच्या आत्म्याशी कधीच लग्न लावून ठेवले होते.

प्रवीर : तुमच्याविषयीही तो मजजवळ बोलत असे; परंतु वाटे....

प्रभा : की जमीनदाराची मुलगी कशी करावी ? होय ना ?

प्रवीर : मीही जमीनदाराचा मुलगा.

प्रभा : तुमचे वडील पाच हजार रुपये मागत होते.

प्रवीर : परंतु आता त्यांचा हट्ट नाही.

प्रभा : जुन्या पिढीला नवीन पिढीकडे यावेच लागेल. नाही तर रेंगाळत बसावे लागेल. खरे ना ? मी जाते हं.

प्रवीर : मीही फुले शोधीत जातो.

(दोघे जातात.)

प्रवेश दुसरा

(शशांक अंथरुणावर आहे.)

शशांक : कधी सुधारणार माझी प्रकृती ? असे अंथरुणात पडून राहण्यापेक्षा मरण बरे. आई नेहमी काळजी करत बसते. मी जगणार नाही असेच तिला वाटत असावे.

प्रभा : शशांकदादा, कसे वाटते तुला ?

शशांक : ये, प्रभा. किती दिवसांनी आलीस ? त्या दिवशी मी जेवायला आलो नाही म्हणून तू रागावलीस; परंतु ज्या माझ्या मित्राला जेवायला

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थारले)
नगर वाचनालय, सातारा

पाठवले तेच तुझे भावी पती ठरले. त्यांचेच वडील तुला मागणी घालायला आले होते. प्रवीरजवळ तू बोललीस. चांगला आहे प्रवीर!

प्रभा : शशांकदादा, नुसता थोडा आला असतास तर काय रे झाले असते ?

शशांक : मी थकतो, प्रभा आणि आईच्या मनात जुन्या गोष्टी आहेत. तुझ्या वडिलांनीच पोलिसांस सांगून मला अटक करवली. असे तिला वाटते; परंतु आता सरकारने सोडले. सारे विसरायला हवे. परंतु मातृहृदय नाही विसरू शकत. मी धट्टाकट्टा बाहेर आलो असतो, तर तिच्या मनातील ती अढी गेली असती. परंतु असा आजारी होऊन आलो. त्यातच कोणी दगड मारला. चालायचेच. या सर्व गोष्टी गृहीत धरूनच आम्ही क्रांतीच्या पथावर पाऊल टाकले. आपण निर्मळ मार्गाने जायचे ठरवले तरी दुसरे थोडेच जाणार आहेत ?

प्रभा : तू आमच्याकडे राहायला येतोस ? मी तुझी काळजी घेईन. औषधपाण्याची नीट व्यवस्था करीन. जमीनदाराची मुलगी असले तरी मला अभिमान नाही आणि मी तिच्यावर कधीच पाणी सोडले आहे. बाबा जावयालाच ना देणार इस्टेट ? जावई घरची जमीनदारीच सोडणार तर ही कशाला आणखी ? शशांकदादा, तू बरा हो. आपण नवीन प्रयोग करू. सहकारी शेतीचे प्रयोग.

शशांक : आता तुम्ही करा प्रयोग.

प्रभा : तू कोठे जाणार ?

शशांक : मी नवीन देह घेऊन नवसमाज निर्मायला येईन.

प्रभा : तू बरा होशील. असं नको बोलू. तू स्फूर्तिदाता, तू प्रकाश देणारा, संदेश देणारा.

शशांक : सारे नवयुगच नवसंदेश देत आहे. मी कोण संदेश देणारा, प्रकाश देणारा ? तो अहंकार मला नको.

प्रभा : शशांकदादा, मी का तुझी कोणी नाही ?

शशांक : तू माझी ताई आहेस.

प्रभा : मग चल ना ताईकडे. तू इकडे दु:खात असावेस आणि आम्ही का सुखात राहू ?

शशांक : माझ्यासारख्याला सुख नाही. जे तुम्हाला सुख ते आम्हाला नाही. ताई, शेकडो वर्षे चालत आलेला अन्याय, त्याचे प्रायश्चित्त आम्ही घेतले पाहिजे. आम्ही तुरुंगात जाऊ. क्षयी होऊ. कधी लाठी खावी लागेल, कधी गोळी, कधी फासही. आमचे हे प्रायश्चित्तरूप जीवन आहे. उद्या सर्वांचे संसार सुखाचे व्हावे, आनंदाचे व्हावेत म्हणून या अग्निदिव्यातून आम्ही गेले पाहिजे. पापाचे कोणीतरी पुरे प्रायश्चित्त घेतल्याशिवाय पुण्य फुलणार नाही.

प्रभा : शशांकदादा, तुला एक विचारू ?

शशांक : विचार.

प्रभा : माझ्या लग्नाच्या दिवशीतरी क्षणभर येशील ? मी तुझी बहीण ना ? मला सख्खे कोणी नाही. येऊनजाऊन तू एक जवळचा भाऊ. आई लहानपणीच गेली. कोण आहे मला ? आपण लहानपणी खेळत असू. तू मला खाऊ देत असत. लपंडावात मी तुझे डोळे घट्ट धरायची नि तू रागावायचास...

शशांक : आणि तू दिलेल्या गोड गोड वस्तू थोड्या का खाल्ल्या ? आणि प्रभा, तुझा आवाज गोड. तू गाणी म्हणायचीस. कधी बासरी वाजवायचीस. खरे ना ? ती बघ बासरी. मी वाजवायला शिकतो. मला नाही जमत. तू वाजवतेस ?

प्रभा : कोठे रे आहे बासरी ? तू का बासरी आता शिकणार ?

शशांक : मला सर्वांच्या जीवनात संगीत आणायचे आहे. ते ध्येय जणू बासरीच्या रूपाने मी हृदयाशी धरीत असतो. वाजव जरा.

प्रभा : (हातात घेऊन) नाही रे, आज नाही वाजवता येणार. आज माझे हृदय गुदमरल्यासारखे झाले आहे. तुला आजारी पाहून बासरी कशी वाजवू?

शशांक : कोठून येते आहे हे संगीत ? हे का पैलतीरावरून येत आहे ? हे का भविष्यकाळचे संगीत ? हे का बोलावणे ? गोड मधुर स्वर ! लांबून येणारे स्वर ! थांबले वाटते संगीत ? अरेरे ! इतक्यात कसे थांबले ? (तो घेरी येऊन पडतो.)

प्रभा : शशांकदादा, शशांकदादा, काय झाले ?

शशांक : डोळ्यांवर झापड आल्यासारखे वाटते. ताई, जगात आता मला दोनच उद्योग. औषध घ्यायचे नि डोळे मिटून पडून राहायचे. डॉक्टर म्हणतात, ''क्षय आहे. कोठे हवापलट करा.'' ताई, लहानपणापासून दोन गोष्टींचा मी मोठा भक्त. स्वातंत्र्याचा व माणसांच्या संगतीचा. परंतु तुरुंगातील शतबंधनात किती आयुष्य गेले ! स्वातंत्र्यवृत्तीचा तेथे किती कोंडमारा आणि या रोगामुळेही माणसांपासून दूर राहिले पाहिजे. ताई, तू दूर बस. त्या आरामखुर्चीत बस. तुझा नवा संसार आता सुरू व्हायचा. तुम्ही सुखी, निरोगी असा. दूर बस.

प्रभा : मला येथेच बसू दे. तू बोलू नकोस. पडून राहा. तू बरा होशील. माझ्या लग्नाला ये. आशीर्वाद द्यायला ये. हे काय शशांकदादा ? ग्लानी का आली ?

(शशांक मान टाकतो.)

शशांकच्या आई.

(प्रभा हाक मारते. आई लगबगीने येते.)

आई : प्रभा, काय गं झालं ? असा का शशांक ? झोप का लागली आहे ?

प्रभा : ही झोप नाही. ग्लानी आहे.

आई : (दीर्घ नि:श्वास सोडून) शशांकबाळ ?

प्रभा : शशांकच्या आई, असे का रोज होते ? डॉक्टरांना बोलावू का ?

आई : गरिबांना कोठे आहेत डॉक्टर ?

प्रभा : परंतु उद्या गोरगरिबांना सर्वांना डॉक्टर मिळावेत म्हणून जी नवसमाजरचना करायची आहे. तिच्यासाठी, आई शशांकाने आधी जगले तर पाहिजे. मी त्याला आमच्या घरी नेऊ ? येथे किती हाल ! किती कष्ट ! आई हे प्रायश्चित्त आहे. आपल्या देशात पाप फार झाले. आपण पूर्वी आपसांत भांडलो. परके आले. त्यांनी जिंकून आपणांस गुलाम केले. आता परके गेले. देश स्वतंत्र झाला. तरी आपण भांडतच आहोत. महात्माजींसारख्या महापुरुषाचीही आहुती पडली. हिंदू-मुसलमान लढले. आता उरलेल्या प्रांताप्रांताची भांडणे. स्पृश्यास्पृश्ये अजून आहेत आणि भांडवलदार, मजूर हे

झगडे वाढत आहेत. फार पाप आहे. शशांक जणू त्याचे प्रायश्चित्त घेत आहे. या तपस्येतून खरे स्वातंत्र्य येईल, सर्वांना सुखी करणारे स्वराज्य येईल.

प्रभा : आई, डॉक्टर काय म्हणतात ?

आई : डॉक्टर कशाला हवेत सांगायला ? मला सारे समजले आहे. मी सर्व गोष्टींना तयार झाले आहे. माझा का हा एक शशांक ? देशांत असे शेकडो शशांक प्रायश्चित्त घेत आहेत. प्रभा, देशात अत्याचार, अनाचार फार आहे. सर्वत्र खून, मारामाऱ्या, आपसांत पठाणी भाषा आणि रोग आहेत. बेकारी आहे. भारतमातेची लेकरे ! स्वराज्यातही अजून कोण त्यांची दैना ! प्रभा, कोणासाठी मी रडू ? सारी जणू माझी. (शशांक हलल्यासारखे करतो.) शशांक बाळ –

प्रभा : आली का शुद्ध ?

(आत बासरीचा आवाज.)

शशांक : (हळूच डोळे उघडतो.) संगीत, किती मधुर संगीत ! आई हे का पैलतीरावरचे संगीत ?

(पडदा पडतो.)

प्रवेश तिसरा

(रहीम, पाटील वगैरे)

रहीम : कलेक्टर नवीन आला आहे. प्रवीरांनी मागे बंदीहुकूम आणून जमीनदारास बांध फोडू दिला नाही. परंतु झालेला अपमान केव्हा दूर करीन असे जमीनदारांना झाले आहे. मुलीचे लग्न एकदा नीट पार पडो, त्यात बखेडा नको, म्हणून मालक सध्या शांत आहे. पुढे बांध फोडल्याशिवाय जमीनदार राहणार नाही. तुम्हाला नाही असे वाटत ?

पाटील : माझ्याही कानांवर अशी कुणकुण आली आहे. आपण एक गोष्ट करावी.

रहीम : कोणती ? येथून निमूटपणे जायला सांगता की काय ? तेवढे नका सांगू. हे घर सोडून मी तरी जाणार नाही. येथे बाळाची कबर, बायकोची कबर. मी मघा तेथे पणती लावून आलो. त्या कबरीवर का

उद्या खरे पाणी नाचणार ? सापविंचू, मासेखेकडे बसणार ? नाही, हे होऊ देता कामा नये.

पाटील : मी येथून जा म्हणून कसे सांगू ? माझ्या मनात निराळाच विचार येतो आहे. जमीनदाराच्या मुलीचे लग्न आहे. आपण सारे लग्नाला जाऊ.

रहीम : आपणाला बोलावणे तरी कोठे आहे ? आपणास कोण विचारतो कुत्रा ? आपल्या श्रमातून निर्माण झालेल्या संपत्तीने तिकडे नाचरंग उडतील; परंतु आपण तेथे गेलो तर कुत्र्याप्रमाणे आपणास हाकलून लावतील.

पाटील : महात्माजींनी मोठा मार्ग दाखविला आहे. आपण प्रभादेवीच्या लग्नाला शेतकऱ्यांची भेट घेऊन जाऊ. फुलांचे हार घेऊन जाऊ. गोड फळे घेऊन जाऊ. माझ्या मुलीने केलेली फुलांची परडी मी नेईन. प्रत्येकाने काहीतरी भेट म्हणून न्यावी. आपण मोठे मन दाखवू या.

रहीम : परंतु जमीनदाराला मोठे मन आहे का ?

पाटील : ते मेलेले असले तरी जिवंत होईल. आपण शशांकदादांना हा विचार कळवू. त्यांनाही बरोबर घेऊ.

रहीम : त्यांची प्रकृती बरी नाही.

पाटील : परंतु लग्नाला जाणार आहेत. आपण त्यांना सांगू की आमच्याबरोबर चला.

रहीम : आणि प्रभादेवीला म्हणू ''ही गरिबांची भेट घ्या आणि बांध न फोडण्याचे वचन द्या. तुमचा नवीन संसार पाण्यात न बुडो.''

पाटील : प्रवीर आणि प्रभा हो म्हणतील.

रहीम : जमीनदार मग कोठे जाणार ? चल, पाटील. शशांकाकडेच जाऊ. (जातात.)

प्रवेश चौथा

(दिवाणखाना : गोपाळराव, प्रवीर, जमीनदार वगैरे मंडळी आहेत.)

जमीनदार : प्रभा, तू भाग्याची म्हणून असा पती तुला लाभला. सुखी व्हा.

प्रभा : बाबा, तुम्ही सुखी आहात ?

जमीनदार : तुझ्या सुखात माझे सुख. उद्या मला एकटे राहावे लागेल. परंतु त्याला काय उपाय ?

प्रभा : राहून राहून मला एका गोष्टीचे दु:ख होत आहे.

जमीनदार : तुझी आई नाही; हेच ना ?

प्रभा : ते दु:ख तर नेहमीच आहे.

प्रवीर : मी सांगू कोणते दु:ख ते ?

प्रभा : सांगा.

प्रवीर : शशांकदादा लग्नाला आला नाही म्हणून ना ?

जमीनदार : तो आजारी आहे.

गोपाळराव : तो आजारी आहे हेच बरे. नाहीतर काही विघ्न करता.

प्रवीर : काय बोलता बाबा ? तो बरा व्हावा म्हणून हजारो शेतकऱ्यांच्या हृदयातून रोज प्रार्थना उठत आहेत, तो बरा होऊ नये असे तुम्ही म्हणता ? जो आम्हा तरुणांचा स्फूर्तिदाता, जो क्रांतिकारक वृत्तीचा असून संयमी, निर्मळ मार्गाने आपण जाऊ म्हणून सांगणार त्याचे तुम्ही वाईट इच्छावे ? आणि ते पुन्हा आमच्या मंगल विवाहप्रसंगी ? तिकडे शशांक पडल्या पडल्या आमच्यासाठी प्रार्थना करीत आहे आणि तुम्ही हे काय म्हणता, बाबा ? या जमीनदाऱ्या, या सावकाऱ्या माणसाला का क्रूर, निर्दय बनवतात ?

गोपाळराव : मी तुझ्यावर नाही का प्रेम करीत ?

जमीनदार : आणि आई गेली तरी प्रभाला मीच नाही वाढविले? जमीनदारांजवळ का प्रेम नसते ? आणि गरीब का कोणाचे खून नाही पाडीत ?

प्रवीर : गरीब हा आधी शिवशंकर असतो. तो तुम्हा सर्वांचे कल्याण करतो. स्वतः उपाशी राहून तुम्हाला आधी पोसतो. परंतु गरिबांच्या सहनशीलतेलाही सीमा नाही. दरिद्री मनुष्य शिवशंकरही आहे आणि रुद्रही आहे. शंकराला दरिद्र आणि रुद्र दोन्ही नावे आहेत.

मुनीमजी : हे आवाज कसले येत आहेत ? हे जयघोष कसले ?
(किसान कामगार राज्यांचा विजय असो. समाजवाद झिंदाबाद. जमीनदारी नष्ट होवो. भांडवलशाही नष्ट करा.)

जमीनदार : लग्नात विघ्न करायला आले की काय ?

गोपाळराव : (घाबरून) आता आपणास खाऊनही टाकायचे !

जमीनदार : (मुनीमजीस) माझी बंदूक आणा. जा आधी. तुम्ही घाबरू नका. वेळच आली तर मी गोळ्या घालीन.

प्रवीर : मी तुम्हाला असे करू देणार नाही. एक बंदूक किती पुरणार ? तुम्हाला जिवंत राहायचे आहे की नाही ?

(मुनीमजी बंदूक आणून देतो. घोषणा जवळ येतात.)

मुनीमजी : त्यांच्या हातात मशाली आहेत. स्पृश्य-अस्पृश्य, हिंदू-मुसलमान सारे आहेत आणि एकाच्या खांद्यावर शशांक आहे.

प्रभा : शशांकदादा ?

मुनीमजी : हो, हो.

जमीनदार : मी म्हटलेच की हा विघ्न करणार !

गोपाळराव : मी मघा म्हटले तर प्रवीरने मोठे प्रवचन दिले.

प्रवीर : शशांक मंगलासाठीच आला आहे.

(मिरवणूक येते. शशांक वगैरे येतात.)

जमीनदार : तुम्ही सारे आत कसे आलात ? फाटक मोडून आत घुसलात ? हे सार कुणबट्टे घेऊन येथे का आग लावायला आलात ?

रहीम : आग लावणारे तुम्ही. गरिबांच्या संसाराची राखरांगोळी करणारे तुम्ही.

जमीनदार : तोंड सांभाळून बोल. फाटक मोडून तुम्ही चोरासारखे आत घुसलात.

पाटील : आम्ही का चोर ?

गोपाळराव : होय. चोर, डाकू, दरोडेखोर.

रहीम : तुम्ही आहात चोर, डाकू. दुसऱ्याच्या श्रमांवर जगणारी बांडगुळे तुम्ही.

पाटील : तुम्ही गरिबांच्या मानगुटीस बसणारी भुते. तुम्ही राक्षस.

जमीनदार : आम्ही राक्षस ? आम्ही चोर ?

शशांक : रागावू नका. परंतु ही गोष्ट खरी नाही का ? राखतो तो राक्षस, देतो तो देव. तुम्ही आपल्या तिजोरीत राखून ठेवता. गीता सांगते, दुसऱ्याला देऊन उरलेले खावे. असे न करील तो चोर. गीता तुम्हाला ''स्तेन एव सः'' म्हणजे चोर म्हणत आहे.

प्रवीर : आणि वेदही म्हणतो. ''केवलाघो भवति केवलादी'' दुसऱ्यांना न देता खाणारा केवळ पापरूप होय.

गोपाळराव : तुम्ही आम्हाला धर्म शिकवावा ?

जमीनदार : समाजवाद्यांना धर्म कोठला ?

प्रभा : बाबा, कुठे असलाच धर्म तर त्यांच्याजवळ असेल. जो दुसऱ्यांना सुखी करू बघतो तो का धर्ममय नव्हे ?

शशांक : प्रवीर, प्रभा, हे सारे शेतकरी घेऊन आम्ही तुमच्या मंगल विवाहासाठी आलो आहोत !

जमीनदार : कुत्री ! आगंतुक येणारी ! जेवायला मिळेल या आशेने आला असाल ?

रहीम : आम्ही स्वत:च्या श्रमाने जगतो. कुत्री तुम्ही आहात.

पाटील : आम्ही प्रभादेवींना विवाहाच्या भेटी आणल्या आहेत. ही त्या मुलीने केलेली परडी. ही मी फुलांनी भरून आणली आहे.

रहीम : आणि मी माझ्या हातांनी विणलेली ही सुंदर चटई. माझा मुलगा गेल्यापासून मी ही तशीच बांधून ठेवली होती.

जमीनदार : ती अशुभ चटई कशाला आणलीस ?

प्रभा : त्याने प्रेमाने आणली. का अशुभ म्हणता ?

शशांक : हे नाना पुष्पहार, हे फलभार, या नाना वस्तू. या प्रेमाने आलेल्या. त्यांचा स्वीकार करा. वधुवरे सुखी होवोत !

प्रवीर : परंतु आम्ही तुम्हाला काय देणार ?

पाटील : एक मागणे द्या.

प्रभा : कोणते ?

रहीम : प्रभादेवी, तुम्ही स्वत:चा नवीन सुखाचा संसार मांडीत आहात. आमचा संसार पाण्यात जावा असे तुम्हाला का वाटेल ?

प्रवीर : असे कसे वाटेल ?

पाटील : मग आमची एक मागणी मंजूर करा. येथील बांध कधी पाडला जाणार नाही, आमची घरेदारे पाण्यात जाणार नाहीत असे आश्वासन द्या.

जमीनदार : ते आश्वासन देणारे हे कोण ? त्यांचा काय संबंध ?

प्रभा : बाबा, या इस्टेटीची व्यवस्था पुढे आम्हीच करणार ना ?

जमीनदार : माझा झालेला अपमान का मी विसरू ?

प्रवीर : तो अपमान तुमच्या आजच्या जावयानेच केला होता. तुम्हाला हे माहीत असून मला का पसंत केलेत ?

जमीनदार : हा सारा शशांकचा चावटपणा आहे. माझ्या मुलीचे लग्न काही बेट्याला नीट पार पाडू देण्याची इच्छा नव्हती म्हणून आजारीपणाचे सोंग करून सुटून आला आणि आता या लोकांना बंड करायला फुस द्यायला आला आहे. हरामखोर.

(शशांकला बंदुकीचा दस्ता मारतो.)

प्रवीर : काय केलेत हे ?

शशांक : सर्वांनी शांत राहावे. ताईच्या लग्नात तिचे वडील अमंगल करू इच्छित असले तरी आपण नाही तसे करता कामा.

(शशांक पडतो.)

प्रभा : शशांकदादा !

जमीनदार : प्रभा, इकडे ये.

प्रभा : तिकडे कोठे येऊ ? ज्या शेतकऱ्यांनी प्रेमाने या भेटी आणल्या त्यांच्यात जाऊन मी राहणार आहे.

प्रवीर : आणि मी अन्यत्र कसा राहू ? आमचे दोघांचे लग्न लागले आहे.

गोपाळराव : प्रवीर, तू जमीनदाराचा मुलगा आहेस.

जमीनदार : प्रभा, तू जमीनदाराची मुलगी आहेस.

प्रवीर : मी जमीनदारीवर कधीच पाणी सोडले आहे.

प्रभा : आणि मीही.

(ती दोघे शेतकऱ्यांत येतात. प्रभा शशांकना वारा घालते.)

जमीनदार : प्रभा, इकडे ये.

प्रभा : जेथे प्रवीर तेथे मी.

गोपाळराव : प्रवीर, इकडे ये.

प्रवीर : जेथे श्रमणारे, तेथे मी. कारण वेद म्हणतो, ''श्रमणाऱ्यांशी मैत्री देव इच्छितात.'' परमेश्वर त्यांच्याजवळच आहे.

रहीम : शशांकांना आपण उचलून नेऊ या.

श्री. छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय सातारा
दाखल नं. ग्रंथानुक्रमांक
किंमत पाने

गोपाळराव : प्रवीर, मागे फिर.

जमीनदार : प्रभा, मागे फिर

(जातात, बरोबर प्रवीर, प्रभा जातात.)

जमीनदार : प्रभा, प्रवीर–दोघे गेली ! आपण दोन पिकली पाने येथे राहिलो, काळच बदलला. चला. आत बसू आणि अश्रू पुसू.

(पडदा.)

प्रवेश पाचवा

(शशांकचे घर. शय्येवर मरणोन्मुख शशांक. आईच्या मांडीवर त्याचे डोके. जवळ प्रवीर, प्रभा, रहीम, पाटील वगैरे.)

प्रभा : आमचे आयुष्य देवाने शशांकदादाला द्यावे.

शशांक : प्रभा, आता तुम्हीच जगा. खूप काम करा. परकी सत्ता गेली. आता आलेले स्वराज्य गरिबांचे व्हावे म्हणून झटा.

प्रवीर : तू गेल्यावर मार्ग कोण दाखवील ?

शशांक : हृदयातील ध्येय–भगवान.

आई : बाळ, बोलू नकोस.

शशांक : आता हे शेवटचेच बोलणे. आई, मी जरा उठू का ?

(उठण्याचा प्रयत्न करतो.)

नाही उठवत मला. मला असे धरून ठेव. आई. मला सर्वांना बघू दे. आई, डोळ्यांसमोर अंधार येत आहे. माझे डोळे मिटणार. नवयुगाची नवीन प्रभात बघायला मी नसेन. हे काय ? आई, तू रडू नकोस. मग मलाही रडू येईल. आई, ही मानवजात सोडून जायला वाईट वाटते. या सर्व विश्वात मानवप्राणी मिळण्याचे भाग्य फक्त आपल्या पृथ्वीला. ही पृथ्वी सोडून जाणे म्हणजे केवढे दुःख ! ये, ताई, जवळ ये. ये, प्रवीर, ये रहीम, या पाटील, ती बघा, मंगल प्रभात माझ्या मिटणाऱ्या डोळ्यांना दिसत आहे. ती प्रभात येईल तेव्हा, प्रभा, तुझ्या शशांकदादाची आठवण करशील ना ? त्या दिव्य आनंदात मला विसरू नकोस आणि आजवर जे हजारो मेले, तो मंगल प्रकाश यावा म्हणून धडपडले, झिजून मेले, त्यांनाही विसरू नका. त्यांचे

पोवाडे गा. शशांकाला विसरा. परंतु त्या हुतात्म्यांना नका विसरू. मंगल प्रभात येईल.

प्रभा : शशांकदादा, तुझी जिवंत श्रद्धा आमच्याजवळ कोठे आहे ? आम्ही दोलायमान साशंक माणसे. मंगल प्रभात येईल अशी श्रद्धा मला या क्षणी तरी वाटत नाही. काँग्रेस भांडवलशाहीकडे झुकत आहे. कम्युनिस्ट व त्यांच्याशी हात मिळवणारे रक्तपाती जात आहेत. समाजवादी श्रद्धा कोठवर टिकणार ?

शशांक : तीच तारक श्रद्धा. नको भांडवलशाही, नको रशियन छाप हुकूमशाही. व्यक्तीला शक्य तितके स्वातंत्र्य देणारा समाजवाद हे भारताचे ध्येय. महात्माजींच्या या भूमीत तरी रक्तपात नकोत. प्रवीर, प्रभा ही श्रद्धा घेऊन तुम्ही जा. काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्या जात्यात तुम्ही का भरडले जाल ? काही होवो. जय की पराजय हा सवाल नाही. स्वत:ची निर्मळ श्रद्धा घेऊन शेवटपर्यंत गेलात की नाही, हाच प्रश्न. मला तर आशा वाटते. श्रीजयप्रकांशासारखा धीरोदात्त नेता तुम्हाला लाभला आहे. तुम्ही विजयी व्हाल.

आई : किती बोलशील ?

शशांक : हे शेवटचे बोलणे. तो बघा नवसमाज. भारतात ना कोणाला ददात, ना कसली वाण. शेतात राबणारा शेतकरी रात्री ताऱ्यांचा अभ्यास करीत आहे, तर विज्ञानाचा उपासक हातात नांगर धरीत आहे. वर्गहीन समाज ! सारे श्रमणारे, सारे ज्ञानविज्ञानाचे उपासक, सारे कलांचा अभ्यास करणारे. खरी मानवसंस्कृती येत आहे. ज्या संस्कृतीत सर्व मानव भर घालीत आहेत अशी विशाल संस्कृती. आई, ती बघ मंगल प्रभात. तुम्ही निराश नका होऊ.

रहीम : एखादे वेळेस वाटते, आलेले स्वातंत्र्य जाईल की काय ?

शशांक : वेडे ! अरे, लाखोंची साधना फुकट जाईल ? भारताची मक्ती ! ती आता कोणीही हिरावू शकणार नाही. कारण ही मुक्ती ना एका वर्गाची, ना एका जातीची; ना एका प्रांताची, ना एका धर्माची. ही मुक्ती ३० कोटी भारतीयांची आहे. आलेले स्वातंत्र्य सर्वांच्या मालकीचे. ते सारे मिळून सांभाळतील. मला तर आशा वाटत आहे

आणि ती अमर आशा तुम्हाला देऊन मी जात आहे. हा रहीम, हे पाटील, हा संतू, सारी श्रमणारी जनता माझ्या या बाजूला आणि इकडे प्रभा, तू प्रवीर, जमीनदारांची शिकलीसवरलेली तुम्ही मुले. येथे तुम्ही सारी एकत्र आला आहात आणि तुमच्या या प्रेमळ मेळाव्यातच माझे स्वप्न मला फलद्रूप झालेले दिसत आहे. येथे हिंदू आहेत, मुसलमान आहेत. शोषित आहेत आणि शोषण करणारे आहेत आणि सर्वांच्यामध्ये माझी प्रेममयी राजराजेश्वरी आई ! जणू भारतमातेचे भव्य प्रतीक माझ्या आईच्या रूपाने मला दिसत आहे आणि तिची सारी लेकरे भेद विसरून, द्वेष विसरून, समता स्थापायला जणू एकत्र आले आहेत. ती पाहा, भविष्याची हाक मला ऐकू येत आहे. ती नव मंगल-प्रभात ! ती पाहा पहिली प्रभात किरणे ! या नवप्रकाशाला प्रणाम करून त्यांचे स्वागत करून मला माझे डोळे मिटू दे. जयहिंद !

✦✦✦

ते आपले घर

दोन शब्द

'ते आपले घर' या नावाचे नाटक त्रिचनापल्ली जेलमध्ये १९३० मध्ये मी लिहिले होते. ती वही मजजवळ पडून होती. त्या नाटकातून स्त्रीपात्रे काढून टाकून ही छोटी नाटिका मी तयार केली आहे. शाळांतील विद्यार्थ्यांना सम्मेलनप्रसंगी, इतर उत्सवप्रसंगी ही नाटिका करता येईल. ठिकठिकाणच्या अनेक तरुणांनाही ही नाटिका बसवता येईल. देशापुढील सध्याचे प्रश्न घेऊन लिहिलेल्या छोट्या नाटिका आहेत कोठे ? मी मोठा कलावान नाही. परंतु राहवत नाही म्हणून स्पृश्यास्पृश्य, हिंदुमुस्लीम ऐक्य, सत्याग्रह, श्रमजीवींसंबंधी आपले कर्तव्य, वगैरेंवर मी लिहित असतो. महाराष्ट्रातील कलावंतांस हे लिहिणे आवडले नाही तरी त्यातील सद्‌हेतू व कळकळ पाहून परमेश्वर कौतुक करील याची मला शंका नाही.

ही नाटिका हरिजनांच्या, काँग्रेसपत्राच्या व प्रकाशमंडळाच्या मदतीसाठी अमळनेरच्या आणि इतर दुसऱ्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांनी मिळून चारदा केली होती. तिचे प्रयोग अत्यंत यशस्वी झाले होते असे, नम्रपणे सांगावेसे वाटते. काँग्रेस पत्रांतून ही छोटी नाटिका क्रमश: प्रसिद्ध झाली. पुष्कळांची पत्रे आली की पुस्तकरूपाने ती तयार करा, म्हणून हे पुस्तक आज प्रसिद्ध होत आहे.

हे पुस्तक मी जळगावच्या प्रकाशमंडळास देत आहे. पुस्तकाचा खर्च जाऊन जे मिळेल ते सारे प्रकाशमंडळाच्या कामाला होईल. तरी जनतेने हे स्वस्त पुस्तक घेऊन प्रकाशमंडळाच्या कामासही थोडी मदत केल्याचे श्रेय घ्यावे. ९० पानांची अडीच आणे किंमत आहे. इतके स्वस्त पुस्तक तुम्हाला कोठे मिळणार ?

– साने गुरुजी

९ ऑगस्ट १९३९
अंमळनेर

नाटिकेतील प्रमुख पात्रे

गणपतराव	:	एक वृद्ध आजारी गृहस्थ.
राजा	:	त्यांचा सत्याग्रही मोठा मुलगा.
रामा	:	राजाचा धाकटा भाऊ.
डॉक्टर	:	राजाचा मित्र.
रामजी	:	गणपतरावांची शेती करणारा महार.
दिनकरराव	:	गणपतरावांचा शत्रू.
गोपाळ	:	राजाचा तुरुंगातील नवीन मित्र.
शंकरराव	:	एक सज्जन गृहस्थ
		याशिवाय लखंभट, गुलाबचंद शेट, वसंता, भिकू गुरव व अनेक मुले.

ते आपले घर (नाटिका)

अंक पहिला

प्रवेश पहिला

(सारी पात्रे येऊन उभी राहतात.
नान्दीचे गाणे म्हणतात.)

(गाणे)

(चाल – भारतमाई)

हसशिल आता तू लवलाही, दैन्य जाइल पाही ।।
स्पृश्यस्पृश्य सारे एकत्र येतील
हिंदुमुसलमान प्रेमे नाचतील
माते तुझे अश्रू पुसून टाकतील
नवतरुणांचा नवधर्म येई ।। धृ. ।।

स्वातंत्र्यार्थ करू सर्वस्वाचा होम
देशप्रेमे अमुचा नाचेल रोमरोम
अल्लाहु अकबर हरहर ओम
नवगर्जना नभ भेदुन जाई ।। मा. ।।

मोक्ष येतो दारी दिसतो समोर
माते तुझा सारा हरेल आता घोर
दिगंतात जाईल तुझी कीर्ती थोर
भक्तिप्रेमे विश्व वाकेल तव पायी ।। मा. ।।

(वंदेमातरम्, महात्मागांधी की जय, इन्किलाब झिंदाबादच्या गर्जना करून राजा शिवाय सर्व जातात.)

राजा : भारतमातेच्या उज्ज्वल भविष्यकालाची गाणी गाताना मी तन्मय होतो; पण मी का केवळ घरात गाणी गात बसू ? आज देशात प्रत्यक्ष स्वातंत्र्याचा संग्राम सुरू आहे. राष्ट्र पेटले आहे. मी घरी कसा राहू ? बाबा म्हणतात, परीक्षा पास झालास. आता नोकरी कर. देशात स्वातंत्र्याचे होमकुंड पेटले असताना मी का अर्जाची भेंडोळी हातात घेऊन साहेबांचे उंबरठे झिजवू ? माझ्याच्याने ते होणार नाही; परंतु बाबांची निराशा होईल. लहानपणी आई वारल्यापासून आम्हा दोघा भावांना बाबांनी तळहाताच्या फोडाप्रमाणे वागविले. ते आज आजारी आहेत. त्यांना हल्ली नीट हिंडवत नाही. अशा स्थितीत त्यांना सोडून मी कसा जाऊ ? काय करावे ? पिता का भारतमाता ?

रामा : दादा, कसला करतोस सारखा विचार ? तू माझे ऐक. नोकरीच्या भानगडीत पडू नकोस. बाबांची काळजी नको करू. मी आहे बाबांना. वेळ आली तर भीक मागेन. परंतु त्यांना सांभाळीन. त्यांचा हात धरून मी त्यांना चालवीन, त्यांचे पाय चेपीन, सारे सारे करीन. खरेच जा तू. देशासाठी जा.

राजा : रामा, तू अजून लहान आहेस. तुझ्यावर सारा भार टाकून मी कसा जाऊ? मी सत्याग्रहात जाणार. वेळ आहे, प्रसंग आहे. समज लाठीमार होऊन माझे डोके फुटले, गोळीबार होऊन माझे प्राण गेले तर ? मी मरणाला भीतो असे नाही; पण तुला कोण, बाबांना कोण ?

रामा : देव आहे सर्वांना आणि दादा सारेच जर असे म्हणू लागतील तर देशासाठी जावे तरी कोणी ?

राजा : खरे आहे तुझे म्हणणे. हे बघ आपले बाबाच इकडे येत आहेत. (गणपतराव काठी टेकीत येतात.)

गणपतराव : (बसत) थकलो अगदी. अगदी त्राण नाही हो आता.

राजा : खरेच हो बाबा.

गणपतराव : मग तू काय ठरविलेस ? नोकरी नाहीच का करणार ?

रामा : बाबा जाऊ देना दादाला. आपल्या घरात देशप्रीतीचा पवित्र दीप लागू दे. आपले घर पवित्र होऊ दे.

गणपतराव : कोठे आहे आपले घर ? आपले घर या जन्मी नाही. मी मनात म्हणत

असे, राजा मोठा होईल, नोकरी चाकरी करील, मग लहानसे सत्तेचे घर बांधू, स्वत:चे घर नसणे या सारखे दु:ख नाही.

राजा : बाबा या हिंदुस्थानात कित्येकांना का स्वत:चे घर आहे ? कोट्यवधी लोक घराशिवाय आहेत. मोठ्या शहरात जाऊन पाहाल तर हजारो लोक रस्त्यावर पडतात. थंडीत गारठतात. पावसात भिजतात. ना थारा ना निवारा. बाबा, स्वराज्याशिवाय कोठले कोणाला सुखाचे घर ? आपले घर नाही याचे तुम्हाला वाईट वाटले; परंतु हिंदुस्थानातील लाखो लोकांना घर नाही हा विचार जर तुमच्या मनात जागृत राहील तर स्वत:चे घर नाही याचे दु:ख तुम्हाला वाटणार नाही.

गणपतराव : साऱ्या गोष्टी खऱ्या; परंतु तुमचा ध्येयवाद मजजवळ कोठे आहे ? मी मनात केवढाल्या आशा खेळवीत होतो. लहानसे घर, छोटीशी बाग, गाय–वासरू, तुझे लग्न झालेले आहे, घरात सून नांदते आहे, बाळ रांगते आहे, अशी स्वप्ने मी रंगवीत असे; परंतु सारी स्वप्ने धुळीत मिळणार ! नोकरी नको म्हणतोस. लग्न तर नाहीच करणार असे ठरविलेस. हा रामाही तुझ्याच पाठीमागे येणार ! माझ्या म्हाताऱ्याच्या साऱ्या आशा मातीत जाणार.

राजा : बाबा तुमच्या मातीत गेलेल्या आशांतून भारतमातेचे भव्य मंदिर उभारलेले मला दिसत आहे. आपल्याला घर नाही; परंतु भविष्य काळात सर्वांना नीट घर मिळालेले माझ्या दृष्टीला दिसत आहे. बाबा जाऊ देना मला.

रामा : बाबा, द्याना दादाला परवानगी.

गणपतराव : जा. राजा जा. तुझ्या ध्येयवादाच्या आड नाही मी येत.

राजा : बाबा कोठेही गेलो तरी तुमचे पवित्र स्मरण मी करीन, तुमच्या चरणांचे चिंतन करीन.

रामा : दादा मीसुद्धा प्रभातफेरी काढीन, मुले जमवीन.

राजा : तू नको असे करू. मग बाबांना कोण ?

रामा : माझ्याच्याने राहवले नाही तर ?

राजा : खरेच; पण हे पाहा कोण आले ?

(शंकरराव येतात)

गणपतराव : या शंकरराव (सर्व नमस्कार करतात. बसतात.)

शंकरराव : काय राजा, तू म्हणे मोठा देशभक्त झाला आहेस. तिकडे मोठमोठी व्याख्याने देतोस. अरे, आपल्या गावात दे की एखादे व्याख्यान.

रामा : आपल्या गावात कोण ऐकणार ? सारे भितुरडे. पोलिसांचे नाव काढताच सारे पळून जातात.

शंकरराव : व्याख्याने ऐकून ऐकूनच भीती कमी होते. आधी श्रवण, मग चिंतन, मग आचरण. राजा, दे बोवा एक व्याख्यान.

गणपतराव : खरेच राजा, मलाही ऐकायचे आहे कसे बोलतोस ते. फार चांगले बोलतो असे म्हणतात.

राजा : तुमचा सर्वांचाच आग्रह असेल, तर देईन एखादे व्याख्यान.

शंकरराव : तू खरेच कारे नोकरी नाही करणार ?

राजा : नाही.

शंकरराव : मोठा त्यागी दिसतोस !

राजा : कसला त्यागी नी काय ? सारे राष्ट्र पेटले आहे. मोठेमोठे अमीर फकीर होत आहेत. मोठेमोठे कोट्याधीश तुरुंगात मोटा ओढीत आहेत. भारताची मान त्यागाने उंच होत आहे. भारत त्यागाने तळपत आहे.

रामा : दादा, आपल्याला रामजीकडे जावयाचे आहे ना ?

राजा : खरेच. बाबा आम्ही जातो. (जातात)

शंकरराव : गणपतराव, खरेच का तुमचा राजा जाणार ?

गणपतराव : होय. जाऊ दे. हजारो जात आहेत; परंतु आमचे सत्तेचे घर हवे होते. घर नाही म्हणून वाईट वाटते.

शंकरराव : येथून तुम्हाला कोण काढणार आहे ? तुमचे घरमालक तर फार धार्मिक आहेत. येथे रजा घेऊन येतात तेव्हा देवावर अभिषेक करतात, ब्राह्मणभोजन घालतात.

गणपतराव : अशांचीच भीती वाटते. देवावर अभिषेक करणारे लोकांना रडवतात. ब्राह्मणभोजन घालणारे हरिजनांना लाथा मारतात.

शंकरराव : तुमच्या राजाची मात्र कमाल आहे. बरे गणपतराव, मी जातो. राजाच्या व्याख्यानाचे नक्की करतो.

गणपतराव : मीही जातो. गीता वाचावयाची आहे.
(दोघे जातात.)

प्रवेश दुसरा

(खांद्यावर घोंगडी घातलेला असा रामजी महार प्रवेश करतो.)

रामजी : किती वाईट वाटते आहे मला ? हे माझे शेत. आज मी या माझ्या शेतावर मजूर म्हणून काम करीत आहे. पाचाचे पाचशे झाले व पाच हजारांचे शेत गेले. २ वर्षे पिकले नाही. खंड घालता आला नाही. गणपतराव हे शेत यंदा माझ्याकडून काढून घेणार असे ऐकतो. मी कोठे जाऊ ? आम्हाला माड्या महाल नकोत. परंतु मोडकी तोडकी झोपडीही असू नये का ? गणपतरावांचे ते राजादा आले आहेत. ते गांधींचे आहेत असे म्हणतात. ते तरी आमची कीव करतील का ?

(पद)

जगी कोण अस्पृश्यांची कीव हो करील
कोण त्यास प्रेमे हृदयी घट्ट हो धरील ।। जगी. ।।
अहोरात्र सेवा करितो, सकल या जगताची
सनातनी जनता परि ही फार फार जाची
दु:खराशी भगवंता ही कोण रे हरील ।।जगी. ।।

खरेच गरिबाला, त्यातला त्यात आम्हा महारामांगांना कोण आहे ?

(राजा व रामा येतात.)

राजा : रामजी, अरे असा दूर का होतोस ? आम्हाला नाही हो विटाळ. बरा आहेस ना ?

रामजी : तुम्ही बरे असलेत म्हणजी आम्ही बरे.

रामा : रामजी आज हसत का नाहीस ?

रामजी : कसा हसू ? या शेतावरून तुमचे वडील मला काढणार, मग मी कसा हसू? मी कोठे जाऊ ? मी दाणे घातले नाहीत. घरात का मी कोठारे भरली आहेत ? राजादा, वास्तविक हे शेत माझे होते. तुम्ही ते व्याजापायी घेतलेत. तुम्हाला सारा इतिहास माहीत आहे.

राजा : होय.

रामजी : व्याज, भयंकर व्याज. मी सर्वस्वास मुकलो आणि आता तुमचे वडील मला देशोधडीला लावत आहेत.

रामा : दादाने बाबांना पुष्कळ सांगितले; परंतु ते ऐकतील तेव्हा खरे.

राजा : रामजी, हे शेत खरोखरच तुझे आहे. या देशात तू खपतोस. तुझा घाम या शेतात पडला आहे. तुझी बायकामाणसे येथे श्रमतात. ही ओसाड भूमी तू हिरवी हिरवी केलीस. धनधान्याने नटवलीस. या भूमातेला वाचा असती, तर ती शेकडो जिभांनी म्हणती की, मी रामजीची आहे. रामजी, श्रमणाऱ्यांचा आधी हक्क. श्रमणारा सर्वात पवित्र. जगात एकच वस्तू पवित्र आहे. ती म्हणजे श्रमणाऱ्यांचा कपाळीवरचा घाम. गंगा-गोदांचे पावित्र्य त्यात आहे. सारे शंकराचार्य त्या घामाच्या स्पर्शाने पवित्र होतील. सारे गादीवाले महाराज त्या घामाच्या स्पर्शाने उद्धरून जातील. शेकडो शेटजी, भटजी माझ्यासारखे हजारो पांढरपेशे त्या पवित्र घर्मबिंदूंच्या स्पर्शाने मोक्षाचे अधिकारी होतील.

रामजी : हे शब्द काय कामाचे ? असला निढळाचा घाम ढाळणारा आज अन्नाला महाग झाला आहे. त्याची कोल्ह्याकुत्र्याहून वाईट दशा झाली आहे.

रामा : रामजी, काळ झपाट्याने बदलत आहे. श्रमणाऱ्याला मान, वैभव लवकरच प्राप्त होईल.

राजा : खरेच, श्रमणाऱ्याला आधी शाश्वती हवी. त्याचा आधी हक्क हवा. जो श्रमतो त्याची सत्ता. सनातन धर्म सांगतो नांगरील त्याची जमीन; परंतु हे थोर धर्मसूत्र आज सारे विसरले आहेत. रामजी, तुरुंगात जाण्यापूर्वी मी बाबांकडून तुझे शेत तुला देववीन. त्यांच्याकडून तसे वचन घेईन. माझे बाबा काही सनातनी दगड नाहीत. ते ऋषींचा आत्मा ओळखतील. धर्माचे रहस्य जाणतील, न्यायनीती पाळतील. खरेच रामजी.

रामा : रामजी, दादा आता सत्याग्रहात जाणार.

रामजी : खरेच का राजादा ? आणि तुरुंगात जाणार ?

रामा : तुरुंगातच काय, गोळीबाराने मरावे लागेल.

राजा : गोळीबाराने मरण्याइतके माझे भाग्य थोर नाही. ते देवाच्या लाडक्या लेकराचे भाग्य असते.

रामा : दादा, तुझे व्याख्यान ठरविले असेल. चल आपण जाऊ.

राजा : खरेच रामजी. आम्ही जातो हां.

रामजी : आम्ही पण येऊ का व्याख्यानाला ?

राजा : त्यांनी मंदिराबिंदीरात ठरविले असेल. ते कसे येऊ देतील ?

रामा : ये तू रामजी, काय होते ते पाहू.

राजा : बरे जातो हां. (दोघे जातात.)

रामजी : खरेच का आम्हा श्रमणाऱ्यांचे राज्य होईल ? खरेच का आम्हाला सुखाचे दिवस येतील ? हो. येतील येतील. (गाणे म्हणता.)

(गाणे)

आता येणार येणार,

आमच्या भाग्याचा काळ हो येणार ।। धृ. ।।
आमचे दैन्य जाईल । आमचे दुःख जाईल,
मान सन्मानाचे स्थान घेणार ।। आता. ।।
आजपर्यंत श्रमलो । आजपर्यंत दमलो
आमची तपश्चर्या आता फळणार ।। आता. ।।
श्रमतो त्याचे वैभव । श्रमतो त्याचा गौरव
तत्त्व जगात विजयी ठरणार ।। आता ।।

होय येणार येणार, आमच्या भाग्याचे दिवस येणार.

(जातो)

प्रवेश तिसरा

(दिनकरराव प्रवेश करतो. पडद्याचे आत मंदिरात सभा जमलेली असते. मुले गोंगाट करितात. म्हातारे गंमत करतात. वंदेमातरम् गर्जना होते.)

दिनकरराव : गणपतरावाच्या पोराचे म्हणे आज व्याख्यान आहे. करा म्हणावे व्याख्यान. ते व्याख्यानही पुढे माझ्या उपयोगीच पडेल. गणपतरावांनी केलेला माझा अपमान दुनिया विसरून गेली आहे, गणपतरावही विसरले असतील; परंतु हा दिनकरराव कसा विसरेल ? ते अपमान–शल्य माझ्या हृदयात रात्रंदिवस सलत आहे.

(शंकरराव येतात)

शंकरराव : दिनकरराव, चला सभेला. लखंभट, पिलंभट, गुलाबचंद शेट सारे केव्हाच गेले. चला (वंदेमातरम् गर्जना होते.)

दिनकरराव : हा गोंगाट कसला ?

शंकरराव : सभेत पोरं आली असतील. आज सुटी आहे. चला.

(दोघे जातात. पडदा उघडतो. सभेचा देखावा. दिनकरराव शंकरराव येतात. दिनकररावाला एक मुलगा धक्का देतो. दिकनरराव उसळतो. पोरे हुर्यो करतात. शंकरराव त्यांना शांत करतात.)

शंकरराव : अद्याप राजाच आला नाही वाटते ?

वसंता : राजा व रामा वडिलांस हात धरून आणीत आहे.

शंकरराव : पितृभक्त आहेत दोघे भाऊ.

दिनकरराव : कसले पितृभक्त ! इकडे बाप म्हातारा व आजारी आहे आणि हे म्हणे तुरुंगात जाणार ? यांना बापाची पर्वा नाही. यांना हवी कीर्ती, हवेत नव्याकाळात फोटो, हव्यात सुताच्या माळा, हव्या मिरवणुकी ! मरे की नाही म्हातारा बाप.

वसंता : तुम्ही आहात ना पण त्यांना मदत करायला. (इतक्यात रामा व राजा गणपतरावांस हात धरून आणतात. या, या असे होते. राजा वडिलांना हळूच बसवितो. स्वत:ही बसतो. शेजारचे शेटजी, भटजी त्यांच्यापासून जरा दूर बसतात. चमत्कारिकपणे बघतात.)

शंकरराव : वसंता, सभेच्या आधी एखादे गाणे म्हण रे.

(वसंता उभा राहून गाणे म्हणतो)

(गाणे)

सत्याग्रह करणार । आता स्वराज्य हे घेणार
स्वराज्य हे घेणार हो ।। सत्याग्रह. ।।
भारतमाता मारी हाका
कोटीकोटी उठणार हो ।।
निर्भय झाली सारी जनता
मरणा ना डरणार हो ।। सत्या. ।।
घरादारांचा मोह न कोणा
आम्हा आता उरणार हो ।।
हिंदभूमिचे दुर्दैव आता
खरोखरी सरणार हो ।। सत्या. ।।

हिंदू –मुसलमान एक होऊनी
भाग्य आता फुलणार हो ।।
स्वातंत्र्याच्या झेल्यावरती
भारतभू झुलणार हो । सत्या. ।।

(राजा रामा व इतर मंडळी वा वा करतात. शेटजी–भटजी, थट्टा करतात. गाणे चालले असता विडी ओढतात, पानपट्टी खातात.)

शंकरराव : आता रीतसर सभेस आरंभ करू या. आपले राजाभाऊ आज व्याख्यान देतील. ते तिकडे लांब पुष्कळ व्याख्याने देतात. ते वास्तविक आपल्या गावचे. आपल्या गावाला त्यांच्याबद्दल अभिमान वाटला पाहिजे. ते थोर त्यागी आहेत. नोकरी वगैरे करणार नाहीत. अशा थोर तरुणाचे व्याख्यान आता ऐकायला मिळणार आहे. अशा व्याख्यानास अध्यक्ष होण्यास आपल्या गावात कोणी लायक नाही. (दिनकरराव, गुलाबचंदशेट रागावतात.) मंगलमूर्तीच अध्यक्ष. मंगलमूर्तीच्या मुक्या अध्यक्षतेखाली राजाभाऊ व्याख्यान देतील. ते शांतपणे ऐका.

हैदरखां : मारा टेकू छे.

राजा : बंधूंना, ही वेळ का व्याख्यान द्यावयाची आहे ? भारतमाता हाका मारीत आहे. इतर देशांत लाखो लोक मरायला उभे राहतात. परंतु आपल्या देशात काय स्थिती आहे ? ना मरायला तयार, ना तुरुंगात जायला तयार. ना खादी घ्यायला तयार, ना काँग्रेसचे सभासद व्हायला तयार. सारी उदासीनता. शेटजी, जरा खादी घ्याकी. दिनकरराव सभासद तरी होत जा. साध्या गोष्टी तरी करा. मरणे दूर राहिले. गांधी टोपी घाला. दरवर्षी सभासद व्हा. हरिजनांना मदत करा. स्वच्छता, साक्षरता या कामांना मदत करा. अशा कामांत मदत करणे म्हणजेच धर्म. आपल्या सर्व बंधुभगिनींची स्थिती सुखाची करणे यापरता धर्म नाही. यासाठीच स्वराज्यही पाहिजे आहे. स्वराज्यात कोणी श्रीमंत नाही, कोणी गरीब नाही, कोणी स्पृश्य नाही, कोणी अस्पृश्य नाही.

(इतक्यात रामजी येतो.)

मुले : ये रामजी ये.

लखंभट : अरे पुढे कशाला येतोस ? हे मंदिर आहे. हो दूर, उतर खाली.

दिनकरराव : माजले बेटे !

रामजी : देवासमोर देवाच्या लेकरांना शिव्या देतो तोच माजलेला.

मुले : वा रामजी !

गुलाबचंदशेट : रामजी, जातोस की नाही ? काही धर्माची मर्यादा पाळ.

रामजी : देवाची मर्यादा तुम्हीच पाळा शेट.

राजा : रामजी बस. तू मनुष्यच आहेस.

दिनकरराव : अधर्म आम्ही सहन करणार नाही. डोकी फुटली तरी चालतील. प्राणापेक्षा धर्म प्यारा आहे.

राजा : तुम्ही डोके फोडाल, परंतु ते आम्हाला शोभत नाही. चलारे बंधूंनो, जेथे आपणास एकत्र बसता येईल, बोलता येईल, तेथे आपण जाऊ. या करंट्यांना बसू दे येथे.

मुले : चलारे. (जातात)

गणपतराव : रामा, राजा गेला वाटते. मलाही हात धरून ने. छान बोलत होता.

दिनकरराव : गणपतराव, जाऊ नका. अधर्म करू नका. महारवाड्यात जाऊ नका. पोटच्या पोरापेक्षा धर्म थोर आहे.

गणपतराव : मी महारमांगात जात नाही. मी माणसात जात आहे. मला महारमांग कोणी नाही. जो रागावतो तो महार. तुकाराम महाराजांनी म्हटले आहे "महारासी शिवे, कोपे ब्राह्मण तो नव्हे ।।" बरे का लखंभट, ऐकलेत का दिनकरराव ? महारमांग कोणी असेल तर ते तुम्ही आहात.

गुलाबचंद शेट : गणपतराव अधर्म करू नका. पुढे पस्तावाल.

गणपतराव : सत्कर्माचा पश्चात्ताप होत नसतो.

लखंभट : जाऊ द्या हो. अधर्म करून आणखी रोगी होतील. (गणपतराव जातात. रामा हात धरतो.)

दिनकरराव : आता पकडतो सावज. जाळे पसरण्यास चांगले साधन मिळाले. गणपतरावास पायाशी लोटांगण घालायला लावीन तरच खरा नावाचा दिनकरराव.
(जातो.)

लखंभट : उठा गुलाबचंद शेट, दिनकरराव गेले वाटते. सायंकाळ झाली. अर्ध्य टळता कामा नये. उठा.

गुलाबचंद शेट : अहो एकदा बसलो की पटकन उठता येत नाही. उठलो तर बसता येत नाही. फार त्रास बघा.

लखंभट : मी उठवतो. उठा, चला. तुम्हाला संध्या शिकवतो चला.

(दोघे जातात.)

(प्रवेश तिसरा समाप्त.)

प्रवेश चौथा

(मुलांची सभा. वामन, रघुनाथ, मीर्झा, रवींद्र, दगडू, उत्तम, दयाराम वगैरे बसले आहेत. काहींच्या डोक्यावर खादीची टोपी आहे. काहींच्या नाही)

वामन : राजाभाऊ कसे छान बोलत होते. नाही ?

मीर्झा : मैभी सत्याग्रह करूंगा.

उत्तम : ''सत्याग्रह करणार, आम्ही स्वराज्य हो घेणार'' हे पद वसंताने किती सुंदर म्हटले. असे पद ऐकून ज्यांच्या मनात देशभक्ती उत्पन्न होणार नाही, त्यांना काय म्हणावे ?

दयाराम : त्यांना पशू म्हणावे.

दगडू : उद्यापासून रोज प्रभातफेरी काढू या.

रघुनाथ : पण गाणी कुठे आहेत ?

वामन : रामाला पुष्कळ येतात गाणी. रामही प्रभातफेरीत येईलच. राजाचा तो भाऊ.

उत्तम : परंतु तुझ्या डोक्यावर अजून खादीटोपीसुद्धा नाही. तू का काळी टोपी घालून फेरीत येणार ? काँग्रेसच्या झेंड्याला काळ्या टोपीचे का काळे निशाण दाखवणार ?

दयाराम : आपण सर्वांनी खादी वापरू या. टोप्यातरी आधी खादीच्या घालू या. डोके शुद्ध झाले की सारे शुद्ध.

दगडू : आणि हृदय शुद्ध व्हावे म्हणून शर्टही खादीचा करू या.

मीर्झा : ही काळी केसाळ टोपी, मै अभी जला देऊंगा.

दगडू : असा हिंदी भाषेचा अपमान नका करू. हिंदी शिकना पडेगा.

दयाराम : कोण शिकवेंगा ?

मीर्झा : मेरा बाप तय्यार है.

उत्तम : आपण प्रभात फेरी काढली तर शाळेत घेणार नाहीत. बंद करतील.

रघुनाथ : माझी नादारी बंद करतील.

दयाराम : माझे वडील सरकारी नोकर. ते परवानगी देतील की नाही कोणास ठाऊक.

दगडू : अशा शंका काढाल तर कसे होईल. मग देशासाठी कोणी उठायचे ?

वामन : पोलिसांचा लाठीमार होईल. खादीच्या पातळ टोपीमुळे डोक्याला संरक्षणही नीट मिळणार नाही.

दगडू : मग का शिरस्त्राणे आणायची ?

उत्तम : १९२८ मध्ये लाला लजपतरायांनी छातीवर मार घेतला. जवाहरलालांनी घेतला.

मीर्झा : मै मार खाऊंगा. पहाडके माफक खडा रहूंगा. सच कहता हूं.

रघुनाथ : येस्. आपणही सहन करू.

वामन : शाळेत दंड झाला तर संप करू. सारे विद्यार्थी बाहेर पडू. रघुनाथची नादारी बंद झाली तर वर्गणी करून फी देऊ.

दगडू : आपण मागे राहता कामा नये. इतर देशांतील तरुणांप्रमाणे आपण झाले पाहिजे.

मीर्झा : विलायती कपडेकी होली करना है. भूलो मत. मै आगकाडी लावूंगा. (जातो.)

दयाराम : मीर्झाचे जोरदार काम.

दगडू : मी आणखी मुले बोलावून आणतो. आणखी विलायती कपडे आणू. मोठी होळी करू. (जातो.)

उत्तम : दगडू भावनाप्रधान आहे. त्याचे नाव बदलले पाहिजे.

रघुनाथ : नाव बदलू नका. हिंदुस्थानात नावाच्या उलट कृती असते. नाव कोणते का असेना. कृती पाहावी. (मीर्झा येतो)

मीर्झा : एक दो, काळी टोपी फेक दो.

(काळ्या टोप्या फेकतात. इतक्यात दगडू व इतर मुले येतात. एक दो विलायती माल फेक दो गर्जना होतात. काळ्या टोप्या, जरीच्या टोप्या, कोट, धोतरे येतात, लोकही येतात.)

उत्तम : मीर्झा, काडी लाव आता

मीर्झा : खडे रहो सब

(सारे गंभीरपणे उभे राहतात. मीर्झा काडी लावतो.)

दयाराम : या होळीत आमचा दंभ जळून जावो. आमची गुलामगिरी जळून जावो.

मीर्झा : हिंदू-मुस्लीम भांडणे जळून जावोत.

वामन : स्पृश्यास्पृश्ये जळून जावोत.

(लोक येतात, विलायती माल होळीत टाकतात, गंभीरपणे उभे राहतात.)

दगडू : आपण सर्वांनी स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचे गाणे गाऊ या. या जिवंत अग्नीसमोर गंभीर प्रतिज्ञा करू या. ही पेटवलेली ज्योत पारतंत्र्याची राखरांगोळी केल्याशिवाय आता विझणार नाही. सभा उधळल्यामुळे दु:खी झालेल्या राजाभाऊंना आपल्या निश्चयाने आनंद होईल.

(सारे जण गाणे गातात)

प्रतिज्ञा जगा ऐक हे दास्य जाळू
प्रतिज्ञा आम्ही प्राण अर्पून पाळू ।। प्र. ।।
नसे भीती आम्हा
नसे लोभ आम्हा
आम्ही मोक्षमार्गातले मोह टाळू ।।प्र. ।।
न जो माय मुक्त
न राहूच स्वस्थ
विलासोपभोग न कोणीही भाळू ।। प्र. ।।
चलाव लाठी तेरी
चलाव गोली तरी
आम्ही वीर छातीवर गोळी झेलू ।। प्र. ।।

(गाणे म्हणत जातात)

प्रवेश पाचवा

राजा : देवा, या सनातनी बंधूंना तू सद्‌बुद्धी कधी देणार ? काल रामजीला ढिपळे मारून घालविले. त्यांनी का रामजीला घालविले ? नाही. रामजीच्या रूपाने असणाऱ्या परमेश्वरालाच त्यांनी हाकलून लावले.

जोपर्यंत माणूस माणसास दूर लोटीत आहे तोपर्यंत कोठले स्वराज्य ? स्वराज्यात हरिजनांना आम्ही असेच वागविणार असू तर ते स्वराज्य काय किंमतीचे ? त्याबद्दल हरिजनांना आपलेपणा कसा वाटेल ? मुसलमानांच्या मशिदीत सारे मुसलमानबंधू जमू शकतात. ख्रिस्ती चर्चमध्ये सारे ख्रिस्ती बसू शकतात; परंतु हिंदूंच्या मंदिरांत सारे हिंदू बंधू समभावाने जमू शकत नाहीत. आमच्या विहिरीवर मुसलमान बंधू पाणी भरतो; परंतु हरिजनांना पाणी भरू देत नाही. पाणीही न देणे हा कुठला धर्म ? महात्मा गांधींच्या हृदयाची आज होळी होत आहे. त्या पुरुषाचे हृदय तडफडत आहे. महात्म्यांचे हृदय दुखविणे याहून पाप कोणते ? या भरतभूमीत सर्व देवांची रूपे असे गर्जना करून सांगणारे व प्रत्यक्ष जीवनात अनुभवणारे संत झाले; परंतु त्याच या भरतभूमीतही हरिजनांना पशुहूनही नीच मानतात. काय करू ?

(रामजी येतो)

रामजी : राजादा, दु:खीकष्टी नका होऊ.

राजा : रामजी, हे तोंड दाखवावयास लाज वाटते. काय हे आमचे लोक ?

रामजी : एकदम कसे सुधारणार ? राजादा, तुमच्यासारखे लोक आम्हास प्रेम देऊ लागले आहेत. आरंभ झाला आहे.

राजा : रामजी, हजारो वर्षे अन्याय सहन करून पुन्हा तू इतकी क्षमावृत्ती दाखवतोस ! तू अधीर होत नाहीस ! धन्य तुझी. रामजी, तुम्हा हरिजनांत राहावे असे मला वाटते. परंतु आज तर मी सत्याग्रहात जाणार आहे. रामजी, पुन्हा कधी भेटेन आता तुला ?

रामजी : स्वराज्य घेऊन या मग भेटा.

(गणपतराव व रामा येतात.)

राजा : हे बघ बाबा आले. थकले आहेत नाही ?

रामा : दादा, आम्ही तुलाच शोधीत होतो. म्हटले कोणी मारले की काय ?

राजा : कोणी मारले म्हणून काय झाले ? हरिजनांची माणुसकी सिद्ध करताना मारही खावा लागेल. मार खाऊन भागणार नाही, मरावे लागेल. एकाच्या मरणाने भागणार नाही. हजारोंचे बलिदान होईल, तेव्हा प्रकाशाचा किरण आला तर येईल. बाबा, हा आपला रामजी, हा

आपला खंडकरी. खरोखर बाबा, ते रामजीचे शेत आहे. ते त्याला देऊन टाका. घरचा अन्याय आधी आपण दूर करू या. तुमचा मुलगा इंग्रजांचा अन्याय दूर करण्यासाठी जात आहे; परंतु घरी अन्याय आपण केला तर ते कसे शोभेल ? द्या ना रामजीला ते शेत. आता तरी पाप पुरे.

गणपतराव : मुलांनो, तुमचे म्हणणे खरे आहे. तुम्ही मला हात धरून चालविता, विचारही तुम्हीच द्या. विचाराचे पाऊल टाकण्यास तुम्हीच शिकवता. रामजी, तुझे शेत मी तुला देतो. खरेच घे. रामजी, आजपर्यंतच्या अन्यायाची, अपमानाची क्षमा कर.

रामजी : केवढी न्याय बुद्धी ! असले एक कृत्य हजारो हरिजनांची हृदये जोडील. कोरड्या शब्दांपेक्षा प्रत्यक्ष करणी महत्त्वाची आहे. तिने संसारात ओलावा येतो. संसार सुखाचा होतो.

रामा : कोरडे शब्द तरी या दुनियेत कोण गोड बोलतो ? गोड शब्दांचाही दुष्काळच आहे.

राजा : बाबा, आता मला जाऊ दे. एक क्षणभरही आता घरात माझ्याने राहवत नाही. भारतमातेच्या हाका कानावर येत आहेत. जाऊ दे मला; परंतु बाबा, तुमच्याजवळ एक मागणे मागून जातो. मी तर तुरुंगात चाललोच. परंतु आपल्या गावात भारतमातेचा झेंडा घेऊन उठण्यास कोणीच तयार नसेल तर रामाला माझ्या पाठोपाठ येऊ दे. तरीही पुन्हा कोणी उठले नाही, तर माझे वृद्ध बाबा भारतमातेची अब्रू सांभाळण्याकरिता झेंडा घेऊन उठू देत. माझे बाबा झेंडा घेऊन उठले आहेत असे तुरुंगात मला कळले तर ती केवढी धन्यतेची गोष्ट ! बाबा, जातो मी. (पाया पडतो) जातो हा रामजी, रामा, जप हा बाबांना. (जातो)

रामजी : रामा, चल, राजादांना आपण पोचवू.

रामा : चल. बाबा, तुम्ही येथे बसा हां. (जातात)

गणपतराव : गेला. थोरमनाचा राजा गेला. कशी मुले आहेत माझी ! राजा जाताना म्हणाला रामाला पाठवा. होय रामालाही मी झेंडा घेऊन पाठवीन आणि वेळ आलीच तरया हिंदभूमीसाठी हा वृद्ध गणपतरावही हातात तिरंगी झेंडा घेऊन उभा राहील व लाठीमार खात हसत प्राण देईल.

✦✦✦

अंक दुसरा

प्रवेश पहिला

(डॉक्टरांचा दवाखाना. टेबल आहे. टेबलावर वर्तमानपत्रे, केसिस् वगैरे आहे. पार्टीशनच्या आत कंपाउंडर आहे.)

डॉक्टर : माझा राजा तुरुंगात आहे. मी घरी सुखाने खातपीत बसलो आहे. राजाचे माझ्यावर किती प्रेम. ''आपण एकदम मरू'' असे म्हणायचा; परंतु तो मरायला गेला आहे आणि मी ? राजाचा मित्र मी शोभत नाही. राजाचा मित्र म्हणवून घ्यावयास मला धैर्य होत नाही. मी सरपटणारा सरडा आहे. राजा चंडोल आहे. मी मातीतील किडा आहे. राजा गगनात उडणारा आहे. चाललेच आहे. ज्याला जेवढे जमेल, तेवढे त्याने करावे. डॉक्टराला खरोखर कितीतरी काम करता येईल. गोरगरिबांना फुकट इंजेक्शने देता येतील. निरनिराळ्या लोकांत डॉक्टराला जाता येते. स्पृश्य, अस्पृश्य, हिंदू-मुसलमान सर्वांचे दरवाजे डॉक्टरांसाठी उघडे असतात. डॉक्टरला सर्वांजवळ नीट वागून सर्व समाजात प्रेम निर्माण करता येईल. डॉक्टर ऐक्य निर्माण करणारा होऊ शकेल. खरेच.

(एक भंगी येतो)

भंगी : डॉक्टर साब, अहो डॉक्टर साब.

डॉक्टर : काय रे काय पाहिजे ?

भंगी : डॉक्टर साहेब, फार दुखते आहे मान. काय करू ?

डॉक्टर : ये आत ये. तपासतो.

भंगी : मी आत येऊ ?

डॉक्टर : का बरे ?

भंगी : मी भंगी ओ, डॉक्टर.

डॉक्टर : मग तर आधी आत ये. साऱ्या समाजाची आई तू. (त्याला हात धरून खुर्चीवर बसवितो, तपासतो. भंगी विव्हळतो.)
(एक हरिजन येतो)

हरिजन : डॉक्टर साब अहो डॉक्टरसाब

डॉक्टर : काय रे ?

हरिजन : पोट फार दुखते साब

डॉक्टर : ये हां, आत ये.

हरिजन : मी महार आहे, डॉक्टर

डॉक्टर : ये, हरिजन म्हणजे समाजाची सेवा करणारा शिवशंकर. ये, या टेबलावर निजवतो व तपासतो. (शेटजी येतात)

शेटजी : डॉक्टर, अहो डॉक्टर.

डॉक्टर : काय, शेटजी ?

शेटजी : डॉक्टर, पोट दुखते आहे व अंगही फार दुखते आहे.

डॉक्टर : या भंगी दादाचेही अंग फार दुखते आहे. शेटजी, तुमचे अंग गादीवर लोळून दुखते आहे. जरा रस्त्यात खडी फोडा आणि तुमच्या गादीवर या भंगीदादाला जरा निजवा.

शेटजी : डॉक्टर, तुम्ही फार थट्टा करता. या भंग्याला का खुर्चीवर बसविलेत ?

डॉक्टर : हो. जो बाहेर सारखा उभा राहून काम करतो त्याला खुर्ची हवी आणि जो नेहमी बसलेलाच असतो, त्याला जरा असे उभे केलेलेच बरे.

शेटजी : आणि हा टेबलावर कोण ?

डॉक्टर : हा हरिजन बंधू आहे.

शेटजी : या टेबलावर महारमांगांना तुम्ही निजविता आणि तेथेच आम्हाला तपासणार ?

डॉक्टर : हे पाहा शेटजी, दिवसभर या टेबलावर पांढरपेशांची पोटे तपासावी लागतात. त्या श्रमहीन बांडगुळांचा स्पर्श होऊन ही टेबले अपवित्र होतात. केव्हा एखाद्या हरिजनांचा, भंग्यांचा, शेतकऱ्यांचा,

कामकऱ्यांचा स्पर्श होईल, याची हे टेबल वाट पाहात असते. श्रमणाऱ्याचा स्पर्श म्हणजे पवित्र स्पर्श.

शेटजी : काय डॉक्टर ! या घाणेरड्या लोकांना तुम्ही जवळ कसे घेता ?

डॉक्टर : हे का घाणेरडे ? शेटजी, तुमचे कपडे इस्तरीचे आहेत; परंतु तुमचे पोट घाणीचे आगर आहे. बद्धकोष्ट, अपचन वगैरे रोग सदा तुम्हाला जडलेले. या श्रमणाऱ्या लोकांचे कपडे मळके आहेत; परंतु कोठे साफ आहेत. शेटजी, तुम्हीच सांगा, पोटाची स्वच्छता असणारा अधिक स्वच्छ का वरच्या कोटाची स्वच्छता असणारा ? तुमच्या पांढरपेशांच्या भोजनपंक्तीत आधी उदबत्त्या लावतात. कारण साऱ्यांचे कोठे घाणीने भरलेले !

(एक सनातनी भटजी येतो)

डॉक्टर : या भटजी. आज अगदी भले मोठे गंध आहे !

सनातनी : आमचा धर्म काही मेला नाही, गंध लहान व्हायला. ज्याचा धर्म मोठा, त्याचे मोठे गंध, त्याच्या मोठाल्या मिशा, त्याची मोठी शेंडी.

डॉक्टर : त्याचा मोठा स्वार्थ, त्याचा मोठा दंभ, त्याचा मोठा कामक्रोध

हरिजन : डॉक्टर, फार दुखते पोट.

डॉक्टर : (तपासून) गड्या ! तुझ्या पोटात रोग तर काही नाही. भुकेने तुझे पोट दुखत आहे. पोटभर जेव म्हणजे राहील !

हरिजन : कोठून जेवू ? डॉक्टर, एखादा डोस द्या व रोज उठून त्रास देणारी ही भूक कायमची नाहीशी करा.

डॉक्टर : भूक बंद करण्याचा डोस साहेबाने अजून शोधला नाही. हे पाहा शेटजी, तुमचेही पोट दुखत आहे, याचेही दुखते आहे. तुम्ही लंघन करा व या हरिजनाला घरात नेऊन पोटभर जेवावयाला वाढा.

सनातनी : हा का हरिजन ? हा का महार येथे ?

शेटजी : होय, भटजी आणि तुम्ही बसला आहात कोणाजवळ ? अहो तो भंगी आहे !

सनातनी : (एकदम उठून) अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम् ! हा काय भ्रष्टाकार.

डॉक्टर : माझ्याकडे हे असेच चालते. येथे श्रमणाऱ्या सर्वांना उच्च स्थान आहे. तुम्हाला हे पसंत नसेल तर बाहेर उभे राहा.

सनातनी : डॉक्टर, फार मस्कऱ्या स्वभाव तुमचा.

डॉक्टर : मी थट्टामस्करी नाही करीत. मी खरे तेच सांगत आहे. मी हरिजनांना सर्वांना शिवतो. अशा धर्महीनाजवळचे औषध तुम्हाला चालेल का ? माझ्या या अपवित्र हाताचा डोस तुमच्या या प्रशस्त पवित्र पोटात गेला तर चालेल का ?

सनातनी : अहो, डॉक्टराला विटाळ नसतो.

शेटजी : डॉक्टर नेहमी पवित्र, असे धर्मात आहे.

डॉक्टर : देव बाटतो आणि डॉक्टर बाटत नाही ! देवापेक्षा का मी मोठा ? काय बोलता तुम्ही !

भंगी : डॉक्टर, फार दुखते हो.

डॉक्टर : भटजी, यांच्या खांद्याला जरा चोळता का हे तेल ! तुमचाही रोग बरा होईल.

सनातनी : तुम्ही फारच अपमान करता. चला शेटजी, दुसरे काय थोडे डॉक्टर आहेत ?

शेटजी : चला, असला भ्रष्टाकार पाहवत नाही.

डॉक्टर : सनातनींनी न आलेलेच बरे; परंतु कधीही इंजेक्शनसाठी येऊ नका बरे. (जातात)

हरिजन : डॉक्टर काय करू ?

डॉक्टर : हे आठ आणे घे. पोटभर जेव. दुसरे औषध नको. ऊठ. (जातो)

भंगी : डॉक्टर माझे कसे राहील ?

डॉक्टर : ते मोठे पिपडे उचलून तुझी मान अवघडली आहे. विश्रांती घे. रजा घे दोन दिवसांची.

भंगी : आम्हाला पगारी रजा कोण देते ?

डॉक्टर : या म्युनिसीपालट्या, या गिरण्या भंग्यांना, कामगारांना पगारी रजा का बरे देत नाहीत ? या गरिबांची काळजी कधी घेणार हे लोक ? भंगी दादा, हे आठ आणे घे. दोन दिवस विश्रांती घे. जा हां. (जातो) (पडद्यात ''अर्धा आणा नवाकाळ, लोकशक्ती पाव आणा. गुजराथेत लाठीमार ! प. मदनमोहन माजवीयांना अटक. नवाकाळ'')

डॉक्टर : ए नवाकाळ.

पत्रविक्या : काय पाहिजे.

डॉक्टर : प्रत्येक पत्राची एकेक प्रत ठेव. शामभाऊंजवळून पैसे ने.
(पत्रविक्या जातो.)

डॉक्टर : (वाचतात) गुजराथेत स्त्रियांवर लाठीमार! ''माझा मुलगा या वेळेस शिकत बसेल तर मी त्याला गोळी घालीन.'' सरदार वल्लभभाईंचे वाक्य! राष्ट्र कसे पेटले आहे! वीरश्री राष्ट्रात संचरली आहे. राजा तुरुंगात आहे. आणि मी बाहेर!
(टपालवाला पत्र आणून देतो व जातो.) हे राजाचे पत्र. (हृदयाशी धरतो राजाचे पत्र म्हणे माझा वेद. (फोडतो व वाचतो.))
''प्रिय डॉक्टर,
मी तुरुंगात आहे; परंतु प्रत्यक्ष सेवा तूच बाहेर करीत असशील. गरिबांची दुवा घेत असशील. स्वयंसेवकांच्या घरी मदत पाठवीत असशील. तुरुंगाच्या बाहेर राहूनही अनंत सेवा करता येते. परंतु हे पत्र मी विशेष कारणासाठी लिहीत आहे. मला की नाही परवा स्वप्न पडले. माझ्या बाबांना सर्प दंश करीत आहे असे पाहिले. माझे स्वप्न खरे ठरत असते. बाबांवर काहीतरी संकट आहे. तरी तू बाबांकडे पत्र देखत जा. मी तुझ्यावर सारे सोपवित आहे. मी बरा आहे. येथे देशभक्तांची मंगल संगती आहे.''
– तुझा राजा
राजा सांगतो तर गेलेच पाहिजे. ''माझ्या बाबांना तू'' असे त्याने मला पूर्वी सांगितले होते. शामभाऊ, अहो शामभाऊ.
(कंपौंडर येतो)

शामभाऊ : काय ?

डॉक्टर : हे पाहा. मला की नाही गावाला जावयाचे आहे. सीरियस केसिस कोणत्या आहेत ?

शामभाऊ : ही गोडबोल्यांकडची, ही पांडू महाराची, ही अहंमद विणकराची.

डॉक्टर : त्यांना मी पाहून येतो. पांडूला रबराची पिशवी शेक करायला द्या. नीट जपा. मी चार दिशी येतोच. गोरगरिबांना हाकलू नका हां.

शामभाऊ : वा असे कसे करीन

(डॉक्टर जातात.)

बरे झाले. चार दिवस आपले राज्य. (खुर्चीवर बसतो) या डॉक्टरांच्या खुर्चीवर जरा बसावे. नको पण उठावे. एकदम यायचे नाहीतर त्या दिवसासारखे व फजिती व्हायची!

(कंपौंडर जातो)

प्रवेश दुसरा

(दिनकरराव प्रेवश करतात)

दिनकरराव : या दिनकररावाला सारेजण साप म्हणतात. होय. मी साप आहे. साप होणे म्हणजे काही पाप नव्हे. या जगात मला कोणी प्रेम दिले नाही. मग माझ्या हृदयात तरी कोठून प्रेम असणार ? जगाने माझा उपहास केला. मीही जगाचा करीन. गणपतराव म्हणे चांगला आहे. दुसऱ्यांना असेल चांगला. मला सारे वाईटच आहेत. त्या प्रतिष्ठित गणपतरावाची फटफजिती करतो. त्याचा स्वाभिमान धुळीत मिळवितो. आज पंचायतीची सभा बोलविली आहे. गणपतरावांवर बहिष्कार पडल्याशिवाय राहत नाही. सभेला आता गेलेच पाहिजे. बरीचशी मंडळी गेलीही.

(जातो. दुसऱ्या बाजूने गाणे म्हणत तिरंगी झेंडे घेऊन मुले येतात.)

गाणे

आम्ही तरुण । भारतमातेचे अरुण ।। धृ.।।
बंधुभाव तो आम्ही पिकवू
अखंड भारत संज्ञा टिकवू
स्वातंत्र्यास्तव त्याग शिकवू
वरुं मरण ।। भा.।।
रूढि बंधने आम्ही मोडू
दास्यशृंखला सगळ्या तोडू
प्रियकर भारतभूचे फेडू
आम्ही ऋण ।। भा.।।

स्वातंत्र्याने देशा नटवू
दारिद्र्याला दुःखा हटवू
हिंदभूमिचे आम्ही हसवू
मुख करुण ।। भा.।।

एकजण : चला. आपण पंचायतीच्या जागी जाऊ.

इतर सारे : चला. महात्मा गांधी की जय.
(जातात.)

प्रवेश तिसरा

(पडदा उघडतो. गणपतीचे देऊळ. पंचायत भरली आहे. लखंभट, शंकरराव, हैदरखां, गुलाबचंदशेट वगैरे बसले आहेत. काही मुले आहेत.)

शंकरराव : दिनकररावांनी पंचायत बोलविली; परंतु त्यांचा अद्याप पत्ता नाही.

गुलाबचंद : हा आवाज कसला ?
(मुले झेंडे घेऊन महात्मा गांधी की जय करीत येतात)

लखंभट : आली कार्टी. उद्योग नाही आरडाओरडीशिवाय.

एक मुलगा : तुम्हाला तरी पानसुपारी खाऊन थुंकणे व तपकीर कोंबून शिंकणे याशिवाय कोणता उद्योग आहे ?

गुलाबचंद : गप्प बस.
(दिनकरराव येतात)

हैदरखां : वो आया देखो.

पोरे : साप आला, साप आला.

दिनकरराव : (एका मुलाला) तुझा बाप साप.

मुलगा : कोणाचा रे बाप काढतोस ?

शंकरराव : शांत राहा मुलांनो.

दिनकरराव : या पोरांचे येथे काय काम?

एक मुलगा : आमचेच येथे काम आहे. तुम्हा म्हाताऱ्यांचेच आता काम नाही.
(गाणे म्हणतो)

भारतमातेचे हो आम्ही
छोटे छोटे सरदार
भारतमातेसाठी सोडू
आम्ही आपुले घरदार ।। छो.।।
बरेका, समजले का ?

शंकरराव : शांत राहा. मुलांनो गप्प बसा.

गुलाबचंद : दिनकरराव, ही सभा कशासाठी बोलावली आहे ?

दिनकरराव : धर्मरक्षणासाठी. मला या जगात दुसरे काय महत्त्वाचे आहे ? धर्म एक सबसे प्यारा. धर्मो रक्षति रक्षितः

वसंत : धर्माचे रक्षण करावे लागत नाही. धर्म दुबळा नसतो. सत्य स्वतःचे संरक्षण करू शकत असेल, तर ते सत्यच नाही. दिनकरराव, आता तुम्ही का धर्मरक्षण करणार ?

मुले : दिनकररावांचा अकरावा अवतार !

शंकरराव : गप्प बसा. असे म्हणू नये. लहानांनी मोठ्यांची थट्टा करू नये.

दिनकरराव : हे पाहा, आपल्या गावात अधर्म वाढत आहे. कोठे खावे, कोठे प्यावे याला ताळतंत्र राहिले नाही. महारमांग, ब्राह्मण, मराठे सारे एकत्र येत आहेत. सब गोलंकार होणार असे दिसते. सारा भ्रष्टाकार. असे पाहण्यापेक्षा डोळे मिटावे असे वाटते; परंतु हा भेकडपणा होईल. ही भ्रष्टाकाराची लाट कठोर उपायाने थांबविली पाहिजे.

वसंत : अहो, कलियुगात हे असे व्हायचेच मुळी. आपल्या थोर थोर ऋषींनी जे भविष्य-पुराणात लिहून ठेवले ते खोटे कसे होणार ? ते खोटे ठरेल तर ऋषी खोटे ठरतील. ऋषींची वाणी शंभर टक्के खरी ठरण्यासाठी या सबगोलंकारात आपण सर्वांनी भाग घेतला पाहिजे. हा आपला नवधर्म बनला पाहिजे.

मुले : वाः छान.

दिनकरराव : मला चावटपणा येत नाही. भ्रष्टाचार माजला तर देव कोपेल. पाऊस पडणार नाही. पाऊस कमी होतच आहे. पाप फार.

वसंत : जंगले तोडलीत म्हणून पाऊस कमी झाला. दरवर्षी झाडे लावा. झाडे तोडण्याच्या पापामुळे पाऊस कमी झाला असेल. हरिजनांना जवळ घेण्यामुळे नाही.

दिनकरराव : या भ्रष्टाकारामुळे भूकंप होत आहेत. पृथ्वी थरथरत आहे. हिंदुस्थान अशाने गडप होईल.

एक मुलगा : गुलाम राहण्यापेक्षा गडप झालेला काय वाईट ?

वसंत : दिनकरराव, पृथ्वीच्या पोटात उष्णता असते म्हणून भूकंप होतात. वाफेमुळे भातावरचे झाकण हालते तेथे का अस्पृश्योद्धार येत असतो ? जरा शाळेत जाऊन सायन्स शिका. शास्त्र शिका.

लखंभट : तुझ्या शाळा आता शास्त्र शिकवणार होय ?

वसंत : ते तुमचे शास्त्र नव्हे. ऑक्सिजन वगैरेचे शास्त्र.

दिनकरराव : मला उर्मट तरुणांजवळ बोलायचे नाही. येथे गावातील पोक्त मंडळी आहेत. ऐकावे त्यांनी, आपल्या गावात पाप फार होत आहे. गणपतरावांचा मुलगा राजा, ज्याचे तुम्ही मारे व्याख्यान करवलेत, त्याला काही विधिनिषेध नाही. तो महारामांगात जातो. जातो नव्हे, त्यांचे पाय चेपतो. त्यांच्याबरोबर जेवतोही.

लखंभट : (एकदम उसळून) काय म्हणता काय ?

गुलाबचंद : महारांकडे जेवला ? शिवशिव !

एक मुलगा : तुमच्याकडे जेवण्यापेक्षा महाराकडे जेवणे पवित्र आहे.

लखंभट : अहो दिनकरराव, तुम्ही म्हणता याला काही पुरावा आहे का ?

दिनकरराव : हा दिनकरराव सत्याचा पूजक आहे. पुराव्याशिवाय मी बोलत नसतो. हा घ्या पुरावा वाचा ही वर्तमानपत्रे (त्यांच्या समोर टाकतो) यांतून स्वच्छ लिहिलेले आहे. राजासारखा एखादा दिवटा तरुण असे करतो याचे नाही एवढे दुःख होत; परंतु असल्या पापी पोरांच्या नादी तो गणपतरावही लागला आहे. राजाला तो खुशाल घरात घेतो. गणपतरावांना पोरांच्या लीला का माहीत नाहीत ? परंतु त्यांनीही विधिनिषेध सोडला. हे बरे नव्हे. हा अधर्म आहे. धर्म रक्षिला पाहिजे. आपल्या डोळ्यांदेखत धर्माचा का खून झालेला पाहावा ?

लखंभट : धर्म सांभाळलाच पाहिजे.

गुलाबचंद : गणपतरावांनाच येथे बोलवा.

शंकरराव : ते आजारी आहेत.

दिनकरराव : राजाचा लहान भाऊ घरी आहे. त्याचा हात धरून ते येतील. त्यांना येथे बोलवावे.

लखंभट : पुन्हा मुलाला घरात घेईल तर म्हणावे बहिष्कार घालू.

दिनकरराव : आणि आता प्रायश्चित्त घेतले पाहिजे. समाजाची क्षमा मागितली पाहिजे.

गुलाबचंद : भिकू गुरवाला बोलवा.

लखंभट : (मोठ्याने) भिकू गुरव, ए भिकू गुरव, (देवळातील गुरव येतो. तो जरा बहिरा असतो.)

भिकूगुरव : काय

लखंभट : त्या गणपतरावास बोलावून आण.

भिकू गुरव : तपकिरीची डबी आणू ?

लखंभट : अरे गणपतरावास बोलावून आण.

भिकू गुरव : बरे.

(जातो व तपकिरीची डबी आणतो.)

लखंभट : अरे ही का आणायला सांगितली ?

(त्याचा कान पकडून 'ग-ण-पत रा-वां-सबोल-व' असे एकेक अक्षर ओरडतात.)

भिकू : तो राजादांचा बाप ?

गुलाबचंद : अरे हो. जा आधी.

(भिकू गुरव जातो)

(भटजी, शेटजी तपकीर ओढतात)

लखंभट : मोठी कडक आहे. मद्रासी दिसते.

एक मुलगा : अमेरिकी आहे अमेरिकी. अहो भटजी तेथे काय थुंकता ? घाणेरडे.

(लखंभटांना शिंका येतात.)

वसंत : भटजी ते नाक जरा नीट पुसा. अगदी ओंगळ बुवा तुम्ही. हरिजन बरे तुमच्यापेक्षा. तेथेच थुंकता काय, नाक काय शिंकरता ? हे मंदिर आहे भटजी.

एक मुलगा : त्रैवर्णिकांची थुंकी देवाला आवडते; परंतु महारामांगांची फुले आवडत नाहीत.

(इतक्यात रामाचा हात धरून गणपतराव येतात.)

शंकरराव : या गणपतराव या.

(ते मोठ्या कष्टाने बसतात. जवळ रामा असतो)

गणपतराव : (हळू व कष्टाने) काय आहे काम ?

दिनकरराव : धर्माचे.

गणपतराव : स्वच्छ सांगा.

दिनकरराव : तुमचा राजा म्हणून मुलगा आहे.

गणपतराव : (दुःखाने) तुरुंगात आहे तो.

दिनकरराव : तो तुमचा मुलगा महारामांगात जात असे, त्यांना शिवत असे. एवढेच नव्हे, तर त्यांच्यात जेवत असे. तुम्हाला हे सारे माहीत होते. तरी तुम्ही त्याला घरात घेतलेत. त्याच्या बरोबर जेवलेत, खाल्लेत. त्याच्या बरोबर तुम्हीही त्या दिवशी महारामांगांच्या सभेला गेलात. आम्ही सांगत होतो की जाऊ नका; परंतु ऐकले नाही. असा अधर्म तुम्ही वाढविता आहात. अधर्माने कल्याण होत नाही. तुम्ही प्रायश्चित्त घ्या. गावाची माफी मागा. स्वतःच्या मुलांना प्रतिबंध घाला. न ऐकतील तर त्यांना घरात घेऊ नका. त्यांच्याबरोबर तुम्ही वाहवत जाणे बरे नव्हे.

लखंभट : ऐका, धर्माची मर्यादा सांभाळा.

गणपतराव : हरिजनांना जवळ करणे म्हणजे का अधर्म ? देव सर्वत्र ना आहे ?

दिनकरराव : क्षुद्रांनी धर्मचर्चा करू नये. ऋषिमुनींनी सांगितलेले ऐकावे. प्रायश्चित्त घेता की नाही ते सांगा.

गणपतराव : मी काही अधर्म केला आहे असे मला वाटत नाही.

लखंभट : काय ?

गणपतराव : सर्व संतांनी केले तेच माझा मुलगा करीत आहे.

दिनकरराव : संतांचे करणे संतांना शोभते. तुमच्यासारख्या जंतांना शोभत नाही.

गणपतराव : मी प्रायश्चित्त घेणार नाही. मलाही थोडाफार धर्म समजतो. तुम्ही नामधारी सनातनींनींच धर्म धुळीत नेला आहे. धर्म म्हणजे ना गंध, ना भस्म, ना शेंडी ना जानवे. धर्म म्हणजे सत्य व न्याय. धर्म म्हणजे दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी तुरुंगात जाणे, मरणे. धर्म म्हणजे दंभ नव्हे. विषयात बरबटलेले तुम्ही किडे. तुम्ही का धर्माच्या गप्पा

माराव्या ? थोर सनातन धर्माची तुम्ही खांडोळी केली आहेत. संतांचे छळ तुम्ही केले आहेत. गीता, भागवताचा खरा आत्मा तुम्ही जाळून टाकला आहे. तुम्ही मानव नसून दानव आहात. धर्मरक्षक नसून धर्मभक्षक आहात. माझा मुलगा वेद उपनिषदे यांचा खरा पूजक आहे. माझ्या मुलाच्या पायाचे थोडे तीर्थ घ्या तुम्ही. सारे उद्धरून जाल !

दिनकरराव : ही उद्दामपणाची भाषा पुरे. तुमच्यावर बहिष्कार घालण्यात येत आहे.

लखंभट : बहिष्कार घातलाच पाहिजे. धर्माचे पालन केले पाहिजे.

शंकरराव : सध्याची परिस्थिती पाहून बहिष्कार न घालणे बरे. जग आपणास हसेल.

गुलाबचंद : बहिष्कार घालावा. एरवी हे ताळ्यावर येणार नाहीत. म्हणे मुलाच्या पायाचे तीर्थ घ्या.

रामा : शेटजी, तुम्ही तरी धर्माच्या गप्पा नका मारू. किती जणांच्या मुंड्या मुरगळल्यात ?

वसंत : आणि किती वेश्या ?

गुलाबचंद : देवळात असे बोलावे का ?

वसंत : देवळात सत्य बोलावे.

रामा : अशांवर कोणी बहिष्कार घालीत नाही. हे व्यभिचारी, लुटारू, दांभिक बगळे, हे बेटे म्हणे धर्मरक्षक ! आणि माझा तो थोर भाऊ तो म्हणे धर्महीन ! घाला, घाला बहिष्कार.

लखंभट : पाणी मिळू देणार नाही.

हैदरखाँ : हम देंगे पानी

मुले : आम्ही नेऊन देऊ.

लखंभट : थोबाडीत मारील बाप.

मुले : बरे.

रामा : चला बाबा. येथे थांबणे पाप आहे.
(हात धरून उठवतो व दोघे जातात.)

मुले : चला रे आपणही त्यांना हात देऊ. जरा गळाल्यासारखे दिसतात.
(जातात)

दिनकरराव : पाहू या आता कसे होते ते.
जातो.
(भिकू गुरव बैठक गुंडाळू लागतो. लखंभट, गुलाबचंद शेट बसलेलेच असतात. इतर जातात.)

लखंभट : अरे दिसते की नाही ? फार माजलास ? थांब जरा.

गुलाबचंदशेट : माझी तर अडचण. एकदा बसले की पटकन उठता येत नाही.

भिकू गुरव : (स्वगत) आता युक्ती करावी. उठात येत नाही का. (उघड) अहो विंचू, विंचू, विंचू.
(पटकन उठतात लखंभट, गुलाबचंद वगैरे)

लखंभट : कोठे, वहाण आण.

गुलाबचंद : कोठे आहे रे ?

भिकू गुरव : गेला, गेला.

लखंभट : चावटपणा करतोस ? काढून टाकू . याद राख. चला शेटजी. तुमचा आम्हाला आधार असतो. माझ्या हाताचा आधार तुम्ही घ्या. (जातात)

प्रवेश चौथा

(जेलमधील अंधार कोठडी. कैद्याच्या पोषाखात राजा दोरी वळीत आहे)

राजा : बाबांबद्दल हुरहुर वाटते; परंतु हे विचार मनातून काढले पाहिजेत. आज या एकांतवासाची मला शिक्षा झाली आहे; परंतु या एकांतातही हृदयातील अनंत सृष्टी आहे. ती कोण दूर करणार ? तुरुंगातील नवीन मित्र माझ्या डोळ्यांसमोर येत आहेत. तो लहान गोपाळ ! किती लहान परंतु देशासाठी तुरुंगात आला. धन्य त्याची. आईच्या मांडीवर खेळणारी मुले आज तुरुंगात हाल भोगीत आहेत. हिंदुस्थान लवकरच स्वतंत्र झाल्याशिवाय कसा राहील ?
(खोलीत नाचत गाणे गातो)

इवली ना शंका
शंका ना आता, स्वतंत्र होईल भूमाता ।। इ.।।

सुटेल ग्रहण
ग्रहण हिंदभूचे, तेजे फुलेल वदन तिचे ।। इ.।।
मिटतिल भेद
भेदभूत मरून, जाईल भारतभू तरुन ।। इ.।।
सकलही बंधू
बंधूभाव–युक्त, होऊन करतील भू मुक्त ।। इ.।।
सकलही अर्पू
अर्पू सुखे प्राण, होईल देश मोक्षखाण ।। इ.।।
(पडदा पडतो.)

प्रवेश पाचवा

(गणपतराव व रामा बसले आहेत.)

गणपतराव : रामा कसे होईल आपले ? हे सारे छळतील. आपणास त्राही भगवान करतील. पाणी मिळू देणार नाहीत. दूध मिळू देणार नाहीत. दुकानात येऊ देणार नाहीत. मी असा नेहमीचा आजारी. तू लहान, राजा तुरुंगात. या घरात तरी राहता येईल की नाही ? मी नेहमी म्हणत असे की स्वतःचे घर असावे. परंतु कोठे आहे आपले घर ? स्वतःचे सत्तेचे घर असते, सत्तेची विहीर असती तर किती छान झाले असते; परंतु घर बांधण्याऐवजी राजाने तुरुंगच घर केले! काय करावे मी ?

रामा : बाबा, असा धीर नका सोडू. मी महारवाड्यातून पाणी आणून देईन. रामजीकडून दूध आणीन. रामजीचे शेत परत दिल्यापासून तो किती प्रेमाने वागतो ? नाहीतर रामजीकडेच राहायला येता ? तो नाही नाही म्हणणार.

गणपतराव : बाळ, हे डोळे आता मिटावेत एवढीच इच्छा आहे. हे धिंडवडे मला सहन होत नाही. या घरातूनही कोणी उद्या जा म्हटले तर ?
(दिनकरराव येतो.)

दिनकरराव : उद्या कशाला ? या क्षणीच येथून जा. हे घर खाली करा.

रामा : तिन्हीसांजा पाप्याचे दर्शन !

दिनकरराव : पाप्यांना परागंदा करण्यासाठीच मी येथे आलो आहे. हं. आटपा. आताच्या आता घर खाली करा.

रामा : हे घर आमच्या चुलत्यांचे आहे.

दिनकरराव : (हसत) चुलते तुमच्यासारखे धर्मलंड नाहीत. हे पाहा म्हटलं त्याचे पत्र. गणपतरावांकडून हे पत्र दाखवून घर काढून घ्या असे यात आहे. त्यांना अधर्म कसा खपेल ? पाहा पत्र. वाचा. आहे ना ओळखीचे अक्षर ? छाप बघा. हा दिनकरराव अर्धवट काम कधी करीत नसतो. हं. आटपा, धर्माला क्षणाचाही विलंब सहन होत नाही.

गणपतराव : तिन्हीसांजा कोठे जाऊ ?

दिनकरराव : मसणात जा. म्हणे कोठे जाऊ ?

रामा : दिनकरराव, खबरदार अभद्र बोलाल तर. हे घर आताच्या आता खाली करून देतो. भूमातेची मांडी तर कोणी नाही ना हिरावून नेणार ? आकाशाचे आच्छादन नाहीना कोणी पाडणार ? आम्ही नदीचे पाणी पिऊ, झाडाचा कोवळा पाला खाऊ, पाखरांचे गाणे ऐकू. देवाच्या या विशाल विश्वमंदिरात आम्ही आनंदाने राहू. चला बाबा, मी सामान काढतो हां.

(इतक्यात मुलांना घर विचारीत हातात बॅग घेतलेले खादीचा पोषाख असलेले डॉक्टर येतात.)

डॉक्टर : काय रे रामा, काय बाबा, ओळखलेत ना ?

गणपतराव : (आश्चर्याने) कोण डॉक्टर ? तुम्ही आज यावेळी कोठे ?

डॉक्टर : अकस्मात आलो. राजाचे तुरुंगातून आले होते पत्र. त्याला काही दुष्ट स्वप्न पडले. त्याने तुमच्याकडे येण्याविषयी मला लिहिले. म्हणून आलो ताबडतोब. राजाचा शब्द मला वेदवाक्य.

दिनकरराव : त्या धर्मभ्रष्टाचा शब्द म्हणे वेदवाक्य ?

डॉक्टर : माझा राजा तुम्हाला नीट माहीत नसावा म्हणून असे म्हणता.

दिनकरराव : चांगला माहीत आहे.

डॉक्टर : रामा, हे सामान असे अस्ताव्यस्त बाहेर का पडले आहे ? घर का सारवले होते ? तुम्ही असे सचिंत का ? बोलत का नाही कोणी ? बरे नाही का ?

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा

दिनकरराव : पाप्यांना बोलायला तोंड नसते. मी सांगतो सारी हकिकत. यांना हे घर आताच्या आता खाली करून द्यायला मी सांगत आहे.

डॉक्टर : भाडे का थकले आहे ? मी देऊन टाकतो.

दिनकरराव : मी पैशांचा भक्त नाही. धर्माचा आहे.

डॉक्टर : हा काय आहे सारा प्रकार ?

दिनकरराव : हे गृहस्थ महारामांगात जातात. यांचे चिरंजीव ते तुरुंगातील देशभक्त महारा-मांगांकडे खातातसुद्धा. गावपंचायतीने यांच्यावर बहिष्कार घातला आहे. हे घरही मला खाली करून पाहिजे. यांच्या चुलत्याचे तसे अधिकारपत्र आहे. मला अधर्म सहन होत नाही.

डॉक्टर : आता दिवे लागताना कोठे जाणार हे ? त्यातून आजारी.

दिनकरराव : धर्म कठोर असतो. धर्म पापाला सवलत देत नसतो, वाव देत नसतो.

डॉक्टर : संध्याकाळी अशक्त, आजारी व वृद्ध अशा सद्‌गृहस्थास घरातून काढून लावणे हा का धर्म ?

दिनकरराव : मला चर्चा करायची नाही.

डॉक्टर : जरा शहरात जाऊन तर पाहा. तेथे ही शिवाशिव नाहीशी होत आहे.

दिनकरराव : जगाने शेण खाल्ले म्हणून मी खावे का ?

गणपतराव : डॉक्टर, जाऊ दे. शब्दाने शब्द वाढतो.

डॉक्टर : तुम्ही यांना नोटीस दिली होती का ?

दिनकरराव : धर्म नोटीस देत नसतो. धर्म म्हणजे इंग्रजांचा कायदा नव्हे.

डॉक्टर : परंतु धर्मापेक्षाही इंग्रजांचा कायदा तुम्ही अधिक मानता. सरकारी अधिकारी म्हणजे तुमचे देव. ते जाऊ द्या. एक महिन्याची आधी नोटीस द्या. घर खाली करून मिळत नाही.

दिनकरराव : शहरातले कायदे येथे नकोत.

डॉक्टर : जाता की नाही ? निघा येथून. नाहीतर एका सज्जनाला बेकायदेशीरपणे छळता म्हणून तुम्हास पोलिसांच्या ताब्यात देईन.

दिनकरराव : तुम्ही सापाला दुखवीत आहात लक्षात ठेवा.

डॉक्टर : सापाचे विष उतरवण्याचे इंजक्शन माझ्याजवळ आहे.

मुले : (हुर्यो, हुर्यो सापाची हुर्यो, असे ओरडतात)

दिनकरराव : बरे पाहून घेईन. याचा सूड घेतल्याशिवाय राहणार नाही. (जातो. त्याच्या पाठोपाठ मुले हुर्यो हुर्यो करीत जातात.)

गणपतराव : डॉक्टर कसे ऐन वेळेवर आलात. देवानेच जणू पाठवले तुम्हाला.

रामा : दादाला पुढचे सारे जणू दिसते. त्याच्या पत्रामुळे तुम्ही आलात. डॉक्टर, आता मी चांगला स्वयंपाक करतो. कोणती करू भाजी ?

डॉक्टर : अरे फराळाचे भरपूर आहे माझ्याबरोबर. बाबांपुरता थोडा ताजा भात कर. चला आपण आत जाऊ. गार वारा सुटला आहे. बाबांना बाधायचा. (जातात. पडदा पडतो)

प्रवेश सहावा

रामजी : ते डॉक्टर राजादांच्या वडिलांस घेऊन गेले. मी त्यांना माझ्याकडे आणणार होतो. बहिष्कार घातला त्यांच्यावर. दुष्ट आहेत हे लोक. अशा म्हातारपणी गणपतरावांचा छळ करणे हा का धर्म ? जगात सारे उलटे कसे ? अधर्माचा धर्म झाला. ज्याला खरा मान हवा तो श्रमणारा मानहीन झाला; परंतु यातूनच पुढे चांगले येईल. झगडा करीत राहिले पाहिजे. चिखलातून कमळे फुलतील.

(गाणे गातो.)

लईलई वंगळ
त्यातून येते मंगल ।। धृ. ।।
घाणघाण चिखल
तेथे जन्मे कमळ ।। लई. ।।
घाणघाण खतानं
धान्य मिळे निर्मळ ।। लई. ।।
आज दिसतं वाईट जे
त्यातून निघे चांगलं ।। लई. ।।

+++

अंक तिसरा

प्रवेश पहिला

(तुरुंगातील बागेचा देखावा. कैद्याच्या वेषात राजा हातात खुरपे घेऊन काम करीत आहे.)

राजा : काम करून करून हाताला किती फोड आले हे. परंतु याचे मला दुःख न वाटता आनंद होत आहे. काम करून ज्या हातांना घट्टे पडतात ते हात पवित्र होतात. ''न ही श्रांतस्य ऋते सख्याय देवा:'' अशी वेदवाणी आहे. श्रमलेल्या मनुष्याची मैत्री देवालाही हवी असते. आम्ही लवकर सुटणार अशा वार्ता येत आहेत. महात्माजींनी साम्राज्य सरकार नमवले म्हणून या सुटकेत आनंद आहे; परंतु मला येथून जावेसे वाटत नाही. या तुरुंगात थोरथोर देशभक्त होते. सेनापती बापट, लोकमान्य, यांचे पवित्र पाय येथे फिरले. त्यांचा घाम येथे गळला. शिपाईसुद्धा त्यांच्या गोष्टी सांगतात. येथील माती कपाळाला बुक्क्याप्रमाणे लावावी असे वाटते. तुरुंग हीच आमची पंढरपुरी. येथेच आज देवाच्या खऱ्या भक्तांची दंगल असते. आज गोपाळ कामाला का बरे आला नाही ? दुसरीकडे दिले की काय त्याा काम ?

(गोपाळ येतो)

राजा : काय रे गोपाळ, आज उशीरसा ?

गोपाळ : मला आज खडी फोडायला पाठवणार होते; परंतु जेलर साहेब म्हणाले, ''दोन दिशी तुम्ही सुटणार, जा बगीच्यातच.''

राजा : म्हणजे सुटण्याची वार्ता खरी दिसते.

गोपाळ : रस्त्यांवरचे मघा जयजयकार ऐकू येत होते.

राजा : गोपाळ, आपण सुटणार व पुन्हा निरनिराळ्या ठिकाणी जाणार ! सरकारचे केवढे उपकार ! नाना ठिकाणचे राष्ट्रसेवक एकत्र आले. प्रांत प्रांतांना भेटले. नवीन ओळखी, नवीन स्नेहबंधने. गोपाळ, तू कोठला व मी कोठला ? परंतु एकत्र आलो. बाहेर गेल्यावर विसरू नकोस हो.

गोपाळ : मी तुम्हाला कसा बरे विसरेन ? तुम्ही मला नवीन जीवन दिलेत. नवीन दृष्टी दिलीत. माझ्याबरोबर किती पुस्तके वाचलीत. तुरुंग म्हणजे जणू राष्ट्रीय शाळा. बाहेरच्या त्या कोंडवाड्यांतून दहादहा वर्षात जे ज्ञान मिळणार नाही, ते सहा महिन्यांत तुम्ही येथे दिलेत. येथे किती चर्चा, प्रवचने, व्याख्याने. नाही का ? तुम्ही बाहेर गेल्यावर मग खरेच का आश्रम काढणार ? मला बोलवा हं. तुमच्याबरोबर काम करण्यात किती आनंद वाटतो !

राजा : गोपाळ, बाहेर गेल्यावर हातून काय होईल ते खरे. तुरुंगातील योजना तुरुंगातच राहावयाच्या. बाहेर प्रत्यक्ष कठोर परिस्थिती असते. येथे कल्पनांचे घोडे आपण दौडवित असतो. पैशाशिवाय कामे उठत नसतात. आश्रम काढावा, वर्तमानपत्र काढावे, कितीतरी मनात येते; परंतु पैसे कोठून आणावयाचे ? दुसऱ्या जवळ मला कधी काही मागवत नाही. हे बघ. जर काढलाच आश्रम तर बोलवीन तुला. तुझा पत्ता आहेच मला माहीत. काय रे, आज मन्या नाही आला तो ?

गोपाळ : त्याला आज खटल्यावर नेले होते.

(मन्या येतो. पायात दंडाबेडी. खिन्न.)

राजा : मन्या ! शिक्षा झाली वाटते ? तू आधीच अशक्त आणि हे पायात साखळदंड ! तुझ्या पायांतील हे जंजीर माझ्या पायात असते तर बरे झाले असते. मन्या, आम्ही आता सुटणार. तुझे कसे होणार ?

मन्या : सर्वांचे होईल तसे आमचे. आम्ही क्रिमिनल चोर. तुम्ही गांधींचे लोकसुद्धा आम्हाला जवळ नाही घेत. स्वराज्यवाले म्हणतात, ''क्रिमिनलमध्ये आम्हाला नका ठेवू''

राजा : मला तर तुमच्यातच रहावयास आवडेल. तुम्हाला चोर कोण म्हणेल ? किती तुमची निर्मळ मने !

मन्या : आम्हाला शिक्षा ठोठावणाऱ्या त्या न्यायाधीशाने तीन दिवस उपवास करावा. चौथ्या दिवशी जर त्याला चोरून खाण्याची इच्छा झाली नाही तर त्याने आम्हाला शिक्षा करावी.

गोपाळ : खाऊन खाऊन अपचने होणारे गादीवाले, त्यांना घातले पाहिजे तुरुंगात. ते खरे चोर. तुम्ही थोर आहात.

मन्या : तुम्हा गांधींचे लोक होतेत, आम्हाला आधार होता. जरा अन्न बरे मिळे. शिव्या कमी मिळत. थोडे माणुसकीचे दर्शन होई. तुम्ही बाहेर गेल्यावर आमची कोण घेणार बाजू ?

राजा : मन्या, आम्ही बाहेर गेलो तरी तुम्हांस विसरणार नाही. आम्ही निवडणूक लढवू. कौन्सिलात जाऊ. कायदे सुधारू. तुरुंग सुधारू.

गोपाळ : तुरुंग मुळी बंदच झाले पाहिजेत. ज्या समाजात तुरुंग आहेत, तो रानटी समाज.

राजा : त्यासाठी सारी समाजरचना बदलावी लागेल.

गोपाळ : मन्या, काम करायला लाग. शिपाईदादा येताहेत.
(सारे काम करू लागतात.)

शिपाई : काय रे मन्या, येथे गांधींच्या लोकांशी गप्पा मारतोस होय ? ये गांधीके लोक काम नहीं करते ओर दूसरेको भी कर नहीं देते. बडे बदमाष. मन्या, बघतोस काय ? साला तुमारेकू दंडा होना. बातचीत करता है. दंडा मारू बघतो

राजा : जरा माणुसकीने वागा की.

शिपाई : गप्प बसा राव. तुम्ही स्वत: शिपाई होऊन पाहा. तुम्हीही असेच वागाल. मन्या, अभीभी खडा, बदमाष–साला (मन्या थरथरतो)

राजा : शिपाई दादा, आम्ही सुटलो की निवडून येऊ. पोलिसखाते, तुरुंगखाते मग आमच्या हाती. जरा जपून वागा.

शिपाई : (स्वगत) खरेच की. पुढे काळ कठीण दिसतो ! (उघडा) तुम्ही गांधीचे लोक उद्या सुटणार ना ?

गोपाळ : आम्हाला काय माहीत ?

शिपाई : तुमकु सब मालुम रहता है. गांधीके लोक बडे बदमाश. छुपाकर नवाकाळ लाते है. साला हमकु पता नहीं लगता, तुमकु पहिला पत्ता बाहेरका कैसा लगता है.

(शिट्टी वाजते)

शिपाई : चलो काम करो, मन्या, दंडा देख. साब आता है.

गोपाळ : साप आता है.

शिपाई : चलो काम करो.

(जरा धक्का बुक्की होते पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा

(गणपतराव आरामखुर्चीत बसले आहेत. आणखीही एक दोन खुर्च्या तेथे असतात. जवळच रामा आहे.)

रामा : बाबा, आता बरे वाटते ना तुम्हाला ?

गणपतराव : राजाकडे माझे डोळे लागले आहेत. केव्हा एकदा त्याला पाहीन असे झाले आहे. राजकीय कैदी लवकरच सुटणार असे म्हणतात.

(पडद्यात 'नवाकाळ अर्धाआणा, सारे राजकीय कैदी सुटले, नवाकाळ')

रामा : ए नवाकाळ

(पत्रविक्या येतो)

पत्रविक्या : हा घ्या. सारे राजकीय कैदी सुटले. (अंक देतो व जातो)

रामा : (हाक मारून) अरे पैसे घे.

पत्रविक्या : मलाही आज इतका आनंद झाला आहे की दिडक्यांकडे लक्ष नाही. माझा नवाकाळ आज विकताना मला धन्य वाटत आहे.

(जातो)

गणपतराव : काय रे खरेच सुटले का ?

रामा : हो.

गणपतराव : राजाही सुटला असेल. त्याचे राजबिंडे शरीर वाळून गेले असेल. चक्की दळून हातांस फोड आले असतील. तुरुंग म्हणजे पृथ्वीवरचे नरकच ते. अशक्त झाला असेल माझा राजा.

रामा : त्याचे हे डॉक्टर मित्र त्याला देतील चांगले टॉनिक. बाबा, दादा येथे येईल. आपण येथेच काही दिवस राहू. येथील हवा किती छान ? आणि समुद्रावर किती मजा. ती सुरूची जंगले. समुद्रावर गेले की खरेच बाबा माझी तहानभूक जाते. घो घो सारखी गर्जना !

गणपतराव : खरोखरच समुद्र म्हणजे एक गंभीर गूढ आहे. समुद्राचा हा गंभीर सामवेद कोणाला कळणार ? अनंत काळापासून तो सारखा ओरडत आहे. पृथ्वीच्या पायाशी डोके आपटीत आहे. काय पाहिजे त्याला ? हृदय पिळवटून कसले गाणे गातो ? का ही त्याची सारखी धडपड ? मानवजातीचे ऐक्य का त्याला पाहिजे आहे ? नका रे एकसारखे एकमेकांशी भांडू. परस्परांत बंधुभाव राखा असे का तो सांगत आहे ? रामा, समुद्र पाहिला म्हणजे राजाची आठवण होते. समुद्रावर जशा लाटा नाचतात, तशाच भावना राजाच्या हृदयात उसळत असतात. समुद्राच्या गर्जनेप्रमाणेच राजा गरिबांसाठी गर्जना करतो. समुद्रदर्शन म्हणजे माझ्या राजाचे हृदयदर्शन.

(डॉक्टर येतात हातात क्रॉनिकल आहे.)

डॉक्टर : काय आज आनंद आहे ना ? सारे कैदी सुटले बाबा.

गणपतराव : राजाही सुटला असेल ?

डॉक्टर : सर्वांबरोबर तो सुटणारच बाबा.

गणपतराव : सुटल्यावर तो येथेच येईल का ?

डॉक्टर : येथे येण्याविषयी त्याला लिहिले आहे.

रामा : परंतु तुरुंगात ते पत्र मिळाले पाहिजे ना ? दादा आपला घरी जायचा नाही तर.

गणपतराव : कोठे आहे आपले घर ? या जन्मी आपले घर नाही.

डॉक्टर : माझे घर तुमचेच समजा.

रामा : डॉक्टर, फिरायला येता ?

डॉक्टर : डॉक्टरला कोठले हिंडणे फिरणे ? डॉक्टरचे परस्वाधीन जिणे. सकाळ नाही, दुपार नाही. दिवस नाही, रात्र नाही. थंडी नाही, पाऊस नाही. रोगी आला की डॉक्टराने उठले पाहिजे, गेले पाहिजे. डॉक्टराला रजा नाही. सुट्टी नाही. रविवार नाही. रामा, तू जा बाबांना घेऊन समुद्रावर. मला जायचे आहे तो पेशंट पाहायला.

गणपतराव : तुम्हाला वेळ झाला तर या; परंतु सकाळी कोठून मिळणार वेळ ? डॉक्टर, खरोखरच किती तुम्ही सेवा करता.

डॉक्टर : मी जातो हा. जातो.

गणपतराव : स्वत:ची स्तुती इवलीही आवडत नाही डॉक्टरांना. खरोखर थोर आहेत. चल राजा, धर हात.
(जातात.)

प्रवेश तिसरा

(स्वयंसेवकाच्या पोषाखात राजा)

राजा : तुरुंगाच्या चार भिंतीच्या कोंडवाड्यातून पडलो सारे बाहेर. हे मोकळे अनंत क्षितिज पाहून मनाला किती आनंद होत आहे! कितीही झाले तरी तुरुंग तो तुरुंग. तेथे कोंडमारा व्हावयाचाच. आज बाहेर सर्वत्र आनंदी आनंद आहे. सर्वांच्या भेटीगाठी होत असतील. जिकडेतिकडे आज झेंडे, जयजयकार, सभा, गाणी. ही पाहा एक प्रभातफेरी येत आहे. किती गोड वाटतो आहे आवाज? आपणही त्यांच्यात शिरावे का? (राजा दूर उभा राहतो व गाणे म्हणत पडद्यातून झेंडे घेतलेली मुले येतात.)

भारत प्यारा स्वतंत्र झाला
जय बोला जय बोला हो ।।धृ ।।
तुटले बंधन सरले क्रंदन
नंदनवन अजि बनवू हो
आनंदाचा सिंधू उसळतो
जय बोला जय बोला हो ।।
गुढ्या उभारा घरोघर आता
भारतगाणी गाऊ हो
हिंदुमुसल्मान एक होऊनी
जय बोला जय बोला हो ।।
सर्व हुतात्मे स्मरा अंतरी
त्याग करू या अनंत हो
स्वातंत्र्याला लायक होऊ
जय बोला जय बोला हो ।।

काँग्रेसच्या या पाठीमागे
बंधुभगिनींनो कोटी हो
काँग्रेस स्वातंत्र्यास देतसे
जय बोला जय बोला हो ।।
जय बोला जय बोला हो
जय बोला जय बोला हो
भारत प्यारा स्वतंत्र झाला
जय बोला जय बोला हो ।।

(मुले गाणे म्हणत रंगभूमीवर नीट उभी असतात. राजा त्यांच्याबरोबर गाणे गाऊ लागतो. मुले शिस्तीत पुन्हा गाणे म्हणत जातात.)

राजा : त्या मुलांबरोबर गाणे गात जावे असेच मलाही वाटू लागले. भारत मातेच्या स्वातंत्र्याचे गाणे ! ते गाणे कोणाला वेड लावणार नाही? परंतु अद्याप भारत कोठे झाला आहे मुक्त ? परंतु आता तो स्वतंत्र झाल्याशिवाय राहणार नाही. त्याला स्वत:च्या सामर्थ्याची जाणीव झाली आहे. ही जाणीव म्हणजेच खरी संजीवनी. भारतात आज विश्वास आणि श्रद्धा उत्पन्न झाली आहेत. आपल्या राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याची अमर श्रद्धा अंतरंगात असणे ही सर्वात महत्त्वाची वस्तू आहे. काँग्रेसने ही श्रद्धा दिली आहे. ती सर्वांना आज एकत्र आणीत आहे. ज्या खैबरखिंडीतून मुसलमानांनी स्वाऱ्या केल्या त्याच खैबरखिंडीतून देशभक्तीचा वणवा पेटत येत आहे. मुसलमानांचा खालचा थर काँग्रेसमध्ये झपाट्याने येईल. हरिजन येतील. पुन्हा प्रचंड सत्याग्रह सुरू झाला तर सारे हिंदुस्थान त्यात पडेल. हिंदुस्थान स्वतंत्र होईल !

किती किती आज आनंद होत आहे ! तुरुंगातील राजकीय कैदी घरोघर आशा व आनंद घेऊन गेले असतील. इतके दिवस साऱ्या घरांत दु:ख होते. सणावारी कोणी गोड करून खाल्ले नाही. आज खरी दिवाळी, आज दसरा. माझे बाबाही माझी वाट पाहात असतील. रामाचे डोळे माझ्याकडे लागले असतील. पहिली गाडी मिळेल तिनेच जावे. (जातो)

प्रवेश चौथा

(दिनकरराव प्रवेश करतात. हातात वर्तमानपत्र)

दिनकरराव : सुटले सारे गांधी. आता सब्गोलंकारास पुन्हा ऊत येईल.
(शंकरराव येतात)

शंकरराव : अहो राजा सुटला आहे आपला.

दिनकरराव : धर्मभ्रष्टाचे नाव काढू नका.

शंकरराव : त्याच्या बापाला तर येथून तुम्ही घालवलेतच.

दिनकरराव : मी आहेच पराक्रमी व निश्चयी. अधर्म मला बिलकूल सहन होत नाही. मारामारीही करायला मी मागेपुढे पाहणार नाही.

शंकरराव : हे जयघोष कानी येत आहेत. राजा आला की काय?
(पडद्यात महात्मा गांधी की जय, राजादादा की जय, वंदेमातरम् अशा गर्जना. मुलांच्या घोळक्यात राजा येतो.)

राजा : (मुलांना) बरे आहात ना रे सारे? माझे वडील तर येथून गेले म्हणता.

मुले : दिनकररावांनी त्यांना घालविले. तो पाहा साप उभा आहे.

राजा : (दिनकररावांस) नमस्कार.

दिनकरराव : (स्वगत) मोठा साळसूदपणाचा आव आणतात हे लोक. (तिरस्काराने बघतो.)

राजा : शंकरराव, नमस्कार.

शंकरराव : राजा सुटून आलास सुखरूप. चांगले झाले. अशक्त झालास हो. तुझे बाबा येथे नाहीत. तुला तरी कसे समजणार म्हणा.

राजा : त्यांनी पत्र पाठविले असेल. परंतु तुरुंगात ३ महिन्यांतून एकदा पत्र मिळते.

दिनकरराव : तुझ्या बापाने येथून काळे केले. तूही काळे कर.

राजा : माझ्या गावात मी का येऊ नये?

दिनकरराव : त्या महारवाड्यात तुमचे जातभाई आहेत. तिकडे जा.

राजा : खरेच रामजी आहे तेथे माझा.
(रामजी धावतच येतो.)

रामजी : (उत्कटतेने) राजादा, राजादा, आलेत.
(मिठी मारतो)

दिनकरराव : डोळ्यांदेखत धर्माचा खून. काय करू रे.

मुले : डोळे फोडून घ्या.

रामजी : राजादा, बरे आहात ना? चला माझ्या घरी. तुमच्या बाबांनाही मी माझ्या घरी नेणार होतो. परंतु तुमच्या मित्रांनी नेले त्यांना. माझे घर तुमचेच समजा. आम्ही तुम्हांस मानपत्र देण्याचे ठरविले आहे. उद्या मोठी सबा करू.

मुले : उद्या केव्हा भरणार सभा?

रामजी : रात्री जेवणानंतर.

मुले : आम्ही येऊ सभेला?

दिनकरराव : मरा.

शंकरराव : मीही येईन रामजी. राजा आपल्या गावचे भूषण. तुम्ही त्याची किंमत ओळखलीत.

दिनकरराव : माकडे माकडांना ओळखतात.

राजा : रामजी, माझ्या गावात तुझ्याशिवाय कोण आहे मला. तूच माझा सखा. तूच आप्तेष्ट. चल, तुझे घर म्हणजे मला मोक्षाचे धाम.

शंकरराव : सबसे उंची प्रेमसगाई.

रामजी : चला राजादा (दोघे जातात)
(मुले जातात)

शंकरराव : दिनकरराव, तुम्हीही येणार का सभेला ?

दिनकरराव : तुम्ही जाऊ म्हणता तर मीही येईन, परंतु मी दूर बसेन.

शंकरराव : दिनकरराव, उदार भावनांनी तुमचे हृदय कधीच का उचंबळत नाही ?

दिनकरराव : मी दगड आहे.

शंकरराव : दगडालाही म्हणे पाझर फुटतात.

दिनकरराव : दगडास पाझर फोडणारे प्रेम आज दुनियेत नाही. मी दगड आहे. दगड होणे हेच माझे ध्येय.

शंकरराव : दगडाचे जगात काय काम ?

दिनकरराव : दगडाचेच काम असते.

शंकरराव : दगडाचेच देव बनतात. दगडांतील दिव्यता तो पाहील तो खरा डोळस. जातो मी.
(जातो.)

दिनकरराव : दगडांतील दिव्यता उद्या दिसेल म्हणावे.
(जातो)

प्रवेश पाचवा

(हरिजन वस्तीतील जागा. हरिजन आनंदाने गाणे गात आहेत.)
(गाणे)

यारे गाऊ सारे गान
यारे गाऊ सारे गान
आमचा सुटून आला प्राण,
आमचा सुटून आला प्राण,
आमचा सुटून आला प्राण ।। या. ।।
पिकेल आता सुख
हरेल सारे दुःख
पृथ्वीवर करू आपण स्वर्ग निर्माण ।। या. ।।
प्रेमाला येईल पूर
भेद सारे होतील दूर
बंधुभाव वाढून कुणा नुरेल कसली वाण ।। या. ।।

(रामजी येतो.)

रामजी : आता सारे शांतपणे नीट बसारे. तो झेंडा नीट लावून ठेवा. आता राजादा येतील. ते आले म्हणजे उभे राहा. (जातो)
(सभा जमते. खांद्यावर घोंगड्या, हाती काठ्या, डोक्याला फाटकी मुंडाशी अशी मंडळी. राजा, रामजी येतात. टाळ्या व जयजयकार. पुन्हा सारे शांत)

रामजी : मंडळी आता शांत राहा. प्रथम मी राजादांना द्यायचे मानपत्र वाचून दाखवतो.
(मानपत्र)
''थोर देशभक्त राजादा –
तुम्ही तुरुंगातून सुखरूप सुटून आलात याचा आम्हाला आनंद होत आहे. तुम्ही स्वराज्य जवळ आणीत आहात. तुमच त्याग मोठा

 /साने गुरुजी

आहे. गरिबांचे तुम्ही वाली आहात. समानता तुमच्या कृतीत आहे. भेदभाव तुमच्या जवळ नाही. तुम्ही आता आमच्यात राहा. आमची घरे म्हणजे तुमची. आम्हास सुधारा. देव तुम्हाला उदंड आयुष्य देवो.''

(मानपत्र राजाच्या हातात देतो. टाळ्या.)

राजा : बंधूंनो, या निर्मळ खादीवर लिहिलेले हे निर्मळ मानपत्र घ्यावयास मी तितका अजून निर्मळ नाही. हे मानपत्र म्हणजे सर्वांना जवळ घेणाऱ्या माझ्या काँग्रेस मातेची पूजा आहे. सारे काँग्रेसमध्ये या. हरिजनांची सेवा हे माझे दिवसरात्रीचे स्वप्न आहे. तुमची स्थिती किती वाईट ! खरोखर श्रमणाऱ्यांना जगात जोपर्यंत सुखाचे दिवस नाहीत तोपर्यंत खरा धर्म नाही. खरा धर्म अद्याप जगात यावयाचा आहे.

(दगड येतो.)

(सभेत गलबला होतो.)

राजा : (कपाळ धरून) शांत बसा. बाँबचे गोळे वरून पडले तरी न हालण्याची शिस्त आपण शिकू तेव्हाच स्वराज्यास पात्र होऊ. मी खऱ्या धर्माबद्दल बोलत होतो. जेव्हा खरा धर्म येईल. (पुन्हा दगड येतात. कपाळातून रक्त येते. राजा पडतो, उठतो.)

लोक : धरा. अरे दिनकरराव. त्या सापाने मारले दगड. धरा त्याला, हाणा.

राजा : नका, त्यांना धक्का लावू नका. (पडतो)

रामजी : राजादांचे शब्द ऐका. दिनकररावांना कोणीही हात लावू नका. गर्दी दूर करा. आपण यांना उचलून नेऊ.

(राजाला उचलून नेतात.)

+++

अंक चौथा

प्रवेश पहिला

(डॉक्टर खुर्चीत बसले आहेत.)

डॉक्टर : आज कदाचित राजा येईल. मला किती आनंद होत आहे ! या गावात त्याचे व्याख्यान करवू. त्याचे व्याख्यान ऐकावे असे कितीतरी मनात येत आहे.

(पडद्यात "नवाकाळ अर्धा आणा. सनातनींचा रानटी हल्ला. देशभक्त राजाभाऊंवर दगड – नवाकाळ")

काय, राजावर दगड, माझ्या राजावर ?

(नवाकाळवाला अंक देऊन जातो. डॉक्टर वाचतात. त्यांचा चेहरा खिन्न होतो.)

अरेरे, माझ्या राजावर का त्यांनी दगड मारावे ? काय करावे ?

(इतक्यात रामा व गणपतराव येतात.)

रामा : डॉक्टर, आज तुम्ही हसत का नाही ? आनंदी का नाही ?

गणपतराव : कोणी पेशंट का अधिक आहे ?

डॉक्टर : आज माझा एक प्राणप्रिय मित्र शरपंजरी पडला आहे.

रामा : कोणत्या गावी ?

गणपतराव : तुम्ही जाऊन या.

डॉक्टर : बाबा, तुमच्या राजावर दिनकररावांनी दगडांचा वर्षाव केला. हरिजन मानपत्र देत होते. ते त्या सापाला सहन झाले नाही. राजाला गाढ मूर्च्छना आहे.

गणपतराव : काय सांगता डॉक्टर ? माझ्या राजावर दगड ? फुलांवर निखारे ओतले त्यांनी ? तळहाताच्या फोडाप्रमाणे मी राजाला वाढवले.

अरेरे ! डॉक्टर ? काय हे म्हातारपणी ? माझे डोळे का मिटत नाहीत ? भेटेल का राजा ? असेल का तो जिवंत ?

रामा : डॉक्टर, दादाला तुम्ही नाही का बरा करणार ?

डॉक्टर : बाबा, असा धीर सोडू नका. घाबरू नका. आपण सारे की नाही आजच्या आज राजाकडे जाऊ. देव सारे बरे करील. चला रडू नका. (पडदा पडतो.)

प्रवेश दुसरा

विठू : राजादांना अजून शुद्ध येत नाही.

हरी : त्यांच्या अंगात फार ताप आहे.

विठू : काय करावे ? बुद्धी काही चालत नाही.

हरी : राजादांना गुण पडावा म्हणून आजपासून दारू न पिण्याची शपथ आपण सारे हरिजन घेऊ या.

विठू : खरेच. सत्य संकल्पाचे बळ असते.

हरी : दारूपायी किती नुकसान.

विठू : आपण आपल्या इतर मंडळीस विचारू या. (जातात.)

प्रवेश तिसरा

(खाटेवर जखम बांधलेला राजा पडला आहे. तो मध्येच तापात बडबडतो, हातवारे करतो, उठू बघतो. कोठेतरी पाहातो. ''तो आला'' असे म्हणतो. रामजी आवरतो. इतर मंडळी जवळ आहे.)

रामजी : अजून कशी शुद्ध येत नाही ? बोटाने कोणाला बोलवीत आहेत ? कोण दिसत आहे यांच्या डोळ्यांना ? वडिलांची का आठवण येत आहे ?

(हरी, विठू वगैरे येतात.)

हरी : रामजीदा, कशी आहे प्रकृती ?

रामजी : आहे तशीच आहे.

विठू : आम्ही सर्व हरिजनांनी एक निश्चय केला आहे.

रामजी : कोणता ?

विठू : महारवाडा आजपासून दारू बंद करणार आहे. राजादांचे प्राण शरीरात यावेत म्हणून महारवाड्यातून दारू कायमची जाणार आहे.

(पद म्हणतो.)

आम्ही सोडू आता दारू ही कायमची
देवा प्रतिज्ञा ही तव पायी रे साची ।। धृ. ।।
राजादांना प्राणदान परि तू दे प्रभू
थोर असे देशभक्त स्मरत हिंदभू
त्याला उठवी देवा
करू दे देशसेवा
कृपादृष्टी हो तुमची ।। आम्ही. ।।

रामजी : देव तुमचा हा पवित्र निश्चय का ऐकणार नाही ?

हरी : जातो आम्ही. देव लवकर गुण देवो.

(जातात.)

रामजी : हरिजनांच्या अंत:करणातील प्रार्थना राजादाला खात्रीने बरा करील. त्या प्रार्थना आराम पाडतील.

(इतक्यात गणपतराव, रामा, डॉक्टर येतात.)

गणपतराव : (राजाला कवटाळून) राजा राजा, कसे रे मारले कसाबांनी ? बोल रे बाळ. रामजी, काय करू मी ?

रामा : दादा, बघ ना रे आमच्याकडे. तुझ्याशिवाय मी कसा राहू, कसा जगू ?

डॉक्टर : तुम्ही सारे शांत राहा. मी त्याला नीट पाहतो एकदा.

(जखमेची पट्टी सोडतो. धुतो. बांधतो. ताप बघतो. बर्फ वगैरे फोडतात.)

रामा : डॉक्टर, दादा बरा होईल ना ?

डॉक्टर : तुम्ही कोणी धीर नाही सोडलात व काळजीपूर्वक शुश्रूषा केलीत तर गुण येईल. रडायचे नाही. आता त्याला स्वस्थ पडू दे.

गणपतराव : डोळे का उघडीत नाही ? निदान वातात तरी डोळे उघडू दे. राजाचे डोळे म्हणजे प्रेमाचे भरलेले जणू डोह. उघड रे डोळे.

रामा : दादा !

डॉक्टर : उघडील हो डोळे. चला बाबा. तुम्ही जरा शांत पडा.
(पडदा पडतो. जातात.)

प्रवेश चौथा

(स्वयंसेवक गोपाळ खाकोटीस पिशवी, व हातात काठी असा येतो.)

गोपाळ : या गावी तर आलो. राजादांचे हे गाव. धन्य आहे हे गाव; परंतु याच गावात त्यांना दगड मारण्यात आले. कृतघ्न गाव. केव्हा राजादांना पाहीन असे झाले आहे. माझी आठवण ते काढीत असतील; परंतु ते भेटतील का, असतील का जिवंत ? हो असतीलच. या गोपाळाजवळ बोलण्यासाठी ते कंठी प्राण धरून राहतील. देवा, माझे प्राण ने व राजादांचे वाचव. ते हजारोंना स्फूर्ती देतील.
या गावात कोठे त्यांचे घर, कोठे ते राहतात ? कोणाला विचारू, कोठे त्यांना शोधू ?
(पद)

शोधू कुठे मी त्यांना ।। धृ. ।।
थोर मनाचे थोर गुणांचे
दिसतील का मज दीना ।। शो. ।।
राजादांचे निर्मळ जीवन
जीवनसम मज मीना ।। शो. ।।

(मुले खेळत येतात.)

मुले : हा कोण गांधी ?

गोपाळ : काय रे मुलांनो, ते जखमी झालेले राजादा कोठे राहतात ?

मुले : ते तिकडे महारवाड्यात राहतात. तुम्ही तिकडेच जा. नाहीतर येथे तुम्हालाही दगड मारतील. गांधीटोपी दिसली की काही दुष्ट दगड मारतात.

गोपाळ : तुम्ही दाखवाल रस्ता ?

एक मुलगा : हो. मी दाखवतो. तुम्ही कोठले ?

गोपाळ : मी राजादांचा तुरुंगातील मित्र. वर्तमानपत्रात त्यांना कोणी दगड मारले असे वाचले व भेटायला धावून आलो.

मुलगा : तुम्ही लांबून भेटायला आलात. आम्ही या गावचे असून भेटायला गेलो नाही. आमचे आईबाप जाऊ देत नाही. काय करावे ? परंतु आज येतो तुमच्याबरोबर.

इतर मुले : आपण सारेच जाऊ. नमस्कार करून येऊ. चला. (जातात)

प्रवेश पाचवा

(राजा खाटेवर आहे. जवळ डॉक्टर व वडील आहेत. रामजीही खाली बसला आहे. रामा आहे. राजा डोळे मिटून पडलेला आहे. तो हातवारे करतो. उठू बघतो.)

डॉक्टर : अजून डोळे कसे उघडीत नाही ?

गणपतराव : अंतर्दृष्टीने तो का कोणाला बघत आहे ? कोणाला गेला आहे भेटायला आत्मा ? राजा अरे राजा ?

रामजी : माझे मन सांगते की आज शुद्ध येईल.

गणपतराव : निर्मळ मनात येते ते खरे ठरते.

(गोपाळ व मुले येतात.)

मुले : रामजी, एक स्वयंसेवक आला आहे. कसे आहे राजादांचे ?

रामजी : बरे नाही हो बाळांनो, कोठे आहे स्वयंसेवक ?

गोपाळ : हा मी आलो आहे.

(मुले राजादाला प्रणाम करून जातात)

गणपतराव : कोण तुम्ही ? कोठले ?

गोपाळ : मी यां तुरुंगातील मित्र. तुरुंगात यांनी प्रेम दिले, ज्ञान दिले, सारे काही दिले. यांच्यामुळे तुरुंग आनंदमय झाला. वर्तमानपत्रात वाईट वार्ता वाचली व मी यांना पाहायला, यांची सेवा करायला आलो आहे.

गणपतराव : या. तुम्ही थकलेले दिसता.

गोपाळ : राजादांजवळ बसलो म्हणजे सारा थकवा पळेल; परंतु तुम्ही मला ''तुम्ही'' म्हणू नका. ''तू'' असे म्हणा.

रामा : ये गोपाळ ये. दादाजवळ बस. दादाचे डोळे तू तरी उघडव.

(गोपाळ राजाचा हात हातात घेतो व स्वत: डोळे मिटतो. राजा

हळूहळू डोळे उघडतो व गोपाळकडे जरा टक लावून त्याला मिठी मारावयास एकदम उठतो. गोपाळ डोळे उघडतो व त्याला आवरतो.)

गोपाळ : पडून राहा. शांत राहा.

राजा : गोपाळ, दिनकरराव, दिनकरराव

रामजी : शांत पडा. दिनकरराव आहेत हो.

राजा : कोठे आहेत ते ? तुम्ही त्यांना मारले असेल, दिनकरराव !

डॉक्टर : राजा शांत राहा. विचार नको करू.

राजा : विचार नको करू तर का पशू होऊ ?

गणपतराव : राजा, असा रागावू नको, चिडू नको. स्वस्थ राहा बाळ.

रामा : बाबा आपण बाहेर जाऊ. गोपाळला बसू दे दादाजवळ. त्याने दादाचे डोळे उघडवले.

डॉक्टर : खरेच आपण जाऊ. (जातात)

गोपाळ : तुम्ही का माझी आठवण करीत होतात ?

राजा : हो, तुझी मूर्ती सारखी आत मला दिसत होती. आत तू दिसेनासा झालास म्हणून डोळे बाहेर उघडले तो समोर तू. गोपाळ, तू यावेस असे मला वाटत होते. तुला मोठे काम आहे. तू त्या दिनकररावांची नीट बातमी आण. त्यांची खुशाली कळेपर्यंत मला बरे वाटणार नाही. हे सारे महात्माजींच्या तत्त्वज्ञानाची टिंगल करतील. मला ते प्राणमय दु:ख आहे. ते कोणी दिनकररावांकडे जाणार नाहीत. तू जा. मी डॉक्टरांसही मग पाठवीन. गोपाळ, माझ्या उशा पायाशी बसायला पुष्कळ आहेत. जा.

गोपाळ : आल्यासारखा थोडा वेळ तरी तुमच्याजवळ बसू दे. तुमचे निर्मळ प्रेम अनुभवू दे.

राजा : गोपाळ, शेवटी तू वेडा रे वेडा. तुरुंगात एवढे उगीच वाचलेस. गोपाळ, माझे एक वाक्य लक्षात ठेव. ''प्रेमापेक्षा कर्तव्य थोर असते.'' जा. खरेच जा. मी शांत पडून राहीन. हा पडदा सोडून ठेव म्हणजे झाले. (गोपाळ जातो, पडदा पडतो.)

प्रवेश सहावा

(दिनकरराव अंथरुणावर तडफडत आहेत. पाणी पाणी करीत आहेत.)

दिनकरराव : पाणी, द्यारे कोणी पाणी. आग. भयंकर आग. पाणी. कोण देणार पाणी ? जगाला प्रेम दिले असते तर दिले असते मला कोणी पाणी. अयाई. सारे आंग कसे फुटते आहे. रोमारोमात भरलेला द्वेष जणू बाहेर पडत आहे. कोरड पडली घशाला. पाणी. (उठू पाहतो – पडतो)

(गोपाळ व मुले बाजूने येतात)

गोपाळ : त्या दिनकररावांचे दाखवता ना घर ?

मुले : त्या सापाचे ? दिनकरराव म्हणजे साप आहे हो. त्या बिळात राहतो तो.

गोपाळ : जातो मी.

मुले : सापाकडे जाणार ?

गोपाळ : आम्हाला सारी माणसे चांगलीच आहेत.

मुले : जाऊ नका. फुस् करील तो. दगड मारील हो तुम्हाला.

गोपाळ : डोक्यात गांधीटोपी असली की कोणाची भीती वाटत नाही. (मुले जातात.)

गोपाळ : हे याचे घर वाटते ? आत शिरतो.

दिनकरराव : पाणी. नाही का रे कोणी देणार पाणी ? सारे का माझ्यासारखे उलट्या काळजाचे ? द्यारे थेंबभर पाणी. अयाई, आग, साऱ्या अंगाची आग.

गोपाळ : (जवळ जाऊन) देतो हां पाणी. (स्वगत) यांच्या घरात कोणीच दिसत नाही. सारी भांडी घाणेरडी दिसतात. भांडे घासून दिले पाहिजे. (आत जातो आणि पाणी घेऊन येतो.)

दिनकरराव : पाणी, पाणी

गोपाळ : हे घ्या. आ करा.

(पाणी देतो. दिनकरराव गोपाळकडे बघतात.)

दिनकरराव : कोण तू ? सापाच्या बिळात कशाला आलास ?

गोपाळ : शांत पडून राहा.

दिनकरराव : आता मेल्याशिवाय शांती नाही. मरणार, मी मरणार.

गोपाळ : मी तुम्हाला वाचवायला आलो आहे.

दिनकरराव : कोण आहेस तू ? तू का देवदूत आहेस ?

गोपाळ : एका देवाने मला पाठवले आहे.

दिनकरराव : कोठे आहे तो देव ?

गोपाळ : बरे झालेत म्हणजे दाखवीन.

दिनकरराव : किती गोड तुझे बोलणे. किती पवित्र तुझे पाहणे. निजव, मला जरा निजव. बाळ कशाला आलास ? मला कशाला बरा करतोस ? मी साप आहे, सैतान आहे. कशाला त्याला जगात ठेवू पाहतोस ?

गोपाळ : तुम्ही साप नाही, सैतान नाही. तुम्ही चांगले आहात. सैतान नसून संत आहात, साप नसून सुगंधी निर्मळ हार आहात. झोपा.
(थोपटतो)
(डॉक्टर येतात)

डॉक्टर : काय गोपाळ, कसे आहे यांचे ?

गोपाळ : लक्षण काही ठीक नाही.

डॉक्टर : राजाने हट्ट धरून मलाही पाठवले. म्हणे जा, जाऊन ये.

गोपाळ : यांना तपासा.
(डॉक्टर तपासू लागतो)

दिनकरराव : कोण तुम्ही ?

डॉक्टर : सर्पाचे विष उतरवणारे डॉक्टर. पडा. मला तपासू देत. (ताप बघतात)

डॉक्टर : हो. मी देतो औषध पाठवून. तू यांच्याजवळ राहणार ना ?

गोपाळ : हो.

डॉक्टर : या सापाची सेवा करून काय मिळणार तुम्हाला ? बरा झाला म्हणजे पुन्हा चावे घेईल. तुम्ही गांधींचे लोक म्हणजे वेडे पीर.

गोपाळ : डॉक्टर, असे कसे म्हणता ? यांची सेवा केल्याने जर हे बरे झाले तर ते खात्रीने निराळे होतील. यांचा खरोखर पुनर्जन्म होईल. डॉक्टर, प्रेमाचे प्रयोग तुम्हाला माहीत नाहीत. तुमच्या जवळ इतर इंजक्शनने आहेत; परंतु प्रेमाचे इंजक्शन नाही.

डॉक्टर : ठीक आहे. चालू दे तुमचे प्रेमप्रयोग.

गोपाळ : थोडी फळे पण द्या पाठवून.

डॉक्टर : ठीक जातो मी (जातो)

दिनकरराव : कोण तपाशीत होते मला ? साप मला म्हणत होता. होय ना ? होय. मी साप होतो; परंतु कोणीतरी माझा सापपणा ओढून घेत आहे. बाळ, तू माझा हात हातात घेतलास म्हणजे माझ्या हातातून काही ओढीत आहेस असे वाटते. तू का धन्वंतरी आहेस ? माझे विष उतरवशील ? सापपणा दूर करशील ?

गोपाळ : तुम्ही बोलू नका. शांत पडा बरे.

दिनकरराव : मला ओव्या म्हण, गाणे म्हण. मला झोपव.

गोपाळ : (स्वगत) आजारी मनुष्य म्हणजे जणू लहान मूल. (प्रकट) थोपटतो हां. गाणे म्हणतो हां.

(थोपटतो व गाणे म्हणतो)

: गाणे :

बा नीज सख्या नीज गड्या लडिवाळा
राजसा परमवेल्हाळा ।। धृ. ।।
या सकल जगी उठले विषमय वारे
द्वेषाचे उडत फवारे
ही सकल मही सूडबुद्धीने भरली
हृदयेच जणू कुणा नुरली
जगी झाला रे सुळसुळाट कामाचा
क्रोधाचा मात्सर्याचा
परि भिऊ नको तू बाळ
धरी प्रेमवृत्ती तू अढळ
प्रेम हेच तव दिव्य बळ
या प्रेमाच्या सामर्थ्ये जगताला
आणशील निजचरणाला ।। बा. ।।
सत्प्रेमाची आहे अद्‌भूत शक्ती
प्रेम हीच खरी चिच्छक्ती

या प्रेमाचे वर्णन कोण करील
तोडके शब्द पडतील
तू प्रेमाचा सागर हृदयी जमवी
सुकलेले जग हे फुलवी
शमवाया विश्वद्वेष
ये घेऊन तू प्रेमास
भरपूर देई जगतास
तू देशील प्रेम जरी जगताला
बदलशील आजच्या काळा ।। बा. ।।
ना जगती कधी प्रेम दिल्याने सरते
हे प्रेम कधी ना मरते
ते दिधल्याने वाढतसे, जागवित
परमहृदयी सुप्त जे असते
परमहृदयाचा विकास करिते प्रेम
प्रेम एक जगदभिराम
बाळ तू निजोनी आज
प्रेमाने हृदयी साज
हो सज्ज पुढे किती काज
तू नीज आता येईल परि तव वेळा
करी तेव्हा प्रेमसुकाळा ।। बा. ।।

कशी गाढ झोप लागली आहे यांना ? त्रस्त अशांत जीवा, झोप शांतपणे झोप. झोपेतून उठशील तो प्रेममय व स्नेहमय होऊन ऊठ. (पडदा पडतो.)

प्रवेश सातवा

(रामजी व राजा)

रामजी : राजादा, देवाची कृपा म्हणून तुम्ही बरे झालात. आता येथून दुसरीकडे जाऊ नका. या महारवाड्यातच राहा. आम्हाला ज्ञान द्या. आमची स्थिती सुधारा.

राजा : मी तुमच्या महारवाड्यातून जाऊ नये या अटीवरच माझे जाणारे प्राण परत आले आहेत. रामजी, मी येथेच राहीन. तुम्ही माझी सेवा केलीत. तुमचा मी उतराई होईन. येथे सेवाधाम म्हणून आपण संस्था काढू. महारवाड्याचे नंदनवन बनवू. स्वच्छता, ज्ञान, उद्योग प्रेम यांचे येथे माहेरघर करू. येथे खरा धर्म आणू. खरी संस्कृती फुलवू.

(गणपतराव येतात)

गणपतराव : राजा, अजून प्रकृतीला जप हो.

राजा : बाबा, आपण सर्वांनी आता येथेच राहायचे.

गणपतराव : तू म्हणशील तसे.

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती
चालवीसी हाती धरूनीया''

माझा हात धरून नेशील तिकडे मी येईन.

(रामा येतो)

रामा : दादा, गोपाळ व दिनकरराव येत आहेत.

राजा : डॉक्टर कोठे आहेत ?

रामा : तिकडे विटीदांडू खेळत आहेत.

राजा : त्यांना बोलव जा.

(रामा जातो. गोपाळ व दिनकरराव येतात)

राजा : या दिनकरराव, इतके लांब कशाला आलात ? मीच येणार होतो तुमच्याकडे. अजून वाऱ्यात फार हिंडू नका. दुखणे उलटायचे नाही तर.

दिनकरराव : राजा. मी काय बोलू, काय सांगू ? मी तुमचा द्वेष केला; परंतु तू मला प्रेम दिलेस. मी तुला दगड मारले, तू गोपाळ पाठवून माझी शुश्रूषा करवलीस. खरोखर, धन्य आहात तुम्ही गांधींचे लोक. गणपतराव, मी तुम्हाला छळले. मला क्षमा करा. हा दिनकरराव आता पूर्वीचा नाही. (पाया पडतो)

राजा : दिनकरराव, आता पूर्वीचे काही आठवायचे नाही. पूर्वीचे बोलायचे नाही. नाटक संपत आले म्हणजे पडदा पडतो. त्याप्रमाणे तुमचे

पूर्वीचे एक नाटक संपले. आता प्रेममय व सेवामय दुसरे नाटक सुरू होऊ दे. दिनकरराव, आम्ही सारे येथेच महारवाड्यात राहणार आहोत. येथे सेवाधाम संस्था काढणार आहोत.

दिनकरराव : गोपाळही येथेच राहणार का ?

गोपाळ : पाण्याला सोडून राहणार का ?

दिनकरराव : आणि डॉक्टर ?

(डॉक्टर येतात)

डॉक्टर : सापाची विषे उतरायला मीही येथेच राहणार आहे.

राजा : असे नको आता बोलू. आपण प्रेमाने सेवा करावयास सारे एकत्र राहू.

रामा : किती मौज होईल.

रामजी : खरा धर्म येईल.

दिनकरराव : तुमच्या संस्थेत मलाही घ्याल ? माझी सारी इस्टेट व उरलेले माझे सारे जीवन या संस्थेला मी देईन. घ्याल का मला ?

राजा : खरे म्हटले तर तुम्हीच आमच्यापेक्षा सेवा करावयास अधिक लायक आहात. पश्चात्ताप झालेला मनुष्य निरहंकारी असतो. दिनकरराव, या तुम्हीही संस्थेत या. ही संस्था म्हणजे आपले घर. हा महारवाडा म्हणजे आपले घर. बाबा, तुम्ही नेहमी म्हणत असा की आपले स्वत:चे घर हवे. बाबा, जेथे जेथे गरीब लोक राहतात तेथे आपले घर. भिल्लकातकरी जेथे राहतात तेथे आपले घर. श्रमणारा मजूर जेथे राहतो तेथे आपले घर. जेथे जेथे दास्य, दु:ख, दैन्य आहे, तेथे आपण जाऊ, तेथे राहू. तेथे आपले घर. तेथे आपण प्रकाश नेऊ. आनंद नेऊ; सहानुभूती, सेवा नेऊ. प्रेमाने पृथ्वी भरू. आपल्या बंधुभगिनींच्या हृदयात आपण प्रेममंदिर बांधू. त्या प्रेममंदिरात वस्ती करू. सेवेने दुसऱ्याच्या हृदयात जे प्रेममंदिर आपण बांधू, ते भूकंपात पडणार नाही, पावसात कोसळणार नाही. त्या घरातून आपणास कोणी काढणार नाही. ते घर जप्त होणार नाही. असे ते प्रेममंदिर म्हणजे आपले घर. बाबा ते आपले घर.

सारे : हो ते आपले घर.

राजा : ते घर आजपासून सुरू करू या. वंदे मातरम् हा पवित्र मंत्र म्हणून घराचे उद्घाटन करू या.

(सारे वंदेमातरम् म्हणतात. महात्मा गांधीकी जय म्हणतात. पडदा पडतो.)

राष्ट्रगीत

वंदे मातरम् सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलां
सस्यशामलां मातरं ।। वं. ।।
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीं
फुलकुसुमित–द्रुमदल–शोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरं ।। वं. ।।

+++

अस्पृश्योद्धार

अस्पृश्योद्धार (नाटिका)

नांदी

(भूप, एकताल, 'परब्रह्म परमेश्वर')

बाल–बाल परमेश्वर – सगुणरूप चिदानंद ।
मना नाना उठति तरंग; बघुनि लागतोच छंद ।। धृ. ।।
ईशा हेचि तव सेवन । पुंडरीक – नयनान ।
लोल गोल तनु–धारी । मज गमे सौख्यकंद ।। १ ।।

प्रवेश पहिला

(एक महाराची झोपडी. एका घोंगडीवर एक बारा–तेरा वर्षांचा मुलगा आजारी पडला आहे. खोलीत आजूबाजूला सर्वत्र अडगळ, म्हणजे काही मडकी, काही काटक्या असे सामान पडले असून मुलाचा बाप त्याच्याजवळ बसला आहे.)

पांडू : बाळ, जरा बरं वाटतं ना रे आता तुला ? अजून तुझं कपाळ तर कसं अगदी तापलेलं आहे. काय करावं, काहीच समजत नाय. देवाजीच्या मनात काय हाय ते कुणास ठावं ! देवा भगवंता, माझ्या पोरीला बेगीन गुण पाडलास तर पाच नारळ फोडीन रे तुला ! बाळ, असं का रे करतोस ?

राघू : अयाई, आई ! बाबा, बाबा ! बय कुठं गेली ? तहान फार तहान लागली, बाबा ! पाणी द्याना घोटभर ! पाणीबी तुम्ही नाही देत ; तुम्ही तरी कोठून द्याल पाणी ? भरू देतील तर ना विहिरीवर ?

पांडू : बाळ, थांब जरा, अशी अगदी जिवाची तगमग नको करू. बघ, पाणी आणलं हाय हो लांब जाऊन. (मडक्यातील पाणी आणतो.) हं, कर

आ; हे घे पाणी. (ओततो). पुरे ना आता ? जरा स्वस्थ पडून राहा. (मुलाची तगमग पाहून बाप स्वत:शीच बोलतो.) पोराची तर ही अशी दशा ! घरात विख खायला दिडकी नाय तर औषधपाण्याला कुठून आणणार पैसा ? डाक्तर कुठून आणू ? आणि आमच्या म्हाराच्या घरी तो येईल तरी कसा ! देवा, आम्ही असंच हालात दिवस काढावं व मरून जावं का रे ?

(अभंग)

जल्म देऊनीया । जन मारायासी । दरिंदळ देशी । काय देवा ।। धृ. ।
पितयाची माया । काय ही म्हणावी । अन्नावीण यावी । तूटी काय ।। १ ।।
गरिबीची दोरी । पडे, की अपूरी । झणी न घेणारी ।। पंचप्राण ।। २ ।।
मृत्यूच्याहि पेक्षा । करी हाल भारी । देवा सुरी बरी । प्राण घ्याया ।। ३ ।।
कृपाळु पिता तूं । मारी न लेकरूं । न तूं पापभीरू । देवा काय ।। ४ ।।

कुत्रासुद्धा नाही खायचा आमचे हाल ! आम्ही काय असं पातक मागल्या जल्मात केलं व्हतं की, म्हाराच्या पोटी आम्हास घातलंस ? दिवसभर मरमर कुठंतरी काम करावं, अन् कसातरी गुजराण करावा; पण अशी दुखणीबाणी आली म्हणजे काम करायला तरी कुठं जाता येतं ! (राघू डोळे उघडतो.)

राघू : बाबा, तुम्ही जा ना कामावर ! मी अगदी नीट पडून राहीन. बय नाही आली अजून ?

पांडू : ती किनाई अंगारा आणायला गेली आहे ! मी तुला सोडून कसा जाऊ? (नारायण प्रवेश करतो.)

नारायण : आपलाच मुलगा आजारी आहे का ?

पांडू : होय महाराज; पण आपण कोण ? आपणास काय पाहिजे ?

नारायण : मला दुसरं कोणी नको. मी तुमच्याकडेच आलो आहे.

पांडू : आम्हा म्हारांकडे ?

नारायण : होय. मी रोज या आळीत येऊन म्हारवाड्यात कुणी आजारी आहे की काय याची चौकशी करतो. मला कळलं की तुमचा मुलगा फार आजारी आहे; म्हणून आपणास मदत करण्यासाठी मी आलो आहे. मी त्याच्याजवळ रात्री येऊन बसत जाईन, म्हणजे तुम्हास झोप मिळेल.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

पांडू : थोर मनाचे आहात तुम्ही, रावसाब; पण तुम्ही तर थोरकुळीचं दिसता ! तुमच्या आईबापास कळलं तर ते तुम्हास घरता घेणार नाहीत. आम्ही जातीनं महार, नीच जात. आम्ही कोल्ह्याकुत्र्यांच्या संगतीत राहावं. महाराज, जा. आल्या पावली माघारे जा. असं पाहू नका. देव तुमचं भलं करील, जा, जा झटकन कुणी पाहिलं नाही तो माघारे परता !

राघू : बाबा, घशास कोरड पडली हो, द्या पाणी द्या ! पोटभर पाणी तरी पाजा ! आग होत आहे सगळ्या अंगाची, बाबा ! (रडू लागतो.)

पांडू : थांब, असा रडू नकोस. देतो अं पाणी ! (माठातील पाणी ओतून देऊ लागतो.)

नारायण : थांबा, थांबा, ते थंडगार पाणी देऊ नका. तापवलं होतं का ?

पांडू : पाणी तापवायला लाकूड फाटा कुठून आणणार ?

नारायण : थांबा, मी आता जाऊन सोड्याच्या दोन बाटल्या घेऊन येतो. (जातो.)

पांडू : मुलाची बुद्धी पण थोर आहे; परंतु आमची सावलीही घेत नाहीत, तिथं आमच्या घरी येऊन असं याचं कारणं याच्या घरी कळलं, तर काय होईल कुणास माहीत ? माझ्यावरही तोहमत येईल.

राघू : बाबा, द्या ना पाणी ? (नारायण येतो.)

नारायण : बाळ, देतो अं पाणी, (बाटली फोडतो.) ही घ्या बाटली; ओता या भांड्यात अन् द्या त्यास !

पांडू : बाळ, हे घे पाणी. आ कर, उघड तोंड नीट ! (पाजतो.)

राघू : हे पाणी असं काय ? अगदी बेचव लागतंय हो !

नारायण : बाळ, हे औषधी पाणी आहे; हेच पी ! डॉक्टर हेच पाणी पिण्यास देतात बरं !

राघू : बाबा, पैसे होते का तुमच्याजवळ हे पाणी आणण्यासाठी ? तुम्ही तर दोन दिवसांत कामावर गेला नाही !

नारायण : बाळ, तू नको बोलण्याचे श्रम घेऊ. तुझ्या बाबांना मदत करावयास मी तयार आहे. काळजी नको करू !

राघू : बाबा, हे कोण ?

नारायण : मी लक्ष्मीधरांचा मुलगा !

पांडू : काय जख्मीधरांचे ?

नारायण : होय.

राघू : नको, तुमची मदत नको. तुमच्या वडिलांनी हजारो कुळांना बुडवलं !

नारायण : पण मी तसा नाही, मला तुझा भाऊ समज !

राघू : तुमचे वडील कोण आहेत हे मी जाणतो !

पांडू : राघू, असं बोलू नये. नीज, गप्प पडून राहा; त्यांनी आपल्याला आयत्या वेळी पैसे दिले, गरज भागली आणि काही असलं तरी मुलाला बोलून काय उपयोग ?

नारायण : पांडबा, माझ्या वडिलांची सर्वत्र होणारी बदनामी माझ्या हृदयाचं पाणी करते हो. माझे ते बाबा आहेत; पण त्याला मी काय करू ? पांडबा, राघूला औषध काय दिलं होतं ?

पांडू : देवीचा अंगारा हेच आमचं औषध !

नारायण : पांडू, मी दुपारी डॉक्टरला घेऊन येईन ! त्याला तहान लागली तर या बाटलीतील पाणी द्या. मी ही दुसरी बाटली आणली आहे, त्यातील थोडं पाणी एका भांड्यात ओतून व त्यात वाटीभर दुसरं पाणी घालून त्याची पट्टी त्याच्या कपाळावर ठेवा. थांबा, नाहीतर मीच पट्टी करून कपाळावर ठेवतो. (तसे करतो.) जाऊ मी ?

पांडू : तुमचे किती उपकार !

नारायण : उपकार वगैरे काही नाही; हा माझा आनंद आहे. जातो अं ! (जातो, पडदा.)

प्रवेश दुसरा

(एका गरीब शेतकऱ्याचे अंगण. खाटेवर लक्ष्मीधरांचा कारकून असून रामजी खाली केविलवाणा बसला आहे.)

कारकून : मग या पैशांची फेड करणार तरी कधी ? आज तीन वर्षे झाली; व्याजाची पै दिली नाहीस. बोल, पैसे घ्यायला तुम्हाला काही वाटत नाही; पण देताना मात्र तुम्हास वाटतं जड ! घेताना तुम्ही आमच्या दाराशी सतरांदा याल; पण पैसे वसूल करण्यासाठी आम्ही शंभर वेळा

यावे ! बोल ना ? तीनदा वायदे केले आणि हात हलवीत आम्हाला माघारं दवडले.

रामजी : रावसाहेब, असं रागावू नका. तुम्हीच तारणार तुम्हीच मारणार ! आज तीन वर्ष सतत दुष्काळ पडत आहे. शेतांत मरेमरेतो राबतो; पण एक दाणा दृष्टीस पडेल तर शपथ ! घरात पोरंबाळं आजारी ! माझी धाकटी सगुणा, मोठी गुणांची पोर ! रावसाहेब, दोन महिन्यांपूर्वी गेली हो ! (डोळ्यांस पाणी येते.) घरातील किडुकमिडुक तिच्या औषधपाण्यासाठी विकलं. हल्ली घरात बायको पडलीच आहे अंथरुणावर ! म्हणून जरा सबुरीनं घ्या, तुचमे पैसे बुडणार नाहीत. दुसऱ्याचं रीण ठेवून नरकात का जायचं ? देवा शपथ पैशाची फेड करीन; पण –

कारकून : त्या शपथा मला नकोत; पैसे केव्हा देणार ते सांग. धन्यानं सांगितलं की, पन्नास रुपये तरी घेऊन ये; नाहीतर फिर्याद करून, जप्ती आणून सर्व घरादाराचा लिलाव करतो. बोल, या घटकेस पन्नास रुपये मोजतोस का दोन दिवसांत जप्ती आणू ?

रामजी : महाराज, असे कठोर नका होऊ ! वडिलोपार्जित लहानसं घर राहू द्या पोरांना छायेसाठी ! तुम्ही मालकांची समजूत घाला, मध्यस्थी करा; मी स्वत: दोन दिवसांनी – तिला जरा बरं वाटलं म्हणजे धन्याकडे येईन, पदर पसरीन ! रावसाहेब, आम्हा गरिबांचे हाल–आमची आसवं तुम्हाला दिसत नाहीत का हो ?

कारकून : अरे, पैसे वसूल करून नेले नाहीत, तर धनी आमच्यावरच गुरगुरतो. उद्या काढून टाकलं तर माझ्या पोराबाळांचीही उपासमार ! रामजी, तुझ्यासाठी करतो रदबदली. अरे, मी तुझ्यासाठी नेहमी सांगतो, म्हणून इतकी वर्ष धनीसाहेबांनी धीर धरला. नाहीतर लक्ष्मीधरपंतांनी केव्हाच तुझ्या घरादारावरून नांगर फिरवला असता. (आवाज बदलून) काय रे रामजी, ती पलीकडे काही गाय चरत आहे; ती तुझीच वाटतं ? मोठी छानदार आहे गड्या ! गाईची जतन छान केली आहेस.

रामजी : माझीच गाय. पोरांचा तिच्यावर फार जीव. सगुणा तर तिची पोळी सारखी खाजवीत बसावयाची. गुणी पोर, सगुणेचा आवाज ऐकताच गाय हंबरायची बघा !

कारकून : रामजी, ही गाय मला देशील विकत ? योग्य ती किंमत मी देईनच तुला ! तू दोन–चार रोजांनी येणार आहेस ना तिकडे ? तुला पण पैसे कर्ज फेडण्यास होतील.

रामजी : रावसाहेब, घरातील माणसांसारखी–प्राण्यांसारखी ही गुरं आम्हाला दूर करवत नाहीत. ही गाय आमची तर कामधेनू. सगुणेच्या आजारात दूध लागलं तर वाटेल तेव्हा खाली बसावं व चार धारा काढून घ्याव्या ! रावसाहेब, ही गाय म्हणजे घराची शोभा; ती नका मागू.

कारकून : रामजी, तुझ्यासाठी मात्र मी मालकाजवळ जीव तोडतोडून सांगावं, आणि तुझ्याजवळ मी ही गाय – फुकट नव्हे, विकत मागतो आणि ती तू मला देऊ नये ? रामजी, जग हे असं कृतघ्नच आहे. उद्या मालकानं जप्ती आणली व पै किंमतीनं गाय हाकलीत नेली, तरी ते चालेल नाही ? अरे, विचार कर, गाय ती काय आणि त्याचा केवढा मोठा प्रश्न तुला पडला आहे ?

रामजी : न्या तर तिला !

कारकून : मी जरा तिला पाहून येतो. (जातो)

रामजी : काय बोलावं; अन् काय करावं ! सगुणा गेली, कपिला चालली. या कर्जापायी काय काय संकटं व प्रसंग येणार कुणाला माहीत ? कर्ज म्हणजे जिवंतपणीचा नरक ! भोवऱ्यात सापडलेला मनुष्य जसा बाहेर येऊ शकत नाही, त्याप्रमाणं मनुष्य एकदा का कर्जात बुडाला की, वर मान होणं अशक्य ! त्याचं सर्वस्वी वाटोळंच व्हायचं ! (कारकून येतो.)

कारकून : रामजी, बरी आहे गाय. मला एक गडी दे बघून. म्हणजे बरोबरच घेऊन जातो. मी त्या शेजारच्या घरी आहे. गडी मिळाला म्हणजे सांग. (जातो.)

रामजी : देवा ! काय रे ही दशा आणलीस ? उद्या पोरांनी दुधाचा थेंब मागितला तर काय देऊ ? त्यांच्या औषधपाण्याला दूध लागलं तर कुठून आणू ?

गाय विकली, हे ऐकून पोरे रडतील. बायको शिव्या देईल. कर्जबाजारी मनुष्याला बाहेर शिव्या, घरात शिव्या, सर्वत्र शिव्या आणि अपमान ! नको हे कर्ज. आज तीन वर्षे, देवा, पाऊस पाडतास, शेतभात पिकवतास तर नसते रे असे दिवस आले ! पण आता रडून काय करणार? रावसाहेबांस गडी पाहून द्यायचा आहे. (विश्राम येतो.)

विश्राम : बाबा, तुम्ही गाय विकली का हो ? मला विका ना बाबा; पण गाय नका विकू. आई रडते आहे हो !

पद (चाल – पांडवा)

गाय जातां जाइ सारे । राहि आतां काय बोला ।।
दूध जाई, वासरूंही । काय शोभा या गृहाला ।। धृ. ।।
आजचाही लाभ गेला । पुढिल आशासिंधु गेला, ।
वैभवांच्या निर्झरांचा । गाय जातां नाश झाला ।। १ ।।

बाबा, गाय दिली ना हो ! (रामजी जातो, विश्राम त्याला धरून रडत जातो.)

प्रवेश तिसरा

(डॉक्टर व नारायण. डॉक्टरांच्या हातात त्यांच्या धंद्याचे सर्व सामान आहे.)

डॉक्टर : अरे, पण कुठं जायचं आहे ते तर सांगशील.

नारायण : ते मग सांगेन; आधी माझ्याबरोबर येता का ? बोला. नाही म्हणू नका. एका गरिबावर उपकार करावयाचे आहेत. फीची फिकीर नको, पैसे मी देईन.

डॉक्टर : तू फी देणार आणि लक्ष्मीधरपंत ओरडतील ते ! बाप पैसा जपतो, तर पोर सर्व उधळतो ! पण जायचं कुठं ?

नारायण : ते आधी सांगणार नाही, तुम्ही चला.

डॉक्टर : बरं बाबा, तू तरी खमक्याच आहेस ! तुझ्यासारखंच का होईना, चल ! (पुढे होऊन).

डॉक्टर : अरे, आपण तर महारवाड्याच्या रस्त्याला आलो. कुणा महारमांगांकडे नेणार की काय मला ?

नारायण : होय. डॉक्टर, त्या पांडू महाराचा पोरगा राघू फार आजारी आहे. तापाने तळमळत आहे.

डॉक्टर : छे रे बाबा, लोक काय म्हणतील ! या गावात मी नवीनच दवाखाना घातला आहे. माझी अजून प्रॅक्टीस नीट सुरू देखील नाही; तोच लोकांविरुद्ध वागण्याचं धाडस मी कसं करू ? मला तशी येण्यास हरकत नाही. अरे, कॉलेजात शिकत होतो, तेव्हा प्रेतंसुद्धा आम्ही फाडीत होतो. उंदीर-बेडूक कापीत होतो; पण या गावात नको.

नारायण : तुम्ही पशूंना शिवता; परंतु मनुष्यप्राण्याला शिवण्याची तुम्हाला लाज वाटते ? डॉक्टर, लोकांच्या बागुलबोवाला भिता ? वाहवा, तुमची सदसद्‌विवेकबुद्धी तुम्ही लोकांना विकून टाकली आहे का काय ?

डॉक्टर : अरे, लोकमतापुढं सदसद्‌विवेकबुद्धी वगैरे चट्‌ सारं बाजूला ठेवावं लागतं. रामालासुद्धा, सीतादेवी शुद्ध होती तरी जनापवादामुळे सोडावी लागली. **'यद्यपि शुद्धं लोकविरुद्ध, ना चरणीयं ना करीयम् ।'** असा प्रत्यक्ष आद्य शंकराचार्यांनीसुद्धा दंडक घालून ठेवला आहे.

नारायण : बोलतो, माफ करा ! सैतानालासुद्धा मोठमोठी वाक्यं म्हणून दाखवून स्वत:च्या वर्तनाचं समर्थन करता येतं. तुम्ही तुमच्या सदसद्‌विवेकबुद्धीचा हृदयातील जागृत देवतेचा खून पाडीत आहात. जोपर्यंत हिंदुस्थानात सदसद्‌विवेकबुद्धीला महत्त्व नसून लोकांच्या रूढीलाच मोठेपणा आहे, तोपर्यंत त्यांच्या उद्धाराची आशा नको.

डॉक्टर : अरे, जग म्हणजे असंच ! नारायणा, कुणी वरून हसतात तर कुणी मनातच रडतात. काही वरून गोड बोलतात, तर काहींच्या पोटात काळकूट भरलेलं असतं. वागतात एका प्रकारे; पण मनात विचार दुसरेच ! आचार, विचार आणि उच्चार या तिन्हीमध्ये एकरूपता दाखवणारा सज्जन या जगता खरोखर विरळा ! नारायणा, आमच्यासारखे उदरभरू व समाजाच्या लहरीप्रमाणे वागणारे लोकच इथूनतिथून भरलेले !

नारायण : जगाचं हे असलं स्वरूप पाहून माझ्या हृदयाचं पाणी पाणी होतं हो ! सारभूत वस्तू दूर लोटून सालपटं उराशी धरणं, मोती भिरकावून शिंपले पेटीत ठेवणं, मनुष्याच्या हृदयाचा खून करून रूढीची पूजा करणं, यातच लोक गढून गेलेले ! डॉक्टरसाहेब, खऱ्या देशदैन्याकडे कुणीच बघत नाहीत. हो, पण आता ही चर्चा राहू दे ! आपण माझ्याबरोबर येता ना ? एका गरिबाच्या पोराचे प्राण वाचवता ना ? (डॉक्टरांची नकारदर्शक मुद्रा पाहून) डॉक्टर, ही विद्या शिकलात तरी कशाला ? खरं देशदैन्य गरिबांच्या झोपड्यांत असतं ! लोकमताच्या तलवारीच्या धारेखाली राहून तुम्हीही आपल्या शिक्षणानं सुधारलेल्या बुद्धीचा उपयोग देशदैन्याकडे डोळेझाक करण्याकडे करणार काय ? देशाचं दैन्य चारी बाजूंनी वावटळीसारखं धावत आहे.

पद (चाल – शाम चुनरिया)

देश अपुला दीन झाला । शोष त्यास बहु बाजुंनि जडाला । जरि नाही सावध झाला तरी बुडाला ।।धृ.।। ओघ धनाचा अखंड गेला । जनता काढि तरि उपोषणाला । वसन नसे धड कुणाकुणाला ।।१।। गोधन आनन अनुदिनी बघता । अंत्यजांस झणि पुनित न करतां । हाय कथू किती कथा तुम्हांला ।।२।।

म्हणून म्हणतो आपल्या सदसद्‌विवेक बुद्धीला चालना द्या !

डॉक्टर : नारायणा, चल ! येतो तुझ्याबरोबर, लोक काय म्हणतील ते म्हणोत ! सत्याची पूजा करणं हाच खरा धर्म मलाही शिकलं पाहिजे. चल.

नारायण : डॉक्टर, असं होईल तरच सारा समाज सुधारेल. चला. (जातात.)

प्रवेश चौथा

(पांडबाची झोपडी. राघू पडला आहे.)

पांडबा : राघू, बोलत का नाहीस ? नारायणराव डॉक्टर घेऊन येणार होते; पण (डॉक्टर व नारायणराव प्रवेश करतात.)

डॉक्टर : हा पाहा मी आलो आहे.

पांडबा : कोण ? (पाहून) या, बसा. पाहा पोरगा कसा कोमेजल्या फुलावाणी झालाय तो !

डॉक्टर : मी पाहतो अं ! गडबड नको करू. (तपासतो.) नारायणा, टायफॉइड आहे. पांडबा, फार जपलं पाहिजे. पाणी तापवून गार करून द्या. ताक, मोसंब्याचा रस पाजा; अंथरुणावरून उठू देऊ नका; शौचाला बेडपॅन पाठवून देतो !

पांडबा : डॉक्टर, आम्हा गरिबांना हे कसं साधणार ? तुमचं येडपन आम्हास कसं जुळेल ?

नारायण : पांडबा, मी आहे ना ! सारी मदत करीन बरं ! मी तुमच्याकडेच राहीन; काही काळजी करू नका.

पांडबा : बरा होईल का हा पोरगा, डाक्तर ?

डॉक्टर : होईल बरा ! जपून मात्र वागलं पाहिजे. पथ्यापाण्याला जपलं पाहिजे. तुम्ही भातभाकर मायेनं खायला द्याल, तर मरण मात्र जवळ येईल. मी सांगेन तसं वागा. नारायणा, चल, औषध देतो. घाबरू नका अं, पांडबा !

राघू : बाबा, पाणी ?

नारायण : सोडा द्या. पांडबा, आम्ही जातो.

डॉक्टर : बरा होईल बरं, पांडबा, तुमचा मुलगा.

पांडबा : देव तुमच्या तोंडात साखर पाडो. (जातात, पडदा.)

प्रवेश पाचवा

(लक्ष्मीधरपंतांची ओसरी. रामराव, गोपाळराव, खंडेराव व माधवराव.)

राम. : ऐकलंत का गोपाळराव ? जे जे ऐकावं ते ते आपलं एकेक आश्चर्यच !

माधव. : काय होईल या काळात काही सांगता येत नाही. (तपकीर ओढतो.)

राम. : कलियुग बरं हे !

गोपाल. : कलौ तु भ्रष्टाचारः !

राम. : अहो तो लक्ष्मीधरपंतांचा नारायण –

खंडे. : मग काय दिवे लावलेन् त्यानं ? अंडी खाल्लीन् की काय ?

माधव. : अहो, अंड्यांचं एवढं काही नाही हो. औषध म्हणून माझ्या पोरालाही ती द्यावी लागली. (तपकीर ओढतो.)

राम. : अहो, तो नारायण म्हणे, महारामांगांच्या घरांत जातो. त्यांच्या पोरांचे पाय चेपतो.

खंडे. : आईबापांचे मात्र जन्मात चेपणार नाही !

राम. : त्यांच्या तिथं खातो, निजतो – आणि पुन्हा लक्ष्मीधरपंतांच्या घरी वावरतो. खरोखर त्यांच्या घरी भ्रष्टाचार माजत चालला आहे. पंतांसारख्या धर्मवीराला हे कसं चालतं कुणास माहीत !

गोपाळ. : अहो, पंतांना कळलंच नसेल ! ही उपद्व्यापी कार्टी घरी थोडीच दाद देणार आहेत ? लक्ष्मीधरपंत खरोखर लाख माणूस ! अलीकडे अशी धार्मिक माणसं आढळतच नाहीत. अधार्मिक गोष्ट पंतांना कधीच खपायची नाही.

खंडे. : आपण आलोच आहोत, घालू त्यांच्या कानांवर ! नाहीतर त्यांच्या घरावर बहिष्कार घालण्यापर्यंत पाळी यायची !

माधव. : (पुढे होऊन तपकीर नाकात कोंबतो.) लक्ष्मीधरपंत, लक्ष्मीधरपंत !

लक्ष्मीधरपंत : (आतून) ओ, ओ, आलो. (येऊन सुपारी कातरून देत) काय माधवराव, ठीक आहे ना ?

माधव. : अहो, काळ खडतर येत चालला. आता ठीक कसचं या कलियुगात ! धर्मावरची श्रद्धा उडत चाललेली लोकांची ! देवाचा कोप होत चालला ! अतिवृष्टीने अति नुकसान झालं. शिकलेले लोक म्हणतात, मन चांगलं असलं म्हणजे झालं, करायचा काय धर्म ? 'खादीला मदत करा, शाळेला साहाय्य करा, महारमांगांना स्वच्छता शिकवा,' ही त्यांची सूत्रं ! तिकडे देवावर कावळे बसताहेत ! (तपकीर ओढतो.)

लक्ष्मीधरपंत : पस्तावतील पुढं या पाखंडी वर्तनानं ! कधी सुख का होईल अशानं ? **'आचारः प्रथमो; धर्मः ।'** आपला पूर्वापार आचार सोडून सगळा भ्रष्टाचार मांडला आहे, अलीकडच्या टारगटांनी ! उघडतील म्हणावं डोळे !

खंडे. : सर्वत्र खेळखंडोबा माजला आहे धर्माचा !

गोपाळ. : हजामत होताच विलायतेहून आलेलं भस्म फुलानं लावतात आणि एखाद्या ब्राह्मणानं भस्म लावलं तर हसतात !

माधव. : म्हणतात अस्पृश्यांना सुधारा, भेदाभेद वाईट ! मोठे आले आहेत धर्मावतार किनाई ! कुठं ते तपःसूर्य मनुयाज्ञवल्क्य व कुठं ही घुंगुरटी !

राम. : खरोखरच हे पाहवत नाही.

लक्ष्मीधरपंत : कोणा धर्मनिष्ठाला हे पाहवेल ? अलीकडची लहान लहान मुलंही त्याच मार्गानं जाऊ लागली आहेत. शाळांत तर विटाळ-चांडाळ नाहीच. पोरं खुशाल वाटेल त्याच्या घरी जातात, खातात. अहो, तो त्या परशुरामपंताचा नातू, परवा एका महाराच्या घरी जाऊन गप्पा मारीत बसला होता !

गोपाळ. : पंत, तुमच्या नारायणाबद्दलही असंच ऐकतो. वेळीच बंदोबस्त करा. नाहीतर आग पेटल्यावर ती कशी विझवणार !

लक्ष्मीधरपंत : कोण, माझा नारायण ? छे ! तो असं कधीच करावयाचा नाही. माझ्या मनाविरुद्ध तो काहीएक करणार नाही. मी त्यास स्वच्छ विचारून पाहीन.

राम. : हो, एकदा विचारून पाहा. जर तसं काही असेल तर वेळीच प्रायश्चित्त व गोप्रदान करावं. काल देवळात तशी काही कुजबुज ऐकू आली. कुणी म्हणतं की, तुमचं घर वर्ज्य केलं पाहिजे !

खंडे. : तसं झालं तर फार वाईट ! तुम्हाला तर ते फारच असह्य होईल व आम्हालाही मरण !

लक्ष्मीधरपंत : तुम्ही सांगितलं, चांगलं केलं.

खंडे. : अहो, स्नेह्याच्या हितास जागणं हे आमचं कर्तव्यच आहे.

सर्व : बरं, येतो. (जातात.)

प्रवेश सहावा

(बालवीर-शिक्षक)

बालवीर-शिक्षक : सर्व बालवीर म्हणजे केवळ पोषाखी पोपट अशी टीका सर्वत्र ऐकू येते. तिच्यात तथ्यही आहे. कुणी हडेलहप्पी सरकारी अधिकारी

यावा व त्याला यांनी ललकारी द्यावी, एवढंच जणू यांचं काम ! पण मी हे सारं पालटणार आहे. बालवीर हा समाजाची सेवा करणारा वीर आहे. सेवाधर्माची, जनतेचे हित करण्याची त्यांना गोडी लागली पाहिजे. त्या दिवशी त्या खेड्यात जाऊन विहिरीभोवती स्वच्छता वगैरे आम्ही केली; तेव्हा गावकऱ्यांना आमच्याबद्दल कितीतरी कौतुक वाटलं ! हल्लीच्या कॉलऱ्यात दिवसांत नदीचं पाणी पिण्यास नेऊ नये, म्हणून बालवीर तिथं निरोधन करतात; तेही किती छान आहे! जाऊन पाहू या तिकडे. पण एक अडचण आहे ! महारामांगांना निराळी विहीर नाही. नदीचं पाणी आम्ही त्यांना नेऊ देत नाही; काय करणार ! त्यांच्या भांड्यात हे औषध टाकून दिलं पाहिजे दोन दोन थेंब. तो नारायण, महारांत जाऊन त्यांची सेवा करतो तशीच साऱ्यांनी केली पाहिजे ! (शिट्टी वाजते, जातो.)

प्रवेश सातवा

(लक्ष्मीधरपंत व नारायण)

लक्ष्मीधरपंत : नारायणा, खरं सांग, गावात तुझ्याबद्दल लोक जे बोलतात, त्यात सत्याचा कितपत अंश आहे ते.

नारायण : काय म्हणतात लोक ? बाबा, तुमचा मुलगा देवास न आवडणारी गोष्ट कधीच करणार नाही.

लक्ष्मीधरपंत : तशी माझी खात्री होतीच ! तू माझ्या मर्जीविरुद्ध कधी वागावयाचा नाहीस, हे पण मला माहीत होतं. हे बघ, खरं सांग; तू त्या महारवाड्यात अलीकडे जातोस व कुणा महाराच्या घरी तास तास बसतोस, खरं का ?

नारायण : बाबा, माझ्याच्यानं खोटं बोलवत नाही. महारवाड्यात तो पांडू महार आहे ना, त्याच एकुलता एक मुलगा राघू फार आजारी आहे. त्या अडाणी गरीब पांडूस त्याची नीट शुश्रूषा ठेवता येईना, त्याला थर्मामीटर लावता येईना, बेडपॅनही देता येईना ! 'आमच्या बाळाला शीतळ वारा' असली गाणी म्हणून मुलाला शीतळ वाटेल, असल्या त्याच्या कल्पना ! म्हणून बाबा, मी त्याच्या मदतीला जातो. त्या

डॉक्टरांना मीच घेऊन गेलो होतो. प्रथम ते येत नव्हते; पण मग आले एकदाचे !

लक्ष्मीधरपंत : नारायण, हे तू चांगलं केलं नाहीस. माझं नाव सर्व स्पृश्यवर्गात बद्दू होत आहे. आज एके ठिकाणी गेलो; तेथील लोक मला लागेल असं उपरोधिक बोलू लागले. मला प्रथम ते समजेना; पण पुढं कळलं. नारायणा, तुझ्या पित्याची अब्रू तुझ्या हातात आहे. मला गावात तोंड बाहेर काढावयास जागा नाही. तू उद्यापासून त्या पांडूकडे जाऊ नको. झाल्या गोष्टीबद्दल मुकाट्यानं प्रायश्चित्त घे. ऐकलंस ?

नारायण : बाबा, वाईट गोष्ट हातून घडली तर प्रायश्चित्त घ्यावं. मी खरोखर वाईट का काही केलं आहे ? भूतदया ही परमेश्वराला प्रिय नाही का ? भक्तिविजयात मी एकनाथांची कथा लहानपणी वाचली होती. त्यांनी अंत्यजाचं मूल पोटाशी धरलं. बाबा, ती गोष्ट काय शिकविते? जे वाचायचं, ते प्रसंगविशेषी आचारात जर आणायचं नाही तर त्या शिकण्या-वाचण्याचा उपयोगी तरी काय ? मी वैष्णवांचाच मार्ग आचारीत आहे.

लक्ष्मीधरपंत : (जरा रागावून) तू मला शास्त्रार्थ नको शिकवायला ! लहान तोंडी मोठा घास केव्हापासून घेऊ लागलास ? मोठी माणसं सांगतात ते काय खोटं ?

नारायण : बाबा, एकनाथ, तुकाराम, विवेकानंद, श्रद्धानंद, महात्मा गांधी हे सारे मोठेच ना ? का या गावातील लोक तेवढेच मोठे ?

लक्ष्मीधरपंत : कारट्या ! (इतक्यात खंडेराव, रामराव, माधवराव, गोपाळराव येतात.) या बसा. काय करू हो ! या पोराची समजूत काही केल्या पटत नाही. तुम्ही तरी रामराव, सांगा दोन गोष्टी. वळला तर वळला.

राम. : नारायण, तुला आम्ही इतके दिवस फार चांगला समजत होतो. अरे, पितृमुखाला काळीमा नको लावू ! '**पितृदेवो भव**' अशी श्रुतीची आज्ञा आहे.

नारायण : आणि '**राष्ट्रदेवो भव**' अशी लोकमान्यांची आज्ञा आहे.

गोपाळ. : अरे, धर्म हा श्रेष्ठ आहे इतर कोणाहीपेक्षा !

नारायण : धर्म म्हणजे तरी काय ?

खंडे. : अरे, धर्म म्हणजे आपल्या पूर्वीच्या आचाराप्रमाणं वागणं.

नारायण : तुम्ही तरी सारे प्राचीन आचाराप्रमाणं वागता का ? गुरुगृही राहिलात का ? गुर्वाज्ञा घेऊन विवाह केलात का ? मरेपर्यंत संसारातच लोळणार, का वानप्रस्थ व संन्यास हे आश्रमही पाहणार ? रोज प्रात:काळी स्नान करता का ? आगगाडीत वाटेल तिथं बसता की नाही ? चहा पिता की नाही ? विड्या ओढता की नाही ? चरबी लावलेला कपडा वापरता की नाही ? हाडांच्या पुडीतून गाळलेली मोरस साखर मिटक्या मारून खाता की नाही ? बोला, कोणता पूर्वीचा आचार राहिला आहे ? कोणत्याही वर्णाचा माणूस विश्रांतीगृह काढतो, हातांनी हजामत करतो, शिंपीकाम करतो, मग काय राहिलं आहे ? बोला.

गोपाळ : अरे, हा आपद्धर्म आहे वेड्या !

नारायण : चांगला आहे आपद्धर्म ! जेव्हा काही चालत नाहीस होतं तेव्हा आपद्धर्माची ढाल पुढं ! हा तुमचा स्वार्थी धर्म तुम्हासच लखलाभ होवो. मी धर्म म्हणजे एवढंच समजतो की, भूतदया करावी, सत्यानं वागावं, परोपकार, प्रेम व पावित्र्य ही हृदयात ठेवून आपल्या देशावर प्रेम करावं, उत्तरोत्तर उदार व उन्नत व्हावं, उदात्त आचारविचार ठेवावा !

पद (केदार, त्रिताल, जगी शील चि.)

धर्म जगति हा वैष्णव मानी । दिवस सदा । जनसेवेवरी राहि म्हणोनी ।।धृ. ।।
परपीडन हें पाप तयाला । पुण्य म्हणे तो उपकाराला ।।
कर्मी रत; त्यजि आपपराला ।
सौख्य स्वतांचें लोकसुखिं गणी ।।१ ।।

अंधपरंपरा हा माझा धर्म नव्हे. परंपरेहून भूतदयेला, पावित्र्याला, प्रेमाला, बंधुभावाला अधिक मान असून ज्या धर्मात हृदयाचा ओलावा आहे, तो धर्म मला पाहिजे आहे. आचरणाच्या दुराग्रहानं पर–पीडा देणारा धर्म हा मला अधर्म वाटतो.

खंडे. : बाळ, अरे, अभद्र बोलू नकोस ! आपला जुना आचार सोडून, कुळाला कलंक लावून, पितहृदयाला दुखवून नरकाचं साधन करू

नको. दुसऱ्याचं हृदय सुखविण्यासाठी झटतोस; परंतु जन्मदात्या पित्याच्या हृदयाची मात्र होळी करतोस ?

नारायण : मला कुणाला सुखवायचं नाही, कुणाला दुखवायचं नाही. मला सत्याची पूजा करावयाची आहे. ती करताना महाराला सुख होईल अगर पित्याचं हृदय दुखावलं जाईल ! सत्य हे सौदा करीत नाही. सत्य हे आपलाच सरळ मार्ग चोखाळतं.

गोपाळ. : अरे, महारांना शिवून नरकात पडशील.

नारायण : अनाथ मनुष्यास मदत केल्यानं जर मला नरकप्राप्ती होत असेल तर तो नरकच मला नंदनवनाप्रमाणं आहे, समजलात ?

लक्ष्मीधरपंत : कार्ट्या, ते सांगतात ते खोटं आणि तुला वाटतं तेवढं खरं ! तू मोठा शंकराचार्य झालास ? का मोठा धर्मसंस्थापक झालास ?

नारायण : बाबा, मानवजातीचा मी एक नम्र सेवक आहे. बाबा, मनात सद्विचार येणं व सदाचार हातून होणं म्हणजेच स्वर्ग ! मनात वाईट विचार येणं व वाईट कृत्य हातून होणं म्हणजे नकर ! मला हेच स्वर्ग-नरक माहीत आहेत. महाराला मदत करणं मी सदाचार समजतो.

लक्ष्मीधरपंत : त्यांना शिवणं हासुद्धा ?

नारायण : होय, त्यांना शिवणं हासुद्धा ! तुम्हाला मांजर, पोपट, कुत्रं ही चालतात आणि चौऱ्याऐंशी लक्ष योनीनंतर जन्म घेतलेला मनुष्य मात्र चालत नाही ! बाबा, अस्पृश्यांनी पांडवप्रतापाची मिरवणूक काढली, म्हणून अस्पृश्यांवर हल्ले करून पांडवप्रताप जाळणारे स्पृश्य हे का स्वर्गाचे धनी होतील ? पांडवप्रताप जाळून मिळणारा स्वर्ग खात्रीनं निराळाच असला पाहिजे. ज्या स्पृश्यांनी श्रीकृष्ण परमात्म्याला पांडवप्रताप रूपानं जाळला, त्या स्पृश्यांत माझा जन्म न होता तरी बरं झालं असतं.

लक्ष्मीधरपंत : बापाच्या घरी खायला मिळत आहे म्हणूनच या लंब्या गप्पा ! पैसे उधळावयास आहेत, म्हणूनच परोपकार आठवत आहेत. घरातून घालवून देतो म्हणजे समजेल महारामांगांवर उपकार कसे करावे ते.

नारायण : बाबा, पैशाच्या मदतीपेक्षा सहानुभूतीनं व प्रेमानं ओथंबलेला एक शब्द हाच जास्त श्रेष्ठ आहे. माझ्याजवळ पैसे नसले तरी गोड शब्द

आहेत. त्या शब्दांनी मी गोरगरीबांस धीर देईन. मी धट्टा–कट्टा आहे; मोलमजुरी करीन, स्वत:चे पोट भरीन आणि माझ्या अस्पृश्य बंधूंस हातभार लावीन. फक्त तुमचा आशीर्वाद मात्र असावा.

लक्ष्मीधरपंत : जा तर, चालता हो. माझ्या घरता पुनश्च हे काळं तोंड दाखवू नकोस. खबरदार या घराची पायरी चढलास तर ! एक सुतळीचा तोडाही या घरांतून तुला मिळणार नाही.

नारायण : बरं आहे. तुमच्या मालमत्तेची मी कधीच आशा केली नव्हती. हजारो गोरगरिबांना पिळून मिळवलेली ही तुमची मालमत्ता माझ्या हातात येती, तर मी तिचा सर्वच्या सर्व गरिबांच्या दरिद्रीनारायणाच्या सेवेस सादर केली असती.

लक्ष्मीधरपंत : म्हणे गरिबांच्या सेवेस दिली असती ! लाज नाही वाटत बोलायला ? मला पैसे मिळवावयास काय श्रम पडले आहेत, ते माझे मला माहीत ! तुला गाढवाला काय त्याचं ? रात्रंदिवस खटाटोपी केल्या, कोर्ट–दरबार केले, तेव्हा कुठं आज सुखाचा घास मिळतो आहे. खरं की नाही, रामराव ?

राम. : यात काय संशय ! अहो, आम्ही ते सारं पाहतच आहोत. एक पैसा दृष्टीस पडणं म्हणजे कोण कष्ट पडतात ! 'जावं त्याच्या वंशा, तेव्हा कळे,' नारायणा, ऐक बाबा, असा हट्टाला पेटू नकोस. वडीलधाऱ्या माणसांचं ऐकणं त्यातच खरं कल्याण आहे.

नारायण : मोठ्या माणसांचं ऐकावं, पित्राज्ञा मोडू नये, हे सारं मला समजतं; परंतु मोठी माणसंसुद्धा चुकण्याचा संभव नसतो का ? भीष्मांनी परशुरामाचं थोडंच ऐकलं ? जी वडील माणसं वाईट करावयास सांगतील त्यांना वामन पंडित पापतरु म्हणतात. मुलांना उद्धटपणा शिकविणारे आईबाप, मुलाला देवापासून, धर्मापासून, स्वर्गापासून दूर नेत आहेत, असं तुम्हास नाही वाटत ? बाबांचे पाय मला सदैव पूज्य आहेत, त्यांचे अनुदार विचार मात्र मला पूज्य नाहीत.

लक्ष्मीधरपंत : कारट्या, मला दोष देणाऱ्या महामूर्खा, चालता हो माझ्या घरातून! नीघ, तुझा माझा संबंध आजपासून तुटला !

माधव. : नारायणा, असं अविचारी वर्तन करू नकोस. ऐक, तुझ्या पित्याचं

ऐक. घरात एवढी संपत्ती, ही प्रेमाची माणसं, हे तुला इतरत्र कुठं मिळणार ? रोज तुला भीक मागावी लागेल समजलास ? दुपारच्या वेळी पोटात घास गेला नाही, म्हणजे पंचप्राण कंठात गोळा होतील व मग घरच्या मायेच्या माणसांची तुला आठवण येईल. भणंगभिकाऱ्याप्रमाणं तुला दिवस काढावे लागतील. अब्रू गमावून बसावं लागेल.

नारायण : गरीब माणसास अब्रूच नसते जणू ! मला गरिबीत, हालअपेष्टांत दिवस काढण्यात काहीच वाईट वाटणार नाही. दुसऱ्याच्या उपयोगी पडावं, दीनदुबळ्यांची सेवा करून त्यांचं दैन्य दूर करण्याचं सत्कार्य सदैव माझ्या हातून घडावं, हीच एकमेव इच्छा रात्रंदिवस माझ्या मनात वसत आहे. या घरात गादीवर लोळणं म्हणजे मला निखाऱ्यावर भाजून निघाल्याप्रमाणं वाटतं. ज्या संपत्तीचा एवढा मोह तुम्ही सारे मला घालता, ती संपत्ती मला काय कामाची ! म्हणे घरी सुख आहे. खरोखरी घरी रोजच हा सुखाचा गोड घास खाताना माझे डोळे शतदा भरून येतात ! गळा दाटून येतो. याला हृदयस्थ परमेश्वरच साक्ष ! बाबा, मी बोलू नये पण बोलतो. तुम्ही हा जमीनजुमला, ही मालमत्ता कशी मिळविली याचा काळाकुट्ट इतिहास साऱ्या जगास माहीत आहे. तुम्ही हजारो गोरगरिबांना व्याजानं पिळून काढलं; खऱ्याचं खोटं केलं; शंभराचे हजार केले; जप्त्या आणल्या; गुरंढोरं पै किंमतीनं लिलावात विकली. बाबा, तुमची ही संपत्ती म्हणजे परक्यांच्या हृदयाची पेटलेली होळी आहे. या संपत्तीत अनेक बायाबापड्यांचे हुंदके, अनेकांचे कढत दीर्घ सुस्कारे, मला ऐकू येत ओहत. नको, ही आसुरी संपत्ती मला नको ! बाबा, हा मी तुमच्या घरातून निघालो, तुमच्या दृष्टीनं चुकणारा; परंतु मनुष्याच्या, माणुसकीच्या दृष्टीनं न चुकणारा, हा तुमचा पोटचा गरीब मुलगा गृहत्यागापूर्वी तुम्हाला वंदन करीत आहे. (नमस्कार.)

लक्ष्मीधरपंत : (लाथ मारून) हरामखोर ! बापास शिव्याशाप देऊन, त्याचा उद्धार करून, पुन्हा साळसूदपणाचा आव आणतोस ! तुझं भाषण म्हणजे माझ्या जखमेवर मीठ आहे, ढोंगी; (नारायण जातो.)

सर्व : अहो, हे काय पंत ! राग आवरा ! नारायणा, अरे नारायणा !

लक्ष्मीधरपंत : जाऊ दे कार्ट्याला ! चांभाराच्या देवाला अशीच खेटराची पूजा पाहिजे.

प्रवेश आठवा

(पांडबाची झोपडी. पांडबा बसला आहे व राघू टकळीवर सूत काढीत आहे.)

पांडबा : राघू, फार वेळ असा बसू नकोस. श्रम करू नकोस पोरा ! नाहीतर फिरून पडायचास आजारी !

राघू : नाही ! बाबा, मला हे दुधाच्या धारेवाणी पांढरंशुभ्र सूत काढायला लयी आवडतं. काल मी त्या मुलांच्या खोलीत गेलो. ते मला जवळ बसवून घेतात, सूत काढायला शिकवतात. (नारायण येतो.)

पांडबा : या बसा. राघू, त्यांच्या पाया पड. (राघू पाया पडतो.)

नारायण : पांडबा, तुमचा राघू आता बरा झाला नाही का ! अजून जरा अशक्त आहे. सुधारेल, देवाजीनं खैर केली, रामरायानं कृपा केली !

पांडोबा : आणि आपले उपकार झाले ! आपण माझ्या लेकरासाठी रातदिन खटपट केली, म्हणून तर हा सोन्याचा दिवस उजाडला.

नारायण : माझे कसले श्रम ? आयुष्याची दोरी बळकट असली म्हणजे सर्व काही मंगलच होतं. 'देव तारी, त्यास कोण मारी.' काय राघू, काय करतो आहेस ?

राघू : सूत काढता आहे, महात्माजींचं आवडतं कार्य करतो ! स्वतंत्र चरखा असता तर, मी त्याच्या सदैव भजनी लागलो असतो.

नारायण : पांडबा, प्राचीन काळापासून महाराचा धंदा विणकामाचा आहे. मद्रासच्या बाजूचे अस्पृश्य मोठमोठे साधू व कवी झाले; पण त्यांचा धंदा विणकामाचाच असे. पांडबा, सूत काढावं, कापड विणावं आणि पोटभर मीठभाकरी खावी, साधी व स्वच्छ राहणी ठेवावी; हीच ईश्वरी देणगी समजावी. अशी राहणी स्पृश्यांच्या जीवनालाही लाजवील. मी देईन राघूला चरखा आणून.

पांडबा : पण तुम्ही आता पैसे कुठून आणणार ?

राघू : मला त्या खोलीतील विद्यार्थी देणार आहेत चरखा.

नारायण : मग छान झालं. सारे तरुण या 'शिवू नको'च्या जुन्या रूढी तोडून असेच बाहेर पडले पाहिजेत. राघू, तू पिंजणही शीक बरं का ? मी रात्रीची शाळा काढणार आहे तुमच्यासाठी.

राघू : मग मी येईन शिकायला; पण शाळेला जागा ?

नारायण : त्या झाडाखाली !

राघू : तुमचं घर आहे ना मोठं ?

पांडबा : नारायणराव, आपल्याला वडिलांनी घरातून जायला सांगितलं हे खरं का ?

नारायण : हो, असं झालं आहे खरं !

पांडबा : मग आता तुम्ही कुठं राहता ?

नारायण : पांडबा, माझ्या विशाल घरात राहतो. माझं घर...

पद (फटका)

विशाल उत्तुंगही असे हे, । गृह माझे वसुधेवरती ।
अनंत नभ आच्छादन त्याचे । विविध भूषणे ज्यावरती ।।धृ. ।।
गृहमाला, रवि, चंद्र, चांदण्या । शक्य कुणाला यद्गणती ।
हंड्या, झुंबर, दीप तयाचे । निसर्गनिर्मित लखलखती ।
स्थिरचर सारे पदार्थसंग्रह । ज्यामधि भरले खेचुनी ।
कमी येथ नच काही कुणाला । लोभ न धरितां दुष्ट मनी ।।
दैवी संपत्तीने व्हावे । कुणींहि येथे संपन्न ।
करणे सात्त्विक लोभ पुष्ट हा । तपोवृत्ति द्या त्या अन्न ।।
दु:खानं जग गांजुनि गेले । कारण चळला हा मार्ग ।
नाहीतर केव्हाच जाहला । असता भूचा या स्वर्ग ! ।।

ईश्वराचं हे आकाशाचं पांघरूण कधी कुणाला कमी पडणार आहे ? भूमातेची ही मांडी सदैव निजायला पसरलेली आहे. खाली जमीन, वर विशाल आकाशाचा चांदवा ! पांडबा, आणखी काय पाहिजे ? दिवसभर कुठंतरी काम करतो, भुकेला कोंडा देऊन रात्री निजायला धोंडा घेतो ! भगवत भक्ताला कधी उणं पडू देणार नाही. पांडबा, वडिलांचं कृपाछत्र नाहीसं झालं तरी देवाजीचं छत्र नाहीसं झालं नाही ना ? जाऊ द्या ! तुम्ही

राघूच्या प्रकृतीस जपा. दुखणं उलटलं तर फार वाईट ! आताच खाण्यापिण्याला जास्त जपलं पाहिजे. राघू, तूही फार श्रम नको करू. पांडबा, घ्या हे पाच रुपये; मोसंबी, डाळिंब आणायला होतील.

पांडबा : नको. मला आता पैशाची जरुरी नाही. आता पैशाची तुम्हाला खरी जरूरी आहे.

नारायण : मला काय जरूर आहे ? कधी जरू र लागलीच तर परमेश्वर काही कमी करणार नाही. ठेवा, ठेवा ते पाच रुपये. पांडबा, मला परत देऊ नका, नको म्हणू नका. पांडबा, तुम्ही नको म्हटलंत म्हणजे माझ्या जिवाला वाईट वाटतं ! बाबांच्या शब्दांपेक्षा तुमचा नकार मला जास्त दु:खदायक होतो.

राघू : तुम्ही आमच्याकडेच राहा ना ?

नारायण : मी सर्वांशी तुमचाच आहे. पांडबा जातो मी. राघूला जपा !

पांडबा : देव तुमचं कल्याण करो !

प्रवेश नववा

बालवीर–शिक्षक : प्रौढ वीरांना आता मोठी जागा पाहिजे. त्यांनी आपल्या कामाचा व्याप बराच वाढविला असून चरखे, सूत यांवर हल्ली त्यांचं फार लक्ष आहे. दहा महारांची मुलंही येतात. नारायणाच्या वर्तनाचा हा परिणाम ! तो रोज कितीतरी कष्ट करतो. त्यामुळेच त्याला मोल चढत आहे. ज्या नारायणाला पंतांनी घालवलं, त्याचं पंतांकडे एखादी हवेली मागावयास जाणं मला ओशाळवाणं वाटं ! आणि गावांत त्यांच्याइतकी संपन्नता कुणालाच नाही ! परंतु कार्यकर्त्यानं असं लाजून चालायचं नाही. किल्ल्याचा जुना गंजलेला दरवाजा जसा ठोकून ठोकून उघडावा लागतो, त्याप्रमाणं जुन्या रूढींनी गंजून गेलेल्या लक्ष्मीधरपंतांच्या हृदयावर मला पुन:पुन्हा आघात केलेच पाहिजेत. अगदी उघड काही अस्पृश्यांच्यासाठी जागा मागावयाची नाही. पाहावा प्रयत्न करून ! हो, पण लक्ष्मीधरपंतच इकडे येत आहेत. फिरावयास आलेली दिसते आहे स्वारी ! निवांतपणाही छान आहे. करतो धाडस ! (लक्ष्मीधरपंत येतात.)

लक्ष्मीधरपंत : (स्वगत) जिकडे तिकडे हा भ्रष्टाचार माजत चालला. एक नारायण दिवटा निघाला, तर दहा त्याच्यासारखं करू लागले ! मीच चुकतो आहे की जग चुकतं आहे ? (बालवीर शिक्षक पुढे येतात.)

बा. शि. : नमस्कार !

लक्ष्मीधरपंत : जय देवा !

बा. शि. : आपणांस एक विनंती करावयाची आहे.

लक्ष्मीधरपंत : बोला !

बा. शि. : आमच्या कार्याचा व्याप हल्ली बराच वाढला आहे ! तेव्हा बाहेरचा बगीच्याचा बंगला आम्हास द्याल का काही दिवस ? शिवाय काही आर्थिक मदतही झाली तर बरे !

लक्ष्मीधरपंत : एकदा सांगितलं, की माझ्याकडून एक छदाम देखील मिळणार नाही म्हणून. मग बंगला कोठला !

बा. शि. : तरी पण तुम्ही काही मदत कराल अशी मला अजून आशा आहे. लक्ष्मीधरपंत, ही बालवीर चळवळ फार उपयुक्त आहे. व्यवहारात लागणाऱ्या अनेक गोष्टींचे शिक्षण या चळवळीत मुलांस मिळते. एकोप्याने कसे वागावे, आज्ञावंदन, शिस्त, परोपकार, भूतदया, कष्ट, काटकपणा इत्यादी अनेक गुण या चळवळीनं अंगी बाणतात. लक्ष्मीधरपंत, आपणांसारखा धनाढ्यांनी मदत द्यावयाची नाही तर कुणी ?

लक्ष्मीधरपंत : मी कवडी देणार नाही. कितीदा सांगावं तुम्हाला ? हे पोषाखी सरदार का कुठे समाजोद्धार करणार आहेत ?

बा. शि. : हेच पुढं समाजाचे आधार होणार आहेत. तुम्हास त्यांचा हिरवा फेटा व सुंदर पोषाख दिसतो, तशी त्यांची मनंही सुंदर होत आहेत; इकडे तुम्ही लक्ष देता काय ?

लक्ष्मीधरपंत : कोणत्या अनुभवावरून तुम्ही म्हणता की, या चळवळीनं मनं सुंदर होतात ?

बा. शि. : ऐका अनुभव ! मुले या चळवळीत आल्याबरोबर त्यांची मने ताबडतोब फिरतात असे नाही. बालवीर चळवळ म्हणजे काही यक्षिणीची कांडी नाही की, जिच्यामुळं जन्मापासून जडलेल्या

भिकार सवयी एकदम चुटकीसरशा नाहीशा होतील ! परंतु या चार-पाच महिन्यांतही आम्हास काही मुलांत फरक स्पष्ट दिसून आला आहे. दोन परस्परांचे वैरी असणारे विद्यार्थी या चळवळीत येताच मित्र झाले; कारण सर्व बालवीर हे आपणास भाऊभाऊ समजतात. जो विद्यार्थी पूर्वीसारखा आजारी पडे, तो आता सणसणीत व गरगरीत झाला आहे. इकडची काडी तिकडे न करणारा तो वासुदेवरावांचा श्याम आता आनंदाने स्वयंसेवक म्हणून पुढे येतो. हल्ली तर स्वच्छता निर्माण करणं, औषधं देणं, शिकवणं हीही कामं प्रौढ वीर करू लागले आहेत; म्हणून म्हणतो की, हेच बालवीर पुढे खेडोपाडी जातील व स्वच्छता व आरोग्य यांचे धडे लोकांस देतील.

लक्ष्मीधरपंत : आणि माझ्या कार्ट्याप्रमाणं महारमांगांस शिवतील त्यांचे पाय चुरतील ! भ्रष्टाचार करण्यासाठी ही चळवळ आहे. तीमुळे महार, मुसलमान सारे एक ठिकाणी यावयाचे, खावयाचे ! तुमचे ते प्रौढ वीरही हल्ली महारांच्या पोरांना सूत काढण्यास शिकवितात. ज्या लक्ष्मीधरपंताने पोटच्या पोरास हाकलून दिले, तो संघटितपणे भ्रष्टाचार करणाऱ्या तुमच्याही चळवळीस पै देईल, जागा देईल, असं मानता कसं ? जा निघा येथून !

बा. शि. : बरे आहे, लक्ष्मीधरपंत. मी पुन्हाही आपणाकडे येईन. दुसऱ्यांची समजूत घालणं गैरसमज दूर करणं हे आमचं कर्तव्यच आहे. अपमान, नकार सर्व हसतमुखानं सहन करणं हा आमचा धर्म आहे. असा एक दिवस येईल की, तुम्ही आपण होऊन चळवळीला साहाय्य करण्यास पुढे याल ! ईश्वर तुम्हास तशी बुद्धी देईल.

लक्ष्मीधरपंत : या. वेळ वाटेल तेवढा घ्या; पण पैसा घेऊ नका, म्हणजे झाले. (जातात)

प्रवेश दहावा

(काही बालवीर प्रवेश करतात.)

नायक : आज मौज झाली की नाही ? बरेच दिवसांनी आज इतके पोटभर खेळलो. तो पाठीवर हात मारण्याचा खेळ कसा गंमतीचा आहे !

एक : आणि कोण जास्त वेळ हसतो ! त्यात कशी मजा ! आपल्या शिक्षकांना तर हसता हसता पुरे झालं. हर्षवायू होण्याची वेळ आली!

दुसरा : आता पुन्हा केव्हा जावयाचे असेच टेकडीवर ?

नायक : पंधरा दिवसांनी पद्मावतीस जावयाचे आहे. तिथं सुंदर तळे आहे, पोहण्याची मौज येईल. जंगलात सूरपारंब्या व इतर खेळ खेळण्याचीही गंमत होईल.

तिसरा : ठरले का ?

नायक : जर तुमचं सर्वांचं ठरलं, तेवढं सूत काढून झालं असेल तर ! त्या राघू वगैरेंनी तर केव्हाच सूत काढलं. ते लोक आपल्यापेक्षा अधिक कष्टाळू असतात, यात संशय नाही.

एक : आम्हीही लवकर काढू !

नायक : चला आता. (बालवीर जातात.) (रस्त्यात पाहून) आं ? हे कोण इथं पडलं आहे ? (खाली वाकतो.) याला ताप आला आहे. (नीट न्याहाळून पाहतो.) अरे, हा तर नारायण ! घेरी येऊन पडला आहे की काय ? काय करावे ? अजून बालवीर दूर गेले नसतील. (शिटी फुंकतो, पाच-सहा बालवीर दौडत येतात.) याला आपण आपल्या मंदिरात नेऊ या. (काठीवर त्याला उचलून नेतात.)

प्रवेश अकरावा

(मंदिरात अंथरूण करून त्यावर नारायणास ठेवतात.)

नायक : ते कपाटातील थर्मामीटर आण पाहू ! (एक जण आणून देतो, झाडून ते लावतो.) गार पाण्याची पट्टी आणून याच्या कपाळावर ठेवा. (घड्याळाकडे पाहतो व थर्मामीटर काढतो.) बराच ताप आहे, १०४ अंश आहे. अजून शुद्धीही येत नाही.

(बालवीर-शिक्षक व डॉक्टर येतात. सर्व बालवीर वंदन करून उभे राहतात.)

बा. शि. : जरा दूर व्हा. आधी गर्दी कमी करा. डॉक्टर पाहा.

डॉक्टर : श्रीमंतांचा मुलगा ! त्यावर शेवटी अशी पाळी यावी ! मी औषध देतो पाठवून. रात्री त्याला इथेच ठेवणार का ?

बा. शि. : वडिलांनी तर याला घरातून घालवून दिलं आहे. इथंच छान व्यवस्था करू ! हवेशीर जागा आहे. दोन बालवीर नेहमी पाळी-पाळीनं राहतील. त्याला घरची आठवणही होऊ देता उपयोगी नाही. तथापि त्याच्या वडिलांकडेही कळविले पाहिजे. (राघू येतो.)

राघू : कुठं आहेत नाना ? (जवळ जाऊन) नाना, आता तुमची सेवा मी करणार ! मास्तर, मी इथं राहू ना ?

बा. शि. : राहा व दुसरा हाही राहील.

डॉक्टर : नीट जपा; कमीजास्त होताच मला सांगा. हा मुलगा फार थोर मनाचा आहे. तो सदसद्विवेक जागृत करण्याच्या बाबतीत माझाही गुरू आहे.

बा. शि. : होय. हा बालवीरांचा राजा आहे आदर्शभूत बालवीर आहे.

डॉक्टर : चला.

बा. शि. : चला सारे. तुम्ही दोघे जण इथं राहा, चला. (नायक व राघू राहतात; बाकी जातात. पडदा.)

प्रवेश बारावा

(बावीर-शिक्षक)

बा. शि. : आता लक्ष्मीधरपंतांकडे जाऊन त्यांना सांगितलं पाहिजे, कारण नारायणाची प्रकृती जास्तच बिघडत आहे. लक्ष्मीधरपंतांकडे जाण्यास मन मात्र जरा कचरते. त्यांनी जरी माझा पूर्वी अपमान केला असला, तरी त्यांच्याकडे जाणं हे माझं कर्तव्यच आहे. मानापमान काही वेळ बाजूस ठेवून, वैयक्तिक भांडणे दूर करून सत्संमत व सदसद्विवेकबुद्धीस आवडणाऱ्या गोष्टी करण्यास सदैव सज्ज असणं, हे तर या बालवीर चळवळीचं आध्यात्मिक रूप आहे. लक्ष्मीधरपंत तरी मनुष्यच आहेत. त्यांच्या हृदयातील कोमल भावना जागृत झाल्याशिवाय राहणार नाहीत. सात्त्विक आशा मात्र ठेवावी. चला.

प्रवेश तेरावा

(दिवाणखाना, लक्ष्मीधरपंत सचिंत बसले आहेत.)

लक्ष्मीधरपंत : त्या दिवशी नारायणास लाथ मारून घालवले; परंतु काय असेल

ते असो, मन आतल्या आत खात आहे. मी जर खरा धार्मिक असतो, तर माझं मन शांतिहीन का बरं झालं असतं ? निरपराधी माणसाजवळच सुख व शांती नांदतात आणि खरे पाहू जाता, नारायण करतो ते सनातनी वैष्णवधर्मात आहेच; पण रूढींचा पीळ उलगडत नाही. काय करावं ? काल रात्रीचं काय भयंकर स्वप्नं ! 'माझ्या नारायणाच्या डोक्यात कुऱ्हाड घालणारा तो भयंकर काळपुरुष ! परंतु त्या दुसऱ्या मालाधारी शुभ्रवर्ण पुरुषानं त्याचा हात पकडला !' काय या स्वप्नाचा अर्थ ? माझा नारायण तरी सुरक्षित आहे ना ? खोट्या समजुतीच्या भरीस पडून त्यास घालविलं. तो जाताना वंदन करावयास आला तर त्याला लाथ हाणली ! अरेरे ! देवा, माझा नारायण पुन्हा येऊ दे रे ! मी त्याचं कोमल मन दुखवणार नाही आता कधी ! त्याची आई स्वर्गातून मला दोष देत असेल.

(पडद्यात, 'अहो लक्ष्मीधरपंत, अहो लक्ष्मीधरपंत' अशा हाका ऐकू येतात.)

लक्ष्मीधरपंत : या हो या, कोण ? वासुदेवराव ?

वासुदेवराव : (प्रवेश करून) अहो लक्ष्मीधरपंत, तुम्हाला अजून कळलं नाही का हो ? वार्ता बरी नाही. तुमचा मुलगा नारायण परवा रात्री रस्त्यात घेरी येऊन पडलेला आढळला. त्याला भयंकर तापही येत आहे.

लक्ष्मीधरपंत : कोण ! माझा नारायण ! त्याला ताप आला ? काय, तो रस्त्यात पडला ? अरेरे ! कुठं आहे तो ?

वासुदेवराव : असे घाबरू नका. त्याची सर्व व्यवस्था झाली आहे. रस्त्यातून एक बालवीर चालला होता. त्याला तो आढळला. त्यानं शिटी फुंकली व इतर बालवीर जमा झाले आणि त्यांनी त्यास उचलून स्वत:च्या संघमंदिरात नेले. सध्या तो तिथंच आहे. त्याचे शिक्षक व डॉक्टर यांनी त्याची नीट शुश्रूषा चालविली आहे. तुम्हास बालवीर-शिक्षक सांगावयास कसे आले नाहीत ? ते तर खास यावयाचे !

लक्ष्मीधरपंत : मी त्यांना पूर्वी टाकून बोललो होतो; म्हणून ते रागावले असतील!

वासुदेवराव : छे: ! बालवीर-शिक्षक हे कधी रागबीग मनात धरीत नाहीत ! ते एवढ्या-तेवढ्यावरून राग मनात धरतील तर बालवीरांचे गुरूच शोभत नाहीत ! मनात अढी धरून बसेल तो बालवीर कसला ?

लक्ष्मीधरपंत : वासुदेवराव ! मला धीर धरवत नाही. केव्हा एकदा डोळ्यांनी नारायणास पाहीन, असं झालं आहे. पूर्वीचा माझा त्याच्यावरील राग सर्व मावळला. वासुदेवराव, माझा नारायण हाच आमच्या घरचा आधार ! आमचा तारक ! माझा मार्गदर्शक आहे. चला, येता माझ्याबरोबर ? आपणच त्याच्या शिक्षकाकडे जाऊ. माझे अहंकाराचे डोंगर वितळून सपाट झाले ! त्यांची हृदयात कारुण्याची गंगा वाहू लागली आहे. वासुदेवराव, चला !

वासुदेवराव : चला ! पण ते पाहा बालवीर-शिक्षकच इकडे येत आहेत. मी म्हटलं नाही, की ते आल्याशिवाय राहणार नाहीत म्हणून ? (बालवीर-शिक्षक प्रवेश करतात.)

बा. शि. : नमस्कार, मी तुमच्याकडे मुद्दाम आलो. आपण तर आपल्या मुलाचं मुखावलोकन करणार नाही, अशी प्रतिज्ञा केली आहे; तरी पण त्याच्या कठीण आजाराची वार्ता आपणास देणे हे माझं कर्तव्य मानून मी आपणाकडे आलो आहे. नारायण आमच्या संघमंदिरात आहे. तिथं त्याच्या शुश्रूषेस दोन बालवीर व राघूही आहे. ज्या महाराच्या मुलाची नारायणानं शुश्रूषा केली तोच राघू ! डॉक्टर येऊन तपासतात, औषधं देतात; तसं घाबरण्यासारखं नाही ! आपणास आपल्या मुलाची हकिकत कळवण्यास आलो म्हणून आपण रागवणार नाहीच. आम्ही भ्रष्टाकार करणारे लोक आहोत, हा आपला समज रूढींसमुद्भव आहे. त्यास सद्विचाराच्या कसोटीवर घासल्यास खरा प्रकार आपणास कळून आपला आमच्यावरचा राग जाईल. आज बालवीरांबरोबर राघूच रात्रंदिवस तुमच्या मुलाची-मोठ्या भावाची करावी तशी शुश्रूषा करीत आहे. शुश्रूषेचा आनंद चाखण्यात त्याने पहिला नंबर पटकावला आहे. राग मानू नका. मी जातो.

लक्ष्मीधरपंत : नका, मास्तर, असं मला बोलू नका. हा लक्ष्मीधरपंत पूर्वीचा नव्हे बरं ! नाही कसाबकरणी मेली; पश्चात्तापाच्या आगीत मनावरची घाण जळून त्याचं सोनं झालं. चला ! माझा नारायण मला दाखवा ! अरे, मी त्यास घालविले, भणंगभिकाऱ्याप्रमाणे भटकावयास लाविल. बाळा, कामं करून पोट भरलं असशील ! अति श्रम

होऊनच तू आजारी झाला असशील ! आमच्या घरात अन्न खायला माणसे नाहीत व तुला खायला अन्न मिळालं नसेल ! घरात गाद्या पडल्या आहेत. तुला नीट धोंडाही मिळाला नसेल. मास्तर, माझ्या गुणी मुलावर काय ही स्थिती मी आणली ! त्याची आई आज जिवंत असती तर असं होऊ देती का ? चला, मास्तर, मला नारायणाकडे घेऊन जा !

बा. शि. : फार उत्तम ! चला ! देव सारं बरं करील. (जातात.)

प्रवेश चौदावा

(संघमंदिराचा देखावा. खाटेवर नारायण आहे. समोर मेजावर लोकमान्य व महात्माजी यांच्या तसबिरी आहेत. त्यांना हार घातले आहेत. गादीवर गुलाबाची दोन फुले आहेत. एकटा राघू तेथे आहे.)

राघू : नाना, अजून तुम्ही शुद्धीवर येत नाही ! राघूला तुम्ही बरं केलंत, राघूच्या सेवेनं तुम्ही नाही का बरे होणार ? पण तुमचे हात, नाना, अक्षी पवित्र देवावाणी ! त्यानं मी बरा झालो ! पण माझे म्हाराच्या पोराचे हात नाना, ते पापी असतील का ? पण मी कधी खोटं नाही बोललो, देवाला भिऊन वागत आलो. देवा, नानांना लवकर बर कर. हा अंगारा आईनं पाठविला आहे. तो लावतो माझ्या नानांना, म्हणजे बरं वाटेल.

(बालवीर शिक्षक व लक्ष्मीधरपंत येतात.)

बा. शि. : राघूला तू एकटाच इथं आणि दुसरं कुणी नाही ?

राघू : ते जेवायला गेले आहेत.

बा. शि. : राघू, नारायणाचं कसं आहे ? हे कसलं लावलं आहेस भस्म ?

राघू : माझ्या आईनं अंगारा पाठवला आहे, तो लावला.

लक्ष्मीधरपंत : आणि मी मात्र माझ्या बाळावर निखारे पाखडले. राघू, हा शुद्धीवर नाही का रे येत ?

राघू : नाही ! वातात नाना सारखे बोलतात. वातात म्हणतात, ''बाबा, मजवर असे रागावू नका. मी देवाला आवडेल असं काम केलं ! तुमचं ऐकलं नाही; क्षमा करा.'' असं बोलतात.

लक्ष्मीधरपंत : बाळ, तुझ्या पुण्याईनं माझी पापं दग्ध होऊन गेली असतील ! मी कशाला रागावू ? आता नाही हो रागावणार !

नारायण : (वातात) आई–बाबा नको ते पैसे, नको. गोरगरीब मरतात–पाणी, मला पाणी द्या ! का मी महारांना शिवतो म्हणून मला पण पाणी नाही ? द्या, पाणी द्या. (पाणी देतात.)

लक्ष्मीधरपंत : बाळ घे. बघ माझ्याकडे ! ओळखलंस का ?

राघू : पाहा डोळे कसे फिरवतात.

नारायण : मी धर्मभ्रष्ट नाही नाही. मी चांगला आहे हो बाबा ! हाय–राघू– आलोऽऽ !

लक्ष्मीधरपंत : बाळ बोलू नको. शांत पड. घे पाणी, आ कर. मास्तर, याला घरी घेऊन जातो हो मी !

बा. शि. : अशा परिस्थितीत त्यास घरी जाण्यास डॉक्टर परवानगी देणार नाहीत. इथंच जर बरा होईपर्यंत त्याला असू दे !

लक्ष्मीधरपंत : मग मीही इथंच राहत जाईन. माझं बाळ आता क्षणभरही डोळ्यांआड झालेलं मला खपणार नाही. मी माझ्या नारायणाला आता इतरांवर विसंबणार नाही हो ! तुम्ही मला कृपा करून इथं राहण्याची मात्र परवानगी द्या. मी तुम्हाला जागा दिली नाही; पण मला द्या.

बा. शि. : मोठ्या आनंदानं राहा. तुमच्या मदतीस दोन बालवीर राहतील.

राघू : मी सारखा आहेच.

लक्ष्मीधरपंत : राहा बरं. तू माझा दुसरा मुलगा आहेस, असे मी समजतो. मास्तर, तुमचा मी आभारी आहे.

बा. शि. : आभार कसचे मानता ? एकमेकांना शक्य ते साहाय्य करणं हे प्रत्येक सुजाण मनुष्याचं कर्तव्यच आहे. बरं तर, मी आता जातो. राघू, तू औषध घेऊन ये जा.

(जातात. एकटे लक्ष्मीधरपंत आहेत.)

लक्ष्मीधरपंत : देवा, माझ्या बाळास लवकर आराम पाड बरे ! रामराया, तुझ्या उत्सवात मी चौघडा लावीन, तुला मुकुट करीन. नारायणा, बाळ का रे डोळे उघडून तू मजकडे प्रेमाने पाहत नाहीस ? माझ्याशी बोलत नाहीस ? तुझ्या पापी पित्याची तुला लाज वाटते का ? मी तुझे तोंड

पाहणार नव्हतो, आता तू माझे तोंड न पाहण्याची प्रतिज्ञा केली आहेस वाटतं ! तुझं फुलासारखं हृदय आज कठोर का बरं झालं ! दीनदयाळा, देवाधिदेवा, तुला मी अनन्य शरण आहे.

पद (चाल–धांवरे रामराया)

प्रार्थना देवा तूंसी । दीन झालेल्या माझी ।
प्रेमाच्या लहरींतूनी । येवो तुझ्या पदाशीं ।।धृ.क।
पापांच्या केल्या राशी । साऱ्या जाळावयासी ।
ओलीस बाळा घेसी । झालों कारण मी त्यासीं ।।१।।
सौदा हा याच्यासाठी । झालों अतीच मी कष्टी ।
नको तूं अंत पाहूं । सिद्ध प्रायश्चित्तासी ।।२।।

नारायणा, बाळ, डोळे उघडून माझ्याकडे बघ. मी अंत:शुद्धीप्रत पोहोचलेला तुझा पिता आहे.

अहंकार गेला–मेला । गेला षड्रीपूचाही मेळा ।
यावया पुण्यराशी । देवा, झालो संन्यासी ।।३।।,

देवा, माझा नारायण मला दे, मी गोरगरीब ऋणकोंच्या अंतरात्म्यांना ऋणमुक्तीने आनंदित करून तुझी प्रथम सेवा करीन ! तसेच...

लाभल्या दौलतीला । मी न म्हणेन माझी ।
जगवितां बाळ माझा । देईन जनता हितासी ।।४।।

नारायणा, तुझ्या भक्ताच्या इच्छेस नारायणाच्या इच्छेस मी मान देईन!

नको तूं ओढूं भारी । निवळलो मी संसारीं ।
झड पीता बाळ माझा । झालोची मी वनवासी ।।५।।
यातूनी उद्धराया । तुजविना ना कोणी ।
धरीले मी पाय तुझे । तारी शरणागतासी ।।६।।

(पडदा पडतो.)

प्रवेश पंधरावा

(पांडबा बसला आहे.)

पांडबा : नानांना उतार पडला. देवानं दया केली. खरा गरिबांचा कनवाळू तूंच! (राघू कपडे धुऊन येतो.)

राघू : बाबा बघा. कपडे कसे छान निघाले ते. खादीचे कपडे असे लख्ख निघतात.

पांडबा : राघू, साबण रे कुठचा पोरा ?

राघू : ते विद्यार्थी आम्हाला देतात; म्हणतात, आम्ही तुम्हाला आठवड्यास एक वडी देत जाऊ; पण तुम्ही सूत मात्र नियमित कातलं पाहिजे. बाबा, आता आपण बामणावाणी नाही दिसणार का हो ? मी कपडे वाळले की ते घालीन अन् नानांच्या घरी जाऊन येईन.

पांडबा : मी पण येणार आहे. पण मी लाकडांची मोळी आणून ती विकल्यावर येईन. आज तुलाच रांधलं पाहिजे. ती गेली आहे कामावर.

राघू : मी भाकर करीन व ती झाकून ठेवून जाईन. (जातो.)

पांडबा : चला, आपण बी कुऱ्हाड घेऊन जावं (जातो.)

प्रवेश सोळावा

(लक्ष्मीधरपंत आपल्या दिवाणखान्यात बसले आहेत. पलंगावरच्या स्वच्छ अंथरुणावर आजारातून उठलेला नारायण आहे.)

नारायण : बाबा, मजवरचा सगळा राग गेला ना ? मी करीत असलेलं काम तुमच्या बरंच मनाविरुद्ध झालं !

लक्ष्मीधरपंत : बाळ, नको रे पुन्हा असं बोलू ! कसला रे राग ! ते झालं गेलं, आता ते सारं विसरलं पाहिजे. (कारकून येतो.)

कारकून : रामजी शेतकरी आला आहे.

लक्ष्मीधरपंत : मग रामजीला इथंच घेऊन या.

कारकून : (आश्चर्याने) इथे दिवाणखान्यात ?

लक्ष्मीधरपंत : हो, येथे दिवाणखान्यात. इथं मी बसलो आहे, इथं आणा. गरीबात व आपणात कसला भेद ?

(कारकून जातो. रामजी आपला मुलगा विश्राम यासह प्रवेश करतो.)

रामजी : रामराम, दादा !

लक्ष्मीधरपंत : रामराम ! काय रामजी ! बस. बसण्यास संकोच नको करू. बसरे बाळ ! (रामजी व विश्राम अदबीने बसतात.)

लक्ष्मीधरपंत : रामजी, यंदाही पिकं बरी नाहीत ना ?

रामजी : प्रथम पीक बरं होतं; परंतु मागूनच्या संततधारेनं नुकसान झालं. आलेलं सारं गेलं.

लक्ष्मीधरपंत : देव ठेवील तसं राहिलं पाहिजे.

रामजी : आमचे देव तुम्हीच ! दादा, तुम्ही दया कराल तरच आम्ही जगू ! मी आपणास पैशाचं विचारावयास आलो होतो. घरी एक पै नाही. माझी पोरं गेली. तिच्या आजारात औषधपाण्याची नीट तरतूद झाली नाही. बायको आजारी आहे. काय करू ? (रामजीच्या डोळ्यास पाणी येते; विश्राम डोळे चोळतो.)

लक्ष्मीधरपंत : रामजी, तू पैशाची काळजी नको करू. खरं म्हटलं तर आजपर्यंत जे व्याज घेतलं त्यानंच माझ्या पैशांची फेड झाली आहे, समजलास? माझं देणं तू आता मुळीच लागत नाहीस. (कारकुनाकडे वळून) तो कर्जरोखा फाडून यांस 'सर्व देणं पावलं' असं लिहून द्या.

रामजी : हां हां हां ! असं कसं होईल ? रावसाहेब, असं उलटं रागानं बोलू नका. मी पैसे बुडवणार नाही.

लक्ष्मीधरपंत : रामजी, मी थट्टा नाही करीत. माझ्या नारायणानं ही उदार बुद्धी मला शिकवली. दुसऱ्याच्या घरादारावरून नांगर फिरवणारा तो लक्ष्मीधरपंत आता नसून, परोपकारात आनंद मानणारा, दुसऱ्यांचे अश्रू पुसणारा, त्यांचे संसार सुखाचे करण्यासाठी त्यांना मदत करणारा, असा लक्ष्मीधरपंत आता उरला आहे.

रामजी : देव तुम्हा बापलेकांना उदंड आयुक्ष देवो, असाच आम्हा गरिबांचा दुवा घेत असा.

नारायण : हा तुझा मुलगा वाटतं ?

रामजी : होय, हा सगुणेच्या पाठचा विश्राम ! नको येऊ म्हटलं तरी आला.

विश्राम : मी धाकट्या धनीसाहेबांना पाहायला आलो आहे. धाकट्या धनीसाहेबांसाठी काकडी आणली आहे. (देतो.)

लक्ष्मीधरपंत : रामजी, तुमची मनं किती उदार असतात ! गरीब झोपड्यांत मोलाचे सद्गुण आढळतात ! दया, प्रेम, कृतज्ञता, आदर हे गुण तिथे जिवंत असतात; परंतु दिवाणखान्यात हे गुण मेले आहेत.

रामजी : धनी, एक इनंती करू का ? आमची गाय कारकुनांनी आणली आहे, ती परत देववाल का ? घरी विश्रामच्या आईच्या औषधाला दूध नाही. आमचा गाईवर फार जीव. रोख्याचे पैसे घ्या पण गाय द्या.

पद (कवाली)

आम्हांला गाय ही प्यारी । जणू ती माय संसारीं ।।धृ.।।
तशिच धेनू । सतत मानू । खचित संपत्ति ती भारी ।।१।।
जीवनांच्या । साधनांच्या । थोर राशीस देणारी ।।२।।
धर्म–कर्मा । पुण्यधामा । आम्हाला तीच दैन्यारी ।।३।।

ती गाय आमची आम्हाला द्याल का परत ?

लक्ष्मीधरपंत : रोख्याचे पैसे घ्यावयाचे नाहीत, हे ठरलेच आहे. यांनी तुमची गाय आणली आहे, रामजी ?

कारकून : मी पैसे देणार आहे. मला फुकट घ्यायची नाही !

लक्ष्मीधरपंत : रामजी, किती किंमत ठरली होती ?

रामजी : पंचवीस रुपये.

लक्ष्मीधरपंत : मी ती गाय पाहिली आहे. त्या सुंदर गायीचे पंचवीस रुपये घेऊन या गरिबाला तुम्ही नाडणार होता; परंतु तुम्हाला तरी मी का दोष द्यावा ? मी उलट्या काळजाचा धनीच जवळ असल्यावर तुम्ही तरी असे का वागू नये ? आता यांची गाय यांस परत द्या.

कारकून : मी आपल्या आज्ञेबाहेर नाही.

रामजी : धनी, आपले फार उपकार आहेत. मी पुन्हा येईन छोटे साहेबांस भेटावयास ! तेव्हा आमच्या देवीचा अंगाराही आणीन.

विश्राम : मी पण येईन. मी वाळकं आणीन.

लक्ष्मीधरपंत : (कारकूनास) या पोरास ती चार केळी व ते डाळिंब द्या.

नारायण : बाबा, ती दोन्ही डाळिंब द्या. विश्रामच्या आईला होतील; ती आजारी आहे ना ?

रामजी : नको, नको !

लक्ष्मीधरपंत : रामजी, नको म्हणू नको. घे (कारकून देतो.) विश्राम, घे; केळी खा.

विश्राम : मी खाली अंगणात खाईन.

(राघू येतो.)

लक्ष्मीधरपंत : ये, राघू ये. आता हे घर तुझंच आहे. आज कसा स्वच्छ कपडे घालून आला आहेस ! अगदी स्पृश्य दिसतोस तू.

नारायण : बाबा, देवानं तुम्हास एकाएकी कसं हो थोर केलं ! धन्य आहात तुम्ही ! काय हे भयंकर रूपांतर !

लक्ष्मीधरपंत : बाळ, हा तुझ्या आचरणाचा परिणाम. राघू, घरी खुशाल आहेत सारी ?

राघू : देवाच्या कृपेनं सारी खुशाल आहेत.

लक्ष्मीधरपंत : राघू, तू हल्ली काय करतोस ? तू आमच्याकडे राहा. शाळेत जा.

राघू : मी सूत काढीत असतो; आता विणकाम शिकणार आहे.

नारायण : माझ्या रात्रीच्या शाळेत तो शिकेल. मी देशभक्तांची चित्रे दाखवीन, त्यांच्या गोष्टी सांगेन ! राघू, गाणीही शिकवीन तुला बरं का ?

राघू : मी एक गाणं शिकलोही आहे.

नारायण : कोणते रे ? म्हण पाहूं.

राघू : (गाणे म्हणतो.)

(गझल)

धर्मवीर हो चला । झुंज आज लागले ।
धर्मबंधूंसाठी या । देऊं आपुले गळे ।।धृ. ।।
गर्जना करा उठा । त्याग थोर या करूं ।।
मोह सर्व सोडुनी । संकटास आदरूं ।।
भेदभाव जाळुनी । बंधु सर्व होऊं या ।
मायभूमि आपुली । सर्व मिळून सेवुं या ।।
भराभरा चला चला । होमकुंड पेटलें ।
घेऊं त्यात हो उड्या । चित्त आज चेतलें ।।
पाश मायभूमिचे । खंडुनी दुरी करूं ।
कष्टवोनि या तनू । धर्मकार्यि या मरूं ।।
देव आपुला सखा । पाठिशी सदा खरा ।
व्हावया स्वतंत्र हा । मार्ग आपला बरा ।।

लक्ष्मीधरपंत : वा, राघू ! अगदी शुद्ध म्हणतोस ! कुणी शिकवलं ?

राघू : बालवीरांबरोबर शिकलो. (राघू जातो.)

लक्ष्मीधरपंत : खरेच राघू, तुझ्या बालवीर-शिक्षकांना बोलावून आण. त्यांच्याशी माझे जरुरीचे काम आहे.

नारायण : (स्वगत) बालवीरांच्या संगतीत राघू बराच सुधारला. योग्य संगती व वळण जर मिळेल, तर ही रानात सुकून जाणारी फुले टवटवीत होतील. त्यांना आपण अस्पृश्य व बुद्धीहीन म्हणतो; पण त्यांची जोपासना केली, म्हणजे तिथेच आपणास हिरे मिळतील. त्यांची जोपासना करणारे शेकडो-लाखो निघाले पाहिजेत. (पांडबा येतो.)

पांडबा : रामराम, दादा! बरे आहेत ना नाना?

लक्ष्मीधरपंत : बरा आहे. आता जरा अशक्तपणा आहे.

पांडबा : मी राघूजवळ म्हटलं होते की, मी आपल्या भेटीस येईन म्हणून!

नारायण : त्यानं सांगितलं. राघू आता येईल. (राघू व बालवीर शिक्षक येतात.)

लक्ष्मीधरपंत : या, मास्तर.

बा. शि. : मी इकडेच नारायणाची प्रकृती पाहावयास येत होतो, तोच वाटेत हा राघू भेटला.

लक्ष्मीधरपंत : मास्तर, मी आज तुम्हास मुद्दाम बोलावणं धाडलं. माझ्या नारायणाची प्रकृती तुम्हा सर्वांच्या सदिच्छेने व देवाच्या दयेने आता सुधारली आहे. नारायणाचा दैहिक पुनर्जन्म झाला व माझा आंतरिक पुनर्जन्म झाला! मास्तर, पांडबा, परमेश्वरास साक्ष ठेवून नारायणाच्या दुखण्यात मी केलेल्या प्रतिज्ञांना आज प्रात्यक्षिक स्वरूप देणार आहे. त्या करताच तुम्हास बोलविले. आजपासून माझी सारी धनदौलत मी दरिद्री नारायणासाठी खर्च करीन. मास्तर, तुम्ही व तुमचे बालवीर फारच चांगलं काम चालवीत आहात अशी. माझी खात्री झाली. त्या कामाला भरपूर जागा असावी म्हणून माझा बंगला असलेला मळा मी तुम्हास देऊन टाकतो. नारायणाची रात्रीची शाळा चालावी, म्हणून गावातील बंगला देतो. माझी सारी घरं तुमचीच आहेत. देशातील माणसे हीच माझी खरी संपत्ती! ही संपत्ती उदार हृदयावर वृद्धिंगत होते, याची जागृती मला झाली, याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो.

बा. शि. : आम्ही आपले आभारी आहोत. तुमच्या या रूपांतरास कारण जसा नारायण, तसेच त्याने आम्हालाही स्फूर्ती दिली. पहिली ज्योत त्यानं पेटवली. नारायणाप्रमाणं सर्व जर वागू लागतील, तर समाजातील दुःख व कलह किती कमी होतील ! जगात पैशाच्या अभावापेक्षा सहानुभूती व प्रेम यांचा अभाव फार जाणवतो.

नारायण : खरं बोललात, मास्तर. आम्ही पैशानं गरीब झालो तरी मनानं सारे श्रीमंत होऊ या ! देवाची लेकरं आहोत म्हणून भावंडांसारखे वागू या.

पांडबा : गोड बोलण्यानं काही वेचत नाही.

राघू : म्हणून तर राघूला लोक जवळ करतात; पण कावळ्याला खडे मारतात.

रामजी : बरं, दयालोभ असू द्या ! जातो आम्ही ! रामराम !

विश्राम : जातो मी ! रामराम !

बा. शि. : बरे येतो. आनंद झाला.

लक्ष्मीधरपंत : बरं आहे, जावे.

(जातात, पडदा.)

प्रवेश सतरावा

(लक्ष्मीधरपंतांचा वाडा. सर्व मंडळी बसली आहेत. राघू दूर उभा राहून बोलत आहे.)

राघू : हे समाजनारायणा ! आमच्यावर जुलूम करून आम्हास कोणी दूर ठेवलं नाही ? गलिच्छ कामं समाजसेवेकरता केली व आम्हीच दूर राहिलो, त्यात इतरही न संस्कारल्यामुळे बहिष्कृत झालेले लोक मिळत गेले ! त्यामुळे दूर राहण्यास अधिक कडकपणा आला. आता हे समाजनारायणा, अस्पृश्याची सविनय प्रार्थना आहे.

(अभंग)

दूरावता दूरावलो । तुझ्या पाया अंतरलो ।।
हें मी सांगायासी भ्यालो । म्हणुनि पारखा रे झालो ।।
मी तर तुणेच लेकरू । नको मला बा धि:क्कारू ।।
माझे काय सारे तुझे । आस मला म्हण माझे ।।

जाति युगे जशि आली । एकनिष्ठा नाही गेली ।।
उष्ट्यावर जगलेला । प्रसादाचा देह झाला ।।
प्रसादाच्या अभिमाने । देवा, आम्हा उद्धारणे ।।

नारायणा, काळ सारखा या अस्पृश्य जातीचे लचके तोडीत आहे. बेवारशी माल पाहून त्याला सारखा जोर येत आहे !

काळ ग्रासायासी येई । राखणारा तूच पाही ।।
तू रे राजा तालेवार । शत्रू लुटितो तूझा कर ।।
शह द्यावयासी त्याला । माझे तू रे म्हणा मला ।।
तू जर केला माझा त्याग । त्याचा होईन भक्ष्यभाग ।।
पायीं तूझ्या ज्याचा माथा । हाणू नको तया लाथा ।।
आसऱ्यावीण हा पोरका । करुणाकरा ध्यानी न का ।।

नारायणा. तुझ्या स्पर्शानं अस्पृश्य जात उद्धरून जावयास पाहिजे; तू भ्रष्ट कसा होशील, तू पुण्यवान आहेस !

लक्ष्मीधरपंत : हे अस्पृश्याचे मुख्य झालेल्या राघू, ये, ये ! गेली, गेली अस्पृश्यता ! माझ्या गावातून ती ठार मेली ! राघू, पांडबा, या असे बैठकीवर या ! माझ्या घरात वावरा. आम्ही आजपर्यंत केलेल्या चुकीचं परिमार्जन करणं अवश्य आहे. जा, तुमच्या इतर मानीव अस्पृश्यांनाही घेऊन या. त्यांना मी माझ्या देवघरापर्यंत हिंडवीन ! त्यांच्या बायकांना घरातून माझ्या मुलीबाळीकडून हळदीकुंकू देववीन ! मंडळी, आपणही अस्पृश्यता घालविली पाहिजे.

गोपाळराव : अपूर्व त्यागानं आपण कालच देवकोटीत जाऊन अनुकरणीय झाला आहात ! तेव्हा रूढींची बंधनेही तोडण्यास आपणच समर्थ आहात !

रामराव : असा धडाडीचा त्यागी पुढारी मिळाल्यावर आम्ही त्यांचे अनुयायी आहोतच !

खंडेराव : योग्य मार्ग दाखविणाऱ्या पुढऱ्याचीच आपल्या समाजात वाण आहे.

माधवराव : अस्पृश्य हे आपले बंधू आहेत, ही माझी कल्पना होतीच; पण तसं वागण्याचं धैर्य नव्हतं ! आज आनंद झाला ! तुटणारा हिंदुसमाज आपणाशी संलग्न झाला !

पांडू : आम्ही याबद्दल आपले ऋणी आहोत !

राघू : आपण आम्हाला जवळ केलंत ! आपण थोर राष्ट्रकार्य करीत आहातच; त्यात मी पित्यासह राष्ट्राकरता प्राण देणारा सैनिक आहे, हे निश्चित समजा !

नारायण : अंत्यजाला जवळ केल्याबरोबर त्याची दृष्टी विशाल कार्याकडे वळली. ऐका मंडळी ! राघू, तुझ्या महत्त्वाकांक्षेबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. अस्पृश्यांना जवळ करून एक मोठे सैन्य आपण राष्ट्रकार्यात समाविष्ट केले आहे.

लक्ष्मीधरपंत : बाळा, हा तुझ्याच पुण्याईचा प्रभाव !

नारायण : अशा पित्याच्या पोटी जन्मोजन्मी पुत्र म्हणून राहण्यातच खरोखरी जन्माचं सार्थक आहे.

लक्ष्मीधरपंत : आनंदी आनंद झाला. परमेश्वर अशीच सर्वांस सद्बुद्धी देवो ! भेदभाव हरपोत ! सर्वांना राष्ट्र कार्याची गोडी लागो ! या प्रसंगी आपण सर्वजण सर्व प्रकारची मंगले वर्षणाऱ्या मंगलमूर्तीची आपल्या सदिच्छा सिद्धीस नेण्याकरिता प्रार्थना करू !

(सर्व उभे राहून गाणे म्हणतात.)

(मालकंस; त्रिताल)

मंगलमूर्ती मंगलवितरो । दु:ख विपत्ती दैन्यास हरो ।।मं।।
अतुला प्रीती, निर्मल दयाधर्म सुनीती हृदयात भरो ।।
लोक नांदो एक मताने । आनंदाने संसार करो ।

(पडदा)

समाप्त

+++

निळा पक्षी

निळा पक्षी

अंक पहिला

लाकूडतोड्याची झोपडी

(रंगभूमी : लाकूडतोड्याच्या झोपडीचा आतील भाग दाखवलेला असतो. ग्रामीण देखावा. परंतु अगदीच दरिद्री नव्हे. एका बाजूला निखारे विझत चाललेली घरातील शेगडी असते. स्वयंपाकाची भांडी असतात. एक लहानसे फडताळ असते. एक ताट असते. भिंतीवर एक जुनाट असे मोठे घड्याळ असते. एक चरखा असतो. नळ असतो. एका मेजावर एक दिवा असतो. फडताळाच्या जवळ एकीकडे कुत्रा असतो व एकीकडे मांजर असते. त्यांना झोप लागलेली असते. त्यांनी अगदी गुरगुटी केलेली असते. पाय पोटात घेतलेले असतात, नाक शेपटीत असते. त्या दोघांच्यामध्ये एक सुरेख भाकरीचा तुकडा असतो. भिंतीवर एक पिंजरा असतो. त्या वाटोळ्या पिंजऱ्यात एक पाखरू असते. पाठीमागे दोन खिडक्या असतात. त्या खिडक्यांना आतून झडपे असतात. ती बंद असतात. एका खिडकीखाली एक घडवंची असते. डाव्या बाजूला मुख्य दरवाजा असतो. त्याला भली मोठी कडी असते. उजवीकडे आणखी एक दार असते. एक शिडी असते. तेथे माळा असतो. उजव्या बाजूला लहान मुलांच्या दोन पलंगड्या असतात. त्या पलंगड्यांच्या उशाशी दोन खुर्च्या असतात. त्या खुर्च्यांवर नीट सुंदर अभ्रे असतात. असा पडदा उघडतो. पडदा उघडतो तेव्हा त्या दोन पलंगड्यांवर मधू व मालती निजलेली असतात. त्यांची **आई** त्यांना नीट थोपटते, खाली वाकून पाहते. मुले नीट निजली की नाही ते पाहते. तिकडून अर्धवट दरवाजातून **बाबा** डोके पुढे करून बघतात. **आई** आपल्या ओठांवर

बोट ठेवून **पित्या**ला गप्प राहण्यास खुणवते. नंतर एकदम दिव्याला निरोप देऊन ती अलगद उजव्या बाजूला निघून जाते. क्षणभर रंगभूमीवर सारा अंधार असतो. नंतर आस्ते आस्ते अधिक झगझगीत होणारा प्रकाश खिडक्यांच्या झडपांमधून येतो. मेजावरचा दिवा एकदम आपोआप लागतो. मघाच्या प्रकाशापेक्षा त्याचा प्रकाश आता निराळ्या रंगाचा असतो. ती दोन मुले जागी झाल्यासारखी होऊन अंथरुणात उठून बसतात.)

मधू : मालती?

मालती : मधू?

मधू : तू निजलेली आहेस?

मालती : आणि तू?

मधू : छट्, मी तूझ्याशी बोलत आहे. मग झोपलेला कसा असेन?

मालती : आज **दिवाळी**चा का रे दिवस?

मधू : अजून अवकाश आहे. उद्यापर्यंत थांबले पाहिजे. परंतु या वर्षाची **दिवाळी** आपणाला गोडबीड आणणार नाही.

मालती : का बरे?

मधू : आई अशा अर्थाच काही म्हणत होती . . . पुढील वर्षाची दिवाळी काहीतरी घेऊन येईल.

मधू : पुढचे वर्ष का फार दूर आहे ?

मालती : बरेच दूर आहे . . . परंतु श्रीमंतांच्या मुलांना थांबण्याची जरुरी नाही. त्यांची दिवाळी सुरूही झाली.

मालती : खरेच का ?

मधू : अर्र . . . दिवा मालवायला आई आज विसरली । . . . माझ्या मनात एक आले आहे.

मालती : काय रे ?

मधू : आपण उठू या.

मालती : चालेल का उठले तर ? उठणे बरे नाही.

मधू : त्याला काय झाले ? जवळपास तर कोणीही नाही पाहायला. मालती, तुला ती झडपे दिसतात?

मालती : किती झगझगीत दिसतात ती?

मधू : पलीकडे मेजवानी चालली आहे. तेथून येतो आहे उजेड.

मालती : कसली मेजवानी.

मधू : अग, ती तेथील श्रीमंतांची मुले. त्यांची चालली आहे गंमत. आपण झडपे उघडू या.

मालती : उघडता येतील का पण ?

मधू : न यायला काय झाले? . . . आणि येथे दुसरे कोणी नाही आपणास रागे भरायला . . . तुला गाणे, वाजवणे, येते का ऐकायला? . . . चल, आपण उठू. . .

(ती दोन्ही मुले उठतात व धावतच एका खिडकीजवळ जातात. घडवंचीवर चढून झडपे उघडतात. स्वच्छ प्रकाश खोलीत भरतो. ती दोन्ही मुले खिडकीबाहेर अधाशाप्रमाणे बघतात.)

मधू : येथून आपणास सारे दिसते ।

मालती : (तिला घडवंचीवर बसायला जागा उरत नाही.) मला तर काहीच दिसत नाही. . .

मधू : थंडी पडली आहे, नाही ? त्या बघ दोन गाड्या, एकेका गाडीला सहा सहा घोडे ।. . .

मालती : त्या गाड्यांतून १२ मुलगे बोहर येत आहेत. . .

मधू : वेडी आहेस तू. अगं, त्या लहान मुली आहेत. . .

मालती : मुलींना का चड्डया ? . . . मुलगेच आहेत ते.

मधू : तुला काय कळे ?. . . अगं, अशी ढकलतेस काय ?

मालती : मी तुला हातही लावला नाही.

मधू : (सारी घडवंची स्वत: बळकावून) सारी जागा तूच घेतेस . . .

मालती : मधू, बघ तरी, मला थोडीसुद्धा जागा नाही. असं रे काय करतोस ?

मधू : गप्प बस. तो बघ दिवाळीचा किल्ला. . .

मालती : कसला किल्ला . . . ?

मधू : अग, दिवाळीतील ।. . . तू तिकडे त्या भिंतीकडे काय बघतेस ? बावळटच आहेस . . .

मालती : मला घडवंचीवर जागा नाही. मग भिंतीकडे नको बघू तर काय करू ?

मधू : (कंजुषाप्रमाणे तिला थोडीशी जागा देतो.) झाले ना आता समाधान ...? बस . . . आता माझ्यापेक्षा तुलाच जास्त जागा. . . मालती, बघ बघ कितीतरी हे दिवे ।. . .

मालती : ते लोक एवढा गोंधळ कसला करीत आहेत ? . . .

मधू : अगं, ते गाणे बजावणे करणारे लोक आहेत.

मालती : ते का रागावले आहेत ?

मधू : नाही काही. परंतु गाणे बजावे म्हणजे धामाधूम होणे. मोठे कठीण काम.

मालती : आणखी एक गाडी आली. ती बघ. तिला पांढरे घोडे आहेत।

मधू : गप्प बस आणि बघ।

मालती : त्या सोन्यासारख्या चमकणाऱ्या वस्तूंना काय म्हणतात?

मधू : अग, ती खेळणी आहेत वेडे।. . . तलवारी, तोफा, बंदुका, शिपाई...

मालती : आणि बहुल्या, तेथे आहेत का रे मधू . . . ?

मधू : हो, बाहुल्या।. . . भिकारड्या बाहुल्या. . . बाहुल्यात कसली आहे मजा. . . काहीतरी आपले तुझे. . .

मालती : आणि ते मेजाभोवती काय आहे सारे ?

मधू : अग, करंज्या, अनरसे, सांजोऱ्या, चकल्या, फळफळावळ, पेढे, बर्फी . . .

मालती : मी अगदी लहान होते तेव्हा एकदा मला मिळाले होते. . .

मधू : मलासुध्दा, भाकरीपेक्षा किती गोड लागतात हे पदार्थ. परंतु आम्हाला कोणी कधी देतच नाही.

मालती : त्यांच्याजवळ बघ ढीग पडले आहेत . . . सारे मेज भरून गेले आहे .. ते का सारे खाणार हे ?.

मधू : नाही तर काय करणार ? खाण्याशिवाय त्या पदार्थांचा काय उपयोग ?

मालती : मग ते एकदम गट्ट का करीत नाहीत?

मधू : कारण, त्यांना भूक नाही.

मालती : (अत्यंत आश्चर्याने) भूक नाही? . . . का नाही?

मधू : कारण, पाहिजे तेव्हा त्यांना खायला मिळते.

मालती : (विश्वास न बसल्यासारखे दाखवीत) अगदी दररोज?

मधू : असे म्हणतात खरे. . .

मालती : हे सारे पदार्थ का ते खाणार ? ते कोणाला देणार नाहीत?

मधू : कोणाला देणार ?

मालती : आपल्याला . . .

मधू : त्यांना काय आपण माहीत? . . .

मालती : समज, आपण त्यांच्याजवळ मागितले. . .

मधू : मागायचे का? तसे करता कामा नये.

मालती : का बरे?

मधू : कारण ते बरे नाही.

मालती : (टाळ्या वाजवून) किती सुखी व आनंदी आहेत ती सारी।

मधू : (आनंदाने) कशी हसताहेत, खिदळताहेत. . .

मालती : आणि कशी नाचताहेत. . .

मधू : खरेच किती छान। आपणही नाचू या?
(घडवंचीवर आनंदाने पाय वाजवतात.)

मालती : खरेच किती मजा।

मधू : त्यांनी खायला आरंभ केला बघ. घेतली हातात सांजोरी, उचलला पेढा. . . लागले, खायला लागले, खायला लागले।

मालती : लहानमोठी सारी खात आहेत. . . त्या लहानांनासुध्दा तीन तीन, चार चार तुकडे।

मधू : खरेच किती मजा। . . . गंमत, मौज, आनंद।

मालती : (कल्पनेने तुकडे मोजीत) मला बारा मिळाले तुकडे. . .

मधू : मला बाराच्या चौपट. . . परंतु माझ्यातील थोडे मी तुलाही देईन. . .
(झोपडीच्या दारावर कोणीतरी थाप मारते.)

मधू : (एकदम शांत होऊन व भीतीने) कोण आहे बरे ? . . .

मालती : बाबा असतील।
(दरवाजा उघडावा की न उघडावा अशा विचारात ती दोघे आहेत तोच ती कडी आपोआप निघते. आवाज होतो. दार अर्धवट उघडते. एक म्हातारी आत येते. ती हिरवे नेसलेली असते. डोक्यावर लाल पदर असतो. तिची पाठ वाकलेली असते. ती लंगडी असते. तसेच जवळ आल्याशिवाय तिला काही दिसत नाही. तिचे नाक लोंबत हनुवटीला मिळालेले असते. एका काठीवर वाकून ती चालत असते. ती एक परी असते.)

परी : येथे गाणारे गवत आहे का? किंवा निळा पक्षी आहे का ?

मधू : येथे गवत तर आहे, परंतु ते गातबीत नाही. . .

मालती : मधूजवळ एक पक्षी आहे. . .

मधू : परंतु मी तो कोणाला देणार नाही.

परी : का नाही देणार ?

मधू : कारण तो माझा आहे.

परी : योग्य आहे कारण. कोठे आहे तो तुझा पक्षी?

मधू : (पिंजऱ्याकडे बोट करून) त्या पिंजऱ्यात. . .

परी : (नाकावर चष्मा ठेवून पिंजरा न्याहाळते.) मला नको हा पक्षी. कारण हा अगदी निळा निळा नाही. मला जो पक्षी पाहिजे आहे, तो तुम्ही शोधून आणा. जा दोघे. . .

मधू : कोठे आहे तो पक्षी? कोठे सापडेल? मला तर माहीत नाही. . .

परी : मलाही ठाऊक नाही आणि म्हणून तर तुम्ही त्याला शोधले पाहिजे. गाणारे गवत न मिळाले तर चालेल एक वेळ. करीन कसे तरी ते सहन. परंतु निळा पक्षी मला पाहिजेच पाहिजे. माझी लहान मुलगी फार आजारी आहे. तिला तो पाहिजे आहे.

मधू : काय होते तुमच्या मुलीला?

परी : आम्हालाही नीटसे समजत नाही. . . सुखी व्हावे असे तिला वाटते....

मधू : खरेच का?. . .

परी : मी कोण तुला माहीत आहे?

मधू : आमच्या शेजारच्या उमाकाकूंसारख्या तुम्ही दिसता.

परी : (एकदम रागावून) मुळीच नाही. . . तिच्यात व माझ्यात मुळीच नाही सारखेपणा. . . मी का त्या उमाकाकूंसारखी. . . मला नाही हो हे सहन होणार . . . मी आहे परी. माझे नाव आहे रूपराणी. . .

मधू : बरे तर. . . चांगले आहे नाव . . .

परी : तुम्ही आता निघाच त्या पक्ष्याच्या शोधाला.

मधू : तुम्ही येणार का आमच्याबरोबर?

परी : मला नाही येता येणार. चुलीवर ठेवले आहे सकाळी काहीतरी. मी जरा बाहेर गेले तर ते वर येते व उतू जाते. (वरच्या तक्तपोशीकडे, धुराड्याकडे व खिडकीकडे अनुक्रमे बोट करून) तुम्ही कोठून जाल? तेथून, का तेथून का इकडून?

मधू : (भीत भीत दाराकडे बोट करून) या बाजूने जायला मला आवडेल.. .

परी : (पुन्हा पूर्वीप्रमाणे एकदम रागावून) ते अशक्य आहे आणि नेहमी दरवाजातून बाहेर जाण्याची सवय घाणेरडी आहे. . . (खिडकीकडे बोट करून) इकडून

पडू आपण बाहेर. . . झाले तर. . . आता उशीर का? कसली वाट पाहता? कपडे करा व निघा.

(मुले सांगितल्याप्रमाणे करतात. पटकन कपडे घालू लागतात.)

परी : मालतीला कपडे घालायला मी मदत करते...

मधू : आमच्या पायात काही नाही.

परी : काही बिघडत नाही. मी तुम्हाला जादूची एक टोपी देईन. तुमचे आई-बाप कोठे आहेत? . . . .

मधू : (उजवीकडे दाराकडे बोट दाखवून) ती तिकडे झोपली आहेत. . .

परी : आणि तुमचे आजी-आजोबा?

मधू : ती तर मेली. . .

परी : तुमची लहान भावंडे? आहेत का आणखी बहीण-भाऊ तुम्हाला?

मधू : हो, आहेत तर! तीन लहान भाऊ आहेत.

मालती : आणि चार लहान बहिणी. . .

परी : कोठे आहेत ती सारी? . . .

मधू : तीही सारी मेली! . . .

परी : पुन्हा पाहायचे आहे त्यांना ?

मधू : हो, खरेच दाखवा. . . आता दाखवा. . . दाखवा ना ?

परी : अरे, माझ्या खिशात नाहीत काही ती... परंतु तुमचे दैव चांगले आहे. स्मृतीच्या प्रांतातून जाल तेव्हा ती तुम्हाला भेटतील... निळ्या पक्ष्याकडे जाणाऱ्या रस्त्यातच तो प्रदेश लागतो. तिसऱ्या वळणाला डाव्या बाजूला आहे. स्मृतीचा प्रांत... दारावर मी ठोठावले, तेव्हा तुम्ही काय करत होता?

मधू : आम्ही करंज्या, अनरसे वगैरे खाण्याचा लटोपटीचा खेळ खेळत होतो...

परी : तुमच्याजवळ आहे का मेवामिठाई, आहेत का करंज्या, सांजोऱ्या? कोठे आहेत दाखवा पाहू...

मधू : श्रीमंत मुलांच्या घरी आहेत... या इकडे व बघा. खरी ना आहे मौज !(तो त्या परीला खिडकीजवळ नेतो.)

परी : (खिडकीशी उभी राहून) दुसरीच मुले खात आहेत सारे !...

मधू : हो, परंतु ती खात आहेत हे तरी आम्ही पाहू शकतो...

परी : तुम्हाला त्यांचा राग नाही येत ?

मधू : कशाचा राग ?

परी : सारे तीच खात आहेत म्हणून... तुम्हाला त्यांनी काहीच न देणे बरे नव्हे, मला तर ते चुकीचे वाटते.

मधू : काही नाही चुकले त्यांचे. ती श्रीमंत मुले आहेत... तेथे खरोखर मजा आहे, गंमत आहे, नाही ?

परी : येथल्यापेक्षा तेथे काही अधिक चांगले नाही.

मधू : काहीतरीच आपले... येथे किती काळोख, जागा किती लहान, सारे कोंदट आणि गोडबीड तर काहीच नाही.

परी : अरे, येथे आहे तसेच तेथे आहे. तेथे आहे तसेच अगदी येथे आहे. अगदी हुबेहूब. काडीचाही फरक नाही. तुला दिसत नाही ?

मधू : दिसत कसे नाही? सारे दिसते. माझे तर डोळे चांगले आहेत. त्या मनोऱ्यावरच्या घड्याळात किती वाजले ते मला दिसते. परंतु बाबांना दिसत नाही.

परी : (एकदम रागावून) मी सांगते ना की तुला दिसत नाही म्हणून? जास्त नाही बोलायचे... आणि मी रे कशी दिसते ?... मी कशासारखी दिसते? (मधू गोंधळून स्तब्ध राहतो.) सांग ना, बोल. कशी दिसते मी? तुला नीट दिसते की नाही ते मला पाहायचे आहे... मी सुरूप आहे की कुरूप आहे?... (अस्वस्थ असे मौन असते) उत्तर देतोस की नाही? मी तरुण आहे की म्हातारी? माझे गाल गुलाबी आहे का फिक्कट आहेत? कदाचित तू म्हणशील की माझ्या पाठीवर टेंबुक आहे म्हणून...

मधू : (मिळते घेण्याच्या आवाजात) तसे काही फार मोठे नाही टेंबुक...

परी : कोणी म्हणतीलही मोठे आहे म्हणून... काय रे, माझे नाक का आकड्यासारखे आहे? माझा एक डोळा का फुटला आहे?...

मधू : तसे काही नाही म्हणत मी... परंतु कोणी फोडला तुमचा डोळा?

परी : (जास्तच चिडून) अरे, तो डोळा फुटलेला नाही बावळटा... फाजील आहेस... अरे, दुसऱ्या डोळ्यापेक्षा हा फुटलेला वाटणारा डोळाच अधिक सुंदर आहे. त्याची सूक्ष्म दृष्टी आहे... धडक्या डोळ्यांपेक्षा हा फुटका डोळाच अधिक मोठा, अधिक तेजस्वी आहे. आकाशाप्रमाणे तो निळा आहे... आणि माझे केस? दिसतात का तुला? शेतातील धान्याप्रमाणे ते सोन्यासारखे आहेत! माझ्या डोक्यावर हे सोनेरी केस इतके विपुल आहेत की, त्यामुळे माझे डोके वाकते... डोक्याच्या सर्व बाजूंनी ते केस नाचत असतात,

धावत असतात... हे पाहा केस माझ्या हातात। (पिकलेल्या केसांच्या दोन बटा ती पुढे करते.)

मधू : हो दिसताहेत थोडेसे...

परी : (संतापून) थोडेसे ?... हे काय थोडेसे! केवढे हे केस, केवढा केशभार, केवढा केशकलाप... माझ्या मुठीत मावत नाहीत... लांबसडक केस... जणू सोन्याच्या लाटा... आम्हाला तर दिसत नाहीत तुमचे केस, असे म्हणणारे आहेत काही लोक. मला माहीत आहे. परंतु अशा नाठाळ, दुष्ट व आंधळ्या लोकांपैकी तुम्ही नसाल अशी मला आशा आहे.

मधू : मी खरेच दुष्ट नाही. परंतु जे दिसते ते मी पाहू शकतो. . .

परी : जे दिसत नाही तेही शंका न घेता तू पाहिले पाहिजे. . . ही माणसे म्हणजे विचित्र प्राणी. . . परींची जात नष्ट झाल्यापासून या माणसांना काहीही दिसेनासे झाले आहे आणि पुन्हा आपल्याला दिसत नाही हे त्यांना समजत नाही. परंतु ज्यांची दृष्टी अंधुक झाली आहे, त्यांना नवप्रकाश देण्यासाठी माझ्याजवळ एक वस्तू मी नेहमी बाळगते हे त्यातल्या त्यात बरे. . . माझ्या पिशवीतून मी काय बरे बाहेर काढीत आहे? . . .

मधू : ओहो, ही तर एक सुंदरशी लहानशी लहान हिरवी टोपी आहे. . . तिच्यावर ते काय झळकत आहे ?

परी : तो एक मोठा हिरा आहे. त्याच्यामुळे लोकांना सारे दिसते.

मधू : खरेच का ?

परी : हो. तू डोक्यावर टोपी घाल व तो हिरा जरा वळव. उजवीकडून डावीकडे. हे पाहा असा फिरव. मग एकदम नवी दृष्टी येते.

मधू : त्याने काही अपाय तर नाही ना होत ?

परी : मुळीच नाही. तो जादूचा हिरा आहे. डोळ्यांना नवीन शक्ती येते. वस्तूंचे अंतरंगही मग एकदम दिसू लागते. भाकरीचा आत्मा, मिरचीचा आत्मा, सर्व खाद्यपेयांचा आत्मा आपणाला दिसू लागतो.

मालती : साखरेचा आत्माही आम्हाला दिसेल का?

परी : (जरा त्रासल्यासारखे करून) हो गं बाई. . . फालतू प्रश्न मला आवडत नाहीत. साखरेचा आत्मा का मिरच्यांच्या आत्म्यांपेक्षा अधिक गोड आहे?. . . हा, निळ्या पक्ष्याच्या शोधासाठी मी जी काही मदत घेऊ शकेन, ती आता दिली आहे. उडणारा गालिचा किंवा वावरणाऱ्याला अदृश्य करणारी

अंगठी तुम्हाला देता आली असती तर बरे झाले असते. परंतु त्या वस्तू ज्या कपाटात मी ठेवल्या, त्याची किल्ली हरवली आहे. अरे, खरेच हो. एक गोष्ट विसरणार होते. . . (हिऱ्याकडे बोट करून) हे पाहा, हा हिरा असा धरावा आणि मग त्याला जरा फिरवले की एकदम सारा भूतकाळ दिसू लागतो. . . आणखी जरा थोडासा तो फिरवा आणि मग भविष्यकाळ तुम्हाला दिसेल. . . सारे आश्चर्यकारक आहे आणि पुन्हा गडबडगुंडा नाही, काही नाही. गुपचूप काम.

मधू : बाबा माझ्याजवळून तो घेतील. . .

परी : त्यांना दिसणारच नाही. तोपर्यंत तो हिरा तुझ्या डोक्यावर आहे, तोपर्यंत तो कोणालाही दिसणार नाही. . . तू करतोस का प्रयोग? . . . (ती मधूच्या डोक्यावर ती चिमुकली हिरवी टोपी ठेवते.) हं, आता फिरव तो हिरा. . . एकदा फिरव आणि मग. . .

(मधूने हिरा फिरवला नाही तोच सर्व वस्तूत आश्चर्यकारक फरक होतो. ती वृद्ध परी एकदम सुंदर अशी अपूर्व राजकन्या दिसू लागते. झोपडीच्या भिंतीतील दगड हिरेमाणकांप्रमाणे झळकू लागतात. खोलीतील साधेसुधे सारे सामान झगमगीत दिसू लागते. त्यांना जीवनकळा चढते. ते साधे मेज स्फटिकाचे केल्याप्रमाणे दिसते. ते घड्याळ हसू लागते व डोळे मिचकावते. घड्याळाचीं लंबकाची पेटी उघडते. आतील दोन काटे एकदम मोकळे होतात व एकमेकांचे हात हातात घेऊन नाचू लागतात. गोड संगीत ऐकू येते.)

मधू : (अत्यंत आश्चर्य दाखवतात व त्या काट्यांकडे बोट दाखवून) ही सुंदर नारी कोण?

परी : घाबरू नको. तुझ्या जीवनाचे ते तास आहेत. मोकळे झाल्यामुळे त्यांना आनंद होत आहे. प्रकट झाल्यामुळे ते नाचत आहेत.

मधू : आणि ह्या भिंती इतक्या झगझगीत का बरे दिसतात? . . . त्या का साखरेच्या केलेल्या आहेत की हिरेमाणकांच्या ?

परी : सारेच दगड मोलाचे असतात. सारे दगड सारखेच असतात. मात्र माणसाला त्यातील काही थोडेच मोलाचे वाटतात.

(त्यांचा असा संवाद चालला आहे, तो तो जादूचा प्रयोग आणखी वाढतच जातो. तो प्रयोग पुरा होतो. भाकरीच्या तुकड्यांतून लहान लहान माणसे

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

बाहेर पडतात व नाचू लागतात. त्यांचा रंग कोंड्यासारखा असतो. अंगावर पीठ उडालेले असते. इतक्यात शेगडीतील विस्तव लालसर व पिवळट पोषाख घालून उडी मारतो व त्या तुकड्यांच्या पाठीमागे लागतो व हसता हसता त्याची मुरकुंडी वळते.)

मधू : हे भिकारडे कोण लोक ?

परी : घाबरू नकोस. भाकरीच्या तुकड्याचे ते आत्मे आहेत. ताटात अगदी दाबून ठेवलेले होते ते. परंतु सत्याचे राज्य सुरू झाल्यामुळे ते आत्मे नाचत आहेत, प्रकट होत आहेत.

मधू : आणि तो लालसर धटिंगण कोण ? घाण येत आहे त्यांच्या अंगाची. कोण आहे तो ?

परी : असे नको हो बोलू । अरे तो की नाही, अग्नी आहे, भयंकर आहे हो तो ।
(संवाद चाललेला असतो व जादूचा प्रयोग सुरूच असतो. कुत्रा व मांजर निजलेली असतात. ती एकदम ओरडतात व पळून अदृश्य होतात. त्यांच्या जागी दोन आकृती दिसू लागतात. एका आकृतीचे तोंड कुत्र्यासारखे असते. दुसरीचे मांजरासारखे. कुत्र्याचे तोंड असलेला माणूस एकदम मधूवर धावतो. चावण्यासाठी नाही, तर चाटण्यासाठी. मधूला तो आपल्या लाडिकपणाने घाबरवतो आणि मांजराचे तोंड असलेला माणूस आपले केस विंचरतो, कल्ल्यांवरून हात फिरवतो, हात धुतो व मग मालतीकडे जातो. अत:पर कुत्र्याच्या तोंडाच्या त्या माणसाला आपण मोत्या म्हणून व मांजराचे तोंड असलेल्या माणसाला बोकोबा म्हणून.)

मोत्या : (ओरडत ओरडत, भुंकत, नाचत, खोलीतील सर्वांना धक्के देत, प्रक्षुब्ध होऊन भावनोन्मत्त होऊन) मधू, मधू माझ्या लहान धन्या, माझ्या देवा, बरे आहे ना ? राम राम. हा घ्या प्रणाम. किती छान झाले. . . शेवटी एकदाचे आता आपणास बोलता येईल. . . कितीतरी गोष्टी मला सांगायच्या आहेत. मी कितीही भुंकलो व शेपूट कितीही हलवले तरी माझ्या मनातील तुला समजत नसे. . . परंतु आता? राम राम, प्रणाम. . . मधू, मधू, मला तुम्ही फार आवडता. . . मी काही गमती करू? . . मी दोन पायांवर उभा राहू, भाकरीचा तुकडा मागू? मागच्या पायांवर उभा राहून नाचू?

मधू : (परीला) कुत्र्यांचे डोके असलेला कोण हा गृहस्थ ?

परी : अरे बावळटा, ज्या कुत्र्याला तू मोकळे केलेस, त्याचा हा आत्मा...

बोकोबा : (मालतीकडे जाऊन व हात पुढे करून, मोठ्या आदराने व सभ्यतेने) नमस्कार ताई. . . आज किती सुंदर दिसता तुम्ही. . .

मालती : नमस्कार राजे. . . (परीला) कोण आहे हे ?

परी : तुला काही कसे कळत नाही ? तुझ्या मांजराचा हा आत्मा. तो स्वागतार्थ हात पुढे करीत आहे. . . घे त्या हाताचा मुका.

मोत्या : (बोकोबाला लकटून) माझाही मुका घ्या. . . मी धाकट्या मधूचा मुका घेतला. . . मी धाकट्या मालतीचा मुका घेतला. मी सर्वांचा मुका घेतला. . . मजा । केवढी गंमत . . . आता मौज करू, मोठी मौज. . . मी बोकोबाला आता भिववितो. भू: भौ भू: ।

बोकोबा : कोण आहात आपण, महाराज?

परी : (मोत्याला काठीने दटावीत) गप्प राहा, नाही तर बघ पुन्हा कायमचा मुका होशील. . .

(जादूचा प्रयोग वाढतच असतो. कोपऱ्यातील चरखा वेगाने गरगर फिरू लागतो आणि तेजस्वी प्रकाशाचे किरण कातू लागतो. पाण्याचा नळ असतो ना, तो मोठ्याने गाऊ लागतो. त्या नळातून सुंदर झरा वाहू लागतो. त्या झऱ्यातून हिरे, माणके, पाचू बाहेर पडतात. त्या रत्नांच्या राशीतून पाण्याचा आत्मा बाहेर पडतो. एखाद्या लहान मुलीप्रमाणे तो दिसतो. त्याच्या अंगातून जणू धारा गळत असतात. डोळे अश्रूपूर्ण असतात. पाण्याचा आत्मा एकदम अग्नीच्या आत्म्याजवळ लढायला जातो. पाण्याच्या आत्म्याला आपण जलराणी म्हणू.)

मधू : ही ओलीचिंब बाई कोण ?

परी : नळातून बाहेर पडलेले हे पाणी आहे. हा पाण्याचा आत्मा आहे. हा पाण्याचा आत्मा. ही जलराणी. (खोलीतील दुधाची दुधाणी पडते. त्या मडक्याचे तुकडे होतात. सांडलेल्या दूधातून उंच, सडपातळ, लाजरी अशी एक मूर्ती प्रकट होते. सर्वांची जणू तिला भीती वाटते. तो दुधाचा आत्मा असतो. ह्या आत्म्याला दुधी म्हणू.)

मधू : साध्या वेषातील ही घाबरलेली स्त्री कोण ?

परी : हा दुधाचा आत्मा. ही दुधी. ह्या दुधाच्या आत्म्याने दुधाणी फोडून टाकली. (मेजाच्या पायाजवळ साखरेचा पुडा असतो. पुडा फोडून एक उंच गृहस्थ बाहेर पडतो. अर्धवट निळा, अर्धवट पांढरा, असा कोट अंगात असतो.

त्याच्या तोंडावर कृत्रिम हास्य असते. जरा दांभिक दिसते मुद्रा. मालतीकडे बघून वरपांगी हसत तो जातो. तो साखरेचा आत्मा असतो त्याला आपण शर्करानंद म्हणू.)

मालती : (बरीच घाबरून) काय पाहिजे याला ?

परी : अग, हा साखरेचा आत्मा, शर्करानंद हो.

मधू : त्याच्याजवळ साखर तरी आहे का हो.

परी : त्याचे खिसे साखरेने भरलेले आहेत. त्याचे प्रत्येक बोट म्हणजे साखरेची कांडी आहे.

(मेजावरचा दिवा खालीपडतो. त्याच क्षणी त्याची ज्योत वर उसळते. त्या ज्योतीतून अनुपम सौंदर्याची एक तेजस्वी कुमारी प्रकट होते. जणू समाधीत असल्याप्रमाणे ती निश्चल उभी राहते. झगमगीत असा तिचा पोशाख असतो.)

मधू : ही तर राणी जणू ।

मालती : ही जणू थोर देवता ।

परी : नाही मुलांनो, हा प्रकाश आहे. हा प्रकाशाचा आत्मा. ही प्रकाशराणी हो.

(इतक्यात फळीवरच्या बशा नाचू लागातात. भोवऱ्याप्रमाणे फिरू लागतात. तेथील वस्त्रातून चंद्र-सूर्याच्या किरणांनी जणू विणलेली अशी वस्त्रे बाहेर पडतात. त्यातच माळ्यावरील चिंध्यांचा भव्य मेळावा येऊन मिळतो. . . परंतु एकदम उजव्या बाजूच्या दारावर थापा ऐकू येतात.)

मधू : बाबा बहुधा । . . . त्यांनी ऐकले वाटते सारे.

परी : तो हिरा फिरव . . . डावीकडून उजवीकडे फिरव.

(मधू त्याप्रमाणे पटकन करतो.)

अरे, इतक्या जलद का फिरवायचा । . . . काय करायचे आता ? फारच पटकन फिरवलास. आता बोलून काय उपयोग ? सर्व आत्म्यांना पुन्हा आपापली स्थाने घेण्यास अडचण पडेल. आता करतील गोंधळ, आपल्याला त्रास होईल.

(परी पुन्हा बुढ्ढी होते. झोपडीच्या भिंतीचे तेज जाते. घड्याळाचे काटे जागेवर जातात. चरखा थांबतो. वगैरे वगैरे. परंतु त्या धांदलीत अग्नी इकडेतिकडे धावतो. त्याला आपल्या चुलीतील जागा पटकन घेण्यास जरा अडचण पडते. एक भाकरीचा तुकडा ताटात जागा होत नाही म्हणून रडू लागतो. त्याला आपण भाकरोबा म्हणू.)

परी : काय आहे भानगड ?

भाकरोबा : (डोळ्यांत आसवे आणून) त्या ताटात मला जागा नाही ।

परी : (ताटात पाहून) आहे की जागा (ताटातील तुकडे जवळजवळ करून) चल, ये लौकर. करा रे जागा त्याला.

(दरवाजावर पुन्हा थापा)

भाकरोबा : (फारच घाबरत व ताटात शिरायची फुकट धडपड करीत) नाही ताटात जाता येत . . . तो खाईल मला ।

मोत्या : (मधूच्या भोवती भोवती नाचत) माझ्या लहानग्या धन्या, माझ्या देवा, मी अद्याप येथेच आहे । अजून मला बोलता येते आहे. अजून मी तुझा मुका घेऊ शकेन. पुन्हा एकदा । पुन्हा एकदा. . .

परी : काय रे, तू अजून येथेच. . . अजून तसाच ?

मोत्या : सुदैव माझे. . . मला उशीर झाला जायला म्हणून पुन्हा मी पूर्वीप्रमाणे मुका झालो नाही.

बोकोबा : माझेही तसेच झाले. काय होणार आता ? काही धोका का आहे ?

परी : सत्य मला सांगितलेच पाहिजे. या दोन लहान मुलांबरोबर प्रवास करावयास जी जातील, ती शेवटी मरतील. प्रवास संपताच त्यांची जीवनयात्राही संपेल.

बोकोबा : (मोत्याला) चल, पुन्हा जुन्या पिंजऱ्यात जाऊ.

मोत्या : नाही, मी येत नाही. माझ्या लहान धन्याबरोबर मी जाईन. त्याच्याबरोबर वाटेत पोटभर बोलेन. . .

बोकोबा : बावळटच आहेस तू. मूर्ख आहेस अगदी. . .

(दरवाजावर पुन्हा थापा)

भाकरोबा : (अश्रू ढाळीत) प्रवासाच्या शेवटी मरायची माझी तयारी नाही. . . मला पुन्हा जाऊ दे ताटात. . .

अग्नी : (खोलीभर वेड्याप्रमाणे धावपळ करण्यापलीकडे त्याने काहीच केलेले नसते. उसासे टाकतो.) माझी जागा मला सापडत नाही. . .

जलराणी : नळात मला पुन्हा शिरता येत नाही. . .

शर्करानंद : (पुड्याभोवती नाचत) पुड्यात पुन्हा मी कसा शिरू ? . . .

दुधी : (लाजत व अडखळत) कोणी तरी माझे मडके फोडले . . .

परी : आता काय करायचे ? सारा वेड्यांचा बाजार । बावळट आहेत आणि भितुरडीही आहेत . . . मुर्खांनो, भितुरड्यांनो, तुम्हाला त्या जुन्या बंधनातच

पडण्याची इच्छा असावी ना ? निळ्या पक्ष्याच्या शोधासाठी या मुलाबरोबर हिंडायला जाण्याऐवजी येथेच खितपत पडणे आवडते ना तुम्हाला ? शी ! . . .

सारी : (मोत्या व प्रकाशराणीशिवाय बाकीची) हो. आम्हाला येथेच राहू दे. माझे ताट, माझी चूल, माझा नळ, माझा पिंजरा.

परी : (प्रकाशराणीकडे वळून : फुटलेल्या दिव्याकडे स्वप्नात असल्याप्रमाणे ती बघत असते.) काय गं प्रकाशराणी, तुझी काय इच्छा आहे ?

प्रकाशराणी: मी या मुलांबरोबर जाईन.

मोत्या : (आनंदाने भुंकत व ओरडत) मी पण, मी पण . . .

मधू : शाबास ! परंतु बाकीच्यांना आता सुटका नाही. उशीर झाला. सर्वांनी निघाले पाहिजे. परंतु हे अग्ने, तू दुरून चल. कोणाच्या जवळ येऊ नकोस आणि मोत्या, तू बोकोबाला सतावू नकोस आणि जलराणी, तू जरा संयम राख. इकडे तिकडे धावू नकोस, सर्वत्र पसरू नकोस.

(पुन्हा उजवीकडील दारावर जोराने थपडा.)

मधू : (नीट कानोसा घेऊन) बाबाच आहेत. ते उठले आहेत असे वाटते.त्यांच्या पायाची चाहूल मला ऐकू येत आहे.

परी : आपण खिडकीतून जाऊ या. तुम्हा सर्वांना प्रथम माझ्या घरी आलेच पाहिजे. तेथे मी सर्व प्राण्यांना व सर्व पदार्थांना नीट पोशाख देईन. (भाकरोबाकडे वळून) त्या निळ्या पक्ष्याला ज्यात घालायचे तो पिंजरा तू हातात घेऊन ठेव. तो तुझ्या ताब्यात. चला, जलदी करा. आता वेळ नका गमावू. (खिडकी एकदम मोठी होते. जणू तिचे दार होते. ती सारी बाहेर जातात. पुन्हा खिडकी अगदी पूर्वीप्रमाणे दिसू लागते. तिला काही जसे माहीतच नाही. खोलीत पुन्हा काळोख होतो. त्या दोन पलंगड्यावर अंधार असतो. उजवीकडे दार सताड उघडते आणि दारातून मधू–मालतीच्या आई–बापांची तोंडे दिसतात.)

बाप : काही नाही हो ! वटवाघळाचा आवाज, रातकिड्यांचा आवाज.

आई : दिसतात का तुम्हाला ?

बाप : हो हो. दोघे शांत झोपलेली आहेत.

आई : त्यांचे घो रणे मला ऐकू येत आहे. (दार पुन्हा बंद होते.)

(पडदा पडतो.)

✦✦✦

अंक दुसरा

प्रवेश पहिला

परीच्या घरी

(**परी रूपराणी**च्या राजवाड्याचे भव्य प्रवेश-मंदिर. चमकणाऱ्या आरसपानी खांबावर सोनेरी व रुपेरी काम. जिने, गच्च्या वगैरे, पाठीमागून उजव्या बाजूने सुंदर पोशाख केलेले **बोकोबा, शर्करानंद** व **अग्नी** येतात. तेज:किरण फेकणाऱ्या खोलीतून ती बाहेर येतात. **परी रूपराणी**चे ते वस्त्रागार असते. **बोको**बांच्या पायात सुरेख बूट असतात. **शर्करानंदा**चा पोशाख रेशमी असतो. **अग्नी**च्या अंगावर नाना रंगांचा पोशाख असतो. एक झिरझिरीत लाल रंगाचा जरतारी झगा वरून घातलेला असतो. दिवाणखाना असतो. त्यातून तिघे इकडेतिकडे हिंडून मग पुढे येतात. **बोकोबा** त्यांना उजव्या बाजूला एका स्तंभाजवळ उभे राहायला सांगतो.)

बोकोबा : इकडून तिकडून. या राजवाड्याची खडा न् खडा माहिती मला आहे. परी रूपराणीला नीळकंठीने हा दिला. मधू, मालती व प्रकाशराणी परीच्या छोट्या मुलीला भेटायला गेली आहेत. तोपर्यंत आपणास थोडीशी मोकळीक आहे. प्रत्येक क्षणाचा उपयोग करून घेऊन या. आपण ज्या परिस्थितीत सापडलो आहोत, तिचा विचार करण्यासाठी मी तुम्हाला येथे आणले आहे. . . सारी आलात का ?

शर्करानंद : परीच्या वस्त्रगारातून मोत्या येत आहे . . .

अग्नी : त्याने हा पोशाख तरी कसला केला आहे ?

बोकोबा : एका प्रसिद्ध परीच्या नोकराप्रमाणे त्याने पोशाख केला आहे. शोभून दिसतो हा पोशाख त्याला . . . गुलामाला असलाच पोशाख असतो... परंतु आपण या खांबापाठीमागे छपू या . . . मोत्याची मला भीती वाटते.

त्याचा विश्वास नाही धरवत. का कोणास माहीत. मी तुम्हाला जे सांगणार आहे, ते त्याच्या कानी न गेलेले बरे. . .

शर्करानंद : आता काय बोलून उपयोग ? तो तर आलाच आपल्याला हुडकत. . . आणि वस्त्रागारातून नटून थटून जलराणीपण येत आहे.

(मोत्या व जलराणी पहिल्या मंडळींना येऊन मिळतात.)

मोत्या : (इकडे तिकडे नाचत) ओहो, खरेच खरेच किती गंमत ! किती छान दिसतो आपण सारी . . . या रंगीबेरंगी फिती, हे जरतारी कपडे, भरजरी झगे, मजा आहे. हे खरेखुरे सोन्याचे काम आहे. नकली नाही. . .

बोकोबा : (जलाराणीला) हा माझ्या अंगावरचा पोशाख तुझ्या ओळखीचा आहे. हा त्या बोकी परीचा 'काळ्या रंगाचा' पोशाख. तो तुला चढवला आहे रूपराणीने.

जलराणी : होय. हा पोशाख मला अगदी ठीक झाला.

अग्नी : (दात खात) तिने आपली छत्री नाही आणली . . .

जलराणी : काय रे म्हणणे आहे ?

अग्नी : काही नाही, कोठे काय ?

जलराणी : परवा मी एक लाल गुलाब पाहिला, त्याविषयी बोलत होतास असे मला वाटले.

बोकोबा : असे हमरीतुमरीवर कोणी येऊ नका, वर्दळीवर येऊ नका. महत्त्वाच्या गोष्टींसंबंधी बोलायचे आहे. . . अजून भाकरोबा कसे आले नाहीत ? कोठे गेले ते ?

मोत्या : कोणताही पोशाख त्याला रुचेना. बसला आहे तेथे हा का तो करीत...

अग्नी : अगडबंब आहे त्याचे पोट. दिसतो बावळटासारखा. निदान कपडे तरी नका का चांगले पाहायला ?

मोत्या : शेवअी तुर्की पद्धतीचा पोशाख त्याने एकदाचा पसंत केला. त्या पोशाखाला हिरे-माणके आहेत. डोक्यावर पागोटे आहे, कमरेला तलवार आहे.

बोकोबा : भाकरोबा आले बघा. . . नीलकंठीचा सर्वांत सुंदर असा पोशाख त्याने घातला आहे.

(भाकरोबा प्रवेश करतात. वर्णिलेला पोशाख त्याच्या अंगावर असतो. रेशमी शेला प्रशस्त पोटाभोवती गुंडाळलेला असतो. एका हातात त्याने

तलवारीची मूठ धरलेली असते. दुसऱ्या हातात निळ्या पक्ष्यांसाठी पिंजरा असतो.)

भाकरोबा : (अंकाराने डोलत) खरेच सांगा. . . कसा बरे दिसतो मी ?

मोत्या : (भाकरोबाभोवती हिंडत) किती शोभून दिसते स्वारी. . . बावळट आहे लेकाचा . . . किती खुलून दिसतात राजश्री . . . किती छान दिसता तुम्ही.

बोकोबा : (भाकरोबाला) मधू, मालती यांचा झाला का पोशाख ?

भाकरोबा : हो. ती पण सजली. मधूने निळे जाकीट घातले आहे व लाल विजारी घातली आहे. मालतीचाही पोशाख उत्कृष्ट आहे. एका सुंदर परीचा झगा, दुसऱ्या एका परीच्या राणीचा बूट तिने घातले आहेत. . .परंतु खरे सांगू का? प्रकाशराणीच्या पोशाखाची रीत काही औरच आहे. . .

बोकोबा : ते कसे काय ?

भाकरोबा : परी रूपराणी म्हणाली प्रकाशराणी स्वतःच इतकी रमणीय व सुंदर आहे की, तिला दुसऱ्या पोशाखाची जरुरीच नाही. . . परंतु मी विरोध केला. आमच्याबरोबर प्रकाशराणी येणार असेल तर आमची प्रतिष्ठा कमी होईल असे काही होता कामा नये. प्रकाशराणी जर पोशाख करून येणार नसेल, तर मी तिच्याबरोबर येणार नाही. . . आम्ही प्रतिष्ठित व सभ्य माणसे आहोत. . . प्रकाशराणीने आमच्याप्रमाणे सभ्यतेने वागावे . . . कपडे काही थोडे तरी घालावे.

अग्नी : प्रकाशराणीला दिव्याच्या पाठीमागचा प्रकाशप्रतिक्षेपक दिला असता विकत घेऊन . . .

बोकोबा : मग परी काय म्हणाली?

भाकरोबा : माझ्या डोक्यावर व पोटावर तिने आपल्या काठीने दोन तडाखे दिले.

बोकोबा : आणि मग ?

भाकरोबा : मग माझी समजूत पटली असे दाखवणे भागच होते. परंतु अगदी शेवटच्या क्षणाला चंद्रकिरणांचा पोशाख घालायचा असे प्रकाशराणीने ठरवले. बोकी परीच्या जडजवाहिराच्या पेटीत अगदी खाली तो पोशाख ठेवलेला होता.

बोकोबा : हे पाहा, गप्प बसायला काय घ्याल? महत्त्वाचा वेळ जात आहे. बडबड नका करू. . . तुम्ही सर्वांनी ऐकलेच आहे की परी रूपराणी म्हणाली, आपला प्रवास संपताच आपले सर्वांचे आयुष्यही संपणार आहे. . . तेव्हा

हा प्रवास शक्यतो संपणारच नाही, तो शक्य तितका लांबेल असे करणे हे आपले काम आहे . . . आणखीही एक गोष्ट आहे. आपल्या जातीचे पुढे कसे होईल याचाही विचार करायला हवा.

भाकरोबा : ऐका, ऐका . . . बोकोबांचे म्हणणे रास्त आहे.

बोकोबा : शांत राहा. . . येथे जे जे पदार्थ आहेत, जे जे प्राणी आहेत, जी जी पंचमहाभुते आहेत, त्या सर्वांना आत्मा आहे. माणसाला ही गोष्ट अद्याप ठाऊक नाही. म्हणून तर अद्याप स्वातंत्र्याचा संहस्रांश तरी आपणाजवळ शिल्लक आहे. परंतु निळा पक्षी जर का त्याला सापडला तर मग त्याला सारे ज्ञान होईल. त्याला सारे दिसेल आणि आपले उरले सुरले स्वातंत्र्यही लयाला जाईल . . . माझी जुनी मैत्रीण निशा, तिच्यापासूनच मला ही गोष्ट नुकतीच समजली. निशादेवी जीवनाच्या सर्व रहस्यांची रखवालीण आहे... म्हणून माझ्या मित्रांनो, तो निळा पक्षी सापडणार नाही अशी आपण खटपट करणे, यात आपले हित आहे. मधू, मालती या मुलांचा जीवही धोक्यात आला तरीही हरकत नाही. काही झाले तरी निळा पक्षी मिळू देता कामा नये.

मोत्या : (संतापाने) काय बडबडतो आहे ? . . . पुन्हा सांग सारे. मला ऐकू आले ते बरोबर आहे की चूक आहे ते पाहू ?

भाकरोबा : खाली बसा मोत्याराव. . . शिस्त पाळा . . . तुमची पाळी नाही अद्याप बोलण्याची . . . बसा खाली. . . या सभेचा मी अध्यक्ष आहे. समजले ना?

अग्नी : कोणी केले राव आपणाला अध्यक्ष ? . . .

जलराणी : गप्प बस रे. . . तू का मध्येच तोंड घालतोस ! . . .

अग्नी : मला वाटेल तेथे मी ढवळाढवळ करीन. . . तू बोलू नकोस... गप्प बस...

शर्करानंद : (सर्वांची समजूत घालीत) माफ करा. . . कृपा करून भांडू नका. हा क्षण महत्त्वाचा आहे. अत्यंत गंभीर आहे. . . कोणते उपाय योजायचे याचा आधी विचार केला पाहिजे. नीट ठरवून टाकले पाहिजे.

भाकरोबा : शर्करानंदांशी मी सहमत आहे आणि बोकोबा. . .

मोत्या : तुमचे सर्व बडबडणे हास्यास्पद आहे. सर्वांच्यावर मनुष्य आहे. बस्स पुरे... मनुष्याचे ऐकणे, त्याची आज्ञा पाळणे, हे आपले काम. . . महत्त्वाची व मुख्य अशी ही एकच गोष्ट आहे. . . मी एका मनुष्य प्राण्याला ओळखतो, आणखी कोणाला नाही. . . मानवाचा विजय असो ! . . .

मनुष्यप्राणी चिरंजीव होवो. . . मनुष्य झिंदाबाद . . . जीवन असो वा मरण असो. आपण सारे माणसांसाठी. आपले सारे त्याच्यासाठी असले पाहिजे. . . मनुष्य म्हणजेच देव, परमेश्वर. . .

भाकरोबा : मोत्या महाशयांप्रमाणेच माझेही मत आहे. . .

बोकोबा : (मोत्याला) परंतु का ते सांगशील की नाही ? कारणे सांग, मुद्दे मांड...

मोत्या : कारणे नाहीत, मुद्दे नाहीत. . . येथ बुद्धिवाद नाही. . . मी मानवावर प्रेम करतो. . . आणखी कसला मुद्दा ? प्रेम करतो त्यात सारे आले. . . माणसाच्या विरूद्ध बोकोबा तू काही करशील, तर तुझी मानगुटी धरीन व माणसाला जाऊन सारे सांगेन.

शर्करानंद : (गोड मध्यस्थी करीत) माफ करा. . . वादविवाद या थरावर आणू नका. . . वर्दळीवर नका येऊ. . . त्या त्या दृष्टीने पाहिले की तुमचे दोघांचे म्हणणे बरोबर आहे. . . दोन्ही बाजूंनी काही ना काही सांगता येईल. . .

भाकरोबा : शर्करानंद म्हणतात त्याच्याशी मी सहमत आहे. . .

बोकोबा : आपण सारी आज जुलुमाखाली कुंथत नाही का ? जलराणी, अग्नी आणि तुम्हीही मोत्याराव आणि भाकरोबा, तुम्ही आज सारी गुलामगिरीत नाही का ? हा अपार जुलूम सदैव चालला आहे. त्या जुलमाला नाव काय द्यावे कळत नाही. परंतु तो जुलूम तर आहे. हा हुकूमशहा येण्यापूर्वी आपण सारी भूतलावर स्वच्छंदाने विहरत होतो, विचरत होतो, ते आठवते का ? तो काळ तुम्हाला स्मरतो का. . . ? त्यावेळेस पाणी व अग्नी यांचीच एकमुखी सत्ता पृथ्वीवर होती. परंतु आज काय ही त्यांची दशा ?. . . आमचे पूर्वजही किती धिप्पाड होते ! आज आम्ही अशी छोटे दिसत आहोत. . . हे पाहा . . . थांबा. . . परी रूपराणी व प्रकाशराणी येत आहेत. . . आपण काही एक करीत नव्हतो असे दाखवा, बरे का ?. . . प्रकाशराणीने माणसाची बाजू घेतली आहे. . . आपला सर्वात मोठा शत्रू म्हणजे ही प्रकाशराणी. . . ही पाहा आलीच ती. . .

(बुद्धी परी रूपराणी उजवीकडून येते. तिच्यामागून प्रकाशराणी, मधू व मालती येतात.)

परी : हं. . . काय रे ? . . . त्या कोपऱ्यात काय चालवले आहे कारस्थान ? ... काही तरी कट चालला आहे असे दिसते . . . निघायची वेळ झाली. . . .

प्रकाशराणी तुमची सर्वांची मार्गदर्शिका होईल. तिची आज्ञा पाळा. माझे ऐकता तसे तिचे ऐका. तिच्याजवळ मी एक यक्षिणीची कांडी देऊन ठेवणार आहे. . . आज सायंकाळी मधू व मालती आपल्या मृत आजोबा-आजीस भेटतील. . . कुटुंबातील मृतांच्या संगतीत आजची सायंकाळ ती दवडतील. . . दरम्यान तुम्ही तयारीने राहा. उद्याचं लांबचा प्रवा आहे, जे जे लागण्यासारखे आहे ते ते जमवून ठेवा . . . हं, चला, निघा आपापल्या कामाला सांगितल्याप्रमाणे ? . . .

बोकोबा : (खोटा आव आणून) रूपराणीसाहेब, हेच तर मी या सर्वांना सांगत होतो. . . आपापले कर्तव्य मनापासून व धैर्याने करा असे मी सांगत होतो. परंतु हा मोत्या. . . हा निष्कारणमध्ये अडथळा करीत होता. . .

मोत्या : काय रे सांगतो आहेस ? थांब, मग काढतो तुझे. . .
(मोत्या बोकोबावर उडी मारणार इतक्यात मधू मोत्याच्या हेतू ओळखून त्याला दटावतो.)

मधू : मोत्या गप्प बैस. . . अत:पर काळजी घे. जर पुन्हा असे करताना सापडलास तर याद राख. . .

मोत्या : हे लहानग्या धन्या, हे माझ्या देवा, तुला माहीत नाही ह्यांचा कावा । हा बोकोबाच मघा. . .

मधू : (दटावून गप्प बस. . .)

परी : पुरे आता. निघा. . . आज संध्याकाळपुरता भाकरोबा, तू आपल्या निळ्या पक्ष्याचा पिंजरा मधूजवळ दे. कदाचित तो निळा पक्षी भूतकाळात दडलेला असायचा. आजोबांच्या घरी सापडायचा एखादवेळेस. . . असलाच तेथे तर जवळ पिंजरा असलेला बरा. . . हं भाकरोबा, द्या ना पिंजरा ।

भाकरोबा : (गंभीरपणे) हे पाहा, परी रूपराणी, एक क्षणभरच माझे म्हणणे ऐकून घ्या. (एखाद्या मोठ्या वक्त्याप्रमाणे भाषण करू लागतो.) मी तुम्हा सर्वांच्या समक्ष सांगतो की, जो हा रूपेरी पिंजरा माझ्या स्वाधीन करण्यात आला होता, तो मी. . .

परी : (त्याला थांबवून) पुरे. . . भाषणे नकोत. . . आपण या बाजूने जाऊ व मुले त्या बाजूने जातील. . .

मधू : (जरा सचिंतपणे) आमच्याबरोबर कोणी नाही का येणार ?

मालती : मला तर भूक लागली आहे ।

मधू : मलासुद्धा ! . . .

परी : (भाकरोबास) तुझ्या त्या तुर्की पोशाखाचे आतील लठ्ठ पोटाचा दे एक तुकडा काढून यांना . . .

(भाकरोबा आपला अंगरखा खोलून सुरीने आपल्या पोटाचे दोन कातळे काढून त्या मुलांना देतो.)

शर्करानंद : (मुलांजवळ जाऊन) तुम्हाला थोड्या साखरेच्या कांड्या देऊ का, ह्या घ्या. . .

(आपल्या डाव्या हाताची बोटे मोडून तो त्यांना देतो.)

मालती : अरे, हे काय करतोस तू ? . . . तू आपली सारी बोटे मोडलीस ।

शर्करानंद : खाऊन तर बघ. . . अति गोड आहे ही साखर. . .

मालती : (खाऊन पाहून) खरेच हो. किती छान आहेत ही बोटे ! तुझ्याजवळ अशी पुष्कळ आहेत ?

शर्करानंद : (विनयाने) हो, लागतील तेवढी. . .

मालती : तू बोटे मोडतोस, तेव्हा तुला इजा नाही होत ? दुःख नाही होत ?. . .

शर्करानंद : मुळीच नाही. . . उलट बरेच असते. कारण लगेच दुसरी नवी ताजी बोटे फुटतात, निर्मळ सुंदर बोटे. . .

परी : या आता मुलांनो, फार साखर खाणे बरे नाही. . . आजोबा व आजीजवळ तुम्हाला मेजवानी आहे, ही गोष्ट विसरू नका. . .

मधू : ती का येथे आहेत ?

परी : आता एकदम तुम्हाला दिसतील. . .

मधू : ती तर मरून गेली. आता ती कशी दिसतील, कशी भेटतील ?

परी : तुम्हाला त्यांची आठवण आहे, मग ती कशी मरतील ? ज्यांची स्मृती आहे, त्यांना मृती नाही. . . माणसांना ही गुप्त गोष्ट माहीत नाही. फार थोडे आहे माणसांचे ज्ञान. परंतु तो हिरा आहे ना, त्याच्यामुळे लवकरच तुम्ही मृतांना बघाल, भेटाल. ज्यांची ज्यांची आठवण होत असते, ती ती सारी मृत माणसे सजीव माणसांप्रमाणे सुखात असतात असे तुम्ही पाहाल.

मधू : प्रकाशराणी येणार का आमच्यासंगे ?

परी : नाही. कुटुंबातील मंडळींच्या भेटीगाठीत दुसऱ्याने न जाणे बरे. . . मी येथे जवळच तुमची वाट बघत बसेन. मी सुद्धा येणे बरे नाही. . . त्यांनी मला कोठे दिले आहे आमंत्रण ?

मधू : कोणत्या मार्गाने जाऊ ?

मालती : तिकडून जा. . . हा स्मृतीचा प्रांत. लागलीच त्याची हद्द. . . हिरा फिरवताच तुम्हाला एक प्रचंड वृक्ष दिसेल. त्यावर पाटी असेल लावलेली. त्या पाटीवरून तुमच्या ध्यानात येईल की आपण स्मृतीच्या प्रांतात शिरलो असे. . . परंतु पावणे नऊ वाजता तुम्ही परत आले पाहिजे, विसरू नका बरे. . . ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. . . ध्यानात ठेवा आणि वक्तशीर वागा. जर का उशीर झाला तर सारे ऑफस् होईल. . . बरे, या आता. तात्पुरता निरोप घेतो... (बोकोबा, मोत्या, प्रकाशराणी सर्वांना बोलावून) तुम्ही या बाजूने... आणि मुलांनो, तुम्ही त्या बाजूने. . . (प्रकाशराणी व इतर प्राणी यांच्यासह परी उजवीकडून जाते. मुले डावीकडून जातात.)

प्रवेश दुसरा

स्मृतीचा प्रांत

(दाट धुके : त्या धुक्यातून उजवीकडे एक प्रचंड वृक्ष दिसतो. त्यावर पाटी असते टांगलेली. एक प्रकारचा अस्पष्ट गूढ असा दुधाळ, प्रकाश मधूव मालती झाडाच्या बुंध्याशी असतात.)

मधू : हेच ते झाड. . . .

मालती : आणि ही बघ पाटी . . .

मधू : मला खालून नाही वाचता येत. . . थांब हो, या मुळकंडांवर चढून वाचतो. . . होय ग होय. 'स्मृतीचा प्रदेश' असे यावर लिहिलेले आहे. . .

मालती : येथूनच का हद्द सुरू झाली ?

मधू : असे दिसते. कारण या बाजूला हात केलेला आहे. . .

मालती : मग कोठे आहेत आजोबा, कोठे आहे आजी ?

मधू : बहुधा त्या धुक्याच्या पलीकडे असतील. . . आपण बघू हा . . .

मालती : मला तर काहीसुद्धा दिसत नाही ! . . . माझे हात-पायसुद्धा मला दिसत नाहीत. . . (गारठल्यासारखे करीत) गारठून गेले मी ! नको ते जाणे. मी नाही येत. . . मी घरी जाते मधू. . . .

मधू : अशी रडू नकोस. ये त्या जलराणीसारखी रडतेस काय ? रडण्याची लाज वाटली पाहिजे. . . एवढी मोठी मुलगी झालीस आणि का रडायचे ? हे बघ, ते धुके हळूहळू उडत चालले वर. आता लवकरच धुक्याच्या पाठीमागे काय आहे ते दिसेल.

(धुके उडू लागते. हळूहळू धुक्याचा दाट पडदा विरळ होत जातो. थोड्याच वेळात पारदर्शक स्वच्छ प्रकाशातून पलीकडे दाट पानांच्या छायेत एका शेतकऱ्याची सुंदरशी लहान झोपडी दिसते. तिच्यावर वेल सोडलेले असतात. झोपडीची दारे व खिडक्या उघड्या असतात. तेथे सावलीत मधमाशांची पोळी असतात. फुलझाडांच्या कुंड्या खिडक्यातून असतात. एक पिंजरा असतो व त्यात कृष्णवर्ण पक्षी झोपलेला असतो. दरवाजाजवळ एक बाक असतो. त्या बाकावर एक म्हातारा शेतकरी व त्याची बायको बसलेली असतात. मधू–मालतीचे हेच आजी–आजोबा!)

मधू : (ओळखून) खरेच की ! अग हेच आपले आजोबा, ही आजी !. . .

मालती : (टाळी वाजवून) होय रे होय . . . खरेच रे खरेच. . .

मालती : (अद्याप अश्रद्ध अशा भावाने) पण जरा थांब, मालती. त्यांना हालता, चालता येते की नाही ते आपणास नाही ठाऊक. . . आपण या झाडाच्या पाठीमागे उभी राहू या . . .

(आजी जांभया देत, टिचक्या वाजवीत, आळेपिळे देत जागी होते. तसेच आजोबाही.)

आजी : आपली अद्याप जिवंत असलेली नातवंडे आज आपणास भेटायला येणार आहेत असे वाटते आहे. . .

आजोबा : ती बहुधा आपलाच विचार करीत असतील. कारण माझ्या पायांना सुया, टाचण्या बोचल्याचा भास होत आहे खरा. . .

आजी : ती अगदी जवळच कोठे तरी असावीत. कारण माझ्या डोळ्यांसमोर आनंदाश्रू चमकत आहे, नाचत आहेत. . .

आजोबा : जवळ खास नाहीत. अद्याप बरीच दूर असावती. कारण अद्याप मला तरतरी वाटत नाही. मरगळ्यासारखे वाटत आहे.

(मधू आणि मालती झाडापाठीमागून एकदम धावत येतात.)

मधू व मालती : ही पाहा आम्ही आलो ! . . . ही पाहा आम्ही आलो ! आजोबा, आजी, खरेच आम्ही आलो, पाहा ना ! आम्हीच आहोत. खरेच !

आजोबा : पाहिलंस ? खरे ना ? मी सांगतच होतो, की ती आज येतील म्हणून . . माझेच खरे झाले. . .

आजी : मधू, मालती, खरेच का तुम्ही ? हो, खरेच. . . ही मालतीच . . . (तिला भेटण्यासाठी धावते) मला धावता येत नाही. . . अजून सांधे दुखतच आहेत. . .

आजोबा : (लंगडत लंगडत) मला तरी कोठे पळता येत आहे ? त्या मोठ्या झाडावरून मी पडलो होतो व पाय तुटला होता. तेव्हापासून हा लाकडी पाय आहे. त्याच्याच आधाराने चालावे लागते.

(**आजोबा, आजी, मधू** व **मालती** एकमेकांना भेटतात.)

आजी : किती रे वाढलास तू । चांगलाच उंचबिंच झाला आहेस तू मधू. . .

आजोबा : (मालतीच्या केसांवरून हात फिरवीत) आणि ही मालती, बघ तरी हिच्याकडे ! किती सुंदर केस, कसे गोड डोळे पोरीचे ! . . .

आजी : मधू-मालती, माझ्याकडे या. इकडे या. अशी माझ्याजवळ बसा. माझ्या मांडीवर, तुमचा पापा घेऊ दे. या दोघे. . .

आजोबा : आणि माझ्याकडे . . . ?

आजी : तुमच्याकडे नाही कोणी येत . . . आधी माझ्याकडे या रे. . . हं, सांगा आता सारे, आई व बाबा कशी आहेत ?

मधू : सारी खुशाल आहेत, आजी. . . आम्ही बाहेर पडलोत तेव्हा ती झोपलेली होती. . .

आजी : (त्यांच्याकडे प्रेमाने बघते व त्यांचे मुके घेते.) खरेच, कशी सोन्यासारखी आहेत देवा मुले । . . . तुम्हाला आंघोळ कुणी घातली ? आणि तुमच्या पायमोज्यांना भोकेबिके नाहीत ! छान. . . मी त्यांचा रफू करीत असे. परंतु काय रे, वरचेवर का येत नाही भेटायला ? त्याने आम्हाला खूप आनंद होतो. तुम्हाला पाहिले की बरे वाटते. . . महिन्यापाठीमागून महिने गेले. तुम्ही आम्हाला विसरून गेलात. खरे ना ? कितीतरी दिवसात आम्हाला कोणीही भेटले नाही ?

मधू : आम्हाला येता येईना आजी आणि आजही आलो हे त्या परीच्यामुळे...

आजी : जी जिवंत आहेत, ती भेटावी म्हणून येथे आम्ही नेहमी वाट बघत बसतो. . . परंतु क्वचितच कदाचित कोणी येते ! . . . मागे तू एकदा आला होतास. कधी बरे ! थांब बघते हो . . . हं आठवले. त्या सर्वपित्री अवसेच्या दिवशी. . .

मधू : मला नाही बोवा आठवत. त्या दिवशी आम्ही कोठेही बाहेर गेलो नव्हतो.

आजी : तुम्ही बाहेर नसाल गेलात. तरी पण आमची आठवण त्या दिवशी तुम्हाला झाली होती. . .

मधू : हो. . .

आजी : ज्या ज्या वेळेस तुम्हाला आमची आठवण येते, त्या त्या वेळेस आम्ही जागी होतो व तुम्ही आम्हाला दिसता. . .

मधू : काय, नुसती आम्हाला आठवण होताच . . . ?

आजी : ते जाऊ दे. सारी माहीत आहे तुला लबाडा. . .

मधू : नाही. मला माहीत नव्हते हे . .

आजी : (आजोबांना) आश्चर्यच एकेक. . . पोरे म्हणतात बघा काय ते. आम्हाला काही माहीत नाही म्हणतात ! काहीच शिकत नाहीत का ही ?

आजोबा : दुसऱ्याविषयी जेव्हा जेव्हा ही जिवंत माणसे बोलतात, तेव्हा तेव्हा असाच मूर्खपणा काहीतरी नेहमी करतात.

मधू : तुम्ही का नेहमी झोपलेली असता ?

आजोबा : हो. जिवंत माणसांना आपली आठवण येऊन आपण जागी होऊ अशी वाट बघता बघता भरपूर झोप आम्हाला मिळते. . . जीवन संपल्यावर झोपलेलेच बरे. . . परंतु मधून मधून जागे होण्यात गंमत असते.

मधू : तर मग तुम्ही खरोखरीच मेलेली नाही एकूण . . .

आजोबा : काय म्हणतोस तू ? . . . काय गं काय म्हणतो हा ? असे काही शब्द वापरतो की त्याचा आम्हाला अर्थच कळत नाही. नवीन कारे आहे हा शब्द, नवीन शोध ?

मधू : कोणता शब्द ? 'मेलेला' हा ?

आजोबा : हो. तोच शब्द मला अडला. काय रे त्याचा अर्थ ?

मधू : हात्तेरी ! तो का कठीण आहे शब्द, आजोबा ? त्याचा अर्थ इतकाच की, माणूस जिवंत नाही आता.

आजोबा : तुमच्या तिकडची माणसे मूर्खच दिसतात बेटी !

मधू : येथे चांगले वाटते का तुम्हाला ? येथे सारे छान आहे का ?

आजोबा : फारच छान. तसे येथे वाईट नाही फारसे. बरे आहे, बेश आहे. येथे विडीबिडी जरा ओढायला मिळाली असती...

मधू : येथे विडी नाही ओढू दे ?. . .

आजोबा : ओढू देतात, परंतु माझी चिलीम गेली फुटून ! . . .

आजी : येथे सारे चांगले आहे, जर तुम्ही वरचेवर आलात तर, भेटलात तर. . .

आजोबा : तुला आठवते का रे ? तुला बोंडे भाजून दिली होती आणि तू इतकी खाल्लीस की शेवटी आजारी पडलास !

मधू : मी सबंध वर्षात नसेल खाल्ले भाजलेले बोंड. यंदा बोंडे फार आलीच नाहीत. . .

आजी : मूर्खासारखे बोलू नकोस. . . येथे तर नेहमी असतात बोंडे. . .

मधू : येथली गोष्ट निराळी.

आजी : काय, येथे काय निराळे आहे? काही निराळे नाही. . . आपण जर एकमेकांना भेटू शकतो, मी तुमचे मुके घेऊ शकते, तर मग काय रे निराळे आहे ? जोपर्यंत मी तुमचे मुके घेऊ शकते, तोपर्यंत काही निराळे नाही.

मधू : (प्रथम आजीकडे व नंतर आजोबांकडे बघून) आजोबा, तुम्ही जसे होतात तसेच आहात अगदी. इवलासुद्धा फरक नाही तुमच्यात. . . आणि आजीसुद्धा . . . परंतु तुमचे चेहरे मात्र जरा आधिक चांगले दिसतात. . .

आजोबा : आम्हाला बरे वाटते एकूण येथे . . . आम्ही अत:पर येथे अधिक वृद्ध नाही होत. . . परंतु तू ! किती रे उंच झालास तरी ! . . . एखाद्या ताडासारखा वाढला आहेत ! छान ! त्या दाराजवळ ती बघ तुझ्या उंचीची खूण आहे. तू आला होतास ना त्या सर्वपित्रीला ? त्यावेळची खूण . . . तेथे राहा बरे ताठ नीट उभा ! . . . (मधू दाराजवळ उभा राहतो.) चार बोटे अधिक उंच झाला ! फारच झपाट्याने वाढलास हो. . . (मालतीही उभी राहते.) मालतीही साडेचार फूट ! किती झपाट्याने वाढली पोरे ! खरेच किती ही आश्चर्यकारक वाढ ! . . .

मधू : (आसपास आनंदाने बघत असतो.) तेथे कसालाही बदल झालेला नाही, कशातही झाला नाही. सर्व काही जेथल्या तेथे आहे ! एवढेच की आता सारे अधिक गोड दिसते, सुंदर व रमणीय दिसते ! ते मोठ्या काट्याचे घड्याळ ! त्या काट्याचे टोक मी मोडले होते. . .

आजोबा : आणि ही बशी, जिचा काठ तू फोडला होतास. . .

मधू : आणि मी हे भिंतीला पाडलेले भोक. . .

आजोबा : होय. तू अशी नुकसानी करीत असत. . . आणि माझे लक्ष नसे तेव्हा त्या झाडावर तू चढत होतास ते हे झाड, बोरीचे झाड ! अजूनही लाल बोरे त्याच्यावर आहेत बघ !

मधू : परंतु पूर्वीपेक्षा अधिक चांगली आहेत !

मालती : आणि हा तो कृष्णरंगी पक्षी ! तो अद्याप गातो का ?
(तो कृष्णवर्ण पक्षी एकदम जागा होतो व मोठ्याने गाऊ लागतो.)

आजी : पाहिलेत तुम्ही ?. . . त्याची आठवण काढताच. . .

मधू : (तो कृष्णवर्ण पक्षी एकदम निळा दिसू लागतो. मधू आश्चर्याने बघू लागतो.) हा तर निळा पक्षी. हाच पक्षी त्या परीकडे मला न्यायचा आहे. हाच तो निळा पक्षी ! तुमच्याजवळ तो आहे असे आम्हाला तुम्ही कधी सांगितलेही नाही. ओहो, निळा निळा आहे अगदी. निळ्या निळ्या जाड काचेसारखा ! (आर्जवाने) आजोबा, आजी, मला द्याल का हा निळा पक्षी ?. . .

आजोबा : बघू. कदाचित कदाचित. . . काय गं, तुझे काय मत आहे ?

आजी : टाका ना देऊन !. . . आपल्याला तरी काय आहे त्याचा उपयोग ? पिंजऱ्यात सारखा झोपलेला तर असतो. . . त्याला कधी गाताना तर आजपर्यंत ऐकले नाहीत येथे . . .

मधू : मी माझ्या पिंजऱ्यात त्याला अडकवतो. . . माझा पिंजरा ? कुठे आहे पिंजरा ? खरेच, त्या मोठ्या झाडाच्या पाठीमागे मी विसरलो. . . (धावत जाऊन पिंजरा घेऊन येतो. त्यात त्या निळ्या पक्ष्याला ठेवतो.) खरेच, दिलात ना तो मला ? अगदी खरोखरख का आपली थट्टा ? परी रूपराणी आनंदाने नाचेल. . . प्रकाशराणीलाही कितीतरी आनंद होईल.

आजोबा : हे बघ, त्या पक्ष्याचे काय होईल ते मात्र मला सांगता येणार नाही. . . तुमच्या तिकडचे पुन्हा ते अशांत, चंचल, अस्थिर जीवन त्याला आवडेल की नाही कोणास ठाऊक ? त्या जीवनाची पुन्हा सवय करणे त्याला जड जाईल बहुधा ! या बाजूने येणाऱ्या वाऱ्याच्या पहिल्या झुळकेबरोबर तो बहुधा पुन्हा निघून येईल . . . बघू या काय काय होईल ते . . . सध्या ठेव त्याला तेथे . . . इकडे ये. ही गाय बघ आपली. . .

मधू : (मधमाशांच्या पोळ्याकडे पाहून) मधमाशांचे कसे काय चालले आहे ?

आजोबा : ठीक चालले आहे. . . तुम्ही तुमच्या तिकडे जिवंत म्हणता तशा नाहीत त्या आता. तरी पण खूप काम करतात त्या . . .

मधू : (पोळ्याजवळ जाऊन) खरेच, मधाचा कसा वास येतो आहे? किती जड असतील ही पोळी !. . . किती सुंदर दिसत आहेत ! आणि माझ्या मेलेल्या बहिणी, त्याही येथे आहेत का ?

मालती : आणि पुरलेले माझे तीन लहान भाऊ कोठे आहेत ?

(ते शब्द उच्चारले जाताच सात लहान मुले निरनिराळ्या आकारांच्या झोपडीतून एकापाठीमागून एक बाहेर येतात.)

आजी : ही पाहा आली सारी, ही पाहा । तुम्हाला त्यांचा विचार येताच, त्यांची आठवण येताच, त्यांच्याबद्दल बोलताच ती आपली सारी आली धावत ! गोड मुले !

(मधू व मालती सर्व भावंडांना भेटायला जातात. ती एकमेकांना मिठ्या मारतात. हातात हात घेऊन नाचतात, आनंदाने ओरडतात.)

मधू : काय रे यशवंत ! (दोघे एकमेकांचे केस ओढतात.) पुन्हा पूर्वीप्रमाणे का झोंबाझोंबी करायची ? आणि हा सदानंद ! आणि हा वासू. . . सदानंद, तुझा भोवरा कोठे आहे ? . . . आणि ही सुंदर, ही नली, ही इंदू ! . . . आणि ही पाहा कुसुमी !

मालती : ओहो, खरेच कुसुमी, चिमुकली कुसुम ! काय ती अजून रांगतेच आहे वाटते ? . . .

आजी : होय, ती आता आणखी वाढत नाही, तेवढीच ती. . .

मधू : (त्यांच्याभोवती एक लहानसे कुत्रे ओरडत असते ते पाहून) अरे, हा तर छोटा टिप्या ! याचीच तर शेपटी मी इंदूच्या कात्रीने कापली होती. . . त्याच्यातही काही फरक नाही झाला.

आजोबा : येथे कशातही कधीही फरक होत नाही, जसेच्या तसे, जेवढेच्या तेवढे असते. . .

मधू : आणि इंदूच्या नाकावर ती पुटकुळीही तशीच आहे अजून . . . !

आजी : होय. ती तशीच राहील, जाणार नाही. त्याला इलाज नाही. . .

मधू : किती छान दिसतात सारी गुबगुबीत व गोंडस ! कसे सुरेख गाल आहेत ! येथे चांगले मिळते वाटते खायला प्यायला ?

आजी : जगण्यचे थांबवल्यापासून त्याची प्रकृती बरीच सुधारली. . . आता कशाची भीती नाही. कोणी कधी आजारी पडत नाही. . . (खोलीतील घड्याळात ठोके पडतात.)

आजी : (आश्चर्याने) कसला हा आवाज, काय बरे ?. . .

आजोबा : मलाही कल्पना नाही करवत... परंतु घड्याळाचा आहे हा आवाज...

आजी : छे! काहीतरीच. . . घड्याळाचे ठोके कधीही पडत नाहीत येथे. . .

आजोबा : ठोके पडत नाहीत. कारण काळवेळ समजण्याची आपणास जरूरच कधी पडत नाही. . . येथे कोणी किती वाजले वगैरे मनात विचार करीत होते का ?

मधू : हो. मी विचार करीत होतो. . . किती वाजले ?

आजोबा : मला सांगता येणार नाही. . . मी विसरून गेलो ते सारे. . . आता आठ ठोके पडले, त्यावरून तुमच्या तिकडे ज्याला आठ वाजले म्हणतात, तितके वाजले असावेत. . .

मधू : पावणेनऊ वाजता प्रकाशराणी माझी वाट पाहील. . . त्या परीनेही तसे सांगितले आहे. . . तिच्यासाठी गेले पाहिजे. . . फार महत्त्वाचे काम आहे. मी घेतो आता रजा ! . . .

आजी : असा एकदम नको रे जाऊ! रात्रीचे जेवणही तयार आहे !. . . चला लवकर पाने घेऊ. . . आज कोबीची छानदार भाजी केली आहे व बोरे घालून कढी केली आहे. . .

(पाटपाणी करतात. ताटे–वाट्या घेतात. सर्व मिळून भराभरा वाढतात.)

मधू : निळा पक्षीही मिळाला. बरे झाले. . . कोबीची भाजी कितीतरी दिवसांत नाही खाल्ली. . . प्रवासाला निघाल्यापासून नाहीच खाल्ली. . . हॉटेलात कोणी करीतच नाही. . .

आजी : पोटभर जेवा! स्वयंपाक करायला वेळ नाही लागला ! . . . बसा सारी जणे . . . आता वेळ नका दवडू. . . घाई आहे ना जायची ? मग उरका भराभर. . .

(आजोबा–आजी बसतात. सारी मुलेही लकटालकटी करीत बसतात. हसतात, खिदळतात, आरडाओरड करतात.)

मधू : (एखाद्या अधाशासारखे खात) किती सुंदर आहे सारे ! किती छान भाजी! . . . मला आणखी पाहिजे. . . आणखी . . . तो ताटात वाजवतो. . .

आजोबा : हे बघ, जरा दमाने घे. जरा शांतीने वाग . . . पूर्वीसारखाच खट्याळ आहेस अजून. . . सारी आदळआपट. . . फोडशील ते ताट. . .

मधू : (एकदम उभा राहून) मला आणखी वाढा, आणखी . . .

(तो भाजीचे पातेले एकदम धरतो, परंतु हातातून ते निसटते. ते खाली पडते. मधूच्या अंगावर कढत कढत रस सांडतो. अंग भाजते. तो ओरडतो, किंचाळतो.)

आजी : तरी मी सांगत होते की जरा हळू म्हणून. . .

आजोबा : (मधूला एक तडाखा देतात.) देऊ आणखी एक रगाडा ?

मधू : (क्षणभर गोंधळतो. परंतु लगेच आश्चर्य प्रकट करण्याकरिता गालावर बोट ठेवतो.) आजोबा, तुम्ही जिवंत असताना मारीत होता, अगदी तसेच आजही मारलेत ! आजोबा, तुमचा मार गोड लागत असे, आजही तसाच लागला ! मी तुमचा पापा घेऊ ?

आजोबा : तुला वाजले किती पाहिजे होते ना ? हे पाहा ठोके पुन्हा पडणार वाटते ?...

मधू : अरे बाप रे ! साडेआठ वाजले ! . . . (तो चमचा फेकतो, ताट दूर ढकलतो.) मालती, अगदी थोडा वेळ आहे. ऊठ, चल. . .

आजी : अरे, आणखी पाच मिनिटे थांब ! इतकी गर्दी काय आहे ? का घराला आग लागली आहे ? कधी कपिलाषष्ठीच्या योगाप्रमाणे येता ! आणि त्यात पुन्हा अशी घाई !. . .

मधू : नाही, आता आणखी नाही थांबता येणार ! . . . प्रकाशराणी फार दयाळू आहे. . . मी येण्याचे वचन दिले आहे. . . मालती, चल नीघ लवकर...

आजोबा : या जगणाऱ्या मंडळींची कोण ही घाई ! कोण धावपळ ! त्यांची सर्व गोष्टींची आपली गर्दी ! एकेक पाहावं तो आपली गंमत !. . .

मधू : (पिंजरा घाईघाईने उचलतो व भराभरा सर्वांचा निरोप घेतो.) नमस्कार आजोबा, जातो हां आजी ! . . . साऱ्या भावंडांनो, येतो हा आम्ही ! यशवंत, सदानंद, वासुदेव, सुंदर, इंदू, नल्ये, कुसुम्ये आणि टिप्या ! जातो हां. . . आता थांबता नाही येणार . . . हे काय, रडू नका आजी ! आम्ही वरचेवर येऊ हां भेटायला . . . !

आजी : दररोज या ! . . .

मधू : हो, खरेच येऊ, जितके वेळा येता येईल तितके वेळा येऊ. . .

आजी : तुम्हाला भेटणे एवढाच काय तो आमचा आनंद ! तुमचे विचार आमच्याकडे आले म्हणजे किती बरे वाटते आम्हाला !

आजोबा : आम्हाला दुसरी करमणूक नाही. . .

मधू : वेळ नाही आता, मालती, चल ! . . . माझा पिंजरा !. . . माझा पक्षी !...

आजोबा : (पिंजरा देऊन) हा घे पिंजरा व पक्षी ! . . . हे बघ, हा पक्षी टिकेलच अशी काही खात्री मला देता येणार नाही, त्याचा रंगही तुला पाहिजे तसाच निळा आहे की नाही कोणास ठाऊक !. . .

मधू : नमस्कार, नमस्कार ! . . .

सारी भावंडे: मधू, येहो ! . . . मालती, ये बरे !. . . कसे होत खायला येथे ! . . . या पुन्हा या, वरचेवर या !. . .

(सारी हातरुमालाने निरोप देतात, हातरुमाल हलवतात. मधू व मालती हळूहळू जाऊ लागतात. प्रवेशाच्या आरंभी धुके होते, तसे पुन्हा जमू लागते. शेवटी धुक्यात सारी अदृश्य होतात आणि पडदा पडायच्या वेळेस फक्त मधू व मालती झाडाखाली दिसतात.)

मधू : मालती, हा रस्ता बहुधा !. . .

मालती : प्रकाशराणी कोठे गेली ?. . .

मधू : मला नाही माहीत . . . (पिंजऱ्यातील पक्ष्याकडे पाहून) हे काय, हा निळा पक्षी नव्हे !. . . हा तर काळा झाला पुन्हा ।

मालती : भाऊ, हात धर माझा. . . मला भय वाटते, मी गारठून गेले !

(पडदा)

✦✦✦

अंक तिसरा

प्रवेश पहिला

निशादेवीचा राजवाडा

(एक मोठा भव्य दिवाणखाना. तो दिवाणखाना जरा गंभीर वाटतो. एक प्रकारचे प्रखर असे, कठोर असे, निर्जीव असे वातावरण तेथे वाटते. जसे एखाद्या जुन्या मोठ्या मंदिरात वाटते. मोठमोठे खांब, कमानी सारे असते. काळे आरसपानी खांब, हस्तिदंताचे सोन्याचेही काम त्यावर चालते. त्या दिवाणखान्याचे एका पाठीमागे एक जरा उंच असे तीन विभाग पाडलेले असतात. उजवीकडे व डावीकडे पंचरसी धातूचे उग्र दरवाजे असतात. अगदी पाठीमागे प्रचंड असा दरवाजा. एक प्रकारचा अस्पष्ट प्रकाश दिवाणखान्यात असतो. तो प्रकाश त्या काळ्या आरसपानी खांबातून, हस्तिदंतातून जणू बाहेर पडत असतो. पडदा उघडण्याच्या वेळेस एका अगदी वृद्ध अशा स्त्रीच्या वेशात निशा प्रवेश करतो. लांब, काळे तिचे कपडे असतात. दिवाणखान्यातील दुसऱ्या दालनात ती बसलेली असते. तिच्या दोन बाजूस दोन मुले असतात. एक जवळजवळ अगदी उघडेनागडे असे असे तेथे झोपलेले असते. मदनाप्रमाणे ते वाटते. झोपेत ते मंद स्मित करीत असते. दुसरे मूल उभे असते. ते नि:स्तब्ध असते. जराही हालत नाही. चालत नाही. पायापासून डोक्यापर्यंत त्याच्या अंगावर बुरखा असतो.)

(उजवीकडून अगदी पुढच्या बाजूने बोकोबा प्रवेश करतात.)

निशा : कोण जात आहे ते ?

बोकोबा : (आरसपानी पायऱ्यांवरून खाली येत) मी आहे, निशामाते ! . . . मी अगदी थकून गेलो आहे ।

निशा : काय रे झाले बाळ ? . . . तुझा चेहरा फिक्कट दिसतो आहे. तू बारीक किती झालास ! आणि साऱ्या अंगावर चिखल उडाला आहे. तुझ्या मिशांवरही

चिखल उडाला आहे. . . पुन्हा का पावसात भांडत होतास कोणाबरोबर? . . . त्या कौलांवर का भांडत होतास ? . . .

बोकोबा : भांडण नाही तंडण नाही. कोठली कौले नि काय ?. . . जीवनमरणाचा समोर प्रश्न आहे. आपले सर्व गुपित आज धोक्यात आले आहे !. . . सर्वनाश समीप आला आहे. . . तुला सावध करण्यासाठी, धोक्याची सूचना देण्यासाठी मी कसा तरी क्षणभर पळून आलो आहे. परंतु काहीही करता येणार नाही असे वाटते!. . . .

निशा : काय आहे सारे ? काय काय होणार आहे ? का नाही काही इलाज करता येणार ?. . .

बोकोबा : मी तुला त्या लहान मधूविषयी सांगितले होते. त्या लाकडूतोड्याचा मुलगा? त्याच्याजवळ तो जादूचा हिरा आहे. त्याविषयी तुला सांगितले होते. . . आणि आता तो मुलगा इकडे येत आहे. तुझ्याजवळ निळा पक्षी मागण्यासाठी येत आहे. . . .

निशा : त्याला अद्याप तो निळा पक्षी मिळाला नाही का ?. . .

बोकोबा : परंतु लवकरच त्याला तो मिळेल. म्हणून आपण काहीतरी चमत्कार केला पाहिजे. . . सारी सद्य:स्थिती तुझ्या कानी घालतो. सारा घोटाळा ती प्रकाशराणी करीत आहेत. ती फितूर झाली आहे. तिने मनुष्याची बाजू घेतली आहे. ती त्याला मार्ग दाखवणार आहे. खरोखरचा निळा पक्षी जो दिवसाच्या उजेडात जगू शकतो, तो येथे आहे, ही गोष्ट प्रकाशराणीला माहीत आहे. चंद्रकिरणांवर जगणारे व सूर्याचा प्रकाश दिसताच मरणारे जे स्वप्नातील निळे पक्षी येथे राहतात.त्या निळ्या पक्ष्यांत तो निळा पक्षी लपवून ठेवलेला आहे. तुझ्या राजवाड्याचा उंबराही चढण्याला प्रकाशराणीला मज्जाव आहे. तिला ही गोष्ट माहीत आहे. ती येथे न येता त्या मुलांना पाठवणार आहे. तुझ्या गुपितांचा दरवाजा उघडण्यांपासून तू मनुष्याला परावृत्त करू शकणार नाहीस. तू त्याला विरोध करू शकणार नाहीस. तेव्हा आता पुढे काय होणार, मला तरी काही समजत नाही. . . जर का खरोखरचा निळा पक्षी आपल्या दुर्दैवाने त्यांना सापडला, तर मग आपल्याला नष्ट व्हावे लागेल. दुसरे गत्यंतर नाही.

निशा : खरेच का बोकोबा ?... किती कठीण आला काळ ! जगायचे तरी मेले कसे ! क्षणांची विश्रांती मिळत नाही... अलीकडे या माणसांचे काही समजेनासे

झाले आहे. काय आहे तरी काय त्याच्या मनात ?... अगदी सारे सारे का समजून घेण्याचे त्याच्या मनात आहे ? त्याला का सर्वज्ञ व्हायचे आहे ? एरवी थांबणार नाही का तो ? माझ्या गुपितातील तिसरा हिस्सा तर त्याने नेलाच. माझ्याजवळ जी भये होती, ती भयेच आता भिऊ लागली. बाहेर पडण्याची त्यांची छाती नाही होत. माझ्याजवळ जी भुतेखेते होती, तीही उडून गेली सारी. माझ्याजवळ असलेले बरेचसे आजार स्वत:च आजारी पडले आहेत !

बोकोबा : निशामाते, सारे मला माहीत आहे. काळ मोठा बाका आला आहे. आता जगणे कठीण झाले आहे. या मनुष्याच्यविरूद्ध फक्त आपणच झगडत आहोत. . . ती आली वाटते. चाहूल ऐकू येत आहे. . . आता एकच मार्ग आहे. ती आहेत लहान मुले. त्यांना असे एकदम घाबरवू. अशी भीती घालू की, 'तो पाठीमागचा गुपितांचा प्रचंड दरवाजा उघडा' असा हट्ट ती धरणार नाहीत. त्या दरवाजापलीकडेच चंद्रलोकींचे पक्षी आहेत... दुसऱ्या गुहेतील गुपिते पाहूनच त्यांचे मन रमेल, भीतीही वाटेल.

निशा : (बाहेरचा आवाज ऐकून) कसला हा आवाज? . . . पुष्कळ आहेत वाटते मुले ? मोठी का आहे पलटण ? . . .

बोकोबा : भिण्याचे कारण नाही. हे आपले मित्र आले, हा भाकरोबा, हा शर्करानंद, आज जलराणीला बरे नाही वाटत आणि अग्नी येऊ शकत नाही. कारण प्रकाशराणीचे व त्याचे नाते आहे. . . फक्त मोत्या आपल्या बाजूला नाही आणि त्याला दूर राखणे अशक्य आहे. . . .

(उजवीकडून पुढच्या बाजूने मधू, मालती, भाकरोबा, शर्करानंद, मोत्या भीत भीत प्रवेश करतात.)

बोकोबा : (मधूकडे धावून) माझ्या लहानग्या धन्या ! या बाजूने. . . या बाजूने. . . तुम्ही येणार म्हणून मी निशामातेला सांगितले. तिला किती आनंद झाला! आज तिला जरा बरे वाटत नाही, म्हणून ती उठून पुढे येऊ शकत नाही. क्षमा करा छोटे धनीसाब. . . !

मधू : सुप्रभात, निशाबाई. . .

निशा : (जरा रागावून) सुप्रभात ? . . . मला नाही असले ऐकण्याची सवय . . . 'शिव रात्र' असे म्हणा, निदान 'शिव सांजा' असे तरी म्हटले पाहिजे...

मधू : (खट्टू होऊन) क्षमा करा बाईसाहेब. . . मला ठाऊक नव्हते. . . (त्या दोन मुलांकडे बोट करून) ही का तुमची मुले ? . . . फार सुंदर आहेत...

निशा : हिचे नाव 'निद्रा'...

मधू : किती लठ्ठ आहे तरी ।... इतके का हो लठ्ठ ?...

निशा : कारण त्याला गाढ झोप लागते...

मधू : आणि या मुलाचे नाव काय ? सर्वांगावरून बुरखा घेतला आहे. तोंड का बरे लपवले आहे त्याने ?.. आजारी का आहे ?... सांगा ना त्याचे नाव?..

निशा : निद्रेची ही बहीण... तिचे नाव न सांगणे बरे...

मधू : का बरे ?

निशा : तिचे नाव ऐकून बरे नाही वाटणार... ते जाऊ दे. आपण दुसरे काही बोलू... बोकोबाने सांगितले की, तुम्ही निळ्या पक्ष्यासाठी खाली आलात म्हणून...

मधू : होय, बाईसाहेब. खरी आहे ती गोष्ट. रागावू नका. तो पक्षी कोठे आहे सांगाल का?

निशा : बाळ, मला नाही रे माहीत... । मला इतकेच माहीत आहे की, तो तेथे नाही... मी कधीही तो पाहिला नाही.

मधू : काहीतरीच... प्रकाशराणीने सांगितले की, तो येथेच होता. प्रकाशराणी खरे तेच सांगते... तुमच्या किल्ल्या मला देता का ?...

निशा : बाळ, मी सांगते ते ऐक. हे बघ. जो कोणी येईल त्याला मी कशा बरे देऊ किल्ल्या? मला नाही देत येणार... निसर्गाची सर्व गुपिते मी सांभाळीत असते. मी राखणदार आहे. किल्ली कोणालाही द्यायची नाही, मुलांना तर नाहीच नाही, असे मला निक्षून बजावण्यात आलेले आहे!...

मधू : जेव्हा जेव्हा मनुष्य तुमच्याजवळ किल्ल्या मागेल, तेव्हा नाकारण्याचा तुम्हाला हक्क नाही, मला हे माहीत आहे...

निशा : कोणी सांगितले तुला ?

मधू : प्रकाशराणीने...

निशा : पुन्हा प्रकाशराणी ! जेथे तेथे हिची लुडबूड ! साऱ्या ठिकाणी तोंड खुपसायला तिला भीतीही वाटत नाही...!

मोत्या : हे माझ्या लहानग्या देवा, हे माझ्या प्रभो, घेऊ का तिच्याजवळून बळजबरीने ओढून...?

मधू : गप्प बस तू. शांत राहा व नीट वाग... (निशेला) हं, द्या बाईसाहेब किल्ल्या, कृपा करून किल्ल्या द्या...

निशा : तुझ्याजवळ निदान ती खूण तरी आहे का ? . . . कोठे आहे ?. . .

मधू : (टोपीला हात लावून) हा पाहा हिरा !. . .

निशा : (सारे उपाय हरले असे पाहून) बरे तर. . . या दिवाणखान्याची सारी दारे उघडणारी ही घे किल्ली. . . सकंट आले, अपाय झाला, तर माझ्याकडे नाही.

भाकरोबा : धोक्याचे आहे का . . . ?

निशा : धोक्याचे ? . . . त्या दरीवरचे ते पंचरसी दरवाजे उघडले, तर माझीही काय दशा होईल मला कल्पना करवत नाही. . . या दिवाणखान्याच्या सभोवतालच्या प्रत्येक गुहेत सारी संकटे, सारे उत्पात, साऱ्या आपत्ती, साऱ्या भयाण भेसूर वस्तू, जागाच्या आरंभापासून जीवनाला सतावणाऱ्या सर्व वस्तू कोंडून ठेवलेल्या आहेत. . . नियतीच्या मदतीने त्या सर्वांना मी मोठ्या मुष्किलीने स्थानबद्ध केले आहे. फार बंडखोर आहेत ती मंडळी. त्यांची व्यवस्था ठेवायला मला किती कष्ट पडतात सांगू ! . . .

त्यांच्यापैकी एखादाही पृथ्वीवर जर पळून आला, तर तुमची कशी त्रेधातिरपिट उडते, ते तुम्ही पाहिलेच आहे. . .

भाकरोबा : या मुलांचा सांभाळ करण्याचे काम साहजिकच मजकडे आहे. कारण मी वडील आहे, अनुभवी आहे आणि या मुलांवर माझी भक्तीही आहे म्हणून हे निशाबाई, एक प्रश्न विचारायची अनुज्ञा दे. . .

निशा : खुशाल विचारा. . .

भाकरोबा : संकट आलेच, तर निसटून जाण्याचा मार्ग ?

निशा : निसटून जाण्याला मार्ग नाही.

मधू : (किल्ली घेऊन व पायऱ्या चढून) येथूनच आरंभ करू या . . . या पंचरसी दरवाजापाठीमागे काय आहे ? . . .

निशा : मला वाटते तेथे पिशाचे आहेत. . . हा दरवाजा उघडल्याला पुष्कळच दिवस झाले, त्यावेळेपासून ती आतच आहेत. . .

मधू : (कुलपात किल्ली घालून) मी बघीन. . . भाकरोबाला. निळ्या पक्ष्यासाठी आणलेला पिंजरा आहे ना तुझ्याजवळ ?

भाकरोबा : (दात वाजवत) तशी काही मला भीती नाही वाटत. परंतु दरवाजा न उघडणे बरे असे मला वाटते. या भोकातून आत डोकवावे.

मधू : तुझा उपदेश नको मला, सल्ला नको मला. . .

मालती : (एकदम रडू लागते.) मला भीती वाटते. . . शर्करानंद कोठे आहे ? . . . मला घरी जायचे आहे.

शर्करानंद : (उत्सुकतेने व आढ्यतेने) हा मी येथे आहे, ताईसाहेब. . . रडू नका . . . मी माझे एक बोट बोडून देतो हं ! म्हणजे साखरेची कांडी होईल चुंफायला...

मधू : पुरे तुमचे ! . . .

(किल्ली फिरवतो व सावधपणे दार खोलतो. एकदम पाच-सहा पिशाचे नाना आकारची, विचित्र रूपांची बाहेर पडतात व चोहोबाजूस पळतात. मालती भीतीने किंचाळते. भाकरोबाची पाचावर धारण बसते. हातातील पिंजरा फेकून दिवाणखान्याच्या मागे तो लपतो. निशा त्या पिशाचांच्या पाठीस लागते व मधूला हाका मारते.)

निशा : मधू ! अरे, पटकन दार बंद कर, त्वरा कर ! ती पळतील सारी मग त्यांना पकडताना नाकी नऊ येतील ! . . . त्यांना तेथे आत अगदी कंटाळा येतो. मनुष्य त्यांची फिकीर बाळगीनासा झाल्यापासून तर त्यांना फारच कंटाळवाणे वाटते. . . (पिशाचांच्या मागे ती लागते व सर्पाचा केलेला चाबूक हातात घेऊन त्यांना वठणीवर आणते. सर्वांना हाकलीत पुन्हा दाराशी आणते.) मधू अरे, मला मदत करा, या इकडे या ! . . .

मधू : (मोत्यास) मोत्या, जा मदतीला जा ! . . .

मोत्या : (भुंकतो व उडी मारतो.) होय, जातो मदतीला, हा चाललो । . . .

मधू : आणि भाकरोबा कोठे आहे ? . . .

भाकरोबा : (दिवाणखान्याच्या पाठीमागून) मी येथे आहे. . . त्यांना बाहेर नाही जाऊ देणार ।. . .

(एकच पिशाच त्या बाजूने जाते व भयानक आरोळी मारीत जोराने पळते.)

निशा : (मान धरून पकडून आणलेल्या तिघांना) जा आत, तिकडे कुठे जाता ? इकडे, अस्से. (त्यांना ती आत ढकलते.) बसा आत आता. (मोत्या आणखी दोन धरून आणतो.) ही आली दोघे. ठीक. त्वरा करा. जा आत लवकर. तुम्हाला वर्षातून एकच दिवस बाहेर येण्याची परवानगी आहे. (ती दार लावते.)

मधू : (दुसऱ्या दाराशी जाऊन) याच्या आत काय आहे ?

निशा : काय सांगून फायदा ? येथे निळा पक्षी नाही म्हणून सांगितले ना एकदा ?. . . तरीही जशी तुझी इच्छा । . . . उघड ते दार उघडायचे असेल तर. . . यात सारे आजार आहेत.

मधू : (कुलपात किल्ली घालून) उघडताना फार सावधगिरी घेतली पाहिजे का?

निशा : काही जरूर नाही. शांत आहेत बिचारी सारी. . . त्यांना बिलकूल सुख नाही. . . या सर्व रोगराईशी मनुष्याने अशी काही अलीकडे जोरदार लढाई चालवली आहे की, बिचाऱ्यांचे काही चालत नाही ! . . . जंतूंचा शोध लागल्यापासून तर फारच हाहा:कार यांच्यात उडाला आहे ! . . . उघड आणि बघ. . .

(मधू दार उघडतो, अगदी सताड उघडतो. कोणी दिसत नाही.)

मधू : ती बाहेर येत नाही वाटते ?. . .

निशा : मी सांगितले ना की, या रोगांना आता जोर राहिला नाही. सारे आजार बेजार झाले आहेत. त्यांच्यात त्राण नाही उरले. त्यांचा धीर खचला आहे. डॉक्टरांची त्यांच्यावर फार करडी नजर. . . जा ना आत ! आणि स्वत:च्या डोळ्यांनीच पाहा. . .

(मधू आत जातो व लगेच बाहेर येतो.)

मधू : निळा पक्षी तेथे नाही. . . हे तुमचे सारे रोग व ते आजार फारच दुर्मुखलेले दिसतात. त्यांना बरेही वाटत नाही बहुधा. त्यांनी डोके जरासुध्द वर नाही केले. . . (एक आजार पायात हलके बूट घालून, एक साधी टोपी घालून बाहेर पडतो व दिवाणखान्यात नाचू-बागडू लागतो.) हा पाहा ! हा एक लहानसा आजार पळू बघत आहे येथून . . . काय याचे नाव ?

निशा : हा काही महत्त्वाचा आजार नाही. अगदीच क्षुद्र आहे हा. याला थंडीपडसे म्हणतात. . . या रोगाच्या पाठीमागे हात धुऊन फारसे कोणी लागत नाही, म्हणून याची अद्याप धडगत आहे, प्रकृती जरा टुणटुणीत आहे. . . (त्या थंडी-पडशाला हाक मारून) इकडे ये रे जरा. . . बघू, इतक्यात नको तू बाहेर पडू. हिवाळा येईपर्यंत वाट पाहा.) ते थंडी-पडसे खोकत, शिंकत, नाक शिंकरीत पळून गुहेत जाते. मधू दार बंद करतो.)

मधू : (दुसऱ्या दाराशी जाऊन) आता यात पाहू या . . . येथे काय आहे ? . . .

निशा : जपून राहा. . . येथे युद्धे आहेत. ती पूर्वीइतकी जोरदार व भयंकर नसत... यातील जर का एखादे बाहेर पडले, तर काय होईल देव जाणे ! . . .

त्यातल्या त्यात एवढे बरे की ती अधिक भयंकर झाली असली, तरी अधिक अवजडही झाली आहेत. त्यामुळे त्यांना पटकन नाही पळता येत. जरा हळू चालतात. . . परंतु दार एकदम लोटायला तयार राहिले पाहिजे. पटकन आत डोकावून घे. सर्वांनी तयार राहावे दार पटकन बंद करायला.

(अत्यंत दक्षतापूर्वक मधू दार उघडतो. किलकिले करतो. त्या लहानशा फटीतूनच तो आज बघतो. लगेच दार घट्ट लावतो. दाराला पाठ देऊन उभा राहतो व ओरडतो.)

मधू : घाई करा, त्वरा करा, लोटा दार. करा बंद. सर्व शक्ती लावा. त्यांनी पाहिले मला. . . ती सारी बाहेर येत आहेत. . . दरवाजा पाडणार, फोडणार!. . .

निशा : सारी एकदम या व जोर करा ! . . . लोटा जोराने ! भाकरोबा, तू काय करतो आहेस ? ढकला जोराने ! . . . ती युद्धे किती जोरदार आहेत ! . . . हा, लावा नेट, अस्स, ठीक झाले ! . . . गेली, मागे गेली !. . . आली होती हो कठीण वेळ !. . . तू खरेच का त्यांना पाहिलेस !. . .

मधू : हो, खरोखरच पाहिले!. . . अजस्र व भयाण दिसतात। परंतु त्यांच्याजवळ निळा पक्षी आहे असे नाही वाटत !. . .

निशा : नाहीच त्यांच्याजवळ, निश्चिंत राहा. . . त्यांच्याजवळ असता, तर त्यांनी तो तेव्हाच गट्ट केला असता. . . झाले ना आता पुष्कळ पाहून ? झाली ना खात्री ? . . . येथे नाही हो तो पक्षी ! काय करायचे ?. . .

मधू : मला सारे पाहिले पाहिजे. . . प्रकाशराणी म्हणाली की सारे पाहा. . .

निशा : प्रकाशराणीला म्हणायला काय जाते ? भीतीने घरी राहायचे व दुसऱ्याला सांगायचे !. . .

मधू : चला दुसऱ्या दाराकडे. . . येथे काय आहे ?

निशा : येथे छाया व महाभये मी कोंडून ठेवली आहेत. . .

मधू : मी उघडू का दार ?

निशा : उघड. काही हरकत नाही. . . ती शांत आहेत सारी, निरुपद्रवी आहेत. त्या दुबळ्या आजारांप्रमाणेच हीही आहेत. . .

मधू : (त्याला नीट विश्वास वाटत नाही. तो अर्धेमुर्धे दार उघडतो व आत डोकावतो.) येथे नाहीत वाटते ती?. . .

निशा : (आत डोकावून) छायांनो, इकडे या बघू जरा! काय करता आहात ? क्षणभर इकडे बाहेर या व पाय जरा मोकळे करा. त्याने बरे वाटेल तुम्हाला. . आणि महाभयांनो! तुम्हीही या . . . भिण्यासारखे काही नाही. . . (काही छाया व काही महाभये येतात. स्त्रियांच्या रूपात ती असतात. त्यांच्या तोंडावरून बुरखे असतात. छायांच्या तोंडावर काळे बुरखे व महाभयांच्या तोंडावर हिरवट रंगाचे. गुहेबाहेर भीत भीत भीत ती दोन पावले येतात. मधूची थोडीशी हालचाल दिसताच एकदम पुन्हा आत जातात.) अरे या ही भीती कशाची ?. . . हा एक लहानसा मुलगा आहे. . . तो तुम्हाला इजा करणर नाही. . . . (मधुला) फारच भित्री झाली आहेत ही सारी. ती पाठीमागे आहेत ना जरा मोठीशी, ती मात्र थोडी धीट आहेत.

मधू : (गुहेत आत खोल बघून) अरे बाप रे, किती अक्राळ विक्राळ . . . !

निशा : साखळदंडाने ती बांधलेली आहेत. . . मनुष्याची ह्यांनाच काय ती फक्त भीती वाटत नाही. . . परंतु बंद कर दार, नाही तर ती संतापतील...

मधू : (दुसऱ्या दाराकडे जाऊन) ही फारच अंधारी गुहा आहे. होय ना ? येथे काय आहे ?

निशा : हिच्या आत अनेक रहस्ये आहेत, गुपिते आहेत! तुला पाहायचीच असतील, तर उघड दार; परंतु आत नको जाऊ... जपून राहा आणि युद्धांचा दरवाजा बंद करण्याची काळजी घेतली, तशीच येथेही घ्यावी लागेल.

मधू : (अर्धवट दार उघडतो. अत्यंत काळजीपूर्वक फार जपवून आत डोकावतो.) हे काय! किती गारठा हा ! . . . माझे डोळे चुरचुरू लागले. लावा, बंद करा, त्वरा करा. अरे, आपणाला ती ढकलीत आहेत. या सारी. त्यांना लकटू या आत. . . (**निशा, मोत्या, बोकोबा, शर्करानंद** सारी मिळून दार बंद करतात.) पाहिले एकदाचे भयाण दृश्य !

निशा : काय पाहिलेस ?

मधू : (अस्वस्थ होऊन) मला सांगता नाही येत, परंतु भेसूर भयंकर देखावा । . . . त्यांना डोळे नव्हते. प्रचंड राक्षसांप्रमाणे ती सारी बसलेली होती. . . मला धरू बघणारा तो कोण होता राक्षस ?

निशा : त्याचे नाव बहुधा **स्तब्धता** असेल. या दाराची त्याच्यावर जबाबदारी आहे. . . फार भीती वाटली वाटते तुला ? फार घाबरलास, होय ना ? तोंड पांढरे फटफटीत झाले तुझे आणि सारे अंग कापत आहे.

मधू : खरेच, असे काही असेल तर मला वाटले नव्हते. कोणी सांगितले असते तरी विश्वास नसता ठेवला. . . कधीही असे दृश्य नव्हते पाहिले. . . माझे हात गारठून गेले आहेत . . .

निशा : तू आणखी पुढे पाहण्याचा हट्टी धरशील, तर अधिकच भयंकर देखावे बघावे लागतील. त्रास होईल. . .

मधू : (दुसऱ्या दाराकडे जाऊन) यात काय आहे ? . . . हीही का भयंकर आहे जागा ? . . .

निशा : नाही. . . येथे सर्व काही थोडेथोडे आहे. . . बेकार **तारे** मी येथेच ठेवते. तसेच माझी काही **उटणी**, काही माझे **सुगंध** येथेच ठेवते. **काजवे**, दुसरे चमकदार प्रकाश देणारे **कीटक**, रात्री लाटांवर व रानावनात एकदम दिसणाऱ्या **ज्वाळा**, या माझ्या **चमकी** हो. त्याही मी येथेच ठेवते. तसेच **दवबिंदू**, **बुलबुलांचे गाणे** वगैरेंचा संग्रहही येथेच ठेवते...

मधू : मग तर मौज आहे. तारे, बुलबुलांचे गाणे. . . हा ना तो दरवाजा ?

निशा : पाहिजे तर उघड. . . आत विशेष घाण वगैरे काही नाही. . . (मधू सताड उघडतो दार. तरुण मुलींच्या रूपात असणारे सुंदर तारे भरजरी व झळझळणारा पोशाख केलेले नाचत बाहेर येतात, दिवाणखान्यात पुंजके करून उभे राहतात. अमृताने जणू ते न्हालेले असतात. . . निशादेवीचे सुगंध ते डोळ्यांना दिसत नाही, परंतु वास येतो. काजवे, दवबिदू, सुंदर ज्वाळा येऊन मिसळतात. बुलबुलाचे गाणे ऐकूण येते व सर्वत्र भरून राहते.)

मालती : (आनंदाने टाळ्या पिटून) किती सुंदर आहेत या मुली !

मधू : आणि किती छान नाचतात !. . .

मालती : किती गोड येतो सुगंध !. . .

मधू : किती गोड आहे गाणे ! . . .

मालती : ती जवळजवळ न दिसणारी कोण ?

निशा : तेच माझे सुगंध. . .

मधू : आणि ते तिकडे काचेवर ? . . .

निशा : मैदानात, रानावनात पडणारे ते दवबिंदू. . . परंतु पुरे आता. या ताऱ्यांचा नाच कधी संपायचा नाही. . . एकदा त्यांचा नाच सुरू झाला की त्यांना परत आत ढकलणे मोठे दुष्कर काम ! . . . (हाताने टाळ्या वाजवून)

तारांनो, चला पुरे आता . . . ही नाचण्याची वेळ नाही. . . आकाश काळ्या ढगांनी भरून आले आहे. . . चला लवकर, आत जा, नाही तर मी सूर्याचे किरण घेऊन येईन हो. . . (तारे, सुगंध, काजवे सारे भराभर आत पळतात. दार बंद होते. बुलबुलाचे गीतही थांबते.)

मधू : (पाठीमाग असलेल्या दाराजवळ जाऊन) हा मधला मोठा दरवाजा !...

निशा : (गंभीरपणे) तो दरवाजा उघडू नकोस. . .

मधू : का बरे ?. . .

निशा : तो उघडण्याची परवानगी नाही. . .

मधू : तर मग येथेच असला पाहिजे तो निळा पक्षी. प्रकाशराणीने तसे सांगितले होते.

निशा : (एखाद्या आईप्रमाणे) बाळ, माझे ऐक. . . आतापर्यंत तुझे लाड मी पुरवले, तुझ्या इच्छ पुरवल्या. मी तुला नाही म्हटले नाही. तुझ्याविरूद्ध वागले नाही. तुझ्यासाठी केले तेवढे कोणासाठी कधीच मी केले नव्हते . . . माझी सारी रहस्ये, सरी गुपिते तीही तुला दिली. . . तू मला आवडतोस. तू निष्पाप आहेस, लहान आहेस. मला तुझी करुणा वाटते. आईने सांगावे तसे मी तुझ्या हिताचे सांगत आहे. ऐक बाळ, माझे ऐक, माझ्यावर विश्वास ठेव. तो शोध दे आता सोडून. आता पुढे नको जाऊस. भवितव्यतेच्या पाठीमागे नको लागूस. उघडू नको हा दरवाजा. . .

मधू : (जरा विचलित होऊन) पण का ?

निशा : तुझा नाश व्हावा असे मला वाटत नाही म्हणून . . . कारण नीट ऐक, लक्ष दे. जे जे कोणी दार उघडते झाले, त्यांनी पुन्हा जिवंतपणी सूर्याचा प्रकाश पाहिला नाही. ते मेले, गेले त्यांना वाचवता आले नाही. नुसते जरा किलकिले केले तरी दार तरी हाच घोर परिणाम होईल. मोठ्या दरवाजापलीकडे जी खोल गुहा आहे, तिला नावही काय द्यावे कळत नाही. दार उघडताच त्या दरीतील अत्यंत निरुपद्रवी व सौम्य अशा वस्तूंचाही पाहणाऱ्याच्या डोळ्यांवर अत्यंत भयानक अशा गोष्टींहूनही अधिक परिणाम होईल. पृथ्वीवरील अत्यंत घोर, आक्राळविक्राळ, कल्पनाही करता येणार नाही अशा भेसूर वस्तूंची कल्पना कर. त्यांच्यापेक्षाही येथील साध्याच वस्तूंचा परिणाम भयाण असा होतो. अरे इतरांची तर गोष्टच नको. परंतु मी सुध्दा त्या दाराला स्पर्श करीत नाही,

चुकून हातही लावत नाही. तू जर हट्ट धरणारच असशील, दार उघडणारच असशील तर आधी मला येथून जाऊ दे, माझ्या त्या अंधारगुडूप गढीत जाऊन बसू दे! तरच माझा बचाव होईल. . . आता तूच विचार कर. नीट समजून काम कर. . .

(मालती रडू लागते, भीतीने ओरडते, मधूला अडवू पाहते.)

भाकरोबा : (दात भीतीने वाजत) नको उघडू दार, प्रिय धन्या, नको. (पाया पडून) आमच्यावर दया कर. . . गुडघे टेकून मी विनवतो. . . पाया पडतो. निशा सांगते ते बरोबर आहे. . .

बोकोबा : आम्हा सर्वांच्या प्राणांचा तू होम मांडला आहेस. . .

मधू : मला तर दार उघडलेच पाहिजे. . .

निशा : (रडत व पाय जोराने आपटीत) मी नाही उघडू देणार, मला नाही इच्छा. . .

मधू : शर्करानंद, भाकरोबा, मालतीला हात धरून तिकडे पळून. . . मी तर उघडणार दार. . .

निशा : पळा रे पळा. त्यांना ज्यांना प्राण प्रिय असतील, ते सारे पळा. निघा पटकन सारे. क्षणभर थांबू नका. . . (तर पळते)

भाकरोबा : (वेड्यासारखा पळू लागतो, कावराबावरा होतो.) थांब रे बाबा जरा, दिवाणखान्याच्या त्या टोकापाशी जाईपर्यंत तरी थांब. . .

बोकोबा : (पळत) थांब, थांब !

(दिवाणखान्याच्या दुसऱ्या टोकाजवळील एका खांबाआड सारे लपतात. मधू एकटा असतो. त्याच्याबरोबर त्या प्रचंड दरवाजाशी फक्त मोत्या राहतो.)

मोत्या : (भीती मनातल्या नात दडवीत, धापा टाकीत, ख् ख् करीत) मी नाही जाणार, मी येथेच थांबेन!. . . मला नाही भय, मला नाही कशाची भीती. माझ्या या लहानग्या देवासह मी राहीन, त्याला सोडणार नाही ! . . .

मधू : (मोत्याला थोपटीत) छान, मोत्या, छान ! . . . माझा पापा घे, मला तुझा मुका घेऊ दे. . . तुझे करणे बरोबर आहे. . . मी आणि तू दोघे आहोत. ठीक . . . आणि आता सावध राहा. . .

(मधू कुलपात किल्ली घालतो. पळालेली भित्री मंडळी ओरडतात. किल्लीचा स्पर्श होताच त्या उंच दरवाजाच्या पाताळ पानांसारखा फटी एकदम दोन्ही दोन बाजूला भिंतीत अदृश्य होतता आणि अपूर्व, अलौकिक

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा

दाखल नं. 23089 ग्रंथानुक्रमांक ना.२८५६
किंमत १८० पाने २८८

मंगल प्रभात २ र. नाटके / गाणे पुस्तके

अशा बागा आत दिसू लागतात! जणू स्वप्नातील उपवने, काल्पनिक भ्रममय, मायिक अशी ती दिसतात. स्वच्छ चंद्रप्रकाशात न्हालेली ती बाग रमणीय दिसते. ग्रह व तारे चमकत असतात. सारे प्रकाशमय झालेले असते आणि तेथे दुसरे काय दिसते? अनंत निळे पक्षी! चंद्रकिरणातून ते नाचत असतात. सारे वातावरण निळ्या निळ्या पक्ष्यांचे! जणू त्या वातावरणाच्या श्वासोच्छ्वासातून ते बाहेर पडत होते! जणू सारे उपवन त्यांचेच बनलेले होते! आश्चर्यकारक रोमहर्षक देखावा!)

निशा : (दिङ्‌मूढ झालेला, आश्चर्यचकित झालेला, उल्कांच्या प्रकाशात उभा ओहो, आनंद अपार आनंद! वा, वा! (पळून गेलेल्यांकडे जाऊन) अरे, इकडे या सारे, या धावत!. . . ते तेथे आहेत, ते निळे पक्षी! सापडले शेवटी! हजारो, लाखो, करोडो निळे पक्षी! माल्ये ये, मोत्या ये। सारी या! मला साहाय्य करा ! (त्या पक्ष्यात शिरून) भराभरा हातांनी पकडता येतात, मुठी भरून घेता येतात!) ते लाजत नाहीत! माणसाळलेले आहेत वाटते। या इकडे. इकडे! (मालती व सारी धावत येतात. फक्त निशा व बोकोबा येत नाहीत.) पाहिलेत ना! आहेत की नाही हजारो निळे पक्षी!... कितीतरी आहेत!... माझ्या हातावर येऊन बसतात! पाहा पाहा, ते चंद्राची किरणे खात आहेत! मालती, कोठे आहेस तू ! . . . ही निळी निळी पिसे बघा किती पडली आहेत! पखरण झाली आहे, जणू सडा पडला आहे त्यांचा ! इतके पिसे भराभरा पडत आहेत की, दुसरे काही दिसतच नाही! मोत्या, त्यांना चावू नकोस, खाऊ नकोस! त्यांना दुखापत नको करू. . . अलगद धर त्यांना!. . .

मालती : (निळा पक्ष्यांनी भरून गेलेली) सात निळे पक्षी मी पकडले सुद्धा !. . . कसे पंख फडफडवितात!. . . मला नाही धरता येत।

मधू : मलाही नाही ! . . . माझ्याजवळ कितीतरी झाले आहेत, हे बघ! . . . ते चालले पळून पुन्हा!. . . अरे आले पुन्हा! गमतच करतात! मोत्याजवळही आहेत! अरे, हे पक्षी आपणालाही ओढीत आहेत! ते का आपणास या आकाशात नेणार? चला, लवकर आपण बाहेर पडू!. . . या बाजूने जाऊ! . . **प्रकाशराणी** वाट बघत असेल!. . . तिला किती किती आनंद होईल! इकडून, या बाजूने. . . (बागेतून सारी पळून येतात. त्यांचे हात धडपडणाऱ्या पाखरांनी भरलेले असतात. सर्व दिवाणखान्यातून हिंडून, त्या निळ्या

पंखांच्या फडफड आवाजात उजवीकडे जातात, जिकडून प्रथम ती सारी आत आलेली असतात. त्यांच्या पाठोपाठ शर्करानंद व भाकरोबा जातात. त्यांनी पक्षी पकडलेले नसतात. निशा व बोकोबा मागे राहतात. ती दोघे येऊन सचिंत मुद्रेने बागेत बघतात.)

निशा : तो नाही ना त्यांना सापडला ? . . .

बोकोबा : नाही. . . तो खरा निळा पक्षी तो पाहा त्या चंद्रकिरणावर मला दिसतो आहे. . . त्यांचा हात त्याला पोचेना, तो फार उंच होता. . . (पडदा पडतो. नंतर लगेच डावीकडून **प्रकाशराणी** आणि उजवीकडून मधू, मालती, मोत्या येतात. धावतच येतात निळे पक्षी घेऊन. परंतु ते पक्षी निर्जीव होतात, त्यांच्या माना खाली होतात, त्यांचे डोळे मिटतात ! त्या पक्षाचे जणू मृतावशेष त्यांच्या हातात असतात. निर्जीव आकार !)

प्रकाशराणी: पकडलात का रे तो **निळा पक्षी** ?

मधू : हो हो. . . पाहिजे असतील तेवढे !. . . हजारो तेथे आहेत ! हे पाहा !. . . (प्रकाशराणीचे पुढे पक्षी करतो, परंतु ते सारे मेलेले आहेत असे दिसते.) हे काय, हे तर सारे मेले !. . . काय केले त्यांनी त्यांना ? माल्ये तुझाही मेला का ग? मोत्या, तुझ्याजवळचे !. . . रागारागाने ते मृत पक्षी फेकून) काय करणार ! चच-- फार वाईट झाले ! कोणी मारले ह्यांना ? . . . दुर्दैवी आहे मी, दु:खी आहे मी. . . (तो आपले तोंड हातात लपवतो. त्याचे सारे शरीर थरथरत असते. तो हुंदके देत असतो.)

प्रकाशराणी: (आईप्रमाणे वात्सल्याने त्याला पोटाशी धरून) रडू नको बाळ ! उगी बेटा. . . दिवसाढवळ्या सूर्यप्रकाशात जो जगू शकेल तो पक्षी तुम्ही नाही धरलात. तो दुसरीकडे सूर्यप्रकाशात जो जगू शकेल तो पक्षी तुम्ही नाही धरलात. तो दुसरीकडे उडाला असेल त्याला शोधू. . .

मोत्या : (त्या मृत पाखरांकडे बघून) खायला बरे असतील का हे ? . . . (सारी डाव्या बाजूने जातात.)

प्रवेश दुसरा

जंगल

(जंगलाचा देखावा. रात्र असते. मोठमोठी जुनाट झाडे. नाना प्रकारची. साग, देवदार, ताल, तमाल, अंजन, कांचन, रातराणी, लिंबी, फणस,

आंबा, बकुळ, बाभूळ, हिवर, ओक वगैरे.)
(बोकोबा प्रवेश करतो.)

बोकोबा : (सर्व झाडांना प्रणाम करून) येथे उपस्थित असलेल्या सर्व वृक्षवनस्पतींना, लता-वेलींना अनंत प्रणाम !

झाडे : (र्मर ध्वनी करीत) तुम्हाला प्रणाम !

बोकोबा : आजचा महान दिवस आहे ! हा खरा दिवस ! आज आपला शत्रू येत आहे. आपण होऊन स्वत:ला तुमच्या स्वाधीन करण्यासाठी येत आहे. त्याच नाव मधू. ज्याने तुमचे आजपर्यंत हत्याकांड केले, त्या लाकूडतोड्याचा तो पोर. तो येत आहे. मनुष्यापासून तुम्ही आजपर्यंत दडवून ठेवलेला तो निळा पक्षी, त्या निळ्या पक्ष्याला आपले सारे गुपित माहीत आहे, त्या निळ्या पक्ष्याच्या शोधार्थ तो येत आहे. . . (झाडांच्या पानात सळसळ आवाज होतो.) काय म्हणणे आहे तुमचे ? . . . हिवराच्या झाडा, काय म्हणतोस ? . . . होय, त्या मुलाच्या तो हिरा आहे. आपले आत्मे थोडावेळ तरी मुक्त करण्याची शक्ती ज्या हिऱ्यात आहे, तोच तो हिरा. तो निळा पक्षी देण्याला आपणास भाग पाडील आणि एकदा का तो निळा पक्षी मनुष्याच्या हाती गेला की, आपण सदैव त्यो गुलाम होऊ. तो वागवील तसे गं वागले पाहिजे. आपल्या नाड्या त्याच्या हाती ! (झाडात सळसळ आवाज) कोण बोलते आहे ? ओक वृक्ष वाटते ? काय रे ओक वृक्षा ? कसे काय चालले आहे, बरे आहे ना ? तुझी थंडी अद्याप थांबली नाही वाटते ? तुला औषध नाही का देत ती गुळवेल ? अजून संधीवात आहे ? दे तो फेकून. ही बघ, तुझ्या पायावर की नाही शेवाळ फार जमली आहे. . . ती निळा पक्षी अद्याप तुझ्याजवळ आहे का रे ? (ओक वृक्षाच्या पानात सळसळ आवाज) काय ? . . . होय, का कू करण्यात अर्थ नाही. संधी दवडता कामा नये. त्याचा नायनाट केलाच पाहिजे. (पानाचे सळसळणे) मला नीट नाही समजले, काय म्हणता ते ? . . . हो, हो, त्याच्याबरोबर त्याची लहान बहीणही आहे. मरू दे तिलाही त्याच्याबरोबर. . . (पानांचा आवाज) मोत्या का ? तो आहे त्याच्याबरोबर. तो दूर जाणार नाही काही केल्या. . . (पानांचा आवाज) काय म्हणालात ? लाच द्यावी त्याला ? छट्. अशक्य. . . मोत्याला वश करण्यासाठी सारे उपाय मी करून पाहिले. . . (पानांचा आवाज देवदाराच्या झाडा, तू बोलत होतास होय ? . . . चार फळ्या तयार ठेवा . . . होय, अग्नी, शर्करानंद,

जलराणी, भाकरोबा. . . ही ही आहेत त्यांच्याबरोबर. या चारांपैकी भाकरोबा तितकीशी खात्री नाही. बाकीची आपल्या बाजूची आहेत. प्रकाशराणी काय ती एकटी मनुष्याच्या बाजूची आहे. परंतु ती येणार नाही. ती झोपलेली असेल तेव्हा निघू या असे मी मुलांना सांगितले आहे. ती येणार आहेत. अशी संधी कधी आली नव्हती... (पानांची सळसळ) हे कोण बोलते आहे ? भूर्जवृक्ष ना . . . ? बरोबर आहे तुझे म्हणणे. मानवेतर प्राण्यांना आपण कळवले पाहिजे. . . सशाजवळ नगारा आहे का ? मिळाला का त्याला परत ? तो येथे आहे का?... वा, मग तर काय छान ! वाजवू दे त्याला नगारा, देऊ दे सर्वत्र दवंडी ! हा पाहा आला त्यांचा संघ !. . . (सशांचा संघ नगारा वाजवत जातो. लांब लांब आवाज ऐकू येतो. मधू, मालती, मोत्या येतात.)

मधू : हीच का जागा ?

बोकोबा : (गोड आवाजात, आढ्यतेने, उत्सुकतेने, तोंड भरून भेटायला जातो.) वा, आलेच माझे छोटे धनी ! किती सुंदर दिसता तुम्ही, कशी मोहक मुद्रा ! आजची सायंकाळही किती रमणीय आहे!. . . तुमच्या आगमनाची सुवार्ता देण्यासाठी मी पुढे आलो ! सारे व्यवस्थित आहे आता. आज रात्री आपणास निळा पक्षी मिळणार, शंकाच नाही. या भागातील सर्व मुख्य मुख्य मानवेतर प्राण्यांना मी बोलावणे पाठवले आहे. ससा गेला आहे. नगारा वाजवीत. . . त्या झाडातून प्राण्यांचे आवाज येत आहेत ऐका !. . . ते की नाही जा लाजाळू आहेत, म्हणून जवळ नाही येत. . .
(निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज ऐकू येतात. गायी, डुकरे, घोडे, गाढवे वगैरेंचे आवाज. बोकोबा एकीकडे मधूच्या जवळ जाऊन) तुम्ही मोत्याला कशाला आणले बरोबर?. . . या मोत्याचे कोणाशी पटत नाही म्हणून मी सांगितले होते. या झाडांशीही त्याचे वैर. . . त्याचे अभद्र. अमंगल अस्तित्व सारे बिघडवेल अशी भीती वाटते. . .

मधू : त्याला चुकविता येईना, टाळता येईन. . . (मोत्याला दरडावीत) चालता हो इथून, भिकारडा कुठला !. . .

मोत्या : कोण ?. . . मी ? . . . का . . . मी काय केले ?. . .

मधू : मी सांगतो ना जा म्हणून !. . . तुझी येथे जरुरी नाही. बस्स ! जास्त नको बोलू. . . तू म्हणजे त्रासदायक, अस्सा जा !. . .

मोत्या : मी एक शब्दही बोलणार नाही. . . मी तुमच्या मागे जरा दुरून चलेन, म्हणजे झाले ना ?. . . त्यांच्या दृष्टीस पडणार नाही. . . असू दे मला प्रार्थना करतो मी !. . .

बोकोबा : (मधूला) असा आज्ञाभंग तुम्ही सहन करता?. . . त्याच्या नाकावर हातातील काठी हाणा. असह्य खरोखर याचे वागणे !. . .

मधू : (मोत्याला मारतो.) अस्से, आता जरा आज्ञा पाळायला शिकशील। चौदावे रत्न हवे, एरवी नाही...

मोत्या : (ओरडतो.) आव, काव, आव, काव ?. . .

मधू : काय आहे आता म्हणणे ?. . .

मोत्या : तुम्ही मारलेत, तरी मला तुमचे पाय चाटले पाहिजेत. मला तुमचे मुके घेऊ दे. (मधूच्या अंगावर प्रेमाने उड्या मारतो, त्याचे मुके घेतो, चाटतो.)

मधू : झाले चाटून, झाले मुके घेऊन. . . पुरे आता. जा.

मालती : मी नाही त्याला जाऊ देणार. नको रे जाऊ मोत्या. मोत्या नसला म्हणजे मला सर्वांचीच भीती वाटते!. . .

मोत्या : (मालतीजवळ जाऊन तिला चाटतो, तिच्याभोवती नाचतो. तिचे जणू पटापट अगणित मुके घेतो.) माझी ही लहानगी माई, खरोखर किती आवडते मला! किती सुंदर आहे ही, किती चांगली! किती सुंदर आहे. किती गोड आहे! तिचा पापा घेतला पाहिजे! पुन्हा एकदा माईला चाटू दे, भेटू दे, पुन्हा एकदा, पुन्हा!. . .

बोकोबा : किती अक्कलशून्य आहे हा!. . . जाऊ दे. वेळ गमावण्यात अर्थ नाही. तो हिरा फिरवा. . .

मधू : मी उभा कुठे राहू ?. . .

बोकोबा : या येथील चंद्रकिरणात. येथून छान दिसेल सारे. . . हं, जरा सावकाश फिरवा. फिरवा!

(मधू हिरा फिरवतो. झाडांतून, त्यांच्या फांद्यातून खूप खोल असा सळसह आवाज. अत्यंत प्राचीन अशी जुनाट झाडे, त्यांच्या फांद्यातून त्यांचे आत्मे बाहेर पडतात. झाडांची खोडे दरवाजा उघडावा तशी उघडतात. झाडांच्या आकाराप्रमाणे व रंगांप्रमाणे त्यांचे आत्मेही लहानमोठ्या परीचे दिसतात. त्यांच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणे त्यांचे त्यांचे आत्मे. उदाहरणार्थ, लिंबाच्या झाडाचा आत्मा सौम्य, परिचित व आनंदी असा

दिसतो. सागाचा आत्मा बारीकमान्या, जाड पोट्या असा दिसतो. भूर्जपत्राचा चपळ व भव्य दिसतो. देवदाराच्या झाडाचा उंची, सडपाळत व निश्चयी दिसतो. वाळुंजीचा जरा खुरटलेला, भयभीत, केविलवाणा दिसतो. सुरूचा दु:खी दिसतो, सुरमाडाच्या झाडाचा प्रतिष्ठित व आढ्यतेचा दिसतो, हिवराच्या झाडाचा वाक्पटू व आनंदी दिसतो, असे अनेक प्रकार, काही आस्ते आस्ते बाहेर पडतात. काही चपळ व उत्साही पटापट उड्या मारतात. सारे आत्मे त्या लहान मुलांभोवती गराडा देऊन उभे राहतात. आपापल्या झाडांच्याहीपासून फार दूर ते नसतात.)

हिवराचे झाड: (आधी धावून व मोठ्याने ओरडून) मनुष्यांनो ! छोट्या माणसांनो!.. . आज तुमच्याजवळ आम्हाला बोलता येईल !... आता मौन पुरे... कोठून आली ही दोन माणसे ?... कोण आहेत ही ? काय ह्यांचा धंदा?. . . (लिंबाचे झाड शांतपणे पुढे येते.) का रे लिंबा, तुझ्या आहेत का ही ओळखीची ?. . .

लिंबी : त्यांना पाहिल्याचे मला नाही आठवत. . .

हिवर : काहीतरीच. तू पाहिलेच असले पाहिजे !. . . सारी माणसे तू ओळखतेस. त्यांच्या घराभोवती तर उभी असतेस !

लिंबी : (त्या मुलांकडे पाहून) नाही. खरेच नाही यांना ओळखीत. . . फार लहान आहेत ही. . . चंद्रप्रकाशात मला भेटायला येणारी प्रेमी माणसे फक्त मी ओळखते. तसेच माझ्या छायेखाली ताडी पिणारे, तेही मी जाणते. . .

सुरमाड : कोण आहेत ही ?. . . खेडयातील का ही गरीब माणसे आहेत?

हिवर : सुरमाडा, तू अलीकडे शहरातील रस्त्यांच्या बाजूला उभा राहतोस, खेड्यांचे तुला काय माहीत ?

वाळुंजी : (लाकडाचे जोड घालून धडपडत उभी असते.) काय करावे आता, आता पुन्हा वाटते माझी मान कापायला, माझे हात तोडायला !. . .

हिवर : गप्प बस !. . . राजवाड्यातून ओकमहाराज बाहेर पडले !. . . आज काही बरी नाही दिसत त्यांची प्रकृती ! संध्याकाळपासून त्यांना कसेसेच होत आहे. . . फारच वृद्ध झाले आहेत महाराज, नाही? किती असेल त्यांचे वय ?. . . देवदार म्हणतो की ते चार हजार वर्षांचे आहेत. परंतु मला वाटते ही अतिशयोक्ती झाली. . . परंतु ऐका. . . महाराजच स्वत: सारे सांगतील. . .

(ओक वृक्ष हळूहळू पुढे येतो. फार पुरातन आहे तो. अंगावर हिरवा लांब अंगरखा आहे. त्याच्यावर शेवाळ वगैरे उगवली आहे. त्याला डोळ्यांना दिसत नसते. त्यांची पांढरी शुभ्र दाढी छातीवर रुळत असते. वाऱ्यावर नाचत असते. एका गाठाळ काठीच्या आधाराने तो चालतो. एका हातात काठी असते. दुसरा हात एका तरुण ओक वृक्षाच्या खांद्यावर ठेवलेला असतो. हा तरुण हात एका तरुण ओक वृक्षाच्या खांद्यावर ठेवलेला असतो. हा तरूण ओक त्याचा वाटाड्या असतो. त्याच्या खांद्यावर **निळा पक्षी** बसलेला असतो. हा महान पुरातन ओक वृक्ष येताच बाकीची झाडे रांगेत उभी राहतात व नम्रतेने प्रणाम करतात अभिवादन करतात.)

मधू : त्याच्या जवळ निळा पक्षी आहे! पटकन घेतला पाहिजे. चला, हा पाहा! ... मला दे रे तो पक्षी !...

सारी झाडे : गप्प बस रे! . . .

बोकोबा : हे **ओक** महाराज!. . . यांना वंदन कर!

ओक : (मधूला) कोण रे तू ?

मधू : मी मधू आहे, महाराज. . . मला निळा पक्षी केव्हा मिळू शकेल? . . .

ओक : त्या लाकूडतोड्याचा का तू मुलगा?

मधू : होय, महाराज. . .

ओक : तुझ्या बापाने आमचे फार नुकसान केले आहे. फार हानी केली आहे आमची. . . एका माझ्या कुटुंबातील करुण कहाणी ऐक. तुझ्या बापाने माझे सहाशे मुलगे मारले, माझे ४७५ चुलते त्याने ठार केले. पुतणे व पुतण्या मिळून बाराशेंची कत्तल त्याने केली. माझ्या ३८० सुना त्याने यमसदनस दवडल्या, बारा हजार नातवांचे त्याने जिवानिशी हाल हाल केले।. . .

मधू : महाराज, मला ह्यातील एक अक्षरही माहीत नाही. . . माझ्या वडिलांनी काही मुद्दाम नाही हे केले!. . .

ओक : तू येथे कोणत्या हेतूसाठी आला आहेस ? आमचे आत्मे बाहेर पडावेत असे तू का केलेस?

मधू : मला क्षमा करा, महाराज, तुम्हाला त्रास झाला याबद्दल माफी मागतो मी... निळा पक्षी कोठे आहे ते तुम्ही मला सांगाल असे बोकोबाने मला सांगितले!. . .

ओक : होय, तू निळ्या पक्ष्याच्या शोधात आहेस हे मला माहीत आहे. निळ्या पक्ष्याचा शोध म्हणजे सर्व चराचराच्या रहस्यांचा व सुखाचा शोध. तो शोध लावून, तो निळा पक्षी मिळवून आमचे दास्य तुम्ही अधिकच खडतर व चिरंजीव करणार !. . .

मधू : तसे नाही, महाराज, त्या परी रूपराणीची मुलगी फार आजारी आहे हो, तिच्यासाठी हवा आहे तो पक्षी. . .

ओक : (मधूला गप्प राहा अशी खूण करून) पुरे झाले !. . . परंतु मानवेतर प्राणी नाही का आले ? त्यांचे आवाज नाही ऐकू येत ते ? कोठे आहेत ते सारे ? हा प्रश्न आमचा आहे, तितकाचा त्यांचाही आहे. जे गंभीर उपाय अवलंबावे लागतील, त्यांची जबाबदारी केवळ आम्ही वृक्षवनस्पतींनीच घेता कामा नये. . . . जे काही आम्हाला करावेसे वाटते, ते आम्ही करू लागलो असे जेव्हा मानवाला कळेल, तेव्हा तो आमच्यावर भयंकर सूड घेईल. त्याचा बदला घेतल्याशिवाय मनुष्य राहणार नाही. . . म्हणून जे काही करावयाचे ते एकमताने करू या. . .

देवदार : (इतर झाडांच्या शेंड्यावरून बघत) मानवेतर प्राणी येत आहेत. सशाच्या पाठीमागून येत आहेत. ते पाहा आले त्यांचे आत्मे. घोडा, सांड, बैल, गाय, लांडगा, बकरी, डुक्कर, कोंबडा, बकरा, गाढव, अस्वल यांचे आत्मे उपस्थित झाले. . .

(देवदार ज्याचे ज्याचे नाव घेतो, तो तो येऊन बसतो. फक्त बकऱ्याचा आत्मा इकडे तिकडे भटकतो व डुकराचा हूं हूं करीत हिंडतो.)

ओक : सारे आले. हजर झाले? . . .

ससा : कोंबड अंडी सोडू शकत नाही. मोठा ससा फिरतीवर गेला आहे. सांबराच्या शिंगात दुखत आह. कोल्हा आजारी. कोल्होबाने डॉक्टरांचे शिफारसपत्रही दिले आहे. हंसीला काही कळेना व लोळ्या तुर्की कोंबडा तर एकदम संतापला. . .

ओक : या मंडळींनी गैरहजर राहावे हे बरे नाही. खेदाची आहे गोष्ट . . . तरी पण सभा कायदेशीर ठरेल इतकी संख्या हजर आहे. . . बंधूनो, कोणता प्रश्न आपल्यासमोर आहे, ते तुम्ही जाणताच. . . पृथ्वीपासून मिळालेल्या एका जादूच्या वस्तूमुळे ह्या मुलाला निळा पक्षी मिळवण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे. हा तो लहान मुलगा समोर आहे. जीवनाला आरंभ

झाल्यापासून जे रहस्य आपण लपवनू ठेवले आहे, ते हिसकावून घेण्यासाठी तो आला आहे. . . मनुष्याचा आपणास आतापर्यंत भरपूर अनुभव आला आहे. या गुपिताचा, या रहस्याचा, एकदा का तो स्वामी झाला, म्हणजे आपल्या नशिबी पुढे काय असेल याची कल्पना आपणा सर्वांना आहे. . . या वेळी कां कूं करण्यात अर्थ नाही. यावेळी नीट निश्चय न करणे मूर्खपणाचे व आत्मघातकीपणाचे होईल. गुळमुळीतपणा उपयोगाचा नाही. नीट जोरदार धोरणाचा अवलंब केला पाहिजे. . . मोठा महत्त्वाचा आणीबाणीचा हा क्षण आहे. उशीर न लावता या मुलाचा सोक्षमोक्ष लावून टाकला पाहिजे.

मधू : काय म्हणतो हा ?

मोत्या : (गुरगुरत व आपले दात दाखवून) म्हातारड्या, माझे दात नीट पाहून ठेव.

भूर्जवृक्ष : (रागाने) ओकमहाराजांचा हा अपमान करीत आहे !

ओक : कुत्रा का ?. . . हाकला त्याला !. . . आमच्यात विश्वासघातकी, स्वजनद्रोही कोणी असता कामा नये !

बोकोबा : (मधूला एकीकडे) मोत्याला जायला सांग. . . गैरसमज होत आहे. . . माझ्यावर सोपव. मी करतो सारे नीट. . . परंतु त्याला ताबडतोब येथून दवड. . .

मधू : (मोत्याला) तू जातोस का दूर ?

मोत्या : त्या ओकमहाशयांचे शेवाळलेले जोडे मला कुरतडू दे !. . . गंमत होईल जरा बुढ्ढ्याची ! अर्धांगवायू झाला आहे का संधिवात झाला आहे म्हाताऱ्याला?

मोत्या : ठीक, ठीक. जातो मी. तुम्हाला जरूर पडेल तेव्हाच मी येईन !. . .

निशा : (मधूला एकीकडे) त्याला बांधून ठेवणेच बरे, नाही तर आयत्या वेळी काही करील खोडी, सारी झाडे रागावतील व सारे काम बिघडेल. . .

मधू : काय करू मी तरी ?. . . त्याचा पट्टाही हरवला. . .

बोकोबा : ही पाहा मजबूत गारवेल !. . . तिने बांधा त्याला. मजबूत आहे तिचा दोर!. . .

मोत्या : (गुरगुरत) येईनच परत मी, आल्याशिवाय नाहीच राहणार ! घाणेरडी म्हातारडी झाडे, खुरटलेली मरतुकडी झाडे ! नुसती मुळे राहिली आहेत ह्या लुळ्या पांगळ्या ओकाची !. . . या सर्वांच्या मुळाशी हा बोकोबा

आहे!. . . त्याच्याशी जरा घ्यावे बोलून, जशास तसे । काय रे कानात सांगतो आहेस ? हा वाघाच्या जातीतल्या, वाघाच्या अवलादी. काय आहे म्हणणे ? चोरासारखे काय करतो आहेस, भुरट्या ?. . .

बोकोबा : पाहिलेस, हा सर्वांचा अपमान करतो, सर्वांना हिडीस फिडीस करतो!...

मधू : त्रास आहे चांडाळाचा! काही सुचू देत नाही. स्वत:चे बोलणे स्वत:ला ऐकू देत नाही. . . गारवेली! त्याला ठेवशील का बांधून ?. . .

गारवेल : (भीत भीत मोत्याजवळ जाऊन) तो चावणार नाही ना ?. . .

मोत्या : (गुरगुरत) चावेन कसा, उलट तुझे मुके घेईल, मुके!. . . थांब जरा!. . . इकडे ये, दोराच्या भेंडोळ्या, इकडे ये जरा!. . .

मधू : (काठीने दरडावीत) मोत्या!. . .

मोत्या : (मधूच्या पायाशी लाडीकपणे व भक्तीने, शेपूट नाचवीत) काय करू मी, माझ्या लहानग्या देवा?. . .

मधू : तेथे पडून राहा!. . . गारवेलीचे ऐक. . . बांधून ठेवू दे तुला. . . ऐक. नाही तर बघ. . .

मोत्या : (गुरगुरतो, दात आतल्या आत खाते, गारवेल त्याला बांधते.) दोराच्या भेंडोळ्या! मांगाच्या दोऱ्या! चाबकाच्या वादी!. . . गुरांच्या दाव्या!. . . माझ्या लहानग्या देवा!. . . अरे, माझे पंज कापून टाकीत आहेत. अरे, मला गुदमरवीत आहेत!. . .

मधू : काही करोत, मला नाही तुझी पर्वा. तूझीच चूक. गप्प बस. स्वस्थ राहा. फार त्रास देतोस तू. असह्य झाले मला!. . .

मोत्या : काही असो. तुम्ही पस्तावाल. माझ्या देवा, फसतो आहेस तू. . . या सर्वांचा दुष्ट आहे हेतू. कट आहे यांचा. जपा, धनीसाहेब, जपा। ... असे, माझे तोंडही बांधले यांनी । आता कसा बोलू?. . .

गारवेल : (मोत्याचे जणू गाठोडे करून) कोठे ठेवू याला? . . . चांगले करकचून आवळले आहे. . . आता एक ब्रही नाही काढणार. . .

ओक : माझ्या खोडाच्या पाठीमागे, माझ्या मोठ्या मुळाशी ठेवा घट्ट बांधून. . . नंतर त्यांचे काय करायचे ते ठरवू. . .
(गारवेल व हिवर त्याला उचलून नेतात पलीकडे)

ओक : झाला का बांधून ? ठीक. हा नाठाळ व अहितकारक साक्षीदार दूर गेला, बरे झाले. सज्जनद्रोही, विश्वासघातकी, पापात्मा, बसू दे रडत तिकडे... आता

आपण विचारविनिमय करू या. सत्य व न्याय यांना धरून बोलणे करू या. माझ्या गंभीर, उत्कट व वेदनामय भावना तुमच्यापासून मी लपवू शकत नाही... मानवाच्या कृत्यांवर आज आपण प्रथमच न्याय द्यायला जन्मलो आहोत. आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय मानवाला आज देऊ या. आजपर्यंत त्याने आपणास छळ छळ छळले. आपण अपार अन्याय सहन केले. त्याला आपण कोणती शिक्षा द्यावयाची याविषयी मला तरी शंका नाही !

सारी झाडे : मुळीच संशय नाही ! . . . त्याला फाशी द्या. . . देहान्त शिक्षा ! . . .

सारे प्राणी : फारच अन्याय केला याने ! . . . फार दुष्टपणा, फारच शक्तीचा दुरुपयोग !. . . कितीतरी वर्षे जुलूम चालवला याने ! चिरडा आता त्याला, करा गट्ट ! क्षणांचाही विलंब नका. येथल्या येथे करू जमीनदोस्त, मिळवू मातीत, टाकू खाऊन ! . . .

मधू : (बोकोबाला) यांना काय झाले? ...सारे रागावलेले, असंतुष्टसे दिसतात?

बोकोबा : भिऊ नका. . . . वसंत ऋतू अद्याप दूर आहे म्हणून त्रासले आहेत सारे. माझ्यावर सोपवा सारे. मी सारे नीट करीन. . .

ओक : आपले सर्वांचे एकमत होणे ही अपरिहार्यच गोष्ट होती. . . . मानवाला पुढे फारसा सूड घेता येऊ नये, या जंगलात या दोन मुलांचे मृतदेह सापडतील, तेव्हा फारसा पुरावा मिळू नये. खाणाखुणा सापडू नयेत, यासाठी कसे मारावे, कसे फाशी द्यावे, कसा यांचा काटा काढावा, ते ठरवू या. झटपट झाले पाहिजे सारे काम. पुन्हा बिनबोभाट कोणाला कळणार नाही असे व फार यातायात न पडता झाले पाहिजे.

मधू : काय आहे हे सारे बोलणे? कशाविषयी. . . याच्या म्हणण्याचा मथितार्थ काय ? हेतू काय ? . . . कंटाळा आला या बडबडीचा व कटकटीचा ? याच्याजवळ निळा पक्षी आहे. त्याने मला दिला पाहिजे. ...

सांड : (पुढे येऊन) याच्यां पोटात शिंगे भोसकणे हा खात्रीचा उपाय आहे. अत्यंत व्यवहार्य व रामबाण आहे हा उपाय. जाऊ का धावून?

ओक : कोण बोलते आहे? . . .

बोकोबा : सांड.

गाय : स्वस्थ राहणे हेच बरे. . . . मला यात लुडबूड करण्याची इच्छा नाही. . . चंद्राच्या प्रकाशात ते तिकडे दूर शेत दिसते ना ? तेथे हिरवा चारा मला खायला मिळतो. . . मला दुसरे पुष्कळ आहे करायला. . .

बैल : मलाही दुसरी कामे आहेत. तरी पण मी आगाऊच सांगतो की, जे काही ठरवाल त्याच्याशी मी सहमत आहे.

भूर्जवृक्ष : माझी सर्वात उंची अशी फांदी त्याला फाशी देण्यासाठी मी देईन.

गारवेल : मी होईन मानेस बसणारी दोरी. . .

देवदार : मी देईन प्रेतपेटीसाठी चार फळ्या. . .

सुरू : मी त्याच्या समाधीवर राहीन. त्याला कायमची समाधी देईन!

वाळुंजी : नदीत त्याला बुडवा, सोपा सुटसुटीत उपाय! आम्ही घेतो जबाबदारी, पार पाडतो बिनबोभाट काम!. . .

लिंबी : (सौम्य व मिळते घेण्याच्या स्वरात) हे पाहा, असे रागावू नका. जरा सबुरीने घ्या. . . गोष्टी खरोखरच इतक्या का थराला नेल्या पाहिजेत?. . . ही मुले लहान आहेत. . . त्यांना फक्त कैद करून ठेवू या. म्हणजे त्यांना काही अपाय आपणास करता येणार नाही. तुरुंगाच्या भोवती चोहोबाजूंना मी उभी राहीन. . .

ओक : कोण बोलते हे ? आवाजावरून, गोड गोड बोलण्यावरून लिंबी असावी ही!. . .

देवदार : होय, लिंबीच महाराज. . .

ओक : पशुतल्याप्रमाणे आपण वृक्षवनस्पतीतही स्वजनद्रोही व विश्वासघातकी निघालेच कोणीतरी!. . . फळझाडेच काय ती विश्वासघातकी निघाला म्हणायची! परंतु फळझाडे खरी झाडेच नव्हेत. . .

डुक्कर : (आपले डोळे खादाडपणे फिरवीत) मला वाटते की, प्रथम ती पोरगी गट्ट करावी. . . फारच कोवळी दिसते आहे!

मधू : काय रे म्हणतोस? . . . थांब हो जरा, तुला. . .

बोकोबा : पण सर्वांना काय झाले आहे, मलाही कळत नाही. एकंदरीत ठीक नाही दिसत लक्षण!. . .

ओक : शांत राहा. . . मुद्दा एवढाच की आपल्यातील प्रथम कोणी जाऊन प्रहार करावा. मनुष्याच्या जन्मापासून जे संकट आपण अनुभवीत आहोत, जो शाप आपल्या शिरावर आहे, ते संकट कायमचे कोण दूर करणार ? तो शाप कोण धुळीत मिळविणार!. . .

देवदार : तो महान मान, महाराज, आपणच घ्यावा! तुम्ही आमचे राजे, तुम्ही आमचे आधार, तुम्ही सर्वात मोठे. . .

ओक : देवदार बोलत आहे वाटते? काय करू रे ? मी आता फारच म्हातारा झालो आहे. डोळ्यांनी दिसत नाही, पाय नीट ठरत नाहीत. हात गारठतात व माझ्या मनातले करीत नाहीत. देवदारा, हा मान तूच घे! तू उंच व सरळ आहेस, सदैव हिरवागर दिसतोस! या पुष्कळशा वृक्षवनस्पतींचे बारसे तू पाहिले आहेस. हे बंधो, माझ्याऐवजी तूच आज पुढे हो! आपल्या मोक्षाचे हे महान कर्म तूच पुढे होऊन पार पाड!. . .

देवदार : पूज्य तात, मी कृतज्ञ आहे. . . परंतु त्या दोघांना पुरण्याचा मान मला मिळणारच आहे. मी हाही मारण्याचा मान मिळवीन, तर माझे सहकारी माझा मत्सर करू लागतील व त्यात त्यांचा दोष तरी काय ? तुम्ही नाही. तर मग हा **भूर्जवृक्ष** आहे ना? त्याची गदाही भक्कम आहे. तोही पुरातन सन्मान्य आहे. त्याला करू दे हे काम.

भूर्जवृक्ष : तुम्हा सर्वांना माहीत आहे की, किड्यांनी मला पोखरून टाकले आहे व माझा मुद्गल विश्वासार्ह नाही फारसा. परंतु साग व सुरू यांची हत्यारे तीक्ष्ण आहेत.

साग : हे काम करण्यात मला आनंद आहे. मोठ्या खुशीने केले असते हे स्वजनमोक्षाचे काम. . . परंतु दुर्दैव असे की, एक चिचुंद्रीने काल रात्री माझा अंगठा पिरगळला, त्यामुळे मला नीट उभेही राहता येत नाही.

सुरू : मी तसा तयार आहे. . . परंतु देवदाराप्रमाणे मला पुरण्याचा मान मिळायचा नसला तरी त्या मुलांच्या समाधीवर अश्रुमोचन करण्याचे काम माझ्याकडे आहे. अनेक कामे एकाने करू पाहणे कायदेशीर होणार नाही. . . या हिवराला विचारा. .

हिवर : माझी थट्टा करता वाटते? . . . मला का हे सांगणार काम ? तुम्ही गंभीरपणे बोलता आहात की, आपली गंमत चालली आहे? लहान लेकाराच्या अंगाहून माझे लाकूड कोवळे आहे. . . शिवाय मला आज काय होत आहे कळत नाही. . . थंडीतापाने सारे अंग कापते आहे. माझ्या पानांकडे नजर टाका जरा. आज सकाळीच थंडी भरली असावी. . .

ओक : (संतापाने वेडा होऊन) मनुष्याला तुम्ही भिता सारी! . . . मनुष्याचे एक प्रकारचे गूढ भय आपणास सदैव वाटत आले आहे व ज्यामुळे आपण कायमचे गुलाम झालो आहोत, तेच भय या दोन निःशस्त्र व असंरक्षित लहान मुलांना पाहून तुम्हालाही वाटत आहे!. . . पुरे झाले. . . अशी

अपूर्व संधी येणार नाही. तुम्ही भीत असाल, तर मी पुढे जातो. जरी मी वृद्ध, अंध, पांगळा असलो, थरथरत असलो तरीही मी या वंशपरंपरागत शत्रूवर चाल करून जाईन!. . . कोठे आहे तो? (हातातील काठीने चाचपीत मधूकडे हळूहळू येतो.)

मधू : (खिशातील चाकू काढून) तो म्हातारडा–हातात काठी असलेला माझ्यावर येतो आहे वाटते चालून ?...

सारी झाडे : (चाकू दिसताच भयाने किंकाळी फोडतात. मधू व ओक वृक्ष यांच्यामध्ये उभी राहतात. सुरी, चाकू ! जपा महाराज, सावध राहा ! सुरी...)

ओक : (धडपडत) जाऊ दे मला, सोडा ! असली सुरी म्हणून काय झाले ? सुरी असो की कुऱ्हाड असो !... कोण मला खेचते आहे पाठीमागे ? काय, तुम्हीही सारे येथे आला आहात काय ? तुम्हाला हे काम करण्याची (हातातील काठी खाली फेकून) ठीक तर, आम्हा वृक्षवनस्पतींचा धिक्कार असो ! तुम्ही पशूंनी तरी करावे आम्हाला मुक्त... !

सांड : आमच्यावरच सोपवा हे काम... मी बघतो आता... शिंगाचा एक देतो तडाखा, की संपलेच काम !...

बैल व गाय : (सांडाची शेपटी धरून मागे खेचतात.) काय आहे तुझ्या मनात ? मूर्खपणा करू नकोस ! हे काम बरे नाही... याचा परिणाम वाईट होणार आहे. याचा परिणाम शेवटी आम्हाला भोगावा लागणार आहे... सोड हा हट्ट. बाजूला हो...त्या वन्य पशूंना, त्या श्वापदांना करू दे ते काम !

सांड : नाही, मी ऐकणार नाही... हे काम माझे आहे... तुम्ही थांबा व पाहा ! इकडे या, जरा मला मागे खेचा नाही, तर अपघात होईल !...

मधू : (किंकाळ्या फोडणाऱ्या मालतीला) घाबरू नको... माझ्या पाठीशी उभी राहा... माझ्या हातात सुरी आहे...

कोंबडा : धीट आहे पोरगा, बिटुकला असून धिटुकला आहे !

मधू : शेवटी माझा निकाल लावण्याचे तुम्ही ठरवलेले दिसते. आले आता लक्षात !...

गाढव : लहान मनुष्या, लक्षात यायला किती वेळ लागला बाबा तुला !

डुक्कर : आता शेवटची प्रार्थना म्हण. आटप, तुझी शेवटची घटका भरली. त्या लहान मुलीला पाठीमागे लपवू नको... तिला पाहून माझ्या डोळ्यांना मेजवानी मिळते. तिलाच मी प्रथम खाणार आहे...

मधू : मी काय केले तुम्हाला ?...

बकरी : काय केले ? काही नाही हो, लहान मनुष्या !... माझा लहान भाऊ मटकावलात, माझ्या दोन बहिणी, माझे तीन चुलते, माझी आत्या, माझे आजोबा, माझी आजी सारी तुम्ही खाल्लीत... थांब गुलामा, तुला त्यांना धुळीत पाडले म्हणजे मग दाखवीन की मलाही थोडे दात आहेत. समजलास ना ?...

गाढव : मलाही चांगले खूर आहेत !...

घोडा : (पायांनी जमीन उकरत) आता पाहा तुम्ही, बघा तर खरे... काय रे पोरा, तुला दातांनी फाडू, का लाथेने झोडू ? (मधूकडे ऐटीने जातो. मधू चाकू उगारतो. तो घोडा एकदम भीतीने मुरडतो व पळतो.) हे काय, हे बरे नव्हे. हे नियमबाह्य आहे. हा तर आत्मसंरक्षण करीत आहे !...

कोंबडा : काही असो. परंतु या लहान मुलाच्या धैर्याची तारीफ केल्याशिवाय माझ्याच्याने राहावत नाही.

डुक्कर : (अस्वल व लांडग्याला) आपण सारी त्याच्यावर तुटून पडू या... मी पाठीमागून तुम्हाला पाठिंबा देईन... आपण त्यांना प्रथम खाली पाडू आणि ती मुलगी खाली आली की तिघे मिळून भागीदारी करू...

लांडगा : त्यांना पुढून हुलकावणी दाखवा... मी जरा बाजूला वळणार आहे... (लांडगा मधूच्या पाठीमागे जाऊन एकदम हल्ला करतो व त्याला अर्धवट खाली पाडतो..)

मधू : दुष्टा !...(एका गुडघ्यावर उठतो, चाकू परजतो. आपल्या बहिणीला सांभाळतो. ती ओरडते, मधू अर्धवट पडला आहे असे पाहून इतर प्राणी व झाडेमाडेही मधूच्या अंगावर धावतात. मधू कावराबावरा होतो. तो साहाय्यासाठी ओरडतो.) धावा, धावा, मदतीला धावा, मोत्या, अरे मोत्या, अरे धाव, बोकोबा, ये रे मदतीला ! या, या धावा !...

बोकोबा : (दांभिकपणे दुरून) मी नाही येऊ शकत. माझा पंजा मोडला आहे.

मधू : (सर्वांशी लढतो. वार चुकवतो.) मोत्या ! ये रे मदतीला, धाव रे धाव ! माझा निभाव नाही लागणार !... मी एकटा ! त्यांची संख्या कितीतरी आहे !...अस्वल, डुक्कर, गाढव, खेचर, देवदार, भूर्जवृक्ष ! कितीतरी एकट्यावर तुटून पडत आहेत ! मोत्या, मोत्या, मोत्या !...

(मोत्या आपली बंधने तोडून धावत येतो. त्यावेळी त्याच्या पायात वगैरे

गुरफटलेल्या दोऱ्या त्याच्या पाठोपाठ लोंबत येतात. झाडे व ते प्राणी यांच्यातून मार्ग काढीत, ढकलाढकली करीत धन्यापाशी येऊन मोत्या उभा राहतो. याला चाव, त्याला चाव असे करतो.)

मोत्या : (सर्वांना चावे घेत.) भिऊ नको माझ्या लहान देवा, हा मी आहे येथे. चला त्यांच्यावर तुटून पडू ! माझे दात कसे वापरायचे ते मी नीट जाणतो !... अस्वला, लठ्ठ आहे नाही तुझी मांडी ? रोवतो दात तेथे ! बरे झाले ना ? आणखी कोणाला पाहिजे प्रसाद ? डुक्करा, हा घे तुला आणि या घोड्याला पण ! बैलाच्या शेपटीला घेतो चावा ! आणि ही झाडे ! या भूर्जवृक्षाची विजारच फाडतो व या म्हातारड्या ओक वृक्षाची बंडी टरकावतो !... देवदार जरा कावा करीत आहे वाटते !... भूः भूः घामाघूम झालो मी, कठीण काम !...

मधू : (अगतिक होऊन) मारले मला ! सुरूने डोक्यावर हाणला तडाखा ! अरेरे, संपले सारे...

मोत्या : भौः वौ... हे कोण वाळुंजी ?... माझा पंजा मोडला रे हिने !...

मधू : पुन्हा सारी जमून चाल करून येत आहेत... अरे, हा तर लांडगा आला!

मोत्या : त्याला आठवण राहील असे करतो.

लांडगा : अरे, तू तर माझा भाऊ ! मूर्खा, याच्या बापाने तुझी सात पिले पाण्यात बुडवली !...

मोत्या : बरे केले ! ती पिले तुझ्यासारखी दिसत म्हणून !...

सारी झाडे व : विश्वासघातकी ! मूर्ख ! पागल ! स्वजनद्रोही ! सोड त्या माणसाला ! मेला तो ! आमच्या बाजूला ये !...

मोत्या : (स्वामीभक्तीने हृदय भरून उत्कटतेने) नाही ! कधीही नाही. तुमच्या सर्वांच्या विरुद्ध मी एकटा !... कधीही नाही सोडणार ! सर्वांत महनीय, वंदनीय, उत्कृष्ट असा जो मनुष्य, असा जो हा माझा देव, त्याच्याशी मी सत्यनिष्ठ राहीन ! (मधूला) हे अस्वल येते आहे. सावध राहा... आणि तो सांड ! त्याच्या नरडीचा घोटच घेतो आता !... भौ वौ... कोणी मारली लाथ ? गाढवाने मारली. माझे दोन दात पडले !...

मधू : मेलो, मोत्या, मेलो मी !... त्या सागाने दिला तडाखा !... हा बघ रक्तबंबाळ झाला माझा हात !... हे त्या लांडग्याचे काम किंवा डुकराचे...

मोत्या : माझ्या लहान देवा, थांब... तुला चाटू दे म्हणजे तुला बरे वाटेल !... आता बरे वाटेल हो... माझ्या मागे उभा राहा... आता नाही पुन्हा हल्ला करणार. होय... अरेच्या ! आली, पुन्हा आली धावून ! हा फारच जोराचा हल्ला होणार असे दिसते ! आपण भक्कम उभे राहिले पाहिजे !

मधू : (जमिनीवर पडतो) नाही रे माझ्याने आता उभे राहवत नाही ? थकलो मी, गळून गेलो मी !

मोत्या : ती पाहा, ती पाहा, प्रकाशराणी आली !... सापडलो एकदाची तिला आपण !... माझ्या लहान राजा, वाचलो आता आपण... माझा मुका घे!... वाचलो, बचावलो आता !... ते बघ देवा !... घाबरली ती झाडेमाडे, ते पशू !.. चालले माघारे, सारे भ्याले !...

मधू : प्रकाशराणी ! ये, ये लवकर ये ! त्या सर्वांनी बंड केले आहे ! आमच्याविरुद्ध आहेत सारे !...

(प्रकाशराणी येते. ती येत आहे तोच जंगलात उषा होते व सर्वत्र उजेड पसरतो.)

प्रकाशराणी : काय आहे भानगड ?... काय झाले ?...गरीब बापडा ! अरे, तो हिरा पुन्हा फिरवला असतास, तर सारी पुन्हा शांत झाली असती, अदृश्य झाली असती. तुला माहीत नव्हते का ? त्यांच्या मनात काय चालले आहे ते मग समजले नसते, दिसले नसते. (मधू हिरा फिरवतो. तात्काळ झाडांचे आत्मे खोडातून आत शिरतात. पशूंचे आत्मेही अदृश्य होतात, फक्त सौम्य गाय व बकरी दूर चरताना दिसतात. ते सारे जंगल पुन्हा मंगल होते, शांत होते. मधू सभोवती साश्चर्य बघतो.)

मधू : कोठे गेले सारे ?... काय झाले होते त्यांना ?... त्यांना का वेड लागले होते?

प्रकाशराणी : वेड नाही. नेहमीच त्यांची अशी वृत्ती आहे; परंतु आपणास दिसत नाही म्हणून कळत नाही... मी पूर्वी तुला सांगितले नव्हते का ? मी बरोबर नसेल तर त्यांना जागृत करणे धोक्याचे आहे असे मी सांगितले होते...

मधू : (चाकूची धार पुशीत) जर मोत्या नसता व हा चाकू नसता, तर कठीण होती वेळ !... इतकी दुष्ट असतील ती सारी मला कल्पनाही नव्हती !...

प्रकाशराणी : या जगात मनुष्याच्या विरुद्ध सारी आहेत. एकीकडे एकटा मानव व विरुद्ध बाजूला चराचर सृष्टी...

मोत्या : माझ्या लहानग्या देवा, फार लागले आहे ?...

मधू : काळजी करण्याचे काही कारण नाही... परंतु मालतीला त्यांनी स्पर्शही केला नाही... परंतु प्रिय मोत्या !... तुझे सारे तोंड रक्ताने भरले आहे, तुझे पंजे मोडले आहेत !...

मोत्या : त्याची वाच्यता करण्याची जरूरी नाही... उद्या सारे ठीक होईल... परंतु एकंदरीत मोठी बाकी झाली लढाई !

बोकोबा : (झुडुपातून लंगडत येत) मलाही असेच वाटते !... बैलाने माझ्या पोटात शिंगांनी चांगलाच दिला तडाखा ! तुम्हाला वरून दिसणार नाही, परंतु आत वेदना आहेत, कळा आहेत आणि त्या ओक झाडाने माझा पंजा मोडला...

मोत्या : कोणता पंजा मोडला ? बघू दे...

मालती : बोकोबा ? खरेच का ? कोठे होताय तू ? दिसलाही नाहीस कोठे...

बोकोबा : (ढोंगीपणाने) प्रिय ताई, त्या घाणेरड्या ओंगळ डुकरावर प्रथमच हल्ला करताना मी जखमी झालो. ते डुक्कर मला खाणार होते आणि नंतर त्या मोत्याने असा प्रहार केला की मी मूर्च्छितच होऊन पडलो.

मोत्या : (बोकोबावर दात खात) लवकरच दोन शब्द तुझ्याजवळ बोलायचे आहेत मला. थांब जरा... मग नीट राहशील !

बोकोबा : (मालतीकडे दीनवाणे बघत) ताई, प्रिय ताई, हा बघ, सारखा अपमान करीत आहे मेला ! मला इजा करणार आहे बहुधा तो !...

मालती : (मोत्याला) सोड रे त्याला. मोत्या, ओंगळ, घाणेरडा आहेस तू.
(ती सारी जातात.)
(पडदा पडतो.)

✦✦✦

अंक चौथा

प्रवेश पहिला

पडद्यासमोर व पडद्यावर सुंदर ढगांचे देखावे
(मधू व मालती, प्रकाशराणी, मोत्या, बोकोबा, भाकरोबा, अग्नी, शर्करानंद, जलराणी व दुधी प्रवेश करतात.)

प्रकाशराणी : या वेळेस तरी आपणास निळा पक्षी मिळणार असे वाटते. मला पूर्वीच सुचले पाहिजे होते; परंतु आकाशातून येणाऱ्या किरणांप्रमाणे आज सकाळी हा विचार एकदम आला मनात. सकाळी जरा उत्साहाने ताजीतवानी बसले होते व कल्पना सुचली. त्या जादूच्या राजवाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ आपण येऊन पोहोचलो आहोत. येथे मानवजातीची नाना प्रकारची सुखे निरनिराळे आनंद नियतीच्या नियंत्रणाखाली एके ठायी नांदत असतात.

मधू : येथे का पुष्कळ प्रकारची सुखे आहेत ? पुष्कळ प्रकारचे आनंद आहेत ? आपणाला मिळतील का काही सुखे ? भेटतील का काही आनंद ? ही सुखे क्षुद्र आहेत का थोर आहेत ? लहान आहेत का महान आहेत ?

प्रकाशराणी : काही क्षुद्र आहेत, काही थोर आहेत, काही लहान आहेत, काही महान, काही सुकुमार-सुंदर आहेत, काही ओबडधोबड अशी आहेत, काही सुरूप आहेत, काही कुरूप आहेत. जी फारच कुरूप होती, त्यांना नुकतेच येथून हाकलून देण्यात आले. ती आता दुःखांचा आश्रय घेऊन राहिली आहेत. जवळच एका गुहेत दुःखे राहतात. सुखांच्या राजवाड्यापासून लांब नाही ती गुहा. हा राजवाडा

व ती गुहा यांचा संबंध आहे. दळणवळणही चालते. दोहोंच्यामध्ये एक झिरझिरीत सूक्ष्म असा वाफेचा पडदा असतो, इतकेच. न्यायाच्या पर्वतावरून किंवा अनंततेच्या खोल दरीतून कधी कधी वारे येतात व हा पडदा मधूनमधून उचलला जातो, मध्येच इकडे तिकडे होतो. . . . हे पाहा, येथे सावध रीतीने वागले पाहिजे. सर्वांनी बरोबर चला. एकटे दुकटे इकडे तिकडे हिंडून चालणार नाही. चुकून दु:खांच्या दरीत जायचे नाही तर कोणी ! सर्वसाधारणपणे येथील आनंद जे आहेत, ते चांगले आहेत. परंतु त्यातही काही धोकेबाज व विश्वासघातकी आहेत. त्यांच्यापेक्षा अत्यंत घोर अशी दु:खेही परवडली.

भाकरोबा : माझ्या मनात एक विचार येतो तो असा, की जर येथील काही आनंद धोकेबाज व दगाबाज असतील, तर आपण आज जाऊच नये. येथे दरवाजाजवळ बसू. मुलांना तेवढे जाऊ देत. जर त्यांना काही दगा दिसला, धोका दिसला, तर त्यांनी पटकन पळत यावे. आपण येथून पटकन त्यांनी हात देऊ व झटकन ओढून घेऊ.

मोत्या : मुळीच नाही असे करायचे. माझ्या लहानग्या देवाला कधीही सोडायचे नाही. छायेप्रमाणे त्याच्या पाठोपाठ राहायचे मी तरी ठरवले आहे. ज्यांना भीती वाटत असेल, त्या भित्र्या भागूबाईंनी बसावे बाहेर, राहावे येथे माशा मारीत. भितुरड्यांची (भाकरोबाकडे बघून) आम्हाला गरज नाही. (बोकोबाकडे बघत) आणि फसव्यांचीही नाही.

अग्नी : मीही आत येणार... तेथे आज गंमत असते असे मी ऐकले आहे. सुखे व आनंद आत अक्षै नाचत असतात.

भाकरोबा : सुखे व आनंद हवेवरच राहतात, की खातात पितात ?

जलराणी : (कण्हत व कुंथत) मी आजपर्यंत सुख कधी चाखले नाही... लहानातील लहान सुखही माझ्या नशिबी आले नाही ! आज तरी थोडी सुखे पाहू दे.

प्रकाशराणी : तुमची सर्वांची टकळी बंद करा. सारखी बडबड ! तुम्हाला कोणी विचाले आहे का ? मी असे नक्की ठरवले आहे की मोत्या, भाकरोबा व

शर्करानंद मुलांबरोबर आत जातील. जलराणीची प्रकृती फार थंड व अग्नीची फार बंडखोर, म्हणून त्यांनी येथे बाहेरच राहावे. दुधीनेही बाहेर राहावे. कारण इतर गोष्टींची लगेच तिच्यावर परिणाम होतो. फारच नाजूक साजूक आहे ती. तिला मग स्वत:ला आवरता येत नाही. बोकोबाने मनास येईल ते करावे.

बोकोबा : आनंदाच्या शेजारी जी सुखे राहतात, त्यांच्याशी मला परिचय आहे. येईन त्यांना भेटून. . .

मधू : प्रकाशराणी, तू नाही का येत?

प्रकाशराणी : माझा प्रकाश बऱ्याचशा आनंदांना सहन होणार नाही. म्हणून मला असे येऊन चालणार नाही. माझ्याजवळ एक जाड बुरखा आहे. ज्या ज्या वेळेस सुखी आनंदी लोकांना मी भेटायला जाते. तेव्हा तेव्हा तो बुरखा तोंडावर घेऊन जाते...

(प्रकाशराणी एक लांब ओढणी अंगावर घेते व स्वत:ला झोकाळून टाकते.) माझा एखादाही किरण त्यांना दिसता कामा नये. बिचकायची एकदम. पुष्कळशी सुखे मला भितात व ती स्वत: आत दु:खी असतात, ती सुखे सगळीच सुखी नाहीत... आता ठीक झाले... आता त्यांच्यातील अंत्यंत ओंगळ व आडदांड, घाणेरडी व उच्छृंखल अशीही मला भिणार नाहीत.

(पडदा उघडतो व दुसरा देखावा दिसतो.) सुखांचा राजवाडा

(पहिल्याने जेव्हा ढग दाखवणारा पडदा उघडतो, तेव्हा रंगभूमीवर राजवाड्याच्या समोर-- अगदी पुढे-एक प्रकारचा दिवाणखाना असतो. त्याला उंच आरसपानी खांब असतात. त्याच्यांमधून सुंदर नयनमनोहर किनखापी पडदे सोडलेले असतात. सोन्याच्या दोऱ्यांनी ते बांधलेले असतात. त्या पडद्याच्या मागचे काही दिसत नाही. नाना प्रकारची उंची व विलासोपभोगांची भांडी व वस्तू तेथे असतात. पेले, तसबिरी, आरसे, कोरीव कामे, हार अशा वस्तू तेथे असतात. मध्यभागी चांदीचे एक मोठे मेज असते त्यावर मेणबत्त्या लावलेल्या असतात. सोन्या-चांदीची ताटे व त्यातून उंची खाद्यपेये असतात. त्या मेजाभोवती जगातील अत्यंत मोठी ऐषारामाची सुखे खात-पीत

आलीपत असतात. आरडाओरडा करीत असतात, लोळत असतात, खेळत असतात. ही सारी सुखे प्रशस्त पोटांची, दोंदिल व अगडबंब अशी असतात. त्यांच्या अंगावर भरजरी पोशाख असतो. अंगावर हिऱ्यामोत्याचे अलंकार असतात. सुंदर दासी ताटे भरभरून आणीत असतात. वाढीत असतात. फेसाळ मद्याचे पेले भरून दिले जात असतात. अत्यंत अश्लील असा हास्यविनोद व गाणे-बजावणे तेथे चाललेले असते. रंगभूमीवर लाल असा दाट प्रकाश पडलेला असतो.)

(मधू व मालती, तसेच मोत्या, शर्करानंद व भाकरोबा हे सारे बघून दिपून जातात, चकित होतात, ती सारी प्रकाशराणीभोवती उभी राहतात. बोकोबा काही एक न बोलता एका काळ्या पडद्याखालून निघून जातो.)

मधू : ही गलेलठ्ठ अशी कोण मंडळी ? कशी मजा करीत आहेत? चमचमीत पदार्थांची रेलचेल आहे अगदी ! चैन आहे ह्यांची !

प्रकाशराणी : पृथ्वीवरची सर्वांची मोठी अशी जी ऐषारामाची सुखे ती ही हो ! उघड्या डोळ्यांनाही ही दिसतात. निळा पक्षी यांच्यात एखादा क्षण राहिला असण्याचा संभव आहे. परंतु बहुधा नसेलच कधी राहिला. थांब, तो हिरा नको इतक्यात फिरवू. थोडा वेळ निदान वरून वरून तरी या दिवाणखान्यात शोध घेऊ या.

मधू : आपण ह्या मंडळींकडे गेलो तर?

प्रकाशराणी : काही हरकत नाही विशेषशी. तशी ही मंडळी फार दुष्ट नाही. जरी या सुखांना चालरीत नसली, जरी ही असभ्य व अश्लील रीतीने वागत असली, तरी दुःस्वभावाची नाहीत.

मालती : कशा छान पोळ्या आहेत त्यांच्याजवळ !

मोत्या : आणि मांसाशनांचेही किती प्रकार ! चंगळ आहे. कोकराच्या तंगड्या, लहान वासरांचे पित्ताशय, मौज आहे ! लहान वासरांच्या पित्ताशयाप्रमाणे रुचकर जगात दुसरे काहीही नसेल !

भाकरोबा : त्या घडीच्या पोळ्या बघ ! सुंदर मैद्याचे ते चिरोटे ! किती छान व सुंदर हे पदार्थ !

शर्करानंद : माफ करा मला. हजार वेळा माफ करा. परंतु माझेही म्हणणे जरा ऐका... मला कोणचेही मन दुखवायचे नाही. परंतु तुम्ही सारी मेवामिठाईने विसरून गेला आहात, असे नाही का? त्या मेजाला जर खरी शोभा कशाने आली असेल तर त्या नानाप्रकारच्या सुंदर मेवामिठाईने. या दिवाणखान्यातील किंवा पृथ्वीवरील कोठल्याही इतर पदार्थापेक्षा मेवामिठाईची शोभा काही और आहे. मेवामिठाईचे सौंदर्य काही और आहे. तिची सर कशाला येणार नाही.

मधू : किती सुखी आहेत ही मंडळी ! काळजी नाही! हसणे, खिदळणे, ओरडणे, गाणे, नाचणे चालले आहे... आपल्याला त्यांनी पाहिले वाटते?

(बड्या ऐषारामांपैकी दहा–बारा आपापल्या पोटाच्या ढेरी हातांनी धरून मोठ्या कष्टाने उठून त्या मुलाकडे येऊ लागतात.)

प्रकाशराणी : भिऊ नका, ही मंडळी तशी मोठी मोकळी व रंगेल आहे... बहुधा तुम्हाला मेजवानीला बोलावतील. परंतु आमंत्रण स्वीकारू नका, येथील काही घेऊ नका, कशालाही हात लावू नका, जर का येथले काही खाल, प्याल, तर आपले कार्य विसराल, ध्येय विसराल, आपल्या कर्तव्याची भूल पडेल.

मधू : एखादा अनारसासुध्दा नाही घ्यायचा? एखादा शंकरपाळाही नाही चालणार ? त्या पोळ्या कशा खुसखुशीत दिसत आहेत! त्या साखरेच्या पाकातील पुऱ्या! तो मुरंबा आहे तिकडे! साय व साखर कशी सुंदर दिसते आहे!...

प्रकाशराणी : ते पदार्थ दिसत आहेत मोहक; परंतु मादक आहेत. त्यात धोका आहे. हे पदार्थ खाल तर सारी इच्छाशक्ती, तुमचा सारा निश्चय यांचा नाश होईल. स्वीकृत कर्तव्यासाठी त्याग करावा लागतो, ही गोष्ट मनुष्याने विसरून चालणार नाही. तुम्ही त्या मंडळींना विनयाने परंतु निश्चयाने नकार द्या.

(सर्वात बडा ऐषाराम पुढे हात करून मधूचा हात धरतो.)

ऐषआराम : काय रे मधुबाळ, कसे आहे तुझे ?

मधू : काय, तुम्ही मला ओळखता? तुम्ही कोण ?

ऐषआराम : सर्वत मोठे ऐषआरामाचे सुख ते मी... मला श्रीमंती म्हणतात. मी माझ्या सर्व बंधूंच्या वतीने तुला व तुझ्या कुटुंबातील सर्वांना आमंत्रण देण्यासाठी आलो आहे. तुम्ही आमच्या पंक्तीला येऊन आम्हाला कृतार्थ करा. आमची ही मेजवानी अहोरात्र अखंड चाललेली असते. या, नाही म्हणून नका. ह्या पृथ्वीवर सर्वात मोठी अशी जी जी ऐषआरामाची सुखे आहेत, ती सारी येथे तुम्हाला दिसतील. मी काहींची तुला ओळख करून देऊ का? हे की नाही माझे जावई. जमीनदारांचे खानदानीचे हे सुख. यांचे पोट मोठ्या भोपळ्याप्रमाणे आहे. स्वयंतृप्त पोकळ अहंकार त्याचे हे सुख. कसे आहे याचे तोंड, कसा ऐटबाज आहे मिजासी चेहरा? (तो पोकळ अहंकार मोठ्या आढ्यतेने मान तुकवतो.) तहान नसतानाही पिण्याचे जे सुख ते हे व भूक नसताही खाण्याचे ते हे. ही दोन्ही जुळी आहेत. यांचे पाय तिंबलेल्या पोकळ कणेचे पोकळ असे केलेले आहेत. (ती जुळी नमस्कार करतात व अडखळतात.) हे इकडे सुख आहे ना ते काही न जाणण्याचे सुख. कसे खांबासाराखे मठ्ठ उभे आहे! आणि ते पलीकडचे काही न समजण्याचे सुख, ते वटवाघळाप्रमाणे आंधळे आहे. हे या बाजूला काही न करण्याचे सुख आहे व त्याच्याजवळ जरुरीपेक्षा जास्त झोप घेण्याचे सुख आहे. या दोघांचे हात भाकरीच्या तुकड्यांचे केलेले आहेत व डोळे मुरावळ्याचे आहेत. हे शेवटी जे बडे गृहस्थ आहेत, यांचे नाव ऐका. विकट हसण्याचे सुख ते हे. ह्यांचे तोंड व कानापासून त्या कानापर्यंत पसरले आहे. जणू फाटले आहे. यांना स्वत:ला मुळीच आवरत नाही. (विकट हास्य वंदन करते व हसू लागते. हसता हसता त्याची मुरकुंडी वळते, परंतु कसेतरी स्वत:चे पोट वगैरे सावरते.)

मधू : (ज्या एका सुखाचे नाव सांगितले गेले नाही व जे सुख जरा एका बाजूला एकलकोंडे बसल्यासारखे दिसते, त्याच्याकडे बोट दाखवून) ते कोण ? कोणते ते सुख ? ते आमच्याकडे येण्याला का भिते व आमच्याकडे पाठ करून का बसले आहे ?

ऐषआराम : त्याविषयी काही विचारू नको. तो जरा लहरी व लाजरा आहे. मुलांना त्याची ओळख करून देणे बरे नाही. (मधूचा हात धरुन) चल, ये. ते सारे बघ सारे पुन्हा खाऊ-पिऊ लागले. जणू नव्याने मेजवानी सुरू झाली! ये, आज सकाळपासून ही बारावी मेजवानी. चल रे मधू, सारे आम्ही तुझीच वाट पाहत होतो. ते सगळे रंगेल गडी तुला हाका मारीत आहेत. चल, संकोच नको करू. येथल्या सर्व सुखांची ओळख करून देणे अशक्य आहे. कितीतरी सुखे येथे आहेत! ये (त्या दोन मुलांपुढे आपला हात पुढे करून) तुम्हाला तिकडे त्या दोन बहुमानाच्या आसनांवर नेऊन बसवू द्या. मला कृतार्थ होऊ द्या.

मधू : नको, खरेच का. मी आपला फार फार आभारी आहे... मला वाईट वाटते नाही म्हणायला. परंतु उपाय नाही. या वेळी तरी मला येता येणार नाही. आम्ही जरा महत्वाच्या कामात आहोत सध्या. निळ्या पक्ष्याच्या शोधात आहोत आम्ही. तो पक्षी कोठे लपून राहतो, हे बहुधा तुम्हाला नसेलच माहीत।

ऐषआराम : निळा पक्षी?... जरा थांब हां... हो मला आठवते... कोणी तरी त्या दिवशी त्याच्यासंबंधी बोलत होते खरे... आमच्या खाण्यात तो आजपर्यंत आला नाही ही गोष्ट मात्र निखालस खरी. आमच्या मेजवानीत त्याची चव चाखली गेली नाही याचाच अर्थ हा की, त्याची फारशी मातब्बरी आम्हाला वाटत नाही. परंतु तू त्याची कशाला एवढी चिंता करतोस?... येथे आमच्याजवळ त्याच्यापेक्षा सुंदर, त्याच्यापेक्षा गोड अशा कितीतरी चिजा आहेत। ये बाळ. आमच्या सुखांचा थोडासा तरी आस्वाद घे. आमच्या ऐषआरामाच्या सुखी राहण्याचा, या दिलखुश जीवनाचा थोडा अनुभव घे. आमच्यात भागीदार हो. आम्ही काय काम करतो ते तू आता पाहशीलच...

मधू : तुम्ही काय काम करता ?

ऐषआराम : काही न करण्यात आम्ही सारखे मग्न झलेले असतो!... एका क्षणाचीही विश्रांती नाही. सारखे काही न करणे चाललेले असते... खायचे असते, प्यायचे असते, लोळायचे असते. सारखे या कामात मग्न असतो!

मधू : मोठी मजा आहे तुमची एकंदरीत।...

ऐषआराम : मजा... हो... खरेच... मजा असलीच पाहिजे... या जगात त्याशिवाय दुसरे काय आहे ?

प्रकाशराणी : तुम्हाला खरोखरच असे वाटते का?

ऐषआराम : (प्रकाशराणीकडे बोट करून मधूला विचारतो.) मी असभ्य तरुणी कोण ?

(हा संवाद चालला असता दुसरी जरा दुय्यम दर्जाची सुखे मोत्या, भाकरोबा, शर्करानंद यांना मेजवानीला ओढून नेतात. त्या सुखांच्या अगदी शेजारी ही आमची मंडळी अगदी प्रेमाने बसलेली पाहून मध चमकतो. मोत्या, भाकरोबा, शर्करानंद तिकडे ताव मारतात, रंगतात.)

मधू : प्रकाशराणी, ते बघ तिकडे खातपीत बसले!

प्रकाशराणी : हाक मार त्यांना... नाही तर त्याचा परिणाम वाईट होईल!

मधू : मोत्या, अरे मोत्या, इकडे ये! ताबडतोब ये ! येतोस की नाही? ऐकायला येते की नाही? मोत्या! आणि भाकरोबा, शर्करानंद तिकडे कशाला गेलात? चला, इकडे या लवकर. परवानगीशिवाय तिकडे जाऊन काय करता आहात? येता की नाही? मला सोडून तिकडे गेला का गुलामांनो!

भाकरोबा : (सारे तोंड घासाने भरलेले आहे.) मधू, जरा नीट नाही का रे बोलता येत? जरा सभ्यतेने बोलावे...

मधू : काय भाकरोबा? असे फाजील केव्हापासून व्हायला लागलेत? उच्छृंखलपणा आठवला वाटते आज?... आणि तू रे मोत्या?... असेच माझे हुकूम मानणार ना? हीच आज्ञाधारकता वाटते?... मोत्या, ये इकडे, गुडघे टेक, टेक गुडघे माझ्यासमोर, ये लवकर...

मोत्या : (पंक्तीत बसलेला आहे तेथूनच) मी खायला बसलो की सारे विसरतो. एकदा खाऊ लागलो की मग माझा मी, मी मग कोणाचा नाही, कोणाचे ऐकत नाही...

शर्करानंद : (तोंड मधाने भरले आहे.) माफ करा. असे आदरातिथ्य करणारे, अगत्याने वाढणारे, आग्रह करणारे मजेदार यजमान सोडून एकदम येववत नाही. त्यांना राग नाही का येणार?

ऐषआराम : मधू, हे मोत्या वगैरे तुला उदाहरण घालून देत आहेत... ये, तुझी आम्ही वाट पाहत आहोत... तुझे आपले सारखे नाही... हा नकार अतःपर आम्ही ऐकणार नाही... नाही तर थोडी प्रेमाची बळजबरी करू हो आम्ही... ये ... या रे सर्व सुखांनो, थांबा, ओढून नेऊ. मला करा. यांना मेजाजवळ एकदा आणले म्हणजे मग रंगतील, आनंदी व सुखी होतील.

(ती सारी सुखे खातपीत, आरडतओरडत, त्यांना चालवेल तितपत चालत येतात व मधू आणि मालती यांना ओढू पाहतात. मुले विरोध करतात. ते लठ्ठ विकट हास्य प्रकाशराणीच्या कमरेला जाऊन जोराने मिठी मारते.)

प्रकाशराणी: मधू, अरे, तो हिरा फिरव... आता वेळ झाली. फिरव...

(मधू त्याप्रमाणे करतो. हिरा फिरवताच रंगभूमीवर एक प्रकारचा अवर्णनीय व विशुद्ध असा झिरझिरीत प्रकाश पसरतो. ते जाड पडदे अदृश्य होतात. एक दिव्य भव्य मंदिर तेथे निर्माण होते. एक प्रकारची गंभीरता, सरलता, साधुता, पवित्रता तेथे वाटते. उंच व बारीक असे सुंदर रमणीय खांब तेथे असतात. मेजवानीचे मेज तेथे दिसत नाही. स्वर्गीय वाऱ्याची झुळूक येते व पहिले सारे निरस्त होते. ऐषआरामी मंडळीचे ते सारे प्रकार उडून जातात. मखमल व जर नाहीशी होते. त्या ऐषआरामी सुखांची अंगे उघडी पडतात. त्यांची बाह्य रूपे, बाहेरचा झगझगाट नाहीसा होऊन आतील खरे ओंगळ व हिडीस रूप प्रकट होते व ती पळू लागतात. त्या दिव्य प्रकाशात ती नवाबी सुखे एकमेकांकडे बघतात व लज्जित होतात! ती सुखे स्वतः दुःखी आहेत असे दिसते. लाजेने व दुःखाने ती ओरडू लागतात. विकट हास्याच्या किंकाळ्या तर सर्वांत स्पष्ट ऐकू येतात! काही न समजण्याचे जे सुख ते मात्र शांत असते. त्याला काय चालले आहे काही कळतच नाही. बाकीची सारी सुखे धावपळ करतात. कोठे तरी लपू बघतात, दडू पाहतात, कोठे काळोखी जागा सापडेल का पाहतात. परंतु त्या दिवाणखान्यात अंधार औषधालाही नसतो. शेवटी निरुपाय होऊन ती सारी सुखे दुःखाच्या दरीकडचा झिरझिरीत पडता उघडून तिकडे जाऊ लागतात. दरीतून

शिव्याशाप ऐकू येतात. मोत्या, भाकरोबा, शर्करानंद लज्जेने माना खाली घलतात. मुलांच्या जवळ येऊन, त्यांच्यामागे लपतात.)

मधू : (त्या सर्व ऐषआरामांची त्रेधा बघून) खरेच, किती गलिच्छ व ओंगळ ही मंडळी... चालली तरी ती कोठे ही सारी?... फारच वाईट ही!

प्रकाशराणी: त्यांचे डोके ठिकाणावर नाही असे वाटते... दु:खाच्या दरीकडे ती चालली... आता त्यांना तर दु:खाच्या सहवासातच कायमचे राहावे लागेल...

मधू : (सभोवती बघतो व विस्मित होतो) ओहो... किती भव्य व सुंदर हा सभामंडप! आता आपण कोठे आहोत?

प्रकाशराणी: आपण कोठे गेलो नाही... जागच्या जागीच आहोत... तुझे डोळे आता निराळे बघत आहेत, एवढेच... वस्तूचे खरे अंतरंग आता आपण पाहत आहोत... तुझ्या हिऱ्याच्या प्रकाशातही जे आनंद स्थिर राहतील, निश्चित राहतील, त्यांचे आत्मे आता आपण पाहू....

मधू : किती मनोहर देखावा। कशी सुंदर सृष्टी!... हवाही किती मजेदार, आनंददायक!... जणू वसंत ऋतूचाच ऐन भर आहे असे वाटत आहे... ओहो... काही मंडळी आपल्याजवळ बोलायला येणारा असे दिसते...

(त्या सभामंडपात सुंदर देवदूतांच्या मूर्ती नुकत्याच झोपेतून उठल्याप्रमाणे दिसू लागतात. निरनिराळ्या खांबामधून एकदम त्या बाहेर पडतात. त्यांची वस्त्रे मोठी तलम व ताऱ्याप्रमाणे चमकणारी व थरथरणारी अशी असतात. गुलाब फुलतात. पाण्याचे स्मित चमकते. दवबिंदू चमकतात. उष:कालचे अद्‌भुत रंग दिसतात.)

प्रकाशराणी: प्रेमळ व सहृदय असे काही आनंद इकडे येत आहेत. निळ्या पक्ष्याबद्दल कदाचित ते थोडीफार माहिती देतील.

मधू : तुझ्या हे ओळखीचे आहेत का? तुला ह्यांची माहिती आहे?

प्रकाशराणी: त्या सर्वांना मी ओळखते. मी त्यांच्याकडे वरचेवर येत असते, परंतु मी कोण आहे याची दाद त्यांना लागू देत नाही...

मधू : ओहो–किती आहेत हे! चाहोबाजूंनी थवेच्या थवे येत आहेत!

प्रकाशराणी: एके काळी तर यांची अगणित संख्या होती. परंतु ऐषआरामांनी यांची संख्या घटविली, बरीच घटविली!...

मधू : काही हरकत नाही. अद्याप कितीतरी उरले आहेत...

प्रकाशराणीं: तुझ्या हातातील हिऱ्याचा परिणाम येथील वातावरणावर, या सभामंडपावर जसजसा अधिक होऊ लागेल, तसतसे आणखी आनंद बाहेर पडतील. पृथ्वीवर कल्पनातील आनंद आहेत... मनुष्य कल्पू शकेल त्यापेक्षा सहस्रपट आहेत. परंतु त्यांना शोधून काढतो कोण, बघतो कोण!... या आनंदांना मिळवण्याचा प्रयत्नच कोणी फारसा करीत नाही!

मधू : ती लहान लहान मंडळी आहे तिकडे... चला आपण त्यांना भेटू...

प्रकाशराणी: ज्या आनंदाची आपणास जरुरी आहे व ज्यांना आपली जरुरी आहे, ते आपोआपच या बाजूला येतील. बाकी इतरांची ओळख करून घ्यायला इतका वेळ तरी कोठे आहे?

(छोटा आनंदाचा एक संघ दिवाणखान्याच्या पाठीमागून हसत नाचत येऊन त्या मुलांभोवती कडे करून नाचू-गाऊ लागतो.)

मधू : किती गोड व सुरेख आहेत हे आनंद!... कोठून आले हे, कोण आहेत हे?

प्रकाशराणी: हे सारे लहान मुलांचे आनंद!

मधू : यांच्याजवळ बोलले तर चालेल?

प्रकाशराणी: चालेल... मी त्या सर्वांना ओळखते. ते नाचतात, गातात, हसतात. परंतु अद्याप ते बोलत नाहीत फार...

मधू : (उड्या मारीत जातो) कसे काय, बरे आहे ना रे मुलांनो? तो मुलगा कसा गुबगुबीत आहे व हसतो किती गोड! गाल कसे आहेत त्याचे छान! जणू गुलाबाची फुलेच! त्यांचे झगेही किती आहेत सुरेख! येथे सारे श्रीमंत असतात वाटते?

प्रकाशराणी: नाही काही. अरे मधू, येथेच काय; परंतु बहुतेक सर्वच ठिकाणी श्रीमंतांपेक्षा गरिबांचीच संख्या नेहमी अधिक असते!

मधू : हे का गरीब आहेत ?

प्रकाशराणी: तसा तुला फरक नाही करता येणार... मुलांचे जे सुख असते ते नेहमी पृथ्वीवर किंवा स्वर्गात जे जे अत्यंत सुंदर आहे, त्याने नटवलेले असते...

मधू : (त्याला मन आवरत नाही) ह्या मुलांबरोबर खूप नाचावेसे वाटते मला...

प्रकाशराणी: नाचायला वगैरे वेळ नाही. त्यांच्याजवळ निळा पक्षी नाही हे दिसतच आहे... ती बघ गेली सुद्धा... त्यांच्या जवळसुद्धा उगीच व्यर्थ दवडायला फार वेळ आहे कोठे? बाळपण फार थोडा वेळ असते... (सुखाचा दुसरा एक संघ येतो. मधाच्या संघापेक्षा ही मंडळी जरा उचं असतात. खूप मोठमोठ्याने गात गात येतात. "ती पाहा तेथे आहेत ती मुले. ती पाहा!" असे म्हणत येतात. येऊन मुलांभोवती फेर धरून नाचतात, त्यांचा प्रमुख नायक मग मधूजवळ जाऊन प्रेमाने हात पुढे करतो.)

सुख : मधू, बरे आहे ना रे ?

मधू : यांना माझे नाव काय माहीत? मघा त्या बड्या ऐषाआरामी श्रीमंती सुखालाही माझे नाव माहीत होते. माझ्या नावाची माहिती असणारी हा आणखी एक! (प्रकाशराणीला) जेथे जेथे मी जातो तेथे तेथे मला ओळखतात...(सुखाला) तू कोण?

सुख : तू मला नाही ओळखत? मग आमच्यातील कोणालाच तू ओळखणार नाहीस, पैज माझी!

मधू : खरेच कोणालाही मी ओळखू शकत नाही. तुम्हाला कधी पाहिल्याचे मला आठवतही नाही.

सुख : (बरोबरच्या सुखांना) ऐकलेत ना रे? मी म्हटले ते खरे झाले की नाही? मी खात्रीच होती कीहा ओळखणार नाही म्हणून! कधीही पाहिले नाही तुम्हाला असे म्हणतो! (सारी मुले खो खो करून हसतात.) असे मधू, वेडबंबू! अरे, तू जर कोणाला जाणत असशील, ओळखत असशील, तर फक्त आम्हालाच. इतर काहीही तू जाणत नाहीस. तुलाजे ज्ञान आहे ते फक्त आमच्यासंबंधी, बाकी कशाचेही नाही! आम्ही सदैव तुझ्या सभोवती असतो. आम्ही खातो, पितो, जागे होतो, श्वासोच्छ्वास करतो व तुमच्याबरोबर राहतो.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

मधू : हो... खरेच की... आठवले, आता ओळखले... परंतु तुमची नावे काय काय ती मला सांगा बघू...

सुख : तुला काही माहीत नाही असे दिसते. तुझ्या घरातील मुख्य सुख ते मी व ही तिथेच नांदणारी इतर सुखे।...

मधू : एकूण माझ्या घरात सुखे आहेत तर?...

सुख : ऐकलेत का रे काय म्हणतो ते?... माझ्या घरात म्हणे सुख आहेत का?... अरे मधू, तुझ्या घरातील कानाकोपरासुद्धा सुखाने भरलेला आहे. सुखाविणे रिता ठाव नाही तुझ्या घरात, आम्ही हसतो, खेळतो, गातो, भिंत पाडतो, छप्पर उचलतो. अशा प्रकारांनी आम्ही आनंद निर्माण करतो. परंतु आम्ही काही केले तरी तुला दिसत नाही व ऐकू येत नाही... आता यापुढे तरी जरा शहाण्यासारखा वाग... आमच्यातील काही प्रमुख सुखांशी तुझी ओळख करून देतो, त्यांना भेट. त्यांचा हात हातात घे. म्हणजे एखाद्या प्रसन्न व सुंदर दिवशी या सुखांना कसे उत्तेजन द्यावे. हसून त्यांना कसे आनंदवावे हे तुला समजू लागेल. गोड शब्दांनी या सुखाचे मग तू कौतुक करशील, स्वागत करशील, आभार मानशील. मधू, तुझे जीवन आनंदी व निश्चित असावे म्हणून ही सारी सुखे किती खटपट करतात सांगू! आधी मी माझी ओळख करून देतो. मी बरे असण्याचे सुख... मी तुझ्या सेवेस सदैव हजर असतो. मी सर्वात सुंदर नसलो तरी सर्वात महत्त्वाचे सुख ते मी आहे. आता पुन्हा कधी भेटलो तर ओळखशील ना?... हे दुसरे स्वच्छ हवेचे सुख... हे कसे अगदी अंतर्बाह्य स्वच्छ आहे. त्याला आत बाहेर काही नाही. जणू पारदर्शक दिसत आहे. हे इकडे उभे हे आईबापांवर प्रेम करण्याचे सुख. याचा पोशाख जरा काळसर असतो. हे सुख नेहमी जरा उदास असते. कारण या सुखाकडे फारसे लक्ष देत नाही. हे या बाजूचे दिव्य वस्त्रांनी नटलेले जे आहे ना ते निळ्या आकाशाचे सुख व त्याच्या शेजारचे हिरवा पोशाख केलेले ते वनातील राईचे सुख. तू तुझ्या खिडकीपाशी जाताच ही सुखे तुला भेटत असतात... हे एक निरभ्र व स्वच्छ सूर्यप्रकाशाचे सुख, कसा आहे त्याचा रंग ? हिऱ्यासारखा आहे, नाही? आणि हे वसंत ऋतूचे सुख. ह्याचा रंग पाचूचा आहे.

मधू : तुम्ही आजच्यासारखीच नेहमी सुंदर असता का? दररोज अशीच दिसता अगदी?

बरे असण्याचे सुख : होय, मधू. अरे, ज्या ज्या वेळेस लोकांचे डोळे खरोखरचे उघडलेले असतात, त्या वेळेस प्रत्येक दिवस म्हणजे आनंदाचा व प्रकाशाचाच असतो. प्रत्येक दिवस म्हणजे रविवार, सुखाचा शांतीचा वार! ही दुसरी सुखे अद्याप राहिली आहेत ना? हे बघ, हे की नाही सूर्यास्ताचे सुख. पृथ्वीवरील मोठमोठ्या राजेमहाराजांच्या वैभवापेक्षाही याचे वैभव थोर आहे! त्याच्या पाठोपाठ ते उगवत्या ताऱ्यांना पाहण्याचे सुख. सोन्याने जणू मढवल्यासारखे ते दिसत आहे. जेव्हा पावसाळा येतो, तेव्हाचे हे पाऊस पडण्याचे सुख. त्याच्या अंगावर मोतीच मोती आहेत बघ. हे हिवाळ्यातील शेकोटीजवळ शेकत बसण्याचे सुख. थंडीने गारठलेल्या हातांना ऊब देण्यासाठी आपला सुंदर लाल झगा ते पुढे करीत असते. परंतु आमच्यातील सर्वोत्कृष्ट जे सुख आहे, त्याचे नाव तर अद्याप मी सांगितलेच नाही. कारण दुसरे जे थोर निर्मळ आनंद आमच्याहून मोठे असे आहेत, त्यांच्याच तोलाचे हे सुख आहे. त्यांचाच भाऊ हे सुख शोभेल. ते थोर आनंद लवकरच तुम्हाला भेटतील. हे जे आमच्यातील निरुपम सर्वोत्कृष्ट असे सुख त्याचे नाव 'निष्पाप व अव्याज विचारांचे सुख.' आमच्यातील सर्वात तेजस्वी ते हेच आणि मग ही इकडे तशी कितीतरी सुखे आहेत. सांगता संपणार नाही आणि त्या थोर आनंदाकडे तुम्ही आल्याचा निरोप मला पाठवायचा आहे. ते आनंद स्वर्गाच्या द्वाराजवळ राहतात. दव पडले असता त्यातून अनवाणी धावत जाण्याचे जे सुख असते, त्या सुखाबरोबर मी निरोप पाठवते त्या महान निर्मळ आनंदाकडे. (दवातून पळत जाण्याचे सुख नाचत हसत पुढे येते.) जा रे, पळत जा व त्या महान आनंदांना या बालकांच्या आगमनाची वार्ता दे...

प्रकाशराणी: (मधूला) ते आनंद येईपर्यंत तू यांच्याजवळ त्या निळ्या पक्ष्याची चौकशी कर. तुझ्या घरातील जे हे बरे असण्याचे सुख, त्याला त्याची माहिती असण्याचा संभाव आहे...

मधू : (त्या सुखाला) कोठे आहे रे तो निळा पक्षी?

(ती सारी सुखे हसतात.)

सुख : अरे, याला तो निळा पक्षी कोठे आहे ते माहीत नाही ?

(ती सारी सुखे हसतात.)

मधू : (चिडून) मला नाही माहीत... मग त्यात हसण्यासारखे काय आहे?...

(पुन्हा सारी मोठ्याने हसतात.)

सुख : जाऊ द्या रे. मधू, असा रागावू नकोस. हसू नका रे आता. पुरे. नाही त्याला माहीत... तो तरी काय करील?... या लहान मुलाला माहीत असेल असे तुम्ही आम्ही तरी का अपेक्षावे? इतरांप्रमाणे तोही इतरांपेक्षा काही तो अधिक अडाणी नाही... त्या माहन निर्मळ आनंदांना निरोप देऊन दवातून पळत जाण्याचे सुख आलेसद्धा ! आणि ते महान आनंदही येत आहेत पाहा.

(दिव्य वस्त्रांनी अलंकृत अशा उंच पवित्र मूर्ती येतात, हळूहळू पुढे येतात.)

मधू : किती सुंदर आहेत हे!... हे हसत का बरे नाहीत? हे सुखी नाहीत का?...

प्रकाशराणी: जेव्हा कोणी हसतो, तेव्हा तो सुखीच असतो असें नाही.

मधू : कोण आहेत हे ?

सुख : हे महान आनंद आहेत.

मधू : तुला त्यांची नांवे आहेत का ठाऊक?

सुख : हो. आम्ही त्यांच्याबरोबर वरचेवर खेळतो... सर्वांच्या पुढे जो हा आनंद आहे तो न्यायी असण्याचा आनंद. ज्या ज्या वेळेस अन्यायाचे उच्चाटन होते, त्या त्या वेळेस याच्या तोंडावर एक प्रकारचे समाधान फुलते. मी अजून वयाने लहान आहे. ह्या आनंदाला हसताना मी अद्याप पाहिले नाही. ह्या आनंदाच्या पाठीमागे तो सद्वर्तनाचा आनंद आहे. तो अत्यंत समाधानीही आहे व अत्यंत दु:खीही आहे. दु:खाचे समाधान करण्यासाठी हा आनंद नेहमी जाऊ पाहत असतो. त्यांच्याकडे जाण्यापासून याला परावृत्त करणे मोठे कठीण जाते. कारण हा जर आमच्यातून गेला, तर आम्हीही दु:खाइतकेच दु:खी

होऊ. तो उजवीकडे कीर्तिमान होण्याचा आनंद आहे, व त्याच्यापाठीमागे समजण्याचा आनंद आहे. हा जो समजण्याचा आनंद आहे, त्यांचा एक भाऊ आहे. त्याचे नाव न समजण्याचा आनंद. हा भाऊ त्या भावाला नेहमी शोधत असतो.

मधू : मी पाहिला आहे ह्याचा भाऊ! त्या बड्या ऐषआरामाच्या सुखांच्या संगतीत ते काही न समजण्याचे सुख होते. परंतु ती सारी श्रीमंती सुखे शेवटी दु:खाच्या दरीत गेली...

सुख : असे मला वाटतच होते... वाईट निघाला एकंदरीत ह्याचा भाऊ. वाईटांच्या संगतीत राहिल्यामुळे तो फारच बिघडला शेवटी. परंतु ही गोष्ट ह्या भावाजवळ बोलू नकोस हो! नाही तर त्या दु:खदरीत जाईल हा धुंडायला व आम्ही एका मोलाच्या आनंदास गमावून बसू... या बाजूला जे काही आनंद आहेत, त्यातील हा जे सुंदर आहे ते पाहण्याचा आनंद आहे. आमच्यामध्ये जो प्रकाश नेहमी प्रकाशतो, त्या प्रकाशाला हाच प्रत्यही किरण देत असतो.

मधू : आणि तो तिकडे अगदी लांब दूर, सोनेरी ढगात, पायांच्या बोटांवर उभे राहून पाहिले तरीही जो नीटसा दिसत नाही, त्या आनंदाचे काय नाव?

सुख : प्रेम करण्याचा तो थोर आनंद... तू कितीही खटपट केलीस, तरी तू इतका लहान आहेस की तो तुला नीट दिसणारच नाही...

मधू : आणि तिकडे उजवीकडे पाठीमागे बुरखा घेतलेले, जवळ न येणारे असे जे आनंद आहेत, त्यांची काय नावे?...

सुख : जे आनंद मनुष्याला अद्याप अज्ञात आहेत असे ते आनंद...

मधू : त्या दुसऱ्यांचे आमच्याजवळ काय आहे काम? आणि हे असे एका बाजूला का झाले?...

सुख : आमच्यातील एक अती विशुद्ध व पवित्र आनंद येत आहे. त्याला जागा देण्यासाठी हे बाजूला होत आहेत.

मधू : कोणता आनंद येत आहे? कोण आहे बरे तो?...

सुख : तू त्याला अजून ओळखले नाहीस?... नीट पाहा. डोळे नीट उघडून हृदयाच्या आतील भागात जाऊन पाहा... त्या आनंदाने तुला बघितले रे बघितले। तो पाहा धावतच येत आहे तुझ्याकडे... बाहू पसरून तुला

मिठी मारण्यासाठी येत आहे... अरे, हा तुझ्या आईचा आनंद... मातृप्रेमाचा हा निस्सीम अतुलनीय अपूर्व आनंद।...

(इतर सारे आनंद या महान आनंदाचा जयजयकार करतात, टाळ्या वाजवतात व बाजूला मुकेपणे उभे राहतात.)

मातृप्रेमाचा आनंद : मधू आणि मालीसुध्दा! खरेच का? मी स्वप्नात आहे की खरोखरच त्यांना समोर पाहत आहे?... तुम्ही येथे असाल अशी नव्हती मला कल्पना! मला घरी अगदी एकटे एकटे वाटत होते आणि तुम्ही ज्या स्वर्गात सर्व मातांचे आत्मे आनंदाने प्रकाशत असतात, त्या स्वर्गात चढू पाहत आहात! परंतु भेटलेत, बरे झाले... आता आधी मटामट मुके घेऊ दे पोटभर. या जवळ, या माझ्या अगदी जवळ. तुम्हाला पोटाशी घट्ट धरू दे. जगात यापेक्षा दुसरा कोणता श्रेष्ठ आनंद आहे? आईने मुलाला पोटाशी धरले आहे, याच्यापुढे सारे आनंद फिके आहेत. मधू, हसत का रे नाहीस? माले, तूही हसत नाहीस? अरे, आईचे प्रेमही का दिसताक्षणी तुम्ही ओळखीत नाही? माझ्याकडे पाहा तरी एकदा नीट! पाहा माझे हे डोळे, हे ओठ, हे हात-- आहेत की नाही ओळखीचे?

मधू : हो, सारे ओळखले मी. परंतु माहीत नव्हते मला... तुम्ही अगदी आईसारख्या दिसता, फक्त आईपेक्षा अधिक सुंदर आहात...

मातृप्रेमाचा आनंद : कारण मी वृध्द कधी होतच नाही. प्रत्येक दिवशी नवीन जोम, नवीन तारुण्य, नवीन आनंद मला लाभत असतात. तुमच्या तोंडावरचे एखादे स्मित पाहताच माझ्यात नवीन तारुण्य संचरते. तुमचे एक हास्य माझे गेलेले एक वर्ष परत आणते... घरी ते दिसत नाही. परंतु येथे सारे दिसते व ते खरेही असते...

मधू : (आश्चर्यकारक होऊन, प्रेमाने बघत व मधूनमधून मुके घेत) आणि तुमचा पोशाखही किती सुंदर आहे!... कशाचा आहे हा? हा रेशमी! आहे की रुप्याचा आहे, का मोत्याचा?

मातृप्रेमाचा आनंद : प्रेमाने बघणे व मुके घेणे याचा तो केलेला आहे. तुम्ही मला एक गोडसा पापा दिलात व मी तुमचा एक गोडसा मुका घेतला, की माझ्या या वस्त्राला एक चंद्रकिरण किंवा एक सूर्यकिरण येऊन मिळतो...

मधू : मजाच एकूण! तू इतकी श्रीमंत आहेस हे मला कधीही खरे वाटत नव्हते... कोठे गं लपवून ठेवतेस हे वैभव, ही संपत्ती?... ज्या कपाटाची आपली किल्ली नेहमी बाबांजवळ असते, त्या कपाटात ठेवतेस?...

मातृप्रेमाचा आनंद : मी हा पोशाख कधीही लपवून ठेवीत नाही. रात्रंदिवस हीच वस्त्रे माझ्या अंगावर असतात. परंतु लोकांना दिसत नाहीत. कारण लोकांचे डोळे नीट उघडेच नसतात. ते जणू उघडे असून मिटल्यासारखे. त्यामुळे त्यांना दिसत नाही... माता मुलांवर जेव्हा प्रेम करतात. तेव्हा त्या श्रीमंत असतात... कोणतीही आई असो, ती मुलांवर प्रेम करते, तेवहा कुबेराहून श्रीमंत असते. माता कधी कुरूप नसतात. द्ररिद्री नसतात, वृद्ध नसतात. मातृप्रेम हा सर्व आनंदातील अत्यंत सुंदर आनंद।... आणि माता जेव्हा दु:खी असतात, तेव्हा त्यांना एकाच गोष्टीची जरूर असते. मुलाच्या एका मुक्याची. तो मुका त्यांनी घेतला की पुरे, त्यांच्या खोल डोळ्यातील अश्रूंचे तात्काळ सुंदर तारे होतात।

मधू : (आश्चर्याने बघून) हे काय? खरोखरच तुझे डोळे ताऱ्यांनी भरले आहेत! तझेच हे नेहमीचे डोळे, परंतु आज किती सुंदर दिसत आहेत! आणि हा तुझा हात... या बोटात ती अंगठीही आहे आणि एके दिवशी दिवा लावताना तुझा हात भाजला होता तीही खूण येथे आहे... परंतु हा हात किती शुभ्र गोरापान दिसतो आहे. किती रेशमासारखा मऊ व कोमल! जणू या हातातून आतून प्रकाश नाच आहे, वाहत आहे! घरी काम पडते तसे या हाताला येथे काम नाही पडत?...

मातृप्रेमाचा आनंद : हो, काम पडते तर! अरे, दररोज काम करणारा, काबाडकष्ट करणारा तोच हात हा. परंतु हा हात तुला लागताच, ह्या हाताने तुला कुरवाळताच, ह्या हाताने तुला पोटाशी धरताच हा हात शुभ्र, स्वच्छ व सुंदर होतो. कोमल व सुकुमार होतो. जणू प्रकाशरस त्याच्यातून धावत आहे असे दिसते. बघ हा हात खरे ना?

मधू : खरेच. आश्चर्य आहे आई, आणि तुझा आवाजही रोजचाच आहे. परंतु परी तू बोलतेस ना त्यापेक्षा येथे आधिक सुरेख बोलतेस!

मातृप्रेमाचा आनंद : घरी फार काम असते व वेळही नसतो बोलायला... परंतु बाहेर बोललो नाही तरी आतून बोलतच असतो. आपण न बोललो तरी

आपणास ऐकू येत असते... बरे, पण तू उद्या पुन्हा आपल्या झोपडीत जाशील. तेथे फाटक्या चिंध्या अंगावर असलेली अशी तुझी आई असेल. त्या आईच्या ठिकाणी मला ओळखशील ना?...

मधू : मला परत जावेसे वाटतच नाही!... तू येथे आहेस, मग मीही येथेच राहतो. तू जितके दिवस येथे राहशील तितके दिवस मीही राहीन!...

मातृप्रेमाचा आनंद : अरे, येथे काय व तेथे खाली काय, सारे एकच! मी खालीच असते. आपण सारी खालीच असते... मला तू खाली जेव्हा जेव्हा बघतोस, त्यावेळी खरोखरच माझ्याकडे कोणत्या डोळ्यांनी बघावे, कसे बघावे, ती कला समजून घेण्यासाठी तू येथे आला आहेस. समजले ना? तुला वाटते आहे की आपण येथे स्वर्गात आहो. परंतु बाळ, जेथे जेथे आपण एकमेकांचे मुके घेऊ, एकमेकांना भेटू, एकमेकाजवळ बसू, तेथे तेथे स्वर्गच आहे. खालची आई व वरची आई... दोन भिन्न नाहीत. तुझी एकच आई आहे. प्रत्येक मुलाला एकच आई असते, तीच त्याची नेहमीच आहे. सदानकदाची व अत्यंत सुदंर अशी आई. फक्त आईकडे कसे पाहावे ते शिकले पाहिजे. आईला नीट ओळखायला शिकले पाहिजे. परंतु मधू येथे कसा रे येऊ शकलास? पृथ्वीवर जन्मल्यापासून ज्या पंथाचा शोध, ज्या मार्गाचा शोध मनुष्याने चालवलेला आहे, तो मार्ग तुला कसा सापडला बाळ?

मधू : (प्रकाशराणीकडे बोट करतो. प्रकाशराणी मुद्दामच योग्य दिसावे म्हणून बाजूला असते.) हिने आणले!

मातृप्रेमाचा आनंद : ह्या कोण?

मधू : ही प्रकाशराणी.

मातृप्रेमाचा आनंद : होय का? मी त्यांना कधीच पाहिले नव्हते... तुमच्यावर तिचा फार लोभ आहे असे ऐकले होते... तिला तुमचा दोघांचा लळा आहे, होय ना?... परंतु तिने स्वतःला असे लपवले का आहे ? स्वतःचे तोंड कधी दाखवीत नाहीत का त्या?...

मधू : दाखवतात तर काय झाले! परंतुंआपले रूप उघड पाहतील तर आनंद कदाचित बावरतील असे मनात येऊन त्यांनी आपले तोंड लपवले आहे.

मातृप्रेमाचा आनंद : परंतु आम्ही तर त्यांची सदैव वाट पाहत असतो. त्यांना माहीत नाही का हे ? (इतर सर्व आनंदांना हाका मारून) या रे सर्व बंधूंनो, लवकर या !... आज प्रकाशराणी दर्शन देण्यासाठी आली आहे !... ते सर्व महान आनंद आश्चर्यचकित होतात. ते उत्सुकतेने जवळ येतात. प्रकाशराणी, प्रकाशराणी असे करीत जयजयकार करतात.

समजण्याचा आनंद : (सर्वांना दूर ढकलून पुढे येतो व प्रकाशराणीस भेटतो.) तू का प्रकाशराणी, आणि आम्हाला कळलेही नाही ! समजलेही नाही ! वर्षानुवर्षे प्रकाश प्रकाश करीत आम्ही वाट पाहत आहोत. मला ओळखलेस का ? मी समजून घेण्याचा आनंद. मी कधीपासून तुला शोधतो आहे ! कितीतरी वर्षांपासून तुला शोधतो आहे... आम्ही सारे सुखी आहोत. परंतु स्वतः पलीकडे आम्हाला पाहता येत नाही !...

न्यायी असण्याचा आनंद : (प्रकाशराणीला भेटून) मला ओळखलेस का ? मी न्यायी असण्याचा आनंद... मीही तुझा बरेच दिवस शोध करीत आहे.... आम्ही सुखी आहोत. परंतु आमच्या छायांच्या पलीकडे आम्हाला पाहता येत नाही...

जे सुंदर आहेत त्याला पाहण्याचा आनंद : (भेटून) मला ओळखलेस ? जे जे सुंदर आहे ते पाहण्याचा आनंद तो मी... माझे तुझ्यावर किती प्रेम आहे म्हणून सांगू ! आम्ही सुखी आहोत. परंतु स्वतःच्या सुखस्वप्नापलीकडे आम्हाला पाहता येत नाही...

समजून घेण्याचा आनंद : ये प्रकाशराणी, ये. आमच्यापासून अशी दूर नको राहूस. दाखव तुझे मुखकमल. आम्हाला तिष्ठत ठेवू नकोस. तुझे तेज सहन करावयास आम्ही समर्थ आहोत, आम्ही तितके पवित्र व विशुद्ध आहोत. काढ, तोंडावरचा बुरखा काढ. आच्छादन दूर कर. आमच्यापासून छपून राहिलेले शेवटचे सुख मिळू दे आम्हाला... आम्ही सर्व बंधू तुझ्या चरणांवर लोटांगण घालीत आहोत... प्रकाशराणी, तू आमची राणी, सम्राज्ञी ! तू आमचे सर्व सुख, आमचे थोर पारितोषिक, तू आमची आशा, तू सर्वस्व !...

प्रकाशराणी : (तोंडावर ओढणी अधिकच आवळून) बंधूंनो, माझ्या सुंदर बंधूंनो ! मी स्वामीची आज्ञा पाळीत असते. त्याची आज्ञा पाळलीच पाहिजे...

अजून तोंड दाखवण्याची वेळ आली नाही. परंतु एक दिवस येईल. त्या दिवशी मी मोकळेपणे, निर्भयपणे, निःशंकपणे तोंडावर बुरखा वगैरे न घेता, न लपता, न छपता तुमच्यासमोर येईन... येते आता मी. नमस्कार, उठा हो आता. जाताना भेटून घेऊ. हरवलेली भावंडे एकमेकांना भेटतात, त्याप्रमाणे आपण प्रेमाने एकमेकांना भेटून घेऊ... आणि त्या दिवसाची.. जो लवकरच उगवणार आहे... त्या सोन्याच्या दिवसाची वाट पाहत राहू या.

मातृप्रेमाचा आनंद : माझ्या लहान गरीब मुलांवर तुझा फार लोभ. फार प्रेम. किती चांगली वागतेस तू त्यांच्याजवळ ?

प्रकाशराणी : जी एकमेकांवर प्रेम करतात, त्यांच्याशी मी नेहमीच चांगली वागते, त्यांच्यावर माया करते...

समजण्याचा आनंद : (प्रकाशराणीजवळ जाऊन) माझ्या मस्तकाचे अवघ्राण कर, माझ्या भालप्रदेशाचे चुंबन घे.

(दोघे अत्यंत प्रेमाने भेटतात व मोठ्या कष्टाने दूर होतात. डोळ्यात अश्रू उभे राहतात.)

मधू : (चकित होऊन) तुम्ही का रडता ? (इतर आनंदांकडे पाहून) तुम्ही सारीच रडत आहात ?... !.... परंतु का, का हे तुमच्या सर्वांच्या डोळ्यात अश्रू ?

प्रकाशराणी : बोलू नको बाळ...

✦✦✦

अंक पाचवा

प्रवेश पहिला

(पडद्यासमोर)

(मधू व मालती, प्रकाशराणी, मोत्या, बोकोबा, भाकरोबा, अग्नी, शर्करानंद, जलराणी व दुधी प्रवेश करतात.)

प्रकाशराणी : परीकडून मला चिठ्ठी आली आहे की तो नील पक्षी बहुधा येथेच असेल...

मधू : येथेच म्हणजे कोठे ?...

प्रकाशराणी : येथे त्या भिंतीपलीकडे असणाऱ्या स्मशानात... तेथील मृतात्म्यांपैकीच कोणी तरी तो नील पक्षी थडग्याखाली लपवून ठेवला आहे असे वाटते. कोणत्या थडग्याखाली लपवलेला आहे ते आपण शोधून काढले पाहिजे. आपण सारी थडगी नीट तपासली पाहिजेत.

मधू : थडगी कशी तपासायची ? मृतांची तपासणी कशी घ्यायची ?

प्रकाशराणी : ते काम सोपे आहे. तुझ्याजवळ तो हिरा आहे ना, तो मध्यरात्री फिरव. म्हणजे प्रेतात्म्यांना फार त्रास नाही व्हायचा. ती जमिनीतून मग वर येताना दिसतील. तसेच जे प्रेतात्मे थडग्यातून बाहेर पडत नाहीत, तेथेच पडून राहतात, त्यांनाही आपण पाहू.

मधू : ती आपणावर रागावणार नाहीत का ?

प्रकाशराणी : छे, मुळीच नाहीत. त्यांना काही समजणारही नाही. त्यांना त्रास दिलेला आवडत नाही हे खरे. परंतु मध्यरात्री बाहेर पडायची त्यांना नेहमीची सवयच आहे. म्हणून आपल्यामुळे त्यांना त्रास व्हायचा नाही. त्याचवेळी तू हिरा फिरव.

मधू : भाकरोबा, दुधी, शर्करानंद अशी फिकट का दिसतात ? त्यांचे चेहरे पांढरे फटफटीत दिसत आहेत. ती काहीच बोलत नाहीत, अशी मुकी का?...

दुधी : (थरथरत) मी नासून जाईन अशी मला भीती वाटते.

प्रकाशराणी : (फक्त मधूला) त्यांच्याकडे लक्ष नको देऊ. त्यांना मृतांची भीती वाटते.

अग्नी : (इकडे तिकडे नाचत) मला त्यांची मुळीच भीती वाटत नाही. त्यांची राख करण्याची मला सवयच आहे. एक काळ असा होता की मृतांना मी जाळीत असे. हल्लीच्यापेक्षा त्या वेळेस मौज असे...

मधू : आपला मोत्याही घाबरल्यासारखा दिसत आहे ! त्यालाही भीती वाटते का?

मोत्या : मला आणि भीती ? छे: मला कसलेही भय नाही. मी काही भीतीने नाही कापत ! तुम्ही जाल तर तुमच्याबरोबर मी आहेच ठेवलेला...

मधू : बोकोबाचे काय म्हणणे आहे ?

बोकोबा : (जरा गूढपणे) मला सारे माहीत आहे. मला सारे समजते...

मधू : (प्रकाशराणीला) तू येणार ना आमच्याबरोबर?

प्रकाशराणी : नाही. मी स्मशानाच्या दाराजवळ असेनच. ही इतर मंडीळीही माझ्याजवळ राहतील. कारण काहींना तेथे भीती वाटेल व वेडेवाकडे चाळेही करायची. हा अग्नी जर तुमच्याबरोबर आला, तर पूर्वीप्रमाणे सर्वांना जाळण्याची त्याला स्फूर्ती व्हायची एखादी ! परंतु हल्ली इकडे तसे करीत नाहीत. तू व मालती दोघेच जा...

मधू : आमच्याबरोबर मोत्याही नको का?

मोत्या : मी तर येणारच. माझ्या लहानग्या धन्याला मी कधीही सोडणार नाही. माझ्या देवाजवळ मला सदैव राहिलेच पाहिजे. मी जाणार !

प्रकाशराणी : तुला जाता येणार नाही. परीने स्पष्ट आज्ञा दिलेली आहे. शिवाय येथे त्यांच्या जिवाला धोका वगैरे काही नाही.

मोत्या : मग ठीक. राहीन मी येथे. मला काय ! परंतु जर का ती प्रेते काही अपाय करू पाहतील, तर फक्त शीळ घाला अशी, (शीळ घालून दाखवतो) की मग पाहा पराक्रम... जसे त्या जंगलात केले, तसे येथे करीन... भूभू कवौ भौ भू..:

प्रकाशराणी : मुलांनो, निघा आता. मी येथे जवळच आहे हं। (प्रकाशराणी दोघांचे मुके घेते.) माझ्यावर ज्यांचे प्रेम आहे व मी ज्यांच्यावर प्रेम करते ते मला परत मिळतील.(इतरांना उद्देशून) तुम्ही या बाजूने चला माझ्याबरोबर (प्रकाशराणीबरोबर इतर सरी जातात.) मधू व मालती फक्त रंगभूमीवर राहतात. दुसरा पडदा उघडतो.)

प्रवेश दुसरा

स्मशानाचा देखावा.

(मध्यरात्रीचा समय. चंद्राचा प्रकाश त्या खेडेगावातील कबरस्थानावर पडलेला आहे. तेथे अनेक थडगी आहेत. थडग्यांना कोठे दगड आहेत, कोठे मातीचे उंचवट आहेत, कोठे कोठे त्यांच्यावर गवत उगवलेले असते. काही थडग्यांवर नावे कोरलेले चिपा बसवलेल्या असतात. एका लहानशा चबुतऱ्याजवळ मधू व मालती उभी असतात.)

मालती : भय वाटते मला...

मधू : मला नाही कधी भय वाटत...

मालती : मेलेली माणसे वाईट असतात का रे?

मधू : ती वाईट कशी असतील? ती का जिवंत आहेत?

मालती : तू पाहिले आहेस कधी मेलेले माणूस?

मधू : हो, पुष्कळ दिवस झाले त्याला. मी अगदी लहान होतो तेव्हा...

मालती : कसे रे दिसे ते?

मधू : अगदी पांढरे फटफटीत. अगदी शांत, थंडगार दगडासारखे. ते मुळीच बोलले नाही...

मालती : आपल्याला येथे दिसतील का रे ?

मधू : हो! प्रकाशराणीने नाही का तसे सांगितले?

मालती : मग कोठे आहेत ती?

मधू : त्या हिरव्या गवताखाली किंवा त्या मोठ्या दगडाखाली असतील.

मालती : सबंध वर्षभर का ती तेथेच असतात?

मधू : हो.

मालती : (ज्या दगडांवर नाव वगैरे लिहिलेले आहे, त्याकडे बोट करून) हे का त्यांच्या घराचे दरवाजे?

मधू : होय...

मालती : हवा मोठी सुंदर असली म्हणजे ही बाहेर पडतात का?

मधू : त्यांना फक्त रात्रीच बाहेर पडता येते...

मालती : असे रे का ?

मधू : कारण त्यांच्या अंगावर एकच कपडा असतो...

मालती : पाऊस पडू लागला म्हणजे ती बाहेर पडतात का?

मधू : पाऊस पडत असला म्हणजे ती घरीच राहतात...

मालती : त्यांच्या घरात चांगले असते का रे ?

मधू : त्यांच्या घरात फार जागा नसते. फार गर्दी व दाटी असते असे म्हणतात...

मालती : त्यांना मुलेबाळ असतात का रे ?

मधू : हो, मेलेली मुलेबाळे सारी त्यांची...

मालती : काय खातात रे ती?

मधू : मुळे.

मालती : आपल्याला दिसतील का रे ती मृत माणसे?

मधू : हो, मी हिरा फिरवला की सारे दिसते...

मालती : ती आपल्याला काय म्हणतील?

मधू : ती बोलत नाहीत, म्हणून काहीच म्हणणार नाहीत...

मालती : का नाही बोलत ती?

मधू : कारण बोलण्यासारखे त्यांच्याजवळ काही नसतेच...

मालती : का नसते बोलण्यासारखे?

मधू : किती गं विचारतेस? त्रासदायक आहेस अगदी...

मालती : तू तो हिरा केव्हा फिरवशील?

मधू : प्रकाशराणीने मध्यरात्र होईपर्यंत थांब म्हणून सांगितले नाही का? मध्यरात्री हिरा फिरवला म्हणजे त्यांना कमी त्रास होईल. आपल्यासाठी मग निराळे त्यांना उठायला नको.

मालती : त्यांना त्रास कमी पडेल असे का?

मधू : कारण मध्यरात्री हवा खाण्यासाठी ती उठतात.

मालती : अजून मध्यरात्र नाही झाली.

मधू : तुला ते घड्याळ दिसते का?

मालती : हो. त्यातल लहान काटाही दिसतो आहे...

मधू : आता बारा वाजतील हो... ऐक. ते बघ ठोक पडत आहेत. (ठोके पडतात.)

मालती : मला येथून जावेसे वाटते. मी जाते...

मधू : आता नाही जायचे... मी तो हिरा फिरवीत आहे आता...

मालती : नको रे थांब, नको... मला आपली जाऊ दे... फार भितो माझा जीव. नको रे भाऊ. खरेच नको. भीती वाटते मला फार...

मधू : अगं, काही धोका नाही माले...

मालती : मेलेल्यांना पाहण्याची मला नाही इच्छा... मला मुळीच नकोत ते पाहायला...

मधू : नको तर नको. तुझे डोळे मिटून ठेव. तू बघू नको...

मालती : (मधूच्या अंगरख्याला बिलगून) भाऊ, मला नाही हो येथे थांबवत. नाही धीर धरवत. माझ्याच्याने नाही राहवणार येथे. जमिनीतून ती वर येणार!

मधू : अशी थरथर कापू नकोस. एक क्षणभर ती येतील...

मालती : तू सुद्धा कापत आहेस. ती अक्राळविक्राळ भयंकर असतील!

मधू : आता वेळ झाली. उगीच वेळ दवडता कामा नये.
(मधू तो हिरा फिरवतो. एक क्षणभरच भयाण शांतता असते. मंग हळूच कुरकुर असा आवाज येऊ लागतो. ती थडगी उघडतात. नावे वगैरे असलेले दगड वर उचलले जातात.)

मालती : (मधूला मिठी मारून) ती बघ येतात... ती बघ तेथे!
(त्या साऱ्या उघडलेल्या थडग्यांतून प्रथम वाफेसारखा धूर येतो. नंतर तो धूर स्वच्छ व एकत्रित होऊन दाट होऊन उंच होत जातो. वर जातो. नंतर पुन्हा तो धूर सर्वत्र नीट पसरतो व स्मशानाचे एकदम नंदनवन होते. उष:कालचे सुंदर किरण पडलेले असतात. दवबिंदू चमकतात. सुंदर फुले फुलतात. पानातून वारा सळसळतो, भुंगे गुं गुं करतात. विहंग जागे

होऊन किलबिल करू लागतात व ते सारे स्मशान निनादित करतात. ती पाखरे सूर्याची व जीवनाची स्तोत्रे गातात. मधू व मालती चकित होतात. ती एकमेकांना घट्टी धरून ठेवतात. त्या पुष्पवाटिकेतून ती दोघे थोडेसे चालतात व ती थडगी कोठे आहेत त्याच्या खुणा पाहातात.)

मालती : (गवतामध्ये बघत) कोठे आहेत प्रेते?

मधू : (सर्वत्र पाहून) येथे प्रेते नाहीत...

(पडदा)

प्रवेश तिसरा

(भविष्याचे राज्य)

(नील रंगाचा राजवाडा, त्यात विशाल विस्तृत सभागृहे. जी मुले अद्याप जन्मावयाची आहेत, ती तेथे वाट पाहत असतात. इंद्रनील मण्यांचे असंख्य स्तंभ तेथे असतात. वरच्या चांदव्याला ते आधार देत असतात. तेथील प्रत्येक वस्तू गर्द अशा निळ्या रंगाची असते. तेथील दृष्टी पोचेल तेथपर्यंतचे वातावरण निळे, एक प्रकारचे आभासमय व चंचल असे दिसते. खांबाच्या खालच्या बैठकी, बसावयासाठी ठेवलेली वाटोळी बाके पांढऱ्या आरसपानी दगडांची असतात. उजव्या बाजूच्या खांबांमधून मोठमोठे दरवाजे असतात. हे दरवाजे या प्रवेशाच्या शेवटी 'काळपुरुष' उघडील. प्रत्यक्ष जीवन व उषा यांच्यासमोर तो ते दरवाजे उघडील. जिकडे तिकडे सम प्रमाणात मुले गजबजून राहिली आहेत. त्या मुलांच्या अंगावर लांब निळे झगे आहेत. काही मुले खेळत असतात, फिरत असतात. कोणी बोलत असतात. कोणी स्वप्ने पाहत असतात, काही मुले काम करीत असतात. काही झोपलेली असतात. कोणी आपल्या भविष्यकालीन संशोधनात गर्क असतात. त्या संशोधनात लागणारी साधने, उपकरणे ते घडवीत असतात. नाना वस्तू, फुले, फळे, झाडे ज्यांच्यावर प्रयोग करायचे आहेत, ती तेथे असतात. कोणी मुले या फुला-फळांच्या वृक्षांची लागवड करीत असतात, तर कोणी फुले, फळे तोडीत असतात. परंतु सर्व वस्तू एकजात त्या तेजस्वी निळ्या

रंगाच्या असतात. त्या मुलांतील काही जरा उंच असतात. त्यांचे कपडे जरा फिक्या निळ्या रंगांचे असतात. ती राजबिंडी दिसतात. अती शांत व रमणीय दिसतात. ते देवदूत असावेत बहुधा.)

हळूच जणू चोराप्रमाणे डावीकडून पुढील खांबांमधून लपत छपत मधू, मालती व प्रकाशराणी प्रवेश करतात. त्यांच्या येण्याने त्या असंख्य निळ्या मुलांत एकप्रकारची हालचाल सुरू होते. ती मुले धावत येतात व या नूतन पाहण्यांच्या अवती भोवती आश्चर्याने बघत उभी राहतात.

मधू : शर्करानंद, भाकरोबा व बोकोबा कोठे आहेत?

प्रकाशराणी : त्यांना येथे येता येणार नाही. भविष्यकाळातील गोष्टी जर त्यांना कळतील. तर ती बंड करतील. आपले ऐकेनाशी होतील.

मधू : आणि मोत्या?...

प्रकाशराणी : काही वर्षांनी आपले काय होणार आहे हे त्यालाही समजणे बरे होणार नाही. त्या सर्वांना कबरस्थानाच्या पडवीत कोंडून मी आले आहे.

मधू : आपण सध्या कोठे आहोत?

प्रकाशराणी : भविष्यकाळाच्या राज्यात आहोत आपण. जी मले अद्याप जन्मावयाची आहेत, त्यांच्यामध्ये आपण आलो आहोत. हा प्रदेश मनुष्यांना कधीही दिसत नाही. परंतु त्या हिऱ्याच्या साहाय्याने आपण येथे बघू शकतो. बहुधा तो निळा पक्षी येथे आपणास मिळेल.

मधू : नक्की मिळेल. कारण येथे सर्वच वस्तूंचा रंग निळा आहे. तेव्हा येथील पक्षीही निळेच असले पाहिजेत. (सर्वत्र बघत) खरोखर किती नयनमनोहर देखावा, किती सुंदर येथील सृष्टी।

प्रकाशराणी : त्या पळणाऱ्या मुलांकडे बघ...

मधू : त्यांना का भूक लागली आहे?

प्रकाशराणी : मुळीच नाही. ती हसत आहेत, मंद स्मित करीत आहेत. त्यांना आश्चर्य वाटत आहे तुमच्याविषयी...

सारी निळी मुले : (आणखी धावत येतात, दुसरीही जमा होतात.) अरे, जिवंत मुले!

मधू : आम्हाला जिवंत मुले असे का म्हणतात?

प्रकाशराणी : कारण ती अद्याप जिवंत नाहीत.

मधू : तर मग ती काय करीत आहेत?

प्रकाशराणी : ती जन्मकालची वाट पाहत आहेत.

मधू : जन्मकाळ?

प्रकाशराणी : हो. आपल्या पृथ्वीवर जी मुले जन्मतात, ती सारी येथून येतात. येथून त्यांचा पुरवठा केला जातो. प्रत्येक मूल आपल्या जन्मवेळेची वाट पाहत असते. तो दिवस, ती घटका केव्हा येणार इकडे सर्वांचे सारखे लक्ष असते. आई--बापांना जेव्हा जेव्हा मुले पाहिजे असतात, तेव्हा ते पलीकडचे मोठमोठे दरवाजे आहेत ना, ते उघडले जातात व तेथून ती मुले खाली सोडली जातात...

मधू : किती आहेत ही मुले, खरेच कितीतरी।

प्रकाशराणी : त्यांच्याशिवाय आणखीही आहेत. आपणाला सारी थोडीच दिसणार! या दिवाणखान्यासारखे तीस हजार दिवाणखाते मुलांनी भरलेले आहेत. खच्चून भरलेले आहेत. जगाच्या अंतापर्यंत ती पुरतील, पुरून उरतील. नुसती कल्पना कर, बघ! कोण करील यांची गणती?

मधू : ते उंच निळे पुरुष, ते कोण?

प्रकाशराणी : त्यांच्याविषयी कोणालाही नक्की माहिती नाही. परंतु या मुलांचे ते सांभाळ करणारे आहेत असे म्हणतात. माणसांच्या नंतर पृथ्वीवर ते येतील असे मी ऐकले आहे. माणसांचे युग संपले की, यांचे सुरू होईल असे म्हणतात... परंतु आपण त्यांना प्रश्न विचारू शकणार नाही. आपणास परवानगी नाही.

मधू : का नाही परवानगी?

प्रकाशराणी : तू भूमातेचे गुपित आहे.

मधू : आणि त्या लहान मुलांशी तरी बोलता येईल का एखाद्याला?

प्रकाशराणी : हो. त्यांच्याशी बोल जा. त्यांच्याशी मैत्री कर. तो एक निळा मुलगा बघ. जरा इतरांपेक्षा अधिक जिज्ञासू दिसतो आहे, नाही? जा त्याच्याजवळ आणि बोल...

मधू : काय बोलू मी?

प्रकाशराणी : मनाला वाटेल ते बोल. तू एखादा लहान खेळगड्याबरोबर, सवंगड्यांबरोबर जसे बोलतोस, तसेच याच्याजवळ बोल...

मधू : त्याचा हात हातात घेऊ? प्रेमाने तो हलवू?

प्रकाशराणी : खुशाल हातात हात घे, तुला तो काही मारणार बिरणार नाही. जा. असा संकोच नको करू. मी आपली दूर जाते.

मधू : (त्या निळ्या मुलाकडे जातो व त्याचा हात हातात घेतो.) कसे काय? (त्याच्या निळ्या पोशाखाला हात लावून) हे काय आहे ?

मुलगा : (गंभीरपणे मधूच्या टोपीला स्पर्श करून) आणि हे ?

मधू : अरे, ही तर माझी टोपी! तुला नाही वाटते टोपी?

मुलगा : नाही. तिचा काय उपयोग?

मधू : कोणी भेटले म्हणजे कसे काय आहे असे विचारण्यासाठी तिचा उपयोग होतो. थंडीत, पावसात ती डोक्याला सांभाळते.

मुलगा : म्हणजे काय ? थंडी केव्हा असते ?

मधू : जेव्हा आपणास हुडहुडी भरते, आपण हु हु हु हु करतो. तेव्हा आपले हात मग गारठतात अगदी व असे छातीशी धरतो ते (आपले हात थरथरवीत छातीशी धरतो.)

मुलगा : पृथ्वीवर का थंड असते?

मधू : हो. हिवाळ्यात कधी कधी अगदी गार वाटते आणि घरात विस्तव वगैरे नसतो तेव्हाही थंड वाटते.

मुलगा : घरात विस्तव का नसतो?

मधू : गरिबीमुळे लाकडे वगैरे घ्यायला पैसे लागतात.

मुलगा : पैसे म्हणजे काय?

मधू : आपण किंमत म्हणून जी देतो, ते पैसे...

मुलगा : असे का?

मधू : हो आणि काहींजवळ पैस असतात, काहींजवळ नसतात.

मुलगा : का नसतात?

मधू : कारण ते श्रीमंत नसतात... तू श्रीमंत आहेस का रे ? तुझे वय काय ?...

मुलगा : मी लवकरच जन्म घेणार आहे... बारा वर्षांनी मी जन्मेन... जन्माला येणे चांगले आहे का रे ? गंमत असते का?

मधू : खरेच, मोठी गंमत असते ।

मुलगा : तू जन्मलास तेव्हा काय केलेस?

मधू : मला नाही आठवत. त्याला कितीतरी दिवस झाले.

मुलगा : ते म्हणतात की पृथ्वी व पृथ्वीवरची जिवंत माणसे-- सारे फार सुंदर आहे.

मधू : हो. निदान वाईट तरी नाही. पाखरे आहेत. खायला भाकरी-पोळी असते. खेळणी असतात. काही मुले आपली खेळणी कोणाला देत नाहीत. आपल्याजवळच घेऊन बसतात. परंतु त्यांच्याजवळ खेळणी नसतात. खाऊ नसतो, त्यांना निदान दुसऱ्यांच्या खेळण्यांकडे, दुसऱ्या मुलांच्या खाऊकडे पाहता तरी येते.

मुलगा : ते सांगतात की आया मुलांची वाट बघत दारात उभ्या असतात. चांगल्या असतात का रे आया?

मधू : खरेच, आया फार चांगल्या असतात. जगातील सर्व वस्तूंपेक्षा चांगली वस्तू म्हणजे आई. आज्यासुद्धा चांगल्या असतात. परंतु त्या लवकर मरतात.

मुलगा : मरतात? म्हणजे काय?

मधू : एके दिवशी सायंकाळी त्या जातात, मग परत येत नाहीत.

मुलगा : का बरे?

मधू : ते कसे कोणाला सांगता येईल? कदाचित त्यांना वाईट वाटत असेल, बरे नसेल वाटत !

मुलगा : तुझी गेली का?

मधू : कोण, आजी?

मुलगा : आई का आजी, मला नाही माहीत.

मधू : आई व आजी म्हणजे एक नाही. आजी पहिल्याने जाते. फार वाईट आहे ही गोष्ट. माझी आजी तर फार मायाळू होती. ती माझ्यावर फार प्रेम करा.

मुलगा : काय झाले तुझ्या डोळ्यांना? तुझे डोळे का मोती तयार करीत आहेत?

मधू : नाही ही काही मोती नाहीत !

मुलगा : मग हे काय?

मधू : काही नाही. येथल्या या साऱ्या निळ्या झगमगटाने डोळे जरा दिपले.

मुलगा : ह्याला काय म्हणतात?

मधू : कशाला?

मुलगा : ते खाली गळत आहे त्याला?

मधू : त्याला काय म्हणावयाचे?... ते थोडेसे पाणी आहे.

मुलगा : ते डोळ्यातून का येते?

मधू : ज्यावेळी कधी कोणी रडतो तेव्हा ते येते.

मुलगा : रडणे? ह्या रडण्याचा काय अर्थ? ह्या पाण्याचा काय अर्थ?

मधू : मी काही रडत नव्हते... त्या निळ्या रंगामुळे हे झाले... परंतु मी रडलो तरी असेच पाणी येणार. त्यात फरक पडणार नाही...

मुलगा : कोणी नेहमी रडतो का रे?

मधू : लहान मुलगे नाही रडत, परंतु मुली रडतात... तुम्ही येथे नाही का रडत कोणी?

मुलगा : नाही. कसे रडायचे ते मला माहीत नाही.

मधू : बरे. तू शिकशील... तू येथे खेळतोस कशाने? ते मोठमोठे निळे पंख दिसत आहेत, त्यांच्याजवळ खेळतोस?

मुलगा : हे पंख ? हे पंख तर पृथ्वीवर जो शोध मी लावणार आहे त्याच्यासाठी आहेत...

मधू : कोणता शोध? तू काही शोधून काढले आहेस?

मुलगा : होय. तू नाही ऐकलेस?... मी पृथ्वीवर आलो म्हणजे सुख देणाऱ्या वस्तूचा शोध लावणार आहे!

मधू : ती वस्तू खायला चांगली लागेल? का तिच्यातून गोड गोड आवाज निघेल?

मुलगा : नाही. त्या वस्तूतून आवाज नाही ऐकायला येत!

मधू : मग काही चांगले नाही ते !

मुलगा : त्या वस्तूत मी रोज सुधारणा करीत असतो... आता बहुतेक ती पूर्ण होत आली आहे. तुला बघायची आहे ती?

मधू : हो. मला फार इच्छा आहे... कोठे आहे ती?

मुलगा : त्या दोन खांबांच्यामध्ये बघ. येथूनही तुला दिसेल ती.

दुसरे एक निळे मूल : (मधूकडे येते व त्याच्या अंगरख्याची बाही धरते.) माझाही शोध तुला पाहायचा आहे? येतोस?

मधू : हो, कोणता शोध, कशाविषयी?

दुसरे मूल : आयुष्यवृद्धीचे हे तीस उपाय! ते तिकडे निळ्या गोळ्यात मी ठेवले आहे.

तिसरे मूल : (गर्दीतून पुढे येत) कोणालाही माहीत नाही असा प्रकाश मी तुला दाखवतो. (अत्यंत अद्‌भुत) अशा ज्योतीने तो स्वत:ला प्रकाशित करतो.) कसा चमत्कारिक आहे प्रकाश, नाही?

चवथे मूल : (मधूचा हात धरून) माझ्याकडे ये ना रे ! माझे यंत्र तू बघच. पंखाशिवाय पाखराने उडावे तसे हे यंत्र. हे यंत्र उडते...

पाचवे मूल : त्यांचे नको रे आधी बघू. आधी माझा शोध. चंद्रावर काय काय संपत्ती आहे तिचा शोध मी लावला आहे.

सारी निळी मुले : (मधू व मालतीभोवती गर्दी करतात. ''माझा शोध बघ. त्याचा नको. आधी माझा. माझी वस्तू चांगली आहे. नाही रे माझी आहे. माझा शोध आश्चर्यकारक आहे. माझा गोड आहे शोध. साखरेचा आहे तो. त्याने माझी कल्पना चोरली रे.'' वगैरे एकच गर्दी ती मुले करतात. सारी बोलतात, पुढे येऊ बघतात.)

(अशा त्या गलबलीत ती सारी निळी मुले त्या दोन मुलांना आपापल्या निळ्या कारखान्यात ओढीत नेतात. त्या कारखान्यातील प्रयोगालयातील जो तो आपला शोध दाखवू लागतो. चाके, कप्प्या, पट्टे, भिंगे-- अनेक वस्तू तेथे असतात व त्यांचा आवाज होत असतो. नाना प्रकरची चमत्कारिक व रहस्यमय यंत्रे तेथे फिरत असतात. निरनिराळे तक्ते, नकाशे, योजना ती निळी मुळे मांडून दाखवतात. नाना प्रकारचे ग्रंथ दाखवतात. प्रचंड आकाराची फुले व फळे ती मुले आणतात. ती फुले-फळे जणू इंद्रनील मण्याची बनवलेली आहेत अशी दिसतात.)

एक मुलगा : (प्रचंड आकाराची जाईची फुले डोक्यावर घेतलेल्या व त्यांच्या भारांमुळे वाकलेला) ही बघ माझी फुले!

मधू : ही कसली फुले? काय याचं नांव? मला नाही ओळखता येत.

मुलगा : अरे, ही जाईची फुले!

मधू : काहीतरीच! ही फुले तर मोठ्या मेजाएवढी दिसत आहेत! ही का जाईची? अशक्य!

मुलगा : वास बघ किती छान येत आहे?

मधू : (वास घेऊन) खरोखर आश्चर्यकारक वास!

मुलगा : मी पृथ्वीवर आलो म्हणजे जाईची फुले अशी मोठाली करीन!

मधू : कधी घडणार हे ?

मुलगा : ५३ वर्षे आहेत अजून, त्रेपन्न वर्षे, चार महिने व नऊ दिवस! (आणखी दोन निराळी मुले येतात. त्यांच्याजवळ मोठ्या घागरी एवढाली द्राक्षे असतात. एका दांड्याला अडकवून तो दांडा उचलून ती आणतात. ती द्राक्षे अत्यंत तेजस्वी दिसतात.)

दोघांपैकी एक : (फळे मधुपुढे नेऊन) कशी आहेत माझी फळे ?

मधू : हे कोहाळे आहेत वाटते?

तो मुलगा : नाही काही. अरे ही द्राक्षे आहेत, द्राक्षे! मी तीस वर्षांचा असेन तेव्हा द्राक्षे अशी करीन. मी शोधून काढली आहे रीत...

दुसरा : आणि माझी ही सफरचंदे पाहा.

मधू : ही तर कलिंगडे आहेत।

तो दुसरा मुलगा : नाही रे, ही कलिंगडे नाहीत. ही मी केलेली सफरचंदे. अजून ही शेवटची नाही काही. माझ्या प्रयोगात अद्याप सुधारणा करावयाची आहे. मी खाली जन्माला येईन व मग एवढाली सफरचंदे करीन. मी शोधून काढली आहे त्याची युक्ती!

आणखी एक मुलगा : (भोपळ्याहून मोठे टोमॅटो आणतो) माझे टोमॅटो बघ कसे आहेत ते!...

मधू : हे टोमॅटो की भोपळे ?

मुलगा : टोमॅटो हो हे। मी पृथ्वीवर येईन व एवढाले टोमॅटो करीन. सुंदर मोठे टोमॅटो! मी तीन लोकांच्या राजांचा बागवान होणार आहे!

मधू : तीन लोक?

मुलगा : म्हणजे पृथ्वी, चंद्र, मंगळ या तिन्ही ग्रहांवर, या तिन्ही लोकी तो राजा ४५ वर्षे राज्य करील. पृथ्वीला सुख देईल. तो राजा होणार आहे, तो तुला पाहायचा आहे?

मधू : कोठे आहे तो?

मुलगा : त्या खांबाच्या पायांशी जो निजलेला आहे, तो हो तो!

मधू : त्या डाव्या बाजूचा?

मुलगा : नाही रे, उजव्या बाजूचा... डाव्या बाजूला मुलगा आहे ना तो भूतलाला अपूर्व असा आनंद देईल, कधी न मिळालेला असा निरुपम आनंद देईल.

मधू : कशाप्रकारे?

(जो मुलगा मधूशी सर्वांच्या आधी बोलू लागला होता तो.)

तो पहिला मुलगा : पृथ्वीतलावर जे विचार आतापर्यंत मनुष्याला स्फुरले नाहीत, असे विचार देऊन.

मधू : आणि तो पलीकडचा लहानसा गबदुल लठ्ठ मुलगा, नाकावर बोटे ठेवून उभा आहे, तो काय करणार आहे?

तो पहिला मुलगा : ज्या वेळेस सूर्याची उष्णता आजच्यापेक्षा फार कमी होईल, त्या वेळेस पृथ्वीवर उष्णता राहावी म्हणून तो एक विशिष्ट प्रकारच्या तेजाचा शोध लावणार आहे.

मधू : एकमेकांना मिठी मारणारी व एकमेकांच्या सारखे मुके घेणारी ती दोन मुले, ती कोण आहेत? ती का बहीण-भाऊ आहेत?

तो पहिला मुलगा : नाही. ती मोठी गमतीदार मुले. गंमत करतात. तरी प्रियकर आहेत. त्यांचे परस्परांवर प्रेम आहे.

मधू : म्हणजे काय?

तो पहिला मुलगा : मला नाही हो माहीत... काळपुरुष त्यांना त्या नावाने हाका मारतो व त्यांची थट्टा करतो... ती दोघे एकमेकांकडे पाहण्यात सारे दिवस दवडतात. एकमेकांचे मुके घेतात, एकमेकांचा सारखा निरोप घेत असतात. !

मधू : का?

तो पहिला मुलगा : बहुधा त्या दोघांना येथून एकदम खाली जाता येणार नाही.

मधू : आणि तो जरा गुलाबी छटेचा मुलगा-- गंभीर दिसतो आहे व आपला अंगठा चुंफतो आहे-- तो काय करणार आहे?

तो पहिला मुलगा : पृथ्वीवरून अन्याय सफा दूर करणार आहे. अन्याय औषधालाही ठेवणार नाही...

मधू : वा! फारच छान होईल. खरेच का?

तो पहिला मुलगा : ते म्हणतात की हे काम प्रचंड आहे.

मधू : आणि तो लालसर केसांचा रे? कोठे जात आहो हे न पाहताच तो चालत आहे! तो का आंधळा आहे?

तो पहिला मुलगा : अजून आंधळा नाही, परंतु तो होणार आहे. त्याच्याकडे नीट बघ तो मरणाला जिंकणार आहे असे नाही दिसत?

मधू : म्हणजे काय?

तो पहिला मुलगा : मलाही याचा अर्थ स्पष्टपणे समजत नाही. परंतु मरणाला जिंकणे म्हणजे एक फार मोठी गोष्ट आहे असे म्हणतात!...

मधू : (पायऱ्या, बाके वगैरेंवर निजून राहिलेल्या शेकडो मुलांकडे बोट करून) ही सारी निजलेली मुले, कितीतरी आहेत ही! ही काहीच हालचाल करीत नाहीत. का बरे?

तो पहिला मुलगा : ती कशाचा सारखा विचार करीत आहेत.

मधू : कशाचा?

तो पहिला मुलगा : आपण कसला विचार करीत आहोत, ते त्यांचे त्यांनाच अजून माहीत नाही. परंतु पृथ्वीवर जाता काहीतरी बरोबर घेऊन गेलेच पाहिजे त्यांना. येथून रिक्त हस्ताने कोणालाही खाली जाता येणार नाही.

मधू : असे कोण म्हणतो?

तो पहिला मुलगा : काळपुरुष, तो काळपुरुष दरवाज्यावर उभा असतो. तो जेव्हा दरवाजा उघडील, तेव्हा तुला दिसेल. फार दमून गेल्यासारखा दिसतो तो.

(इतर सर्व मुलांना कोपरांनी बाजूला करीत एक मुलगा पुढे येतो व बोलू लागतो.)

मुलगा : कसे काय रे मधू?

मधू : अरेच्च्या। याला माझे नाव काय माहीत?

मुलगा : (मधू व मालतीला प्रेमाने भेटून त्यांचे मुके घेतो.) कसे आहे तुमचे? बरी खुशाल आहेत ना सारी? या माझ्याजवळ व मला नीट प्रेमाने भेटा. माझा पापा घ्या. मुका घ्या, ये, माले तूही ये. मला तुमची नावे माहीत आहेत. यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. कारण मी तुमचा नवीन भाऊ होणार आहे. तुम्ही येथे आला आहात म्हणून नुकतेच मला त्यांनी सांगितले. दिवाणखान्याच्या त्या पलीकडच्या टोकाला मी माझे विचार माझ्या पिशवीत भरीत होतो. माझी बांधाबांध करून ठेवीत होतो. आईला सांगा की मी तयार आहे म्हणून...

मधू : तू का आमच्याकडे येणार?

मुलगा : हो. अगदी खात्रीपूर्वक. संक्रातीला येईन. मी प्रथम लहान असेन. मला तेव्हा त्रास नका हा देऊ! जन्माला येण्यापूर्वीच मी तुम्हाला भेटलो, तुमचे मुके घेतले. किती छान झाले! पाळणा नीट दुरुस्त करून ठेवा असे बाबांना सांगा. आपल्या घरात कसे काय आहे रे? सुख आहे की नाही?

मधू : काही फार वाईट नाही आमचे घर... आणि आई तर फारच प्रेमळ व मायाळू आहे!...

मुलगा : आणि खाण्यापिण्याला!

मधू : खाण्यापिण्याचे तसे काय सांगू? पण आई कधी कधी गोडबीड करते, नाही का ग माले?

मालती : हो, सणासुदीला करते.

मधू : त्या पिशवीत काय आहे? काय घेऊन येणार आहेस आमच्यासाठी?

मुलगा : तीन आजार घेऊन येणार आहे. डाग्या खोकला व गोवर!...

मधू : बस्स, इतकेच? आणि त्यानंतर तू काय करशील?

मुलगा : त्यानंतर?... मी तुम्हाला सोडून जाईन!...

मधू : मग येतोस तरी कशाला? येण्याचे श्रम घेण्यात तरी काय हशील?

मुलगा : येथे आपल्या मनाप्रमाणे ठरवायचे नसते!

(एक प्रकाराची लाट खाली-वर आदळते आहे व तिचा आवाज एकू येत आहे असे वाटते. तो आवाज दरवाजातून, खांबातून येत आहे असे

वाटते. आता पूर्वीपेक्षा अधिक स्वच्छ व प्रखर असा प्रकाश खांबांवर व दरवाजांवर पडतो.)

मधू : तो कोण?

मुलगा : तोच काळ! आता तो दरवाजे उघडील.

(मुलांच्या थव्यात एकदम हालचाल सुरू होते. पुष्कळजण आपापली कामे, यंत्रे वगैरे सोडून देतात. निजलेलीही बरीचशी उठतात. सर्वांची दृष्टी त्या दरवाजाकडे जाते. सारी दरवाजाजवळ जातात.)

प्रकाशराणी : (मधूला भेटून) या खांबाच्या आड आपण लपून राहू. या काळाने आपणास जर पाहिले तर बरे नाही.

मधू : हा कोठून येतो आहे आवाज?

प्रकाशराणी : उषा उदय पावत आहे. ज्या मुलांचा आज जन्म व्हावयाचा आहे, ती या वेळेस खाली पृथ्वीवर जातात.

मधू : ती खाली कशी जातील? शिड्या आहेत?

मुलगा : तू ते सारे आता पाहशील. तो बघ काळपुरुष अडसर काढीत आहे...

मधू : ती खाली कशी जातील? शिड्या आहेत?

मुलगा : ते ते सारे आता पाहशील. तो बघ काळपुरुष अडसर काढीत आहे...

मधू : काळ म्हणजे काय?

मुलगा : खाली जन्म घेण्यासाठी जाणाऱ्यांना रोज सकाळी उष:कालाबरोबर हाका मारतो असा वृद्ध पुराणपुरुष.

मधू : तो दुष्ट आहे का?

मुलगा : तसे नाही; परंतु तो कोणाचे ऐकत नाही. त्याला कितीही सांगा, पाया पडा, गयावया करा, पदर पसरा, तो ऐकणार नाही. काही मुले त्यांची पाळी नसूनही 'आम्ही जातो, आम्हाला पाठवा', असा हट्ट धरून बसतात. परंतु काळ कोणाचे काही चालू देत नाही. ढकलतो त्यांना मागे...

मधू : त्यांना का खाली जाण्यात आनंद वाटतो ?

मुलगा : मागे राहण्यातही दु:ख वाटते व जाता नाही वाईट वाटते. ते बघ, तिकडे बघ. काळापुरुष दरवाजे उघडू लागला.

(दरवाजांच्या फळ्या बिजागऱ्यांवर सावकाश फिरतात व उघडतात.

लांबून येणाऱ्या संगीताप्रमाणे पृथ्वीवरील आवाज ऐकू येत असतात. दिवाणखान्यात लालसर व हिरवा प्रकाश सर्वत्र भरतो. काळापुरुष उभा आहे. तो उंच आहे. वृद्ध आहे. त्याची लांब शुभ्र दाढी रुळत असते. त्याच्या हातात विळा आहे व घड्याळ आहे. दाराच्या उंबरठ्यात तो उभा आहे. दूर उष:प्रकाशात गलबतांची रुपेरी व सोनेरी शिडे प्रेक्षकांना दिसतात.)

काळ : (उंबऱ्यात उभा राहून) ज्यांची वेळ आली आहे ते तयार आहेत का ?

निळी मुले : (इतरांना कोपराने ढकलीत, सर्व बाजूंनी धावत येतात.) हो, आम्ही तयार आहोत. जाणारे सारे येथे हजर आहोत.

काळ : (जरा गंभीर व दटावणीच्या आवाजात पुढे गर्दी करीत घुसणाऱ्या मुलांना) एका वेळी एक. गर्दी नका करू. एकेक या. पुन्हा जास्त आलेत. व्हा मागे. नेहमी आपले तुमचे तेच... मला कोणी फसवू शकणार नाही... (एकाला मागे ढकलून) आज तुझी नाही रे पाळी. जा मागे. उद्यापर्यंत धीर धर. तुझीही नाही रे. दहा वर्षे अवकाश आहे तुला. समजलास... हा तेरावा धनगर कशाला? बारांचीच मागणी आहे. जास्तींची जरूर नाही. पृथ्वीवर आहेत तेच फार झाले आहेत... आणि वास्तवशास्त्रज्ञ कोठे आहेत?... प्रामाणिक मनुष्याचा एक नमुना पृथ्वीवर असावा म्हणून मागण्यात आला आहे. कोठे आहे तो प्रामाणिक माणूस?... तू का रे ? (तो मुलगा 'हो' अशी मान हलवतो.) तू तर नेभळट व बावळट दिसतो आहेस अगदी. बरे... अरे ए, इतक्या घाईने नको येऊ. पडशील की। जरा धीरेसे आणि तू रे, काय आणले आहेस बरोबर?... काही नाही? हात हालवीत जाणार? ते नाही चालायचे. मग आज नाही जाता येणार. काही तरी तयार कर. वाटले तर एखादा मोठा गुन्हा बरोबर घेऊन जा. एखादा सुंदरसा नवीन रोग निर्माण कर व तो ने. तुम्ही बरोबर काय नेता, त्याच्याशी मला काही एक कर्तव्य नाही. परंतु काही तरी प्रत्येकाचे बरोबर आहे की नाही एवढे मी पाहणार.

(इतक्यात एका मुलाला इतर मुले ढकलीत पुढे आणतात. त्यांची ओढाताण चाललेली असते. काळाचे तिकडे लक्ष जाते.)

काय आहे रे धिंगामस्ती? काय रे आहे तुझी भानगडे? येत नव्हतास वाटते? तुझी वेळ आली आहे माहीत नाही का तुला? अन्यायाशी लढणारा वीर पुरुष खाली पाहिजे आहे. तूच आहेस एक बाबा. तुला गेल्याशिवाय गत्यंतर नाही.

निळी मुले : 'मी जात नाही.' म्हणतो तो, आजोबा!

काळ : काय म्हणतो? जात नाही? कोठे आहो आपण हे विसरला वाटते? माझ्याशी गाठ आहे म्हणाजे... तक्रार नाही, आवाज नाही मुकाट्याने निघाले पाहिजे. वेळ नाही येथे दवडायला...

मुलगा : (ज्याला ढकलून आणण्यात आले असते) नको, खरेच नको. मला पृथ्वीवर जाण्याची बिलकुल इच्छा नाही. मला जावेसे वाटत नाही. जन्म घ्यायची इच्छा नाही. मी येथेच राहीन...

काळ : तुला तुझी इच्छा कोणी विचारली?... वेळ आली म्हणजे आली. हं नीघ, उचल पाऊल, त्वरा कर. हो पुढे...

दुसरे एक मूल : (पुढे येऊन) त्याच्या ऐवजी मी जाऊ? त्याची जागा मी भरून काढीन. माझे आई-बाप वृद्ध झाले आहेत व ते कितीतरी दिवस माझी वाट पाहत आहेत असे एकेले मी...

काळ : ते काही चालणार नाही. ज्याने त्याने आपली वेळ येताच गेले पाहिजे. तुमचे ऐकू लागेन तर कधीच काम सुरळीतपणे पार पडणार नाही. एकाला जायला पाहिजे, तर एकाला नको. एक वेळेच्या आधी येतो तर एक उशिरा येतो. (काही मुले उंबऱ्यात गर्दी करतात, त्यांना मागे ढकलून) अशी गर्दी नका रे करू. जा मागे, उगीच उठाठेवा. ज्यांना आज जायचे नाही, त्यांचे येथे काम नाही. आज जाऊ जाऊ म्हणत आहात, परंतु तुमची पाळी येऊ दे, म्हणजे होईल घाबरगुंडी व मागे लपाल. ही पाहा चार मुले. त्यांची आहे आज पाळी. कशी पानाप्रमाणे कापत आहेत!

(एक मूल उंबरा ओलांडून खाली जाणार इतक्यात परत मागे येते. त्याला उद्देशून का, मागे का आली स्वारी पुन्हा? काय झाले?)

मुलगा : जे दोन गुन्हे मला करायचे आहेत, ते ज्या पेटीत मी ठेवले होते, ती पेटी मी विसरलो!

दुसरे एक मूल : बहुजन समाजसाला नवप्रकाश देणारा माझा विचार ज्या भांड्यात मी ठेवला होता, ते भांडे घ्यायला मीही विसरलो.

काळ : मग जा लवकर. पळत जा व पळत ये. आता फक्त ६१२ सेकंद राहिली आहेत... उषादेवीचे गलबत शीड फडफडवीत आहे. गलबते हाकारायची वेळ होत आली. उषादेवी वाट पाहत आहे. उशीर कराल तर आज जाता येणार नाही. लवकर या दोघे... चढा रे सारी. चढा गलबतावर, चला. (एक लहान मुलगा काळाच्या तंगड्यांतून हळूच निसटून गलबताकडे जाऊ पाहतो त्याला पकडून) तू नाही रे लबाडा- तुझी पाळी येण्यापूर्वी हा तू तिसऱ्यांदा आज पुन्हा जाऊ पाहत होतास. पुन्हा जर असा सापडलास तर कायमची खाली जाण्याची बंदी होईल, समजलास? याद राख आणि पृथ्वीवर जन्म घेणे, ती काही गंमत नाही, खेळ नाही... हां, झाली का रे साऱ्यांची तयारी? चढले सारे? कोणी नाही ना राहिले? कोणाचे सामान नाही ना राहिले? जो तो आपल्या ठरावीक जागेवर आहे ना? (गलबतात मुले बसली आहेत. त्यांची तपासणी करीत व गणती करीत) अजून कमी भरतो! एक चुकतो आहे. कोण राहिला आहे लपून? लपून उपयोग नाही. तो मला दिसतो आहे. मुलांच्या घोळक्यात. चल रे प्रियकरा, चल प्रियेला निरोप देऊन, चल पटकन. नीघ. आटप आता.

(ज्या दोन मुलांना प्रेमी म्हणून म्हणत असत, ती एकमेकांना मिठी मारतात. त्यांचे चेहरे निराशेने काळवंडलेले असतात. ती काळाकडे जाऊन त्याच्या पाया पडतात.)

प्रियकर : मला माझ्या प्रियेबरोबर येथे राहू दे ना!

प्रिया : नाही तर मला त्याच्याबरोबर आज जाऊ दे ना!

काळ : अशक्य! ते होणे नाही... आता फक्त ३९४ सेकंद राहिली...

प्रियकर : मला जन्म घेण्याची मुळीच इच्छा नाही.

काळ : तुझ्या आवडीनिवडीवर येथे काही नाही.

प्रियकर : तिच्या आधी मला खाली जावे लागणार!

प्रिया : मला आता कधी पुन्हा दिसणार हे?

प्रियकर : आता खाली जगात मला एकटे एकटे राहावे लागणार!

काळ : अरे, हे माझ्या का हाता आहे?... तुमचे अर्ज तर जीवनाधिपतीकडे करा. मला आज्ञा होते, तीप्रमाणे मी जोडतो वा तोडतो. (त्या दोहोतील एकाचा हात धरून) नीघ...

प्रियकर : नका हो ताटातूट करू... तिलाही येऊ दे!...

प्रिया : (प्रियकराच्या कपड्यांना बिलगून) माझ्याबरोबर हे येथेच राहू द्या हो! नका हो त्यांना ओढू, नका नका!!...

काळ : चल, नीघ येथून. सोड त्याला. तो काही मरायला नाही चालला, जिवंत होण्यासाठी चालला आहे. (त्या प्रियकराला ओढतो.) नीघरे. चल, असा इकडे ये...

प्रिया : (त्या ओढल्या जाणाऱ्या प्रियकराकडे दोन्ही हात पसरून वेड्याप्रमाणे धावते.) खूण... एक खूण... तुम्हाला पृथ्वीवर आल्यावर मी कसे ओळखू?... काही खूण...

प्रियकर : मी तुझ्यावर सदैव प्रेम करीन.

प्रिया : पृथ्वीवर सर्वात अत्यंत दु:खीकष्टी अभागी मी होईन! मला त्या खुणेने ओळखाल?... (ती जमिनीवर पडते व तशीच हात पसरून पडते.)

काळ : आशेने राहणे हे चांगले. आशा धरा... आणि आता आहे ना सारे बरोबर? सारे ठीक?... (हातातील कालचक्राकडे पाहत) आता फक्त ६३ सेकंद राहिली...

(जाणाऱ्या व राहणाऱ्या मुलांत शेवटच्या हालचाली, भावना उंचबळताना दिसतात. एकमेकांचे घाईने निरोप घेतात.)

निळी मुले : (जाणारी व राहणारी सारी एकदम) नमस्कार श्याम, रामराम खंडू, ये बरे का रे मोहन, रमण... मी माझा शोध आणणार आहे ते जाहीर करून ठेव... अरे, तू तो नवीन स्क्रू घेतलास का बरोबर?... प्रचंड कलिंगडाचा माझा शोध विसरू नकोस हो!... मला पुन्हा ओळख बरे... मी तुला ओळखीन, शोधून काढीन... तू काही नाही ना रे विसरलास?... तू आपले विचार हरवू नकोस हो... अरे, इतका खाली नको वाकून वरून उंबऱ्यातून... आम्हाला खालची बातमी पाठवीत जा... पण पाठवता कशी येणार? ते अशक्य दिसते... अरे, प्रयत्न करा, खटपट करून तर पाहा!... खाली पृथ्वीवर कसे काय आहे, मजा

आहे की नाही, ते आम्हाला कळवा... मी तुला भेटायलरा येईल... मी सिंहासनावर जन्म घेईन...

काळ : (किल्ल्यांचा जुडगा वाजवतो. विळा हलवतो.) बस्स, पुरे आता... नांगर वर ओढला गेला...

(गलबते निघतात. हळूहळू शिडे दिसतनाशी होतात, गलबतातील मुलांचा गलबला दुरून ऐकायला येतो. ''आहो पृथ्वी! ती पाहा. ती बघ मला दिसते आहे, किती सुंदर, किती तेजस्वी झगमगीत दिसत आहे, किती मोठी आहे!'' वगैरे आवाज ऐकू येतात. नंतर अगदी फार खोलातून फार दुरून आनंद व आशा यांची गाणी ऐकू येतात.)

मधू : (प्रकाशराणीला) हे काय बरे?... कोणाची गाणी ही? हा दुसराच आवाज आहे. हा मुलांचा नाही त्या...

प्रकाशराणी : खाली येणाऱ्या मुलांना भेटावयास पुढे येणाऱ्या मातांच्या गाण्याचा तो आवाज आहे...

(काळ दरवाजे बंद करतो... दिवाणखान्यात एकदा नीट निरखून बघतो तो मधू, मालती व प्रकाशराणी त्याच्या एकदम दृष्टीस पडतात.)

काळ : (चकित व प्रक्षुब्ध होऊन) कोण आहे?... तुम्ही येथे काय करीत आहात?... कोण तुम्ही?... तुम्ही निळी नाहीत? तुम्हाला येथे प्रवेश कसा मिळाला? कशी आलीत आत?

(आपल्या विळ्याने त्यांना भिववीत काळ पुढे येतो.)

प्रकाशराणी : (मधूला) काही बोलू नकोस. उत्तर देऊ नकोस... मी तो निळा पक्षी घेतला आहे माझ्याबरोबर. माझ्या अंगरख्यात लपवून ठेवला आहे... चला, पटकन पळून जाऊ... तो हिरा फिरव... म्हणजे त्यांना आपण सापडणार नाही, आपला मागमूस कळणार नाही...

(ती तिघे डाव्या बाजूने निसटून जाता... डाव्या बाजूच्या पुढील खांबातून पटकन जातात...)

✦✦✦

अंक सहावा

प्रवेश पहिला

निरोप घेणे.

(रंगभूमीवर एक भिंत व त्या भिंतीत लहानसे दार. दिवस उजाडायची वेळ. तांबडे फुटायची वेळ.)

(मधू, मालती, प्रकाशराणी, भाकरोबा, जलराणी, शर्करानंद, अग्नी, दुधी प्रवेश करतात.)

प्रकाशराणी : आपण कोठे आहोत ओळखा बरे! तुम्हाला नाहीच ओळखता येणार...

मधू : खरेच, नाही बुवा सांगता येत. काही नाही कल्पना होत!

प्रकाशराणी : अरे वेड्या, हे दार, ही भिंत, ही तुझ्या ओळखीची नाहीत का?

मधू : भिंतीचा रंग लाल आहे, दार हिरव्या रंगांचे आहे...

प्रकाशराणी : आणखी काही आठवत नाही?...

मधू : काळाने आपणास दरवाजा दाखवला ते आठवते.

प्रकाशराणी : स्वप्नात असलेली माणसे किती चमत्कारिक असतात... स्वत:चे हातही त्यांना मग ओळखता येत नसतात.

मधू : कोण आहे स्वप्नात?... मी का?...

प्रकाशराणी : कदाचित मीच असेन... कोणी सांगावे? ते काही असो. परंतु मधू जन्मल्यापासून जे घर शेकडो वेळा तू पाहिले आहेस, त्या घराची ही भिंत आहे हे मात्र खरे...

मधू : जन्मल्यापासून मी अनेकदा पाहिलेले ते घर?...

प्रकाशराणी : होय रे झोपाळू!... एक वर्ष झाले त्या गोष्टीला. एके दिवशी तीन्हीसांजा झाल्यावर आपण नव्हतो का हे सोडून गेलो?

मधू : एक वर्ष झाले? का, तेव्हा?...

प्रकाशराणी : जाऊ दे, जाऊ दे!... असे डोळे नको वटारू! तू डोळे वटारलेस की जणू नीलमण्याची गुहाच उघडली आहे असे वाटते!... हे तुमचेचे जुने आवडते घर. तेथे तुझे आई-बाप राहतात...

मधू : (दाराजवळ जाऊन) परंतु मला वाटते... होय, खरेच मला असा भास होतो की... हा लहानसा दरवाजा... ही लाकडाची खिटी तर ती ओळखतो... खरेच का आत आहेत ती?... आईजवळ का आलो?... जाऊ दे मला एकदम आत... आईचा एकदम मुका घ्यायचा आहे मला.

प्रकाशराणी : क्षणभर थांब... ती गाढ झोपेत आहेत. एकदम त्यांना दचकवून जागे नको करू... शिवाय ठोका पडेपर्यंत दार उघडणार नाही।

मधू : किती वाजता? फार का थांबावे लागेल?...

प्रकाशराणी : नाही हो बाळांनो!... अगदी थोडेसे क्षण...

मधू : आपण परत आलो म्हणून तुला आनंद नाही होत?... हे काय, प्रकाशराणी?... तुझे तोंड असे काय दिसते? तू का आजारी आहेस, बरे नाही वाटत?

प्रकाशराणी : काही नाही बाळ... मला जरा वाईट वाटते आहे. तुम्हाला आता सोडून मला जावे लागेल...

मधू : आम्हाला सोडणार?

प्रकाशराणी : सोडून गेलेच पाहिजे... येथे आता माझे काम नाही. वर्ष संपले, ती परी रूपराणी तुमच्याजवळ निळा पक्षी मागण्यासाठी पुन्हा येईल...

मधू : परंतु निळा पक्षी मिळाला कोठे? स्मृतीच्या प्रांतातील आणला तर तो काळा पडता, भविष्यकाळाच्या राज्यातील गुलाबी निघाला, निशाराणीच्या तेथून आणले ते तर सारे मेले आणि जंगलातील तर पकडता आलाच नाही... काय बरे माझा दोष? कोणाचे रंग बदलतात, कोणी मरतात, कोणी पळून जातात! मी तरी काय करणार? तरी परी रूपराणी माझ्यावर रागवेल का?

प्रकाशराणी : आपण सारे प्रयत्न केले... करता येण्यासारखे सारे केले. एक तर निळा पक्षी अस्तित्वातच नसेल मुळी किंवा त्याला पिंजऱ्यात घालताच त्याचा रंग बदलत असला पाहिजे...

मधू : पिंजरा कोठे आहे पण?

भाकरोबा : हा आहे धनीसाब... आपल्या प्रदीर्घ प्रवासात तो माझ्या स्वाधीन केलेला होता. तो नीट सांभाळण्याची जोखीम माझ्यावर टाकण्यात आलेली होती. आज ती जोखीम पुरी होत आहे व तो पिंजरा पुन्हा आपल्या हाती मी सोपवत आहे. ज्यावेळी तो मजजवळ देण्यात आला होता, तसाच्या तसा अगदी नीट दार लावलेला तो आहे. मी कोणालाही त्याला हातसुद्धा लावू दिला नाही... (एखाद्या वक्त्याप्रमाणे भाषण करीत) आणि आता या शेवटच्या क्षणी दोन शब्द बोलण्याची, सर्वांच्या वतीने बोलण्याची मी परवानगी मागतो...

अग्नी : त्याला भाषण करायला कोणी सांगितले?

जलराणी : गप्प बस रे...

भाकरोबा : कोण करतो आहे अडथळा? माझा हा क्षुद्र शत्रू, माझा हा मत्सरी प्रतिस्पर्धी!

अग्नी : मी का प्रतिस्पर्धी? अरे, मी नसेन तर तुझी काय होईल स्थिती!... पचायला कठीण असा एक पिठाचा आकारबिकार नीट नसलेला लगदा होशील नुसता!...

जलराणी : गप्प बसे रे...

अग्नी : तुझ्या ओरडण्याने काही मी गप्प बसणारा नाही, समजलीस!... (वर्दळीवर येऊन धक्काबुक्कीपर्यंत पाळी येणार असे दिसते.)

प्रकाशराणी : (जादूची कांडी उभारून) पुरे रे...

भाकरोबा : अग्नी असेल एक पंचमहाभुतातील भूत! परंतु हा फाजील व हास्यास्पद अहंकार, दुसऱ्याचा असा उपहास करण्याची वाईट खोड, हे नेहमीचे असभ्य वर्तन, अविनयी व खुनशीपणा हा अतिरेक, ह्यामुळे ह्याला जग कंटाळते, जग किदरून जाते. ह्याच्याशी कसे वागावे जगाला कळत नाही!

अग्नी : पिठाळलेल्या लठ्ठ पोट्या, थांब हो!

भाकरोबा : (आवाज चढवून) किती ओरडलास, विरोध केलास, अडथळे आणलेस तरी मी माझे कर्तव्य पार पाडीन... आज मला सर्वांच्या वतीने इच्छा आहे की...

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

अग्नी : सर्वांच्या वतीने म्हणून नको, माझ्या वतीने तू नको... मला माझे तोंड आहे, माझी जीभ आहे!

भाकरोबा : सर्वांच्या वतीने व संयमी परंतु उंचबळलेल्या साध्या भावनांनी मी या दोन मुलांचे निरोप घेणार आहे. या दोन मुलांचे स्वीकृत महान कार्य आज समाप्त झाले आहे. आम्हाला परस्परांबद्दल फार आदर होता. एकमेकांस आम्ही चाहत होतो. यामुळे एक प्रकारचा लळा उत्पन्न झाला होता. आज निरोप घेताना म्हणून फार दु:ख होत आहे...

मधू : काय? तूही निरोप घेणार! तूही आम्हाला सोडून जाणार?

भाकरोबा : काय करू बाळ. निरुपाय आहे. कारण माणसांची डोळे उघडण्याची घटका अद्याप आलेली नाही... मी तुला सोडणार आहे, ही गोष्ट खरी आहे... परंतु ही ताटातूट बाह्य आहे, वरवरची आहे. तू पुन्हा कधी मला बोलताना ऐकणार नाहीस एवढेच...

अग्नी : तुझी वटवट बंद होईल यात तोटा काहीच नाही...

जलराणी : चूप, गप्प बस...

अग्नी : तू तुझी बडबड थांबव, किटलीत, विहिरीत, नळात, झऱ्यात, धबधब्यात सर्वत्र तुझी सारखी बडबड. ती बंद कर, मग मी माझी करीन. समजलीस ना?

प्रकाशराणी : (जादूच्या कांडीने त्यांना दरडावीत) पुरेरे आता. ऐकलेत ना? फार भांडकुदळ आहात तुम्ही सारी. आता सारी जाणार म्हणून जोर आला आहे वाटते?...

भाकरोबा : (मोठ्या आढ्यतेने) तुमचे बोलणे मला लागू नाही... मी एवढेच या मुलांना सांगत होतो की, अत:पर बोलताना मला तुम्ही ऐकणार नाही, सजीव स्थितीत मला कधी तुम्ही पाहणार नाही... वस्तूंचे जे अदृश्य जीवन ते अत:पर तुमच्या डोळ्यांना दिसणार नाही, एवढेच. परंतु फळीवरील ताटात मी नेहमी असेनच. आमटीबरोबर सहकार्य करण्यासाठी पानात दिसेनच. मी मानवाचा सर्वात जुना, अत्यंत विश्वासू असा मित्र आहे. जलराणी व अग्नीही, जर मला म्हणता येत असेल तर, असेच मनुष्याचे अनादिकालापासून विश्वासू मित्र आहेत.

अग्नी : आता मी माझ्याविषयी काय सांगू, निरोप घेताना काय बोलू ?...

प्रकाशराणी : लवकर आटपा. वेळ भरभर जात आहे. आता ठोके पडतील व आपणास चिरंतन स्तब्धतेत विलीन व्हावे लागेल. हं, जलदी करा. मुलांना भेटून या.

अग्नी : (पुढे घुसून) आधी मी, आधी मी ! (मुलांनाा जोराने मिठी मारून, मुके घेऊन) मधू, मालती, येतो हां ! लाडक्यांनो, या बरे, जातो हं मी... काही जाळायचे असेल, कशाला काडी लावण्यासाठी कोणी पाहिजे असेल, तर मला आठवा...

मालती : अरे अरे... हा तर भाजीत आहे मला, जाळीत आहे मला ! हे का भेटणे ।

मधू : हाय,अरे... माझे नाक होरपळले !...

प्रकाशराणी : अग्ने इकडे ये... जरा जपून संयमाने वाग... तू चुलीत नाहीस हे ध्यानात धर...

जलराणी : त्याला काही कळतच नाही, अडाणी नुसता...

भाकरोबा : निर्लज्ज आहे तो...

अग्नी : घाबरू नका. हे पाहा आता. मी माझे हात आपल्या खिशात घालतो. हं... परंतु मला विसरू नका... मी मानवाचा मित्र आहे... मी नेहमी चुलीत, शेगडीत असेनच. जेव्हा जेव्हा तू थंडीत गारठशील किंवा दुःखी असशीत तेव्हा तेव्हा मी माझी जीभ जरा बाहेर काढीन... थंडीत मी ऊब देईन व बोंडे वगैरे भाजून देईन...

जलराणी : (मुलांजवळ जाऊन) मला मुका घेऊ दे. मी मुका घेताना दुखवणार नाही. अगदी हळूच घेईन...

अग्नी : बाळांनो, जपा, नाहीतर भिजाल हो !...

जलराणी : मी प्रेमळ आहे, सौम्य व शांत आहे. मनुष्यप्राण्याजवळ मी नेहमी उदारपणाने व कनवाळूपणाने वागते.

अग्नी : ज्यांना बुडवितेस त्यांच्याविषयी काय ?

जलराणी : वापी-तळ्यांवर, विहिरी-झऱ्यांवर प्रेम करा... मी त्यात सदैव आहेच.

अग्नी : सर्वत्र हिने पाणी पाणी केले...

जलराणी : सायंकाळी एखाद्या झऱ्याचे काठी तू जर कधी बसलास-- आणि असे झरे येथल्या जंगलात तर कितीतरी आहेत-- तर ते सारे काय म्हणण्याचा यत्न करीत असतात ते समजून घेण्याची तू खटपट कर!...

अग्नी : पुरे पुरे, येते सारे पाणी... मला पोहताही येत नाही...

जलराणी : आज तुम्हाला जितके स्पष्ट मला सांगता येत आहे, तुमच्यावर मी प्रेम करते, तुम्ही मला आवडता हे जसे विशद रीतीने मला आज बोलून दाखविता येत आहे, तसे मला पुन्हा कधीही सांगता येणार नाही. परंतु जेव्हा जेव्हा माझा ध्वनी तुम्ही ऐकाल, माझा आवाज तुमच्या कानांवर पडेल, त्या त्या वेळेस मी हेच सांगत असेन ही गोष्ट विसरू नका. बाळांनो, मला आता जास्त बोलवत नाही... माझे अश्रू मला बोलू देत नाहीत. सद्गदित झाला आहे माझा कंठ. भरून आला आहे गळा...

अग्नी : परंतु बोलणे तर कंठ दाटून आल्याप्रमाणे नाही वाटत!

जलराणी : पाण्याची पिशवी बघितलीत तर माझी आठवण करा... अरेरे, आता पुन्हा कायमचे मुके झाले पाहिजे, नि:स्तब्ध झाले पाहिजे, परंतु माझ्या मनात तुमचाच विचार चाललेला असेल... हौदात, नळात, पाणी शिंपण्याच्या झारीत, खुज्यात, माठात सर्वत्र मी तुम्हाला भेटेनच...

दुधी : (भीतभीत येऊन) मी दुधाच्या भांड्यात भेटेन...

मधू : दुधी, तू सुद्धा का चाललीस? लाजाळू दुधी! किती चांगली आहे दुधी! ... सारी का सोडून जाणार?

शर्करानंद : (आढ्यतेने व जरा अहंकाराने) तुमच्या हृदयात आठवण ठेवण्यासाठी जर थोडासा कोपरा शिल्लक असेल तर माझीही स्मृती असू दे. माझा सहवास तुम्हाला गोड वाटत असे याची कधी कधी आठवण असे दे. मला जास्त काही सांगायचे नाही. माझ्या स्वभावाचे अश्रूंशी जमत नाही. जेव्हा अश्रू माझ्या पायावर पडतात, तेव्हा फार इजा होते. मला...

भाकरोबा : मोठा यती संन्यासी जणू!

अग्नी : (ओरडत) साखरद्राक्षे, बत्तासे, बर्फी!

मधू : परंतु, बोकोबा व मोत्या कोठे गेले?

(बोकोबा कर्कश रीतीने ओरडत आहेत असे ऐकू येते.)

मालती : बोकोबा ओरडत आहे!... कोणी तरी त्याला मारीत आहे!...

(बोकोबा धावत येतो. त्याच्या अंगावरचे केस भीतीने उभे राहिलेले असतात. त्याचे कपडे सारे फाटलेले असतात. दात दुखत आहे जणू अशा तऱ्हेने हातरुमाल तोंडावर त्याने धरलेला असतो. रागाने व दुःखाने तो ओरडतो. त्याच्या पाठोपाठ मोत्या येतो. तो बोकोबाला चावतो, मारतो. पंजे मारतो.)

मोत्या : (बोकोबाला मारीत) पुरे ना आता!... मिळाला चांगला खरपूस खाऊ?... आणखी पाहिजे का थोडा?... घे, हा घे. पुरे?

(प्रकाशराणी, मधू व मालती पुढे धावतात व त्यांना सोडवतात.)

मधू : मोत्या।... तू का पिसाळलास, वेडा झालास?... बरे बरे. मला हे कधीही... थांब ना... थांबतोस की नाही? सोड त्याला. तू धजावतोस तरी कसा?... थांब हो ना...

(मोत्याची व बोकोबांची मोठ्या शर्थीने सोडवणूक करतात.)

प्रकाशराणी : हे काय आहे?... काय झाले, काय आहे भानगड?

बोकोबा : (फुरफुरत व डोळे पुशीत) प्रकाशराणी, सारं हा मोत्या... त्याने माझा अपमान केला, माझ्या अन्नात जस्ताचे तुकडे घातले, माझी शेपटी त्याने ओढली, मला मारले, मी काही एक केले नाही...

मोत्या : कांही कांही केले नाही! (जरा हळू परंतु बोकोबाला भेवडावीत व दटावीत) असो. थोडा तरी मिळाला खाऊ, बरे झाले. आणखीही मिळेल, समजले की नाही!

मालती : (बोकोबाला हातात घेऊन पोटाशी धरून) गरीब बिचारा बोकोबा। कोठे मारले त्याने, कोठे चावला?... सांग, तुझ्याबरोबर मीही रडेन...

प्रकाशराणी : (मोत्याला जरा कठोरपणे) मोत्या, तुझे हे वर्तन फारच निंद्य आहे. काळवेळही तुला कळत नाही. या मुलांचा निरोप घेण्याची दुःखाची ही वेळ, अशा या गंभीर व दुःखद प्रसंगी असे वागणे शोभले ना तुला? च् च...

मोत्या : (एकदम स्थित गंभीर होऊन) ह्या लहानग्यापासून का ताटातूट होणार? या गरीब बिचाऱ्यांपासून का आम्ही जाणार?

प्रकाशराणी : होय. तो क्षण, जो तुम्हास माहीत आहे, तो आता समीप आला आहे. .. आपण सारी पुन्हा निरंतन नि:स्तबधतेत विलीन होणार. ती नीरव स्थिती पुन्हा मिळणार... या मुलांजवळ पुन्हा बोलता येणार नाही...

मोत्या : (खरोखरच्या निराशेच्या व दु:खाच्या आरोळ्या व किंकाळ्या मारीत त्या मुलांच्या अगदी जवळ जातो व त्यांना उत्कटतेने चाटतो, त्यांचे भराभर मुके घेतो.) नाही नाही. मी त्या मुक्या स्थितीत फिरून जाणार नाही. मी नाही तयार... माझा स्पष्ट नकार आहे!... मी नेहमी बोलेन!... माझ्या लहानग्या देवा, आता तरी माझे म्हणणे तुला समजेल ना? यापुढे तरी ओळखशील ना माझा आशय?... होय, होय, होय!... आणि आपण एकमेकांजवळ सारे सारे सांगत जाऊ, होय ना?... मी नेहमी स्वच्छ राहीन... स्वयंपाकघरातून मी पुन्हा कधीही चोरणार नाही!... मी एक आश्चर्यकारक गंमत करून दाखवू?... बोकोबांचा मी मुका घेऊ? तुम्हाला त्याने बरे वाटेल? घेऊ?...

मालती : (बोकोबला) काय रे बोकोबा? तुला नाही का काही सांगायचे?...

बोकोबा : (कृत्रिम व गूढ आवाजात) तुमची लायकी आहे त्याप्रमाणे मी तुमच्यावर प्रेम करतो...

प्रकाशराणी : आता माझी पाळी उरली. मलाही तुमचा, बाळांनो, शेवटचा मुका घेऊ दे!...

मधू व मालती : (प्रकाशराणीच्या कपड्यांना बिलगून) नाही, प्रकाशराणी, नाही, तू नाही जायचे. आमच्यासंगे येथे राहा... बाबा राहू देतील. ते काही बोलणार नाहीत. तू आमच्यावर किती दयामाया केलीस ते सारे आम्ही आईला सांगू...

प्रकाशराणी : नाही हो मला राहता येणार!... हा दरवाजा आम्हाला बंद आहे. मला तुम्हाला सोडून जावेच लागणार. अरेरे...

मधू : तू एकटी कोठे जाणार?...

प्रकाशराणी : फार लांब नाही, वस्तूमात्रांच्या नि:स्तब्धतेच्या प्रांतात जाणार मी. तिकडे त्या बाजूला...

मधू : ते काही नाही. मी नाहीच जाऊ देणार... आम्हीही नाही तर तुझ्याबरोबर येऊ... मी आईला सांगेन...

प्रकाशराणी : रडू नका, डोळ्यात पाणी आणू नका. माझ्या लहानग्या लाडक्यांनो, उगी राहा... जलराणीप्रमाणे माझ्याजवळ ध्वनी नाही. माझ्याजवळ फक्त तेजस्विता आहे. परंतु ती मनुष्याला समजत नाही. परंतु मी त्याच्या आतापर्यंत त्याच्यावर कृपा करीत असते, त्याच्याकडे प्रेमाने बघत असते. पसरणाऱ्या प्रत्येक चंद्रकिरणांतून, प्रत्येक चमचम करणाऱ्या ताऱ्यातून दररोज येणाऱ्या उषेतून, लावलेल्या प्रत्येक दिव्यातून, तुमच्या आत्म्याच्या प्रत्येक तेजस्वी सद्विचारातून तुमच्याजवळ मीच बोलत असते हे कधीही विसरू नका. (भिंतीच्या आत आठाचे ठोके पडतात.) ऐका ! ठोके पडत आहेत !... येतो हो, जा हा बाळांनो !... ते पाहा दार उघडत आहे !... शिरा आत, पटकन शिरा !...

(अर्धवट उघडलेल्या दारातून ती मुलांना आत ढकलते. दार पुन्हा मिटते, भाकरोबा एकदा आलेला अश्रू पुसतो. शर्करानंद व जलराणी तर रडून रडून ओलेचिंब होतात. बावरल्यासारखी पळतातव उजव्या आणि डावीकडच्या बाजूस अदृश्य होतात. मोत्या पडद्यामागे ओरडत असतो. रंगभूमी क्षणभर रिकामी असते. पुन्हा मध्यभागी दार असलेली भिंत व शेवटचा प्रवेश सुरू होतो.)

प्रवेश दुसरा

जागृती

(पहिल्या अंकात जो देखावा असतो, तोच सारा. परंतु सर्व वस्तू व एकंदर सारे वातावरण अधिक आनंदमय, अधिक टवटवीत, अधिक सुखी असे दिसते. खिडक्यांच्या बंद केलेल्या झडपाच्या फटीतून बाहेरचा सकाळचा सूर्यप्रकाश आत घुसतो. उजवीकडे मधू व मालती आपापल्या बिछान्यात पलंगड्यावर स्वस्थ झोपलेली असतात. पहिल्या अंकात कुत्रा, मांजर व इतर वस्तू परीच्या येण्यापूर्वी जेथे होत्या तेथेच असतात. (मुलांची आहे प्रवेश करते.)

आई : (आनंदी रागाने) उठा की आता आळशांनो! उठा, निघा अंथरुणातून बाहेर... लाजा नाही का वाटत तुम्हाला इतका वेळ लोळत पडायला?... आठ वाजून गेले, सूर्य झाडांच्या डोक्यावर आला!... कशी निजली आहेत सोनुली माझी, कशी निजली आहेत देवा गुरगुंटी करून! (ती वाकते व मुलांचे मुके घेते.) कशी दिसतात जणू गुलाबांची फुले... मधूनच्या अंगाला कमळाचा सुवास येतो. मालतीच्या अंगाला जाईजुईचा. (पुन्हा पापा घेऊन) मुले म्हणजे किती गोड वस्तू!... तरी पण इतका वेळपर्यंत का झोपायचे? असे आळशी नाही मी त्यांना होऊ देणार!...आणि इतका वेळ झोपणे प्रकृतीलाही बरे नाही असे एकले आहे मी ...(मधूला हळूच हलवून) मधू, ऊठ, ऊठ रे, मधू...

मधू : (जागा होत) काय, कोण?... प्रकाशराणी? कोठे आहे ती? नाही, नाही. जाऊ नको तू...

आई : प्रकाशराणी?... प्रकाश?... तो बघ बाहेर पसारला आहे. कितीतरी वेळ झाला दिवस निघून... दुपार झाल्यासारखे वाटते आहे बाहेर. तुझ्या खिडकीची झडपे आहेत बंद. परंतु बाहेर बघ... थांब, ती उघडते हो मी. (ती झडपे मागे साराते व प्रखर प्रकाश खोलीत येतो.) बघ आता बाहेर! काय रे, काय झाले? असा काय करतोस? तू तर आंधळा झाल्यासारखा, दिपून गेल्यासारखा दिसतोस!...

मधू : (डोळे चोळून) आई, आई, खरेच आई आहेस तू?...

आई : मग, अरे आईच मी!... कोण आहे असे तुला वाटले?

मधू : होय, तूच आहेस, तूच आहेस!...

आई : होय रे राजा! मीच आहे हो. एका रात्रीत काही माझे तोंड नाही बदलले. चेहऱ्यात फरक नाही काही झाला... अशा आश्चर्यचकित रीतीने तू माझ्याकडे टक लावून का बघतोस?... माझे नाक वगैरे उलटसुलटे नाही ना झाले कशाने?

मधू : आई, तुला परत बघून किती आनंद होतो आहे!... कितीतरी दिवसांनी भेटलो आई!... कसे आहे छान माझे अंथरूण... मी घरी आलो पुन्हा!...

आई : काय, झालेतरी काय तुला ? तू जागा का होत नाहीस?... तू आजारी तर नाहीस ना?... पाहू दे मला, जीभ दाखव बरे... ऊठ, दुसरे कपडे घाल.

मधू : माझ्या अंगावर माझा सदरा आहे, वा!

आई : मग, अंगावर होताच तुझ्या. तुझी विजार घाल. खुर्चीवर आहे तिकडे ठेवलेली...

मधू : मी प्रवासात का असाच होतो?...

आई : कोणता प्रवास?

मधू : अग, गेल्या वर्षीचा?...

आई : गेल्या वर्षी ?

मधू : होय, होय, गेल्या वर्षी दिवाळीच्या दिवशी मी बाहेर गेलो जेव्हा...

आई : तू बाहेर गेलास ?... अरे, तू खोलीच्या बाहेरही गेला नाहीस... रात्री तुला मी निजवले आणि आता सकाळीही तू येथे आहेस. तुला का हे सारे स्वप्नात दिसले ?

मधू : तुला काही नाही समजत, आई !... अगं, गेल्या वर्षी दिवाळीचे दिवशी मी, मालती, प्रकाशवाणी, परी रूपराणी यांच्याबरोबर बाहेर गेलो. प्रकाशराणी किती सुंदर आहे, किती ममताळू ! भाकरोबा, शर्करानंद, जलराणी, अग्नी ती सारी भांडणाशिवाय काही करत नसत... तू रागावली नाहीस ना माझ्यावर ? आम्ही गेलो म्हणून तुला का फार वाईट वाटले ? आणि बाबा काय म्हणाले ? मला नाही म्हणता येईना... मी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती तुम्हाला सारे समजावे म्हणून ?...

आई : हे तू सारे कशाविषयी बोलत आहेस ?... तू आजारी तरी आहेस किंवा झोपेत तरी अजून आहेस... (ती पुन्हा त्यांना प्रेमाने हलवते.) हं, जागा हो असा. बरे वाटते ना आता ?

मधू : आई, तू काहीही म्हण. मी तुला सांगतो... तूच अद्याप झोपेत आहेस !

आई : काय, मी अजून झोपेत ? काहीतरीच बोल !... अरे, सहा वाजल्यापासून मी उठले आहे. सारी भांडीकुंडी घासली, केर काढला, चुलीत विस्तव घातला...

मधू : मालतीला विचार मी म्हणतो ते खरे आहे की नाही ते... खरेच, त्या प्रवासात किती धाडसाचे व साहसाचे प्रसंग !...

आई : मालती कशाला ?... तुझ्या म्हणण्याचा अर्थ तरी काय ?

मधू : अगं, मालती माझ्याबरोबर होती... आम्ही आजी व आजोबा यांनाही भेटून आलो...

आई : (अधिकच गोंधळात पडून) आजी नि आजोबा ?

मधू : हो. त्या स्मृतीच्या प्रांतांत... आमच्या वाटेवरच होता तो भाग... ते मेलेले आहेत; परंतु चांगले आहेत. आजीने बोरांची कढी मोठी नामी केली होती... आणि ते सारे लहान भाऊ यशवंता, सदानंद, वासू सारे भेटले आणि सुंदर, इंदू, नली यांनाही भेटलो. लहानगी कुसुमसुद्धा पाहिली...

मालती : कुसुम अजून रांगतेच !...

मधू : आणि इंदूच्या नाकावर ती पुटकुळी अजून तशीच आहे....

आई : ते आपली ब्रँडीची बाटली ज्या कपाटात ठेवतात, त्याची किल्ली तर नाही ना तुम्हाला सापडली ?

मधू : बाबा का ब्रँडीची बाटली छपवून ठेवतात ?

आई : तुमच्यासारखी धांडुळणारी मुले असली, म्हणजे लपवण्याशिवाय गत्यंतर नसते. सर्वत्र धांडुळतील, काडीच्या कामाची मात्र नाही... परंतु ते जाऊ द्या, कबूल करा की तुम्ही घेतलीत म्हणून. मला नक्की वाटते की, तुम्ही ती घेतलीत... मी त्यांना सांगणार नाही, तुम्हाला मी मारणार नाही. कबूल करा...

मधू : आई, मला ती कोठे आहे ते माहीतही नाही....

आई : माझ्यासमोर सरळ चालून दाखव बरे. नीट सरळ चालता येते की नाही ते बघू दे... (मधू तसे करतो.) छे: मग तसले नाही काही दिसत... तर मग देवा. झाले तरी काय यांना ?... माझी इतर गेली, तशी हीही का जाणार?... (ती एकदम भिते, घाबरते व हाका मारते.) इकडे या हो लवकर, आधी या... पोरांना बरे नाही वाटत. आजारी आहेत ही ! (वडील शांतपणे हातात कुऱ्हाड घेतलेले असे येतात.)

वडील : काय आहे ?...

मधू व मालती : (वडिलांना मिठी मारण्यासाठी धावतात) बाबा, अहो बाबा ! नमस्कार बाबा !... या वर्षी तुम्हाला भरपूर मिळाले ना काम ?...

वडील : काय बरे आहे हा प्रकार ?... ती आजारीबिजारी तर दिसत नाहीत. चांगली दिसताहेत...

आई : (रडत) दिसते तसे नसते. त्यांच्या चेहऱ्यावर नका जाऊ... त्या इतरांचे झाले तसेच व्हायचे... तीसुद्धा शेवटपर्यंत चांगली दिसत होती आणि शेवटी देवाने नेली !... यांना काय झाले आहे मला तरी कळत नाही... काल रात्री अगदी नीट यांना निजवले आणि आज सकाळी उठली तो सारे बिघडलेले... काय म्हणतात ते त्यांचे त्यांनाच कळत नाही. प्रवासाविषयी काहीतरी बोलतात. त्यांनी प्रकाशराणी पाहिली. आजोबा व आजी पाहिली. म्हणतात की ती मेलेली असली, तरी चांगली आहेत...

मधू : परंतु आजोबांचा लाकडी पाय अजून आहेच...

मालती : आणि आजीचे अजून सांधे दुखताच...

आई : ऐकलंत ना ?... धावा आणि डॉक्टर आणा आधी !...

वडील : डॉक्टर नको काही... ती अजून मेली नाहीत... आपणच बघू ये काय भानगड ती... (पुढील दारावर कोणी तरी ठोठावते.) आत या ! (शेजारच्या उमाकाकू आत येतात. **परी रूपराणी**प्रमाणे त्या दिसत असतात. एका काठीवर टेकीत येतात.)

शेजी : तुमची दिवाळी सुखात जावो. बरे आहे ना साऱ्यांचे ?...

मधू : ही तरी **परी रूपराणी** !

शेजी : मी थोडे निखारे मागण्यासाठी आले आहे. दिवाळीचं काही करायला हवे ना गोडधोड... आज सकाळी फारच गारवा आहे. काय रे बाळांनो, कसे काय आहे ?

मधू : **परी रूपराणी, निळा पक्षी** शेवटी नाही सापडला मला...

शेजी : काय म्हणतो हा ?...

आई : शेजी, काही विचारू नको बघ. आपण काय म्हणतो ते त्यांचे त्यांनाच कहत नाही. उठल्यापासून असेच काहीतरी बोलतात... काहीतरी खाल्ले असेल यांनी. ते बाधले बहुधा...

शेजी : मधू, अरे तुझी शेजीबाई, उमाकाकू, ती मी. मला नाही का ओळखीत ?

मधू : मी तुम्हाला ओळखतो. परी रूपराणी त्याच तुम्ही... रागावला नाहीत ना आमच्यावर ?

शेजी : रूपाराणी ? काय म्हणतोस तू ? काय झाले तुला ?....

मधू : रूपराणी.

शेजी : अरे, माझे नाव उमाकाकू. कोठली आणलीस रूपराणी ?

मधू : उमाकाकू का ठमाकाकू, मला काही माहीत नाही. मालतीला विचारा.

आई : मधूच नाही तर मालतीसुद्धा ! भ्रमिष्टासारखे करते. काय करावे तरी !

वडील : तू उगीच घाबरतेस. काही झालेले नाही. दोन चापट्या देतो, म्हणजे होईल सारे ठीक !

शेजी : असे नका करू. मारूबिरू नका... मला माहीत आहे हा प्रकार. स्वप्नात काहीतरी पाहिल्याचा परिणाम आहे... चांदण्यात ती निजली असतील... माझी लहान मुलगी, जी फार आजारी आहे, तिला असे पुष्कळ वेळा होते....

आई : सारे जाऊ द्या; परंतु तुमची लहान मुलगी कशी आहे ?

शेजी : आहे तशीच आहे... अजून तिला उठता येत नाही... डॉक्टर म्हणतात की सारा मनाचा प्रकार आहे... मज्जातंतूचे आहे दुखणे. ती कशाने बरी होईल मला माहीत आहे; परंतु जाऊ दे. आज सकाळीच ती त्याविषयी विचारीत होती. दिवाळीच्या दिवशी ती वस्तू आपणास मिळावी असे तिला जणू वाटत होते. तिने आपले मनात घेतले आहे की...

आई : मलाही ठाऊक आहे. मधूचा पक्षी तिला हवा आहे... काय रे मधू, दे ना तुझा तो पक्षी त्या गरीब बिचारीला. नाही का देणार आता तरी ?...

मधू : काय म्हणतेस आई ?

आई : अरे, तुझा पक्षी... तुला त्याचा काही उपयोग नाहीच... त्याच्याकडे ढुंकून बघतसुद्धा नाहीस अलीकडे... आणि ती बिचारी त्याच्यासाठी मरत आहे ! अंथरुणाला कितीतरी दिवस झाले खिळली आहे !...

मधू : हे बरोबर. आता जमले. माझा पक्षी !... कोठे आहे बरे तो ?... हां. तो तेथे आहे पिंजरा ! माले, तुला दिसतो का तो ? भाकरोबाने हा बरोबर घेतला होता, होय, हाच तो; परंतु यात तर एकच पक्षी आहे. दुसरा त्याने

खाल्ला की काय ? आश्चर्य आहे ! आणि अरे वा, हा निळा आहे !... परंतु हे तर माझे कबुतर ! परंतु मी गेलो त्या वेळेपेक्षा हे अधिक निळे दिसते आहे !... आणि ह्या तर निळ्या पक्ष्यासाठी आम्ही सर्वत्र शोधत होतो !... आम्ही गेलो शोधत दूर दूर आणि पक्षी तर होता येथे घरी !... खरेच किती आश्चर्यकारक सुंदर आहे हा पक्षी ? माले, बघ ही का पक्षी! हा पाहून प्रकाशराणीला काय वाटेल ?... थांब, मी पिंजरा खाली काढतो... (खुर्चीवर चढून मधू पिंजरा खाली काढतो व शेजीबाईजवळ नेतो.) शेजीबाई, हा घ्या. हा काही अगदी तितका निळा नाही अजून; पण पुढे होईल, बघाल तुम्ही. जा, लवकर घेऊन जा तुमच्या मुलीजवळ...

शेजी : खरेच का ?... थट्टा नाही ना करीत ?... काही न मागता एकदम फुकट मला देणार ?... खरेच किती माझी पोर देवा आनंदी होईल, किती तिला बरे वाटेल ! (मधूचा मुका घेऊन) तुझा घेतलाच पाहिजे मुका?... जाते आता मी उडत जाते पळत !

मधू : होय, लवकर जा... कारण काहींचा रग बदलतो हो...

शेजी : ती काय म्हणते ते सांगण्यासाठी मी येईन...
(ती जाते)

मधू : (आजूबाजूस नीट न्याहाळून) आई, बाबा, तुम्ही या घराला काय केलेत ? ते होते तसेच आहे; परंतु अधिक सुंदर दिसत आहे...

वडील : काय म्हणतोस तू ?... अधिक सुंदर दिसते ?

मधू : होय, खरेच. जणू सर्व घराला रंग दिल्याप्रमाणे वाटते आहे. सारे घर त्यामुळे नवीन वाटते आहे. सर्वत्र स्वच्छता दिसत आहे. सारे घासून पुसून साफ केल्याप्रमाणे दिसत आहे... गेल्या वर्षी काही असे नव्हते दिसत घर...

वडील : गेल्या वर्षी ?...

मधू : (खिडकीपाशी जाऊन) आणि त्या जंगलाकडे बघा तरी !... किती मोठे दिसत आहे आणि किती छान !... कोणाला वाटेल की ते नवीनच आहे !... किती सुखी वाटते आहे आज मला, किती आनंद होत आहे आज !... (फळीजवळ जाऊन व भाकरीच्या ताटाला पाहून)

भाकरोबा कोठे आहे ? ताटातील भाकरी तर शांत आहे अगदी आणि हा मोत्या येथे आहे. काय रे मोत्या, कर्र छ !... छान तू पडलास !... आठवते का तुला त्या जंगलात ?

मालती : आणि बोकोबा ?... तो मला ओळखतो आहे; परंतु आता बोलणे बंद आहे त्याचे...

मधू : भाकरोबा... (कपाळाला हात लावून) अरेच्या, हिरा गेला की ! माझी चिमुकली हिरवी टोपी कोणी नेली ?... जाऊ दे. आता तिची जरूरीही नाही... हां, तो अग्नी !... चांगला आहे खरोखर ! जलराणीला खिजवण्यासाठी तो हसतो व थट्टामस्करी करतो... (पाण्याच्या नळाजवळ जाऊन) आणि जलराणी ? नमस्कार जलराणी ! काय बरे म्हणते ती ?... ती अजूनही बोलते आहे; परंतु मला पूर्वी समजे तिचे बोलणे तसे आता स्पष्ट नाही समजत...

मालती : आणि शर्करानंद नाही दिसत ते...

मधू : खरेच देवा, प्रभो, किती मी सुखी, सुखी, सुखी !...

मालती : आणि मीही, मीही !

आई : तुमची तोंडाची टकळी सुरूच आहे. काय बडबडता आहात रे ?

वडील : त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस व अशांत होऊ नकोस... सुखी असण्याचा खेळ ती खेळत आहेत...

मधू : मला सर्वांत प्रकाशराणी आवडली... कोठे आहे तिचा दिवा ? तो आपणाला लावता येईल का !... (सभोवती पाहून) खरेच, सारे किती सुंदर, गोड व आनंदी वाटत आहे आज ! मला किती बरे वाटत आहे !...

आई : का बरे ?

मधू : मला ही नाही आई का ते समजत !

(पुढील दारावर थाप ऐकू येते.)

वडील : या, आत या...

(शेजी उमाकाकू येते. अत्यंत सुंदर अशी आपली मुलगी हातात धरून ती येते. त्या मुलीच्या हातात पोटाशी धरलेला तो निळा पक्षी असतो.)

शेजी : पाहिलात का चमत्कार ?

आई : अशक्य !... ती चालू शकते ?

शेजी : चालू शकते ?... ती आता उड्या मारू शकते, नाचू शकते, उडू शकते !... तो पक्षी दृष्टीस पडताच तिने उडी मारली. एका उडीत ती खिडकीजवळ गेली व हा मधूचाच ना खरोखर पक्षी हे तिने पाहिले... आणि मग काय तिचा आनंद !... एकदम एखाद्या देवदूताप्रमाणे रस्त्यात गेली, नाचू हसू लागली ! तिच्याबरोबर मला चालवेना, माझी कोण धावपळ !...

मधू : (आश्चर्यचकित होऊन त्या मुलीजवळ जाऊन) प्रकाशराणीप्रमाणे आहे ही, खरोखरच तशी आहे...

मालती : परंतु ही बरीच लहान आहे.

मधू : हो, खरेच लहान आहे ! परंतु ती वाढेल, मोठी होईल...

शेजी : काय म्हणताहेत ही ?... अजून रोजच्यासारखी नाही का झाली ?

आई : सुधारत आहेत, बरी होत आहेत... आता सकाळची न्याहारी झाली की चांगली बरी होतील...

शेजी : (आपल्या मुलीला मधूच्याजवळ ढकलून) बाळ, मधूचे आभार मान, जा त्याच्याजवळ...

(मधू भिऊन एक पाऊल मागे घेतो.)

आई : मधू, असे बरे नाही हो. असा दूर रे का होतोस ? घे तिला जवळ व घे तिचा मुका... असा नाही, नीट चांगला घे... तू आजच कसा इतका लाजाळू झालास ? हं, घे आणखी एक तिचा पापा... पण काय रे, काय झाले ?.... मधू ?... रडणार की काय तू ? काय रे ?

(मधू त्या लहान मुलीचा मुका घेतो व जरा घाबरल्याप्रमाणे तेथे तिच्यासमोर उभा राहतो. क्षणभर ती दोघे न बोलता एकमेकांकडे पाहतात. नंतर मधू त्या कबुतराला थोपटतो.)

मधू : हा चांगला आहे का निळा ?

लहान मुलगी : हो, मला तर फारच आवडला...

मधू : याच्याहून अधिक निळे मी पाहिले आहेत... परंतु अगदी गर्द निळे असतात, ते काही केल्या बघ पकडता नाही येत...

लहान मुलगी : नाही तर नाही... हा सुरेख आहे, छान आहे...

मधू : त्याला खायला मिळाले का नाही ?

लहान मुलगी : अजून नाही... काय खातो तो ?

मधू : काहीही. धान्य, भाकर, मका, नाकतोडे...

लहान मुलगी : तो कसे खातो ते सांग ना...

मधू : आपल्या चोचीने. मी तुला दाखवतो म्हणजे तुला दिसेल.
(मधू त्या लहान मुलीजवळून तो पक्षी घेण्यासाठी पुढे सरकतो. ती एकदम मागे होते. जणू तिला समजतो त्याचा हेतू. दोघांच्या हालचालीत पक्षावरची पकड जरा ढिली होते. त्याचे लक्ष जरा चलित झाले आहे. असे पाहून तो पक्षी निसटतो व एकदम उडून जातो, दूर जातो.)

लहान मुलगी : (निराशेने किंकाळी फोडून) आई !... तो गेला,... उडून गेला ! (ती ओक्साबोक्शी रडू लागते.)

मधू : जाऊ दे उडून... रडू नको... मी त्याला पुन्हा पकडीन... (रंगभूमीवर अगदी पुढे येऊन व प्रेक्षकांना उद्देशून) जर तुमच्यापैकी कोणाला तो सापडला, तर तो मला परत देण्याइतकी उदारता व दया तुम्ही दाखवाल ना ? पुढे आम्हाला आमच्या सुखासाठी त्याची जरूर आहे...

✦✦✦

परिचय

'निळा पक्षी' या पुस्तकाचा कर्ता मॉरिस मॅटर्लिंक. १८६२ मध्ये त्याचा जन्म झाला. तो कधी बेल्जममध्ये राही, कधी फ्रान्समध्ये. घेंट येथील विद्यापीठात त्याचे शिक्षण झाले. १८८७ मध्ये तो पॅरिस शहरात येऊन राहिला. तेथील कवींशी त्याचा परिचय झाला. प्रतीकवादी कवींशी त्याचा परिचय अधिकच वाढला; परंतु त्याचा पिता निवर्तल्यामुळे तो पुन्हा बेल्जममध्ये परतला. १८८९ पासून त्याची साहित्यसेवा सुरू झाली.

मॅटर्लिंक याने कितीतरी लिहिले आहे. तो गूढवादी लेखक आहे; परंतु त्याच्या लिहिण्यातील गूढ गुप्त न राहता प्रकट होत असते. त्याच्या लेखनातील प्रतीकवाद इतका वास्तविक असतो की, तो सहज समजतो. त्याची भाषा अत्यंत सोपी आहे. सामान्य जीवनातील सुंदरता दाखवणे हे मॅटर्लिंक यांचे ध्येय आहे. नाटके, कविता, निबंध इत्यादी नाना प्रकारात त्याने लिहिले आहे. त्याला वाङ्मयातील नोबेल प्राईजही मिळाले आहे.

अशा विख्यात साहित्याचार्याचे 'निळा पक्षी' हे गोड पुस्तक मी मराठीत आणत आहे. या पुस्तकाचे बहुतेक भाषांतर नाशिकच्या तुरुंगात १९३३ मध्ये मी केले होते. काही भाग राहिला होता. तोही पुरा करून हे पुस्तक आज मराठी वाचकांना देत आहे.

'निळा पक्षी' हे नाटक आहे. प्रतीकात्मक नाटक आहे. मोठे गोड नाटक आहे. ते कितीदा वाचले तरी मला समाधान होत नसे. नेहमीच्या नाटकांप्रमाणे हे नाही. लहान मुले व परी यांचे हे नाटक आहे. या नाटकात सारी अंतर्बाह्य सृष्टी पात्ररूपाने उभी केली आहे. चराचर सृष्टी येथे बोलते. रागावते, हसते, रडते. मानवप्राणी व इतर सारी मानवेतर सृष्टी यांचा झगडा येथे दाखवला आहे. स्थूल व क्षुद्र अशी सुखे दाखवली आहेत. तर उच्च व उदात्त असे आनंदही उभे केले आहेत. मोठी मौज आहे.

गोष्टीला आरंभ असा आहे की, दोन भावंडे रात्री एकदम जागी होतात. समोरच्या श्रीमंत घरी खाणे, पिण, गाणे चालले असते. तेथे मुले आनंदात असतात. कारण सणाचे ते दिवस असतात. परंतु या भावंडांजवळ काय असते ? गरीब आई-बापांची ती मुले होती. बहीण व भाऊ एका स्टुलावर बसून समोरच्या घरातील देखावा पाहतात. तेथे कितीतरी खाण्याच्या वस्तू असतात. पेढे, बर्फी, करंज्या, सांजोऱ्या

असतात. बहीण मालती भाऊ मधू याला म्हणते, 'ती मुलं खात का नाहीत ते पदार्थ ?' भाऊ उत्तर देतो, 'भूक नसेल !'

जगात कोणाला कधी भूक नसेल या गोष्टीवर त्या मुलीचा विश्वास बसत नाही. तिला तर नेहमी भूक लागते. त्याचे पोटही भरत नसेल. भावाचे उत्तर ऐकून बहिणीला आश्चर्य वाटते. त्या एका वाक्यात मॅटर्लिकने समाजातील विषमता मांडली आहे. एकीकडे अपरंपार धनधान्याच्या राशी आहेत, तेथे अजीर्ण आहे. त्या धनधान्याचे काय करावे हे त्या श्रीमंतांना समजत नाही आणि दुसरीकडे उपासमार आहे. सर्व गोष्टींची वाण आहे.

मधू व मालती समोर बघत असतात. शेवटी समोरची मुले खाऊ लागतात. मधू व मालती काय खाणार ? परंतु ती गरीब मुले आपली गरिबी कल्पनेने विसरू पाहतात. मालती खोटे खोटे म्हणते, 'मी पाच लाडू खाल्ले.' मधू म्हणतो, 'मी दहा अनारसे खाल्ले.' त्यांच्या त्या काल्पनिक खाण्याने हृदय पिळवटते. वाचकांच्या मनात शेकडो भावना व विचार येतात. सारी विषम समाजरचना डोळ्यांसमोर येऊन ही कधी नष्ट होईल असे वाटते.

इतक्यात दारावर टकटक आवाज येतो. मुले चपापतात. कोणी नाही असे वाटते; परंतु तेथे एक परी येते. ती दिसते कुरूप; परंतु तिला कुरूप म्हटले तर राग येतो. ती त्या मुलांना म्हणते, 'तुम्हा माणसांना नीट दिसतच नाही. मी का कुरूप आहे ? हे पाहा माझे सोनेरी लांब केस, सुंदर डोळे !' वास्तविक तिचे केस ओंगळ व बुटके असतात. डोळे कसे असतात; परंतु त्या परीच्या शब्दात खोल अर्थ आहे. मनुष्य बहिर्दृष्टी आहे. तो वरचे स्वरूप पाहतो व परीक्षा करतो. परंतु वस्तूचे अंतरंग पाहणे जगात दुर्मीळ आहे. या जगात भिकारड्या झोपडीत श्रीमंत हृदयाची माणसे सापडतात आणि मोठ्या टोलेजंग राजवाड्यात संकुचित, अनुदार व क्षुद्र विचारांची माणसे सापडतात. या जगात फाटक्या कपड्यात मोलाची थोर जीवने आढळतात. परंतु भरजरी पोशाखात भिकार जीवने दिसतात. ढग काळे काळे दिसतात. परंतु त्यातून सृष्टीला नवजीवन देणाऱ्या निर्मळ पाण्याच्या धारा गळतात आणि शुभ्र दिसणारे शरद ऋतूतील ढग, ते उगीच गर्जना करतात. या जगात एकूण दिसते तसे नसते तर ! मॅटर्लिक याने ही गोष्ट या गोड नाटकात अनेक ठिकाणी दाखवली आहे.

ती परी त्या मुलांना म्हणते, 'तुम्ही निळा पक्षी शोधून आणा.' ती लहान मुले कोठे जाणार ? कोण वाटाड्या, कोण बरोबर ? ती परी एक खरा मार्गदर्शक त्यांना देते. कोण बरे

झाला मार्गदर्शक ? प्रकाश. प्रकाशदेवता मार्गदर्शक होते. प्रकाशाशिवाय कोण मार्ग दाखवणार ? उपनिषदातील ऋषींनी 'तमसो मा ज्योतिर्गमय' अशी प्रार्थना केली. जर्मनीचा महान कवी गटे मरताना म्हणाला, 'More Light' आणखी प्रकाश. मनुष्याने – ज्ञानाच्या, विचाराच्या प्रकाशात पाऊले टाकीतच जीवनयात्रा चालविली पाहिजे. प्रकाशाच्या संगतीतच या विराट संसाराला रमणीयता देण्यासाठी झटले पाहिजे.

एकटा प्रकाशच का त्या मुलाबरोबर होता ? नाही. ती परी त्या मुलांबरोबर एक हिरा देते. ती त्यांना सांगते, 'फिरवा हिरा अमुक बाजूस.' तसे करताच त्या खोलीतील सर्व वस्तूंतून आत्मे प्रकट होतात. मॅटर्लिंक का अद्वैत सिद्धांत सांगत आहे ? सर्वत्र चैतन्य आहे हे का तो सांगत आहे ? सर्व चराचर वस्तूत जीव आहे हे का ते सांगतो ? खोलीतील सर्व वस्तूंतून आत्मे बाहेर पडून बोलू लागतात, एकमेकांशी भांडू लागतात. पुन्हा हिरा दुसऱ्या बाजूला फिरविताच आत्मे परत वस्तूत शिरतात; परंतु काहींना पटकन शिरता येत नाही. कुत्रा, मांजर, साखर, भाकर, पाणी वगैरेंना एकदम शिरता येत नाही. मग ही मंडळीही त्या मुलांबरोबर निघतात. मुलांबरोबर साखर नको का, भाकर नको का ? मुलांना खाऊ तर आधी हवा. त्या त्या वस्तूंचे व प्राण्यांचे ते ते आत्मे सजतात व या मुलांबरोबर निघतात.

ती परी कोठे जायचे ते सुचविते. त्या मुलांना ती सांगते की, 'तुमची मेलेली माणसेही तुम्हाला भेटतील. आजोबा, आजी व मृत भावंडे भेटतील, ती पाहा निळा पक्षी सापडला तर. सारे धुंडाळा.' त्या मुलांना आनंद होतो. प्रथम ती मृतांच्या राज्यात जातात. कबरस्थानातून जातात. तेथे या दोन मुलांचे फारच बहारीचे संवाद. मरणाबद्दल मुलांच्या काय कल्पना असतात त्या सहजपणे मांडल्या आहेत. मालती विचारते, 'मेलेल्या माणसांना मुलेबाळे नसतात का ?' मधू म्हणतो, 'मेलेली मुले ती मेलेल्या माणसांची मुले.' किती साधे उत्तर !

कबरस्थानानंतर स्मृतीच्या प्रांताची सीमा लागते. ते शिरतात त्या प्रांतांत तेथे त्यांना आजोबा, आजी, मेलेली लहान भावंडे सारी भेटतात. मरताना ज्या वयाची असतात, त्याच वयाची ती सारी दिसतात. ते मृत आजोबा मधू व मालतीस म्हणतात, 'आम्ही आता अधिक म्हातारे होण्याचे बंद केले आहे. मरताना जेवढे होतो तेवढेच आहोत.' मेलेली भावंडे मरताना कोणी रांगणारी किंवा चालणारी जशी होती तशी दिसतात.

आजोबा व आजी सांगतात, 'आमची आठवण तुम्ही काढलीत की लगेच आम्ही जागी होतो. तोपर्यंत झोपून असतो. आमची नेहमी आठवण करीत जा.

वर्षातून दोन-चार वेळा तरी करा.' मॅटर्लिक सांगत आहे की जोपर्यंत माणसाची आठवण आपणास येते तोपर्यंत तो अमरच आहे. मृत्यूवर स्मरणाने विजय मिळवता येतो. मनुष्य जिवंत असूनही त्याची जर आपणास आठवणही होत नसेल, तर आपणापुरता तरी तो मेल्यासारखाच. याच्या उलट मृतांचे सारखे स्मरण होत असेल, तर ती मृत माणसे आपणाजवळ आहेतच. सुंदर व थोर कल्पना. आजी, आजोबा व मधू, मालती यांच्या या प्रसंगात मोठे मार्मिक संवाद आहेत. उत्कृष्ट स्वभावचित्रे आहेत. मधू खाण्यासाठी कसा अधीर होतो, भाजी अंगावर सांडून भाजून घेतो, वगैरे लहान मुलांचा अधीर स्वभाव दाखवला आहे. आजोबा व आजीला नातवंडे उंच झालेली पाहून कसा आनंद होतो, विशेषत: आजीला मालतीचे कसे कौतुक वाटते, ते सारे सहृदयतेने रंगवले आहे.

नंतर एक भीषण देखावा आहे. निळा पक्षी शोधीत मुले जातात. मधू तो हिरा त्या एका विवक्षित बाजूला फिरवतो. सारी झाडी-माडे, सारे पशु-पक्षी एकदम बंड करून उठतात. सर्वांतील जीव बाहेर पडतात. मनात साठवलेले त्यांचे विचार बाहेर पडतात. मानवेतर सृष्टीला मानवाविषयी काय वाटत असेल ते येथे दाखवले आहे. सारी मानवेतर सृष्टी मनुष्याला खाऊ की चावू असे करते. झाडे म्हणतात, 'हा मनुष्यप्राणी आम्हाला तोडतो, जाळतो, कापतो. दुष्ट आहे हा मनुष्य.' बकरे, मेंढे म्हणतात, 'हा मनुष्यप्राणी सारखा आम्हाला मारतो व खातो. दुष्ट आहे हा. माणसाला निळा पक्षी मिळता कामा नये. हा मनुष्यप्राणी सर्व सृष्टीचा स्वामी होऊ बघत आहे. सृष्टीची सर्व रहस्ये जाणू इच्छित आहे. तो निळा पक्षी त्याला मिळाला तर सारी रहस्ये त्याला कळतील. सर्व सृष्टीवर तो सत्ता गाजवील. प्रेमाची सत्ता नाही, तर सोट्याची सत्ता !'

'सर्वभक्षस्तु वायस:' असे आपण म्हणतो; परंतु 'सर्वभक्षस्तु मानव:' असे म्हटले तर किती यथार्थ होईल ! आपण स्वत:ला मानवेतर सृष्टीच्या अंतरंगी दवडू या. म्हणजे मानवांबद्दल त्या सृष्टीच्या काय कल्पना असतील ते कळेल. आपण पक्षांची शिकार करतो, पशु मारतो, मासे खातो. आपल्या पायांखाली लाखो किडेमुंग्या चिरडल्या जातात. आपले किती अपराध ! मानवाने केवढा कत्तलखाना उघडला आहे ! मानवेतर सृष्टीविषयी मानवाला आहे का प्रेम, आहे का आस्था ! मानवाला विजयाची हाव आहे. मानवेतर सृष्टीचा तो सम्राट होऊ इच्छितो. आपल्या इच्छेपुढे सर्व चराचर तो नमवू इच्छितो. सर्व मानवेतर सृष्टीला तो स्वत:ची दासी करू इच्छितो. मानवेतर सजीव निर्जीव सृष्टी आपले स्वातंत्र्य नष्ट होत आहे. म्हणून कशी मनात जळत

असेल त्याचे येथे चित्र आहे. मधू व मालती हे जणू मानवजातीचे दोन प्रतिनिधी. त्यांच्याविरुद्ध झाडेमाडे, पशुपक्षी बंड करतात. त्यांना मारू पाहतात; परंतु आयत्या वेळी प्रकाशराणी येते. हिरा दुसऱ्या बाजूस फिरवण्यात येतो. सारे आत्मे लपतात.

याच्यापुढे सुखाचे प्रवेश आहेत. विषयभोगांची सुखे प्रथम दाखवली आहेत. पंच विषयांची सुखे, खाना, पीना सुखसे सोना या प्रकारची सुखे ही सारी सुखे साकार केली आहेत. सारी सुखे पात्रे बनतात. ऐषआरामाचे सुख, सारखे खाण्याचे सुख, लोळण्याचे सुख, झोपण्याचे सुख. त्यांची मेजवानी चालली आहे. प्रकाशराणी मुलांना सांगते, 'खाऊ नका तेथे काही. खाल तर कर्तव्य विसराल.' थोर वाक्य. जो केवळ खाण्यापिण्याच्या आनंदात दंग झाला, त्याला कोठले उदात्त आनंद ! खाणे-पिणे हे एक साधन आहे. खाणे-पिणे हे काही जीवनाचे ध्येय नव्हे. जगून पुरुषार्थ करावा, जग आहे त्यापेक्षा सुंदर व खरे सुखी करावे, यासाठी खावयाचे. ती खाण्यापिण्याची गलेलठ्ठ सुखे मधू-मालतीस बोलावतात. मधू, मालती निरनिराळ्या सुखांची माहिती मिळवतात. एक सुख जरा थोडेसे विवस्त्र व अलसलुलित दिसते. मुले विचारतात, 'या सुखाचे नाव काय?' त्यांना सांगण्यात येते, 'या सुखाशी सध्या नको परिचय. तुम्ही लहान आहात.' मॅटर्लिंक सूचक आहे. सूचकतेने सारे समजावून देतो.

ही सारी सुखे जवळच्या दु:खाच्या दरीत शेवटी जायची आहेत असे दाखवले आहे. या सुखांच्या शेजारीच दु:खाचे घर आहे. फार खाणारा शेवटी आजारी पडणार ! रोग येणार ! आळशी शेवटी भुकेकंगाल होणार ! अति विषयी सर्वदा दैन्यवाणा होणार ! ही विषयसुखे शेवटी जीवनाची माती करतात. आरंभी गोड परंतु शेवटी विषोपम अशी ही सुखे असतात.

विषयाचे सुख द्वाड
येथे वाट बहु गोड
पुढे आहे अवघड
यत यातना ।। सीताराम राजाराम भज रे मना ।।

हेच मॅटर्लिंकही सांगत आहे.

या क्षुद्र सुखानंतर निर्मळ, पवित्र व उच्च आनंद प्रकट होतात. फारच सुहृदय व उदात्त आहे हा देखावा. कृतज्ञता, ज्ञान, उच्च प्रेम, पावित्र्य, अकपटपणा वगैरेंचे आनंद येथे भेटायला येतात. जीवनातील साधी साधी गोड सुखे येथे भेटतात. आपण सभोवती पाहू तर कितीतरी आनंद आहेत. पाहीना तो भिकारी, गवतावर सुंदर दवबिंदू

पडतात. ते मोत्यांसारखे दिसतात. ते पाहून दृष्टी सुखावते. सूर्योदय व सूर्यास्ताचे मनोहर शतरंगी देखावे. नद्या, झरे यांचे संगीत. गोड फुले, स्वच्छ हवेचा व स्वच्छ प्रकाशाचा आनंद. आई–बापांच्या व बहीण–भावांच्या प्रेमाचा आनंद. गोड बोलण्याचा आनंद. शेकडो आनंद देवाने दिले आहेत. निळे निळे अनंत आकाश, ते तारे, ते शीतल सुगंधी वारे, झिमझिम पाऊस, निळे निळे डोंगर, हिरवी हिरवी राने किती आनंद !

मनुष्याने जीवनाला कंटाळू नये. संसारात दु:खे आहेत; परंतु त्यांचा विसर पडावा म्हणून ईश्वराने अनंत आनंद सभोवती विखरून ठेवले आहेत. महान कवी रवींद्रनाथ नेहमी म्हणतात, 'सृष्टीतील अपार आनंद मी भरपूर लुटला. सृष्टी आनंदमय आहे.'

मॅटर्लिंकने हा प्रवेश अती कोमलतेने रंगवला आहे. ज्या वेळेस मातृप्रेमाचा आनंद भेटायला येतो, तेव्हा मधू–मालतीची मने उचंबळतात. ती मुले म्हणतात, 'आई, तू इतकी चांगली नसे दिसत. आता किती छान दिसतेस.' आपण प्रेमाच्या डोळ्यांनी पाहिले म्हणजे सारे गोड दिसते. मुलांना स्वत:ची माता कधी कुरूप का वाटते ? आईला शेंबडी मुलेही गोड वाटतात.

'स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमी रांगले.'

मुलांच्या अंगाची माती अंगाला लागली तर आईला धन्यता वाटते. डोळ्यात प्रेम ओता व मग सृष्टीकडे पाहा. सारी सृष्टी मंगल दिसेल. जशी दृष्टी तशी सृष्टी.

या प्रवेशानंतर निळा पक्षी शोधायला एका अज्ञात प्रदेशात ती मुले जातात. तो भविष्याचा प्रदेश असतो. येथे फारच गंमत आहे. भविष्यकाळात जन्मास येणारी कोट्यवधी मुले येथे असतात. निरनिराळ्या कोठड्यांतून पुढे जन्मास येणारी मुले साठवून ठेवलेली आहेत. निळी निळी मुले. काळपुरुष रोज पृथ्वीवर ठरावीक मुले जन्मण्यासाठी पाठवीत असतो. रोज उष:काल होताच हातात नोंदणीपुस्तक घेऊन म्हातारा काळपुरुष उभा राहतो. त्या त्या मुलांना तो हाक मारतो. येथे सारे ठरलेले असते. उद्या कोणी जन्मायचे, परवा कोणी, सारे ठरलेले. कुरकुर करता येत नाही. कोणाला जायची इच्छा नसते, तर कोणी त्यांची पाळी नसतानाही खाली पृथ्वीवर जाण्यास अधीर होतात. प्रत्येक जन्मणाऱ्या मुलाने बरोबर काहीतरी नेले पाहिजे. पृथ्वीवर रिकाम्या हातांनी कोणी जायचे नाही.

व्यक्तिवादाची मॅटर्लिंकने येथे थट्टा केली आहे की, खरोखरच गंभीरपणे तो व्यक्तिवाद मानतो ते समजायला कठीण आहे. युरोपात व्यक्तिवादाची एकोणिसाव्या शतकात चलती होती. प्रत्येक जीव काही विशिष्ट गुणधर्म बरोबर घेऊन येतो.

प्रत्येकाचा स्वधर्म वेगळा. प्रत्येकाच्या जीवनाचे निराळे रंग. कोणी डॉक्टर होईल, कोणी शेतकरी होईल. कोणी शास्त्रज्ञ, कोणी शिक्षक. 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' असे आपण म्हणतो.

मधू व मालती तो देखावा पाहतात. एक मुलगा म्हणतो, 'मी टोमॅटो भोपळ्याएवढे कसे करता येतील याचा शोध बरोबर घेऊन जात आहे.' दुसरा म्हणतो, 'मी एकाच झाडाला निरनिराळी फळे आणण्याचा प्रयोग बरोबर नेत आहे.' प्रत्येकजण काहीतरी सांगतो. जो कोणी आपल्याबरोबर काही घेणार नाही त्याला काळपुरुष दरडावतो.

मागणी तसा पुरवठा हे तत्त्व काळपुरुष अंमलात आणतो. पृथ्वीवर ज्या माणसांची जरूरी असेल ती पाठवण्यात येतात. काळपुरुष म्हणतो, 'गुराखी थोडेसेच पाहिजेत.' उद्योगधंदे वाढत आहेत. शेती कमी होत आहे. मग गुराखी फार कशाला ? मॅटर्लिकने एक भेदक वाक्य मध्येच घातले आहे. काळपुरुष म्हणतो, 'पृथ्वीवर प्रामाणिक मनुष्याचा एक नमुना मागण्यात आला आहे. एक येऊ दे पुढे प्रामाणिक मूल!' मानवी संस्कृतीवर केवढी ही टीका ! युरोपियन संस्कृतीवर केवढा हा प्रहार ! युरोपियन संस्कृती जगाचा व स्वत:चा संहार करीत आहे. जगावर साम्राज्य स्थापित आहे. दुसऱ्यांना मृतवत् करून स्वत:चे राजवाडे उठवीत आहे. सर्वत्र लुटालूट व मारामार, सत्ता व अहंकार. सत्याला व प्रेमाला स्थान नाही. प्रामाणिकपणा नष्ट झाला. पृथ्वीवर प्रामाणिकपणा नावालाही राहिला नाही का ?

इतक्यात मधू व मालतीस एक मुलगा भेटतो. तो म्हणतो, 'मी तुमच्या घरी जन्मणार आहे. तुमचा भाऊ होणार आहे. कसे आहे तुमचे घर ? खायला आहे ना पोटभर ?' मधू व मालती म्हणतात, 'आमचे घर काही वाईट अगदी नाही; परंतु तू बरोबर काय आणणार आहेस ?' तो मुलगा म्हणतो, 'मी देवी, गोवर वगैरे घेऊन येईन. त्यातच मरेन.' मधू व मालती म्हणतात, 'मग जन्मतोस तरी कशाला ?' तो मुलगा म्हणतो, 'येथे स्वत:ची इच्छा नसते.'

स्वत:ची इच्छा नसते म्हणजे सारे का ठरलेले आहे ? आपण का केवळ कळसूत्री बाहुली ? आपणास काही स्वातंत्र्य आहे की नाही ? आपणास ज्याची आवड असेल ते आपण करू या. परंतु काहीच करणार नाही, जन्मणार नाही, असे म्हणून चालणार नाही. तुम्हाला जन्मावे लागेल, कर्म करावी लागतील. फक्त कोणते कोणते काम करावयाचे ते तुम्ही पसंत करा. असा का याचा अर्थ ?

एक प्रेमी जोडपे असते. प्रियकराला खाली पाठवायचे असते. तो आधी जन्मणार. त्याला वाईट वाटते. प्रियकरीण जन्मली म्हणजे ती आपणाला ओळखणार कशी ? ती दोघे पृथ्वीवर कशी भेटणार ? त्यांना चिंता वाटते. ती एकमेकांना सोडीत नाहीत. शेवटी काळापुरुष दरडावतो. स्फुंदत स्फुंदत तो प्रियकर नावेत उतरतो.

पुन्हा यादी वाचण्यात येते. वर राहणारी मुले खाली जाणाऱ्यांना म्हणतात, 'पृथ्वीवर कसे काय आहे ते कळवा.' दुरून गोड आवाज येतात. मधू व मालती विचारतात, 'हे कसले आवाज ?' त्यांना उत्तर मिळते, 'मुलांची प्रतीक्षा करणाऱ्या प्रेमळ मातांची ती गाणी. येणाऱ्या बाळांचे स्वागत करणाऱ्या मातांची ती मंगल गीते आहेत !'

मधू व मालती पुन्हा आपल्या घराजवळ येतात. प्रकाशराणी त्यांना त्यांचं ते घर दाखवते. मुले पुन्हा आपापल्या छोट्या पलंगडीवर पहुडतात. त्यांना झोप लागते. कितीतरी उजाडले तरी मुले जागी होत नाहीत. त्यांची आई त्यांना उठवायला येते. ती म्हणतात, 'किती छान दिसते घर ! किती सुंदर रंग ! आई, तू किती छान दिसतेस आज! आम्ही आजोबा–आजी पाहिली. धाकटी मेलेली भावंडे पाहिली. मजा. आणि ते निळे पक्षी आणि ती निळी मुले ! आणि ते पशू व ती झाडे कशी अंगावर आली !' त्या आईला हे बोलणे समजत नाही. तिची दोनच मुले वाचलेली असतात. तिला भीती वाटते. तिला वाटते की, ही मुलेही मरणार की काय ? ती नवऱ्याला एकदम हाका मारते. तो म्हणतो, 'दोन तडाखे देतो म्हणजे जाईल यांचे वेड.'

इतक्यात ती शेजारची म्हातारी येते. तिची मुलगी अंथरुणाला खिळलेली असते. मधूजवळ एक पक्षी असतो. तो तिला पाहिजे असतो. त्याच्या ध्यासाने ती आजारी पडते. आपल्या मुलीसाठी तो पक्षी मागायला ती म्हातारी उजाडता येते. सणाचा मंगल दिवस; परंतु मधू व मालतीची आई शेजीबाईस म्हणते, 'आज मुले काहीतरीच बोलत आहेत. काय झाले कळत नाही. कोणाची पडली दृष्ट, कसली झाली बाधा ?' ती अनुभवी म्हातारी शेजीबाई म्हणते, 'बाधा काही नाही. स्वप्न असेल. चांदण्यात झोपले किंवा चांदणे अंगावर पडले तर असे होते. थोड्या वेळाने सारे ठीक होईल.'

मधूची आई त्याला म्हणते, 'मधू, तुझा पक्षी दे ना त्या मुलीला. ती बरी होईल.' मधू एकदम उठतो. तो आपला पिंजरा घेऊन येतो. तो आश्चर्याने म्हणतो, 'निळा पक्षी तर येथेच आहे. आपण उगीचच धुंडीत होतो.' ती परी म्हणाली,

'म्हाताऱ्या आईच्या मुलीसाठी आणा निळा पक्षी शोधून. घरातच पक्षी. शेजीबाई, हा घ्या पक्षी. द्या तुमच्या मुलीला.'

शेजारीणबाईचे हृदय कृतज्ञतेने ओथंबून येते. ती विचारते, 'खरेच का दिलास ? फुकट दिलास ? काही किंमत नको ?' मधू म्हणतो, 'खरेच दिला.' ती म्हातारी आनंदाने घरी जाते. तो पक्षी पाहून ती आजारी मुलगी एकदम उठते. तिचा आजार जातो. तो पक्षी हातात घेऊन ती धावत निघते. तिला एकदम उत्साह येतो, शक्ती येते. म्हाताऱ्या आईला तिच्याबरोबर जाता जाता दम लागतो. माय-लेकरे मधूकडे येतात. मधू त्या मुलीला विचारतो, 'त्याला खायला घातलेस का ? नसशील घातलेस.' मुलगी म्हणते, 'घालीन.' मधू म्हणतो, 'इकडे दे तो, त्याला कसे खायला घालावे ते मी दाखवतो.' मधू पक्षी ओढू लागतो. ती मुलगी साशंक होते. ती देत नाही. त्या ओढाताणीत शेवटी तो पक्षी उडून जातो. ती मुलगी रडू लागते. मधू तिची समजूत घालतो व म्हणतो, 'रडू नको. आपण पुन्हा पकडू. आपणाला पुढे त्याची जरूर पडेल. प्रेक्षकांनो, आमचा निळा पक्षी तुम्हा कोणाला सापडला तर द्या हो आणून.'

संपले नाटक. निळा पक्षी म्हणजे सुख ? सुखाचा शोध करू तसतसे ते दूरच आहे. म्हटले तर ते जवळ आहे, म्हटले तर लांब आहे. सुख हे शेवटी अंतरंगात आहे. सुख क्षणभर सापडल्यासारखे वाटते, परंतु लगेच नष्ट होते. सुख म्हणजे प्रकाश व छाया. खरे सुख शेवटी चित्ताच्या साम्यावस्थेत आहे. 'यद्यत्परवशं दुःखं । यद्यदात्मवशं सुखम' ही भगवान मनूंची व्याख्याच शेवटी खरी आहे. सुखाचा झरा शेवटी आपल्या हृदयात आहे. असे का मॅटर्लिकला सुचवायचे आहे ? का नेहमी मानव जातीने आणखी पुढे आणखी पुढे जात रहावे असे तो सुचवतो ?

असे हे गोड प्रतीकात्मक नाटक आहे. मधूजवळ शेजारची मुलगी त्याचा निळा पक्षी मागते. त्याच गोष्टी जणू त्याला स्वप्नात दिसतात. त्या स्वप्नात लेखकाने आणखी मनोहर प्रसंग मानवी समाज व संकृती यावर प्रकाश पाडणारे योजिले आहेत. सोपी भाषा, सहृदय व मार्मिक प्रसंग. मोठे मधुर आहे हे पुस्तक. मला ते अत्यंत आवडते. माझा हा अनुवाद मराठी वाचक गोड करून घेवोत अशी त्यांना प्रार्थना आहे. पुस्तक प्रकाशित केल्याबद्दल प्रकाशकांस धन्यवाद.

साने गुरुजी

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!'मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

मंगल प्रभात आणि इतर नाटके

₹ 280

200040 B107

e mail : riyapublications@gmail.com

रिया पब्लिकेशन्स

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स